बँक कर्मचाऱ्यांसाठी मराठी | COMMUNICATIVE MARATHI FOR BANK EMPLOYEES

# बँक कर्मचाऱ्यांसाठी मराठी



# COMMUNICATIVE MARATHI FOR BANK EMPLOYEES

लघु-अभ्यासक्रम / SHORT COURSE

BHARATI KELKAR
KRUTTIKA BHOSALE
SUHAS LIMAYE

UNIVERSITY OF MUMBAI
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

भारती केळकर / BHARATI KELKAR
कृत्तिका भोसले / KRUTTIKA BHOSALE
सुहास लिमये / SUHAS LIMAYE

# COMMUNICATIVE MARATHI FOR BANK EMPLOYEES
# बँक कर्मचाऱ्यांसाठी मराठी

**लघु-अभ्यासक्रम / SHORT COURSE**

**संपादक / Editor**

मेहेर भूत / MEHER BHOOT
विभा सुराणा / VIBHA SURANA
संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL
सोनाली गुजर / SONALEE GUJAR

**संकल्पना आणि निर्मिती / Concept and Production**

जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ / Department of German, University of Mumbai

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

**ISBN No.: 978-93-5407-519-3**
**First Edition : 2021**
**पहिली आवृत्ती : २०२१**

क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन - शेअर अलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये मुक्तपणे उपलब्ध
Published under Creative Commons Attribution - ShareAlike License (CC BY-SA 4.0)
https://creativecommons.org/licenses/by-sa/ 4.0/

- **प्रकल्प समन्वयक / Project Co-ordinator**
  विभा सुराणा / VIBHA SURANA
- **लेखक / Authors**
  भारती केळकर / BHARATI KELKAR
  कृत्तिका भोसले / KRUTTIKA BHOSALE
  सुहास लिमये / SUHAS LIMAYE
- **संपादक / Editor**
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR
- **संपादकीय मंडळ / Editorial Team**
  माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE
  गुरुनाथ कलमकर / GURUNATH KALAMKAR
- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **Layout Design / Photos / Typesetting**
  सौरभ भोसले / SAURABH BHOSALE
  देवेंद्र काळप / DEVENDRA KALAP
- **प्रकाशक / Publisher**
  मुंबई विद्यापीठ / University of Mumbai
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai
- **संकेतस्थळ / Website**
  www.rmvs.marathi.gov.in www.mu.ac.in https://www.learn-marathi.com
- **ई-पत्ता / E-mail Address :** rmvs_marathi@yahoo.com / deptofgerman@mu.ac.in

**TEXTBOOK WITH EXERCISES AND LINK FOR AUDIO & AUDIO-VISUAL LEARNING MATERIAL :** https://mu.ac.in/marathiforbanks

**INR 500 | ₹ ५००**

# Preface

*Communicative Marathi for Bank Employees* or Bankkarmacharyansaathi Marathi is a Marathi text cum workbook specially designed for bank employees working in the various banks in the state of Maharashtra. This book addresses a target group of non-native employees, who need to implement the language for the routine bank administration and to help them communicate with the customers and the native speakers. The aim of this book is to acquaint the officers with a working knowledge of specific Marathi vocabulary required for banks.

This book has been prepared using an integrated communicative approach and is intended for those who know and have accomplished the first two levels of Marathi. It thus dedicates itself to serve the sole purpose of teaching communicative Marathi to the non-native bank employees, with an emphasis on spoken Marathi.

The book consists of ten chapters, wherein a basic revision of the first two levels is done in the initial chapters. Each chapter deals not only with day to day situations faced by the employees, but also contains different text types which are required for communication and correspondence. The chapters also include communicative texts in authentic situations, pattern drills, grammar exercises, visuals, audio visual components and an overview of the vocabulary along with the meanings in English after the end of each unit. The list of vocabulary is specific to the context and highlights the usage. A final test has been included at the end to evaluate the language skills of the learners. Special efforts have been undertaken to integrate the communicative approach of learning so that the learners will be able to communicate in Marathi.

Though the book is meant for classroom teaching of approximately 60 teaching hours, self-learners too can make use of the book and the audio link. Keeping in mind the aim of the target learners, the focus is on enhancing the speaking, listening and understanding skills of the learners.

*Communicative Marathi for Bank Employees* has been designed after an extensive research carried out to meet the needs of the bank employees. The content and preparation of material of the book is created solely for teaching communicative Marathi.

This book has been prepared under the aegis of the innovative Marathi Language Teaching (MLT) project at the Department of German, University of Mumbai. Besides designing and preparing learning material for communicative Marathi for short courses for specific target groups like for nurses, rickshaw- and taxi-drivers, government employees and bank employees, this project has also developed structured courses for six levels of Marathi language proficiency for non-native speakers. The content for these levels is published as *My Marathi,* Levels 1 to 6 and includes a set of textbook, workbook, glossary and online links.

We are grateful to the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and the Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni for facilitating the smooth running of this project.

We appreciate and thank all those who have contributed in the making of this book.

Editors
Meher Bhoot, Vibha Surana, Sanjay Krushnaji Patil, Sonalee Gujar
2021

# आभार | Acknowledgements

Abhijeet Ranadive

Aditi Satam

Aditya Badle

Amit Varandekar

Anil Utpat

Ashish Sawant

Chetan Subhash Rasal

Disha Palkar

Geeta Bhagwat

Girissha Tilak

Madhura Gawande

Mohan Vispute

Neha Thombare

Nishka Pradhan

Pradnya Dalvi

Prakash Gole

Priyanka Katkar

Rajesh Wadekar

Ratik Sheikh

Rohit Chaubey

Sachin Suresh

Shweta Redkar

Tushar Ghate

Varsha Mane

Vinda Karandikar

- Special thanks for the permissions

Charuhas Pandit

Prabhakar Wadekar

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओळख | अभिवादन करणे<br>स्वत:चे नाव-गाव आणि पद सांगणे<br>इतरांचे विचारणे<br>अक्षरे ओळखणे<br>सोपे शब्द वाचणे आणि लिहिणे<br>जोडाक्षरे तयार करता येणे<br>१ ते २० अंक शिकणे<br>बँकेतील विभाग व त्यांची कामे यांबद्दल जाणून घेणे | स्वर-स्वरादी<br>व्यंजने<br>स्वरचिन्हे<br>जोडाक्षरे<br>शब्द<br>व्यक्तिवाचक सर्वनामे<br>सामान्य वर्तमानकाळ : असणे, नसणे | नमस्कार, नमस्ते, उद्या भेटू इ०<br>शाखाप्रबंधक, रोखपाल इ०, कर्ज विभाग, बचत विभाग इ०<br>प्रश्नशब्द : काय, कोण, कुठले / कुठल्या, कुठे | ११ |
| २ | दैनंदिन कामकाज | स्वत:ची खुशाली सांगणे आणि इतरांची विचारणे<br>२१ ते १,००,००० अंक शिकणे<br>वाजले किती? – वेळ विचारणे, सांगणे<br>बँकेच्या कामकाजाच्या वेळा सांगणे<br>खाते उघडणे<br>आज्ञा, सूचना, सल्ला देणे, विनंती करणे | साधा वर्तमानकाळ (इतर क्रियापदे)<br>अपूर्ण वर्तमानकाळ : लिखित आणि बोली भाषेतील क्रियापदांची रूपे<br>आज्ञार्थ आणि विध्यर्थ | बरा / बरी, ठणठणीत, मजेत इ०<br>धन्यवाद, आभारी आहे इ० खात्यांचे प्रकार<br>प्रश्नशब्द : कसे, कशा, कसा, कशी किती वाजले, किती वाजता? | ३८ |
| ३ | क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड | पासबुक, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड यांची माहिती देणे<br>पैसे काढणे, पैसे भरणे, चेक भरणे या व्यवहारांची माहिती देणे | साधा भूतकाळ, पूर्ण वर्तमानकाळ, अपूर्ण भूतकाळ<br>अव्यये / क्रियाविशेषणे : खाली, वर, अलीकडे-पलीकडे, विशेषणे : स्वच्छ, नीट, चांगला इ० | पैसे काढणे, पैसे भरणे, चेक भरणे कागदपत्रे, ग्राहक मेळावा | ६८ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ४ | नेट बँकिंग | ग्राहकांना नेट बँकिंग / मोबाईल बँकिंगची माहिती देणे<br>शक्यता, क्षमता यांविषयी बोलणे<br>इच्छा, गरज बोलून दाखवणे<br>रंग ओळखता येणे<br>संबंध, मालकी हक्क दाखवणे | पूर्ण भूतकाळ<br>षष्ठी विभक्तिप्रत्यय : माझा, तुमचा, चा, ची, चे ...<br>सामान्य रूपे | घरबसल्या बँकेचे व्यवहार, नेट बँकिंगचे फायदे हवं, पाहिजे क्रियापदे : साठवणे, पैसे गुंतवणे इ॰ सत्कार, रंगकाम हेलपाटे प्रश्नशब्द : कोण, कोणाचा | ९८ |
| ५ | मुदतठेवी, आवर्ती ठेवी | ग्राहकांना विविध ठेवींच्या प्रकारांची माहिती देणे<br>मुदतठेवींच्या प्रकारांविषयी माहिती देणे | साधा भविष्यकाळ : करेन, करू, करणार शिवाय, नंतर, साठी, करता इ॰ अव्ययांचा वापर | मुदतठेवी : तिमाही, सहामाही, वार्षिक, ज्येष्ठ नागरिक बचत योजना इ॰ आत्ता, आधी, सह इ॰ | १२४ |
| ६ | बँक लॉकरचे व्यवहार | लॉकर देणे<br>लॉकरच्या किल्लीचे महत्त्व समजावून सांगणे<br>'नॉमिनेशन' ची माहिती देणे, महत्त्व सांगणे | द्वितीया, चतुर्थी आणि तृतीया<br>विभक्तिप्रत्यय : ने, ई, शी, ला, ना आणि, किंवा, पण, कारण, म्हणून इ॰<br>उभयान्वयी अव्यये<br>जर-तर, सुद्धा, तरी, तरीसुद्धा या अव्ययांचा वापर<br>क्रियापद : लागणे | जोखीम, मुद्दाम, चौकशी, ऐवज, लॉकरची किल्ली, दमछाक, चिडचिड, वादविवाद, माघारी, नामनिर्देशन | १४४ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ७ | सण, उत्सव आणि भटकंती | महाराष्ट्रातील सण आणि उत्सव यांविषयी माहिती घेणे<br>महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीविषयी जाणून घेणे<br>महाराष्ट्रातील खेळांविषयी माहिती करून घेणे<br>प्रेक्षणीय ठिकाणांविषयी माहिती करून घेणे | भाववाचक नामे शिकणे<br>सप्तमी विभक्तिप्रत्यय : त, ई, आ | टाळाटाळ, भरभराट, प्रामाणिकपणा, सुरक्षितता, जबाबदारी, प्रोत्साहन इ॰ | १६७ |
| ८ | कर्ज प्रकरणे | बँकेच्या कर्जयोजनांची माहिती देणे<br>कर्जांच्या विविध प्रकारांविषयी माहिती देणे<br>प्रशिक्षणे, कार्यशाळा यांच्या उपयुक्ततेविषयी चर्चा करणे | 'ताना' प्रत्यय जोडून क्रियापदांचा वापर शिकणे<br>तुलनावाचक शब्द शिकणे<br>ऊन, हून विभक्तिप्रत्ययांचा वापर शिकणे | गृह कर्ज ठेवींवरील कर्ज, शेती आणि पूरक उद्योग इ॰ गहाणखत, सात बाराचा उतारा, पीक कर्ज पासून, पर्यंत, केव्हापासून, कुठपर्यंत | १९४ |
| ९ | कर्जवसुली | कर्जवसुलीचे महत्त्व<br>कर्जवसुलीतील अडचणींविषयी बोलणे<br>कर्जवसुलीचे अनुभव सांगणे<br>अनुत्पादित कर्जे आणि बुडीत कर्जे यांतील फरक समजावून सांगणे<br>ग्राहकांशी मराठीत संवाद साधण्याच्या फायद्यांविषयी बोलणे | जेव्हा-तेव्हा, जसा-तसा<br>क्रियापदांचा नामांसारखा वापर<br>शब्दयोगी पद '-मुळे'<br>क्रियापद : चालणे | अनुत्पादित कर्जे आणि बुडीत कर्जे कदाचित, बहुधा, एकंदरीत, नक्की ... पुरेसा-पुरता | २१६ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १० | निरोप | ताण आणि जोखीम यांविषयी बोलणे<br>बँक कर्मचाऱ्यांना होणारे आजार व त्यांवरील उपायांबद्दल चर्चा करणे<br>ग्राहकांचे नेहमीचे प्रश्न आणि अडचणी समजून घेऊन उपाय सुचवणे<br>निरोप देणे | -आयला, -आयचा प्रत्यय लावून क्रियापदांचा वापर शिकणे<br>संख्यावाचक विशेषणे : एकेक, अनेक, दुप्पट, तिप्पट इ॰ शिकणे संबोधन | कंबरदुखी, मधुमेह, पाठदुखी, मानदुखी इ॰<br>ओ भाऊ, ओ / अहो ताई इ॰<br>दुप्पट, तिप्पट, एकेक, निम्मा इ॰<br>अरेरे, ओहो, अरेच्चा | २४० |
| | दृक्‌श्राव्य | | | | २६३ |
| | बँकेतील नेहमीचे संवाद | | | | २७० |
| | परीक्षा | | | | २७६ |
| | उत्तरे | | | | २९० |
| | ध्वनिमुद्रित उतारे व संवाद यांचे प्रतिलेखन | | | | ३०८ |
| | शब्दसंग्रह | | | | ३१५ |

# ओळख ९












## चला, शिकू या...

- अभिवादन करणे
- स्वत:चे नाव-गाव आणि पद सांगणे, इतरांचे विचारणे
- अक्षरे ओळखणे
- सोपे शब्द वाचणे आणि लिहिणे
- जोडाक्षरे वाचता / लिहिता येणे
- १ ते २० अंक शिकणे
- बँकेतील विभाग व त्यांची कामे यांबद्दल जाणून घेणे
- व्यक्तिवाचक सर्वनामे वापरणे
- सामान्य वर्तमानकाळ शिकणे : असणे, नसणे
- प्रश्नशब्द वापरणे : काय, कोण, कुठले / कुठल्या, कुठे

## १ ओळख


**क. वाचू या.** **Read.**





नमस्कार. मी सुहास साबळे.
मी कोल्हापूरचा आहे आणि
स्टेशन रोड, कोल्हापूर शाखेचा
शाखाप्रबंधक आहे.

| | | |
|---|---|---|
| शिवकुमार शर्मा | : | नमस्कार, साबळेसाहेब. मी शिवकुमार शर्मा. आजपासून आपल्या बँकेत रुजू झालो आहे. |
| साबळे | : | मी कोल्हापूरचा आहे. तुम्ही कुठून आलात? |
| शिवकुमार | : | मी बनारसचा आहे. |
| साबळे | : | चला, सगळ्या स्टाफची ओळख करून घ्या. |








नमस्कार, मी उषा गायकवाड.
मी मुदतठेव विभाग सांभाळते.
मी कोल्हापूरची आहे.
आपलं नाव काय?




नमस्कार, मी किमया चौधरी.
मी कॅशिअर / रोखपाल आहे.

मी प्रशांत जेधे.
मी कर्जवसुली अधिकारी आहे.







मी संदीप चव्हाण. मी साताऱ्याचा आहे. मी क्लिअरिंग विभागप्रमुख आहे.




मी रत्ना मोकाशी.
मी कर्जविभागाचे काम सांभाळते.

मी सुभाष कदम. मी सुरक्षारक्षक आहे. मी आजरा गावचा आहे. / मी आजऱ्याचा.




**ख. जोड्या जुळवू या.** **Match the columns.**

| | |
|---|---|
| अ. तुमचं नाव काय? | १. मी आजरा गावचा आहे. |
| आ. तुम्ही कुठले? | २. मी शाखाप्रबंधक आहे. |
| इ. तुम्ही काय करता? | ३. मी रत्ना मोकाशी. |

उत्तरे :

| | |
|---|---|
| | |
| | |
| | |

**ग. आता स्वतःबद्दल लिहू या.** **Write about yourself.**

| | |
|---|---|
| अ. तुमचं नाव काय? | मी -------------. |
| आ. तुम्ही कुठले? | मी -------------चा / ची. |
| इ. तुम्ही काय करता? | मी ------------- आहे. |

नमस्कार / नमस्ते / हॅलो / हाय

| | |
|---|---|
| तुमचं नाव काय? / तुम्ही कोण? | माझं नाव ---------- . / मी ------- . |
| तुम्ही कुठले? | मी ----------चा / ची. |
| तुम्ही काय करता? | मी ---------- आहे. |

अच्छा / टाटा / उद्या भेटू / उद्या भेटू या

अ. अभिवादन : नमस्कार / ---------- / ---------- / ----------

आ. प्रश्न : ------------------------------------------

इ. उत्तर : ------------------------------------------

ई. प्रश्न : ------------------------------------------

उ. उत्तर : ------------------------------------------

ऊ. प्रश्न : ------------------------------------------

ए. उत्तर : ------------------------------------------



ॲ. निरोप घेणे : ------------ / टाटा / ------------ / ------------

## २ स्वर, स्वरादी आणि व्यंजने

क. ऐकू या आणि वाचू या. **Listen and read.**

स्वर :-

अ आ इ ई

उ ऊ ए ॲ ऐ

ओ ऑ औ

ऋ

स्वरादी :-

अं अः

व्यंजने :-

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व

श ष स

ह ळ (क्ष) (ज्ञ)

**ख. वाचू या.** **Read.**

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खॅ | खै | खो | खॉ | खौ | खं | खः |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गॅ | गै | गो | गॉ | गौ | गं | गः |
| घ | घा | घि | घी | घु | घू | घे | घॅ | घै | घो | घॉ | घौ | घं | घः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| च | चा | चि | ची | चु | चू | चे | चॅ | चै | चो | चॉ | चौ | चं | चः |
| छ | छा | छि | छी | छु | छू | छे | छॅ | छै | छो | छॉ | छौ | छं | छः |
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जॅ | जै | जो | जॉ | जौ | जं | जः |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झॅ | झै | झो | झॉ | झौ | झं | झः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ट | टा | टि | टी | टु | टू | टे | टॅ | टै | टो | टॉ | टौ | टं | टः |
| ठ | ठा | ठि | ठी | ठु | ठू | ठे | ठॅ | ठै | ठो | ठॉ | ठौ | ठं | ठः |
| ड | डा | डि | डी | डु | डू | डे | डॅ | डै | डो | डॉ | डौ | डं | डः |
| ढ | ढा | ढि | ढी | ढु | ढू | ढे | ढॅ | ढै | ढो | ढॉ | ढौ | ढं | ढः |
| ण | णा | णि | णी | णु | णू | णे | णॅ | णै | णो | णॉ | णौ | णं | णः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त | ता | ति | ती | तु | तू | ते | तॅ | तै | तो | तॉ | तौ | तं | तः |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थॅ | थै | थो | थॉ | थौ | थं | थः |
| द | दा | दि | दी | दु | दू | दे | दॅ | दै | दो | दॉ | दौ | दं | दः |
| ध | धा | धि | धी | धु | धू | धे | धॅ | धै | धो | धॉ | धौ | धं | धः |
| न | ना | नि | नी | नु | नू | ने | नॅ | नै | नो | नॉ | नौ | नं | नः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | पा | पि | पी | पु | पू | पे | पॅ | पै | पो | पॉ | पौ | पं | पः |
| फ | फा | फि | फी | फु | फू | फे | फॅ | फै | फो | फॉ | फौ | फं | फः |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बॅ | बै | बो | बॉ | बौ | बं | बः |
| भ | भा | भि | भी | भु | भू | भे | भॅ | भै | भो | भॉ | भौ | भं | भः |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे | मॅ | मै | मो | मॉ | मौ | मं | मः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | या | यि | यी | यु | यू | ये | यॅ | यै | यो | यॉ | यौ | यं | यः |
| र | रा | रि | री | रु | रू | रे | रॅ | रै | रो | रॉ | रौ | रं | रः |
| ल | ला | लि | ली | लु | लू | ले | लॅ | लै | लो | लॉ | लौ | लं | लः |
| व | वा | वि | वी | वु | वू | वे | वॅ | वै | वो | वॉ | वौ | वं | वः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शॅ | शै | शो | शॉ | शौ | शं | शः |
| ष | षा | षि | षी | षु | षू | षे | षॅ | षै | षो | षॉ | षौ | षं | षः |
| स | सा | सि | सी | सु | सू | से | सॅ | सै | सो | सॉ | सौ | सं | सः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | हा | हि | ही | हु | हू | हे | हॅ | है | हो | हॉ | हौ | हं | हः |
| ळ | ळा | ळि | ळी | ळु | ळू | ळे | ळॅ | ळै | ळो | ळॉ | ळौ | ळं | ळः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्ष | क्षा | क्षि | क्षी | क्षु | क्षू | क्षे | क्षॅ | क्षै | क्षो | क्षॉ | क्षौ | क्षं | क्षः |
| ज्ञ | ज्ञा | ज्ञि | ज्ञी | ज्ञु | ज्ञू | ज्ञे | ज्ञॅ | ज्ञै | ज्ञो | ज्ञॉ | ज्ञौ | ज्ञं | ज्ञः |

| तुमच्या माहितीसाठी... | |
|---|---|
| अशी बनतात अक्षरे | |
| क् + अ = क | क् + अॅ = कॅ |
| क् + आ = का | क् + ऐ = कै |
| क् + इ = कि | क् + ओ = को |
| क् + ई = की | क् + ऑ = कॉ |
| क् + उ = कु | क् + औ = कौ |
| क् + ऊ = कू | क् + अं = कं |
| क् + ए = के | क् + अ: = क: |

**ग. रिकाम्या जागी कंसातील योग्य अक्षर लिहू या.** **Fill in the blanks.**

(व, अ, ऐ, घे, से, आ, बँ, खा, ए, मी)

| | |
|---|---|
| अ. म् + ई = ------------ | ऊ. ब् + अॅ + अं = बँ |
| आ. प् + ------------ = पै | ए. क् + ------------ = क |
| इ. घ् + ए = ------------ | अॅ. स् + ए = ------------ |
| ई. ख् + आ = ------------ | ऐ. न् + ------------ = ना |
| उ. त् + ------------ = ते | ओ. व् + अ = ------------ |

**घ. वरील तक्त्यातील तयार झालेल्या अक्षरांपासून कोणते शब्द तयार होतात ते पाहू या.**
**Construct words by combining the above alphabets.**

उदा. मी, बँक, ------------, ------------, ------------, ------------,

**सराव** **Pattern drill**

| शिक्षक / शिक्षिका | शिक्षक / शिक्षिका |
|---|---|
| उदा. नमस्कार, माझं नाव सुहास साबळे. तुमचं नाव काय? | उदा. नमस्कार, माझं नाव सुहास साबळे. तुमचं नाव काय |
| **विद्यार्थी / विद्यार्थिनी** | **विद्यार्थी / विद्यार्थिनी** |
| तुमचं नाव काय? | नमस्कार, माझं नाव पीटर डिसुझा. |
| तुमचं नाव काय? | नमस्कार, माझं नाव ... |
| तुमचं नाव काय? | नमस्कार, माझं नाव ... |
| तुमचं नाव काय? | नमस्कार, माझं नाव ... |
| ... | ... |

| शिक्षक / शिक्षिका | शिक्षक / शिक्षिका |
|---|---|
| उदा. तुम्ही काय करता? | उदा. मी शिक्षिका आहे. |
| **शिक्षक / शिक्षिका** | **विद्यार्थी / विद्यार्थिनी** |
| तुम्ही काय करता? (रोखपाल) | मी रोखपाल आहे. |
| तुम्ही काय करता? (शिपाई) | मी शिपाई आहे. |
| तुम्ही काय करता? (शाखाप्रबंधक) | मी शाखाप्रबंधक आहे. |
| तुम्ही काय करता? (कर्जवसुली अधिकारी) | मी कर्जवसुली अधिकारी आहे. |
| तुम्ही काय करता? (क्लिअरिंग विभागप्रमुख) | मी क्लिअरिंग विभागप्रमुख आहे. |
| तुम्ही काय करता? (विद्यार्थी / विद्यार्थिनी) | मी विद्यार्थी / विद्यार्थिनी आहे. |

## ३ मी, आम्ही, तू, तुम्ही...

**क. वाचू या.** **Read.**

मी



मी मुंबईमध्ये राहते / राहाते.
मी मुंबईमध्ये आहे.

आम्ही



आम्ही मुंबईमध्ये राहतो.
आम्ही मुंबईमध्ये आहोत.

आपण



आपण मुंबईमध्ये राहतो.
आपण मुंबईमध्ये आहोत.

तू



तू कुठे राहतोस?
मी मुंबईमध्ये राहतो.

तुम्ही/आपण



तुम्ही / आपण कुठे राहतो
आम्ही मुंबईमध्ये राहतो.

तुम्ही/आपण



तुम्ही / आपण कुठे राहता?
मी मुंबईमध्ये राहतो.

तो



तो मुंबईमध्ये राहतो.
तो मुंबईमध्ये आहे.

ते



ते मुंबईमध्ये राहतात.
ते मुंबईमध्ये आहेत.

ती



ती कुठे राहते?
ती कुठे आहे?

त्या



त्या मुंबईमध्ये राहतात.
त्या मुंबईमध्ये आहेत.

ते



ते कुठे राहतं?
ते कुठे आहे?

ती



ती मुंबईमध्ये राहतात.
ती मुंबईमध्ये आहेत.

### ख. संवाद वाचू या. Read.

उषा : मी उषा गायकवाड. मी आपल्या बँकेत मुदतठेव विभागात काम करते. मी आणि किमया, आम्ही दोघी महालक्ष्मी कॉलनीत राहतो.

प्रशांत : मी प्रशांत जेधे. मी आणि साबळेसर, आम्ही दोघे कोल्हापूरचेच आहोत. आम्ही रंकाळ्याजवळ राहतो. आपण / तुम्ही कुठे राहता, शिवकुमार?

शिवकुमार : मी इथे नवीन आहे. मी आणि संदीपसर, आम्ही दोघे लक्ष्मी लॉजमध्ये राहतो. किमयामॅडम, आपण / तुम्ही कुठे राहता?

किमया : मी शिवाजी पुतळ्याजवळ राहते.

शिवकुमार : कदम, तू कुठे राहतोस?

कदम : मी शाहूपुरीत राहतो.

शिवकुमार : प्रशांत आणि रत्ना,
आपण / तुम्ही कुठे राहता?

रत्ना : मी बँक कॉलनीत राहते.

प्रशांत : मी शालिनी पॅलेसजवळ राहतो.



## सर्वनामे – Pronouns

| एकवचन | अनेकवचन / आदरार्थी |
|---|---|
| मी | आम्ही / आपण |
| तू | तुम्ही / आपण |
| तो | ते |
| ती | त्या |
| ते | ती |
| ती + ते | ते |
| तो + ती | |
| तो + ते | |

### ग. खालील संवाद वाचू या व त्यात आलेली सर्वनामे अधोरेखित करू या.
**Read and underline the pronouns.**

**बँकेतील दिवसाची सुरुवात**

साबळे : कदम, रत्ना मोकाशी अजून आल्या नाहीत का?

कदम : नाही, आज त्या येणार नाहीत.

साबळे : बरं, मग उषा गायकवाड आल्या का? त्या काय करताहेत?

कदम : साहेब, त्या आज उशिरा येणार आहेत.

साबळे : ठीक आहे. मग प्रशांत जेधे आलेत ना?

कदम : हो, ते आलेयत.




साबळे : बरं, मग जेध्यांना माझ्याकडे पाठव. आणि कदम, तुझा मुलगा पास झाला का? तो आता काय करतो?

कदम : हो, झाला ना तो बीए पास. तो आता नोकरी करतो. माझी मुलगीसुद्धा पास झाली साहेब. ती नोकरी शोधतेय.

साबळे : छान! छान! अभिनंदन, त्या दोघांचंही.

**घ. आता उदाहरणात दाखवल्याप्रमाणे खालील तक्ता पूर्ण करू या.** **Complete the table.**

| नामे (Nouns) | सर्वनामे (pronouns) |
|---|---|
| मोकाशीबाई | त्या |
| अ. गायकवाड | ------------------------ |
| आ. जेधे | ------------------------ |
| इ. मुलगा | ------------------------ |
| ई. मुलगी | ------------------------ |
| उ. मुलगा आणि मुलगी | ------------------------ |

**च. खालील वाक्यांमध्ये योग्य सर्वनामाचा उपयोग करून वाक्ये पूर्ण करू या.**
**Fill in the blanks using the correct pronoun.**

उदा॰ आपण बसावे अशी विनंती आहे.

अ. आज दुपारी दोन वाजता या --------------, तुमच्या खात्यात व्याज जमा करतो.

आ. -------------- नेहमी वेळेवर येऊन काऊंटर सुरू करते.

इ. गायकवाडबाई मुदतठेवींचे काम पाहतात. -------------- तुम्हाला व्याजाचे दर सांगतील.

ई. साबळेसाहेब हेडऑफिसला गेले आहेत. -------------- उद्या भेटतील.

उ. -------------- इथे आहेस तोपर्यंत मी जाऊन येतो.

ऊ. -------------- कामात आहात, -------------- नंतर बोलू.

ए. ग्राहक बँकेत ठेवी ठेवतात. -------------- आहेत म्हणून बँक चालते.


छ. वाचू या. Read.

तो

विभाग

ती

रांग

ते

पासबुक

तो


पैसा, ते पैसे

ती


बँक

ते


कर्ज

तो


संगणक

ती

खुर्ची


ते

टेबल

तो

दरवाजा

ती


शाखा

ते


खाते

## ४ कोणाचं काय काम आहे?

### क. ऐकू या आणि वाचू या. Listen and read.

| | | |
|---|---|---|
| शिवकुमार | : | साबळेसाहेब, आपण शाखाप्रबंधक आहात ना? |
| साबळे | : | हो. मी शाखाप्रबंधक आहे. |
| शिवकुमार | : | उषा गायकवाड, तुम्ही क्लिअरिंग विभागात आहात का? |
| उषा गायकवाड | : | नाही. मी मुदतठेव विभागात आहे. |
| शिवकुमार | : | रत्ना मोकाशी, आपण कर्जविभागाच्या प्रमुख आहात का? |
| रत्ना मोकाशी | : | हो, मी कर्जविभागाची प्रमुख अधिकारी आहे. |
| शिवकुमार | : | सुभाष कदम, तुम्ही शिपाई आहात का? |
| सुभाष कदम | : | नाही. मी सुरक्षारक्षक आहे. |
| शिवकुमार | : | आपल्या शाखेमध्ये शिपाई कोण आहेत? |
| सुभाष कदम | : | मंगला सातपुते ह्या शिपाई आहेत. |
| शिवकुमार | : | किमया आणि गौरव, तुम्ही कॅशिअर आहात का? |
| किमया आणि गौरव | : | हो, आम्ही दोघे कॅशिअर आहोत. |
| शिवकुमार | : | प्रशांत जेधे क्लिअरिंगचं काम पाहतात का? |
| साबळे | : | नाही. ते कर्जवसुलीचं काम पाहतात. |
| शिवकुमार | : | कदमांचा मुलगा इथे काम करणार आहे का? |
| साबळे | : | नाही, तो दुसरीकडे नोकरी करतो. |
| शिवकुमार | : | ती मुलगी बँकेत नवीन आहे का? |
| साबळे | : | हो, ती नवीन आहे. एक महिन्यापूर्वी ती रुजू झाली आहे. |

### सामान्य वर्तमानकाळ 'असणे' – Simple present tense 'to be'

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी आहे | आम्ही / आपण आहोत |
| तू आहेस | तुम्ही / आपण आहात |
| तुम्ही / आपण आहात | तुम्ही / आपण आहात |
| तो / ती / ते आहे | ते / त्या / ती आहेत |

### ख. सराव. Pattern drill.

अ. तुम्ही काय करता? (शिक्षिका) — मी शिक्षिका आहे.

आ. सुभाष काय करतो? (शिपाई) — तो ---------------------

इ. साबळे काय करतात? (शाखाप्रबंधक) — --------------------------

उ. जेधे काय करतात? (कर्जवसुली अधिकारी) — --------------------------

ऊ. तुम्ही काय करता? (क्लिअरिंग विभागप्रमुख) — --------------------------

ए. किमया काय करते? (रोखपाल) — --------------------------

### ग. नसणे.

सुभाष कदम, तुम्ही शिपाई आहात ना?

नाही. मी शिपाई नाही. मी सुरक्षारक्षक आहे.

### सामान्य वर्तमानकाळ 'नसणे' – Simple present tense 'not to be'

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी नाही | आम्ही / आपण नाही |
| तू नाहीस | तुम्ही / आपण नाही |
| तुम्ही / आपण नाही | तुम्ही / आपण नाही |
| तो / ती / ते नाही | ते / त्या / ती नाहीत |

**घ. बँकेतील विभाग व त्यांची कामे.**
**वाचू या व त्याखालील वाक्यांसमोर योग्य तो विभाग लिहू या.**

**Read and write the name of the correct department in the sentences below.**

**मुदतठेव विभाग**

ठेवी स्वीकारणे, ठेवीची मुदत वाढवणे, ठेवीवर कर्ज देणे

**कर्ज विभाग**

उपभोक्ता ऋण, गृहकर्ज, शेतीसाठी, जमिनीसाठी, उद्योगासाठी कर्ज मंजूर करणे

**बचत विभाग**

बचतखाते उघडणे व त्यासंबंधित विविध सेवा पुरवणे, खातेदारांना मागणीनुसार लॉकर्स देणे

**कर्जवसुली विभाग**

कर्जवसुलीवर नियंत्रण ठेवणे, बुडीत कर्जाबाबतीत योग्य ती कारवाई करणे

**चालू खाते / ओव्हरड्राफ्ट विभाग**

चालू खाते उघडून देणे, गरजेप्रमाणे ओव्हरड्राफ्ट मंजूर करणे

**क्लिअरिंग विभाग**

खातेदारांचे चेक क्लिअरिंगला पाठवणे आणि आलेले चेक पास करणे

**रोखीचे व्यवहार विभाग**

रोखपालांना तिजोरीतून रोख रक्कम देणे, त्याच्या नोंदी ठेवणे, रोख भरणा स्वीकारणे, रोख रक्कम देणे

अ. मला बचतखाते उघडायचे आहे. ------------------------------

आ. मला नवीन घरासाठी कर्ज काढायचे आहे. ------------------------------

इ. मला खात्यात चेक भरायचा आहे. ------------------------------

ई. मला लॉकर हवा आहे. ------------------------------

उ. मला कर्जाचा हफ्ता भरायचा आहे. ------------------------------




ऊ. मला ठेवीवर कर्ज हवे आहे. ------------------------------

ए. मला बँकेतून काही रोख रक्कम काढायची आहे. ______________________

**च. वाचू या.** Read.

तुमचे नाव काय? / तुम्ही कोण? – माझे नाव शिवकुमार. / मी शिवकुमार.
तुम्ही कुठले / कुठल्या? – मी बनारसचा.
तुम्ही कुठे राहता? – मी कोल्हापूरमध्ये / कोल्हापुरात राहतो.
तुम्ही काय काम करता? – मी बचत विभागाचा अधिकारी आहे.

**छ. मराठीतील प्रश्नशब्द 'क' च्या बाराखडीतील अक्षराने सुरू होतात. वरील वाक्ये वाचून त्यातील प्रश्नशब्द अधोरेखित करू या.**
Read the above sentences and underline the question words.

**ज. जोड्या जुळवू या.** Match the columns.

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १. काय? | अ. मुंबईत, दिल्लीत, चेन्नईमध्ये |
| २. कोण? | आ. रोखपाल, शाखाप्रबंधक, कर्जवसुली अधिकारी |
| ३. कुठले / कुठल्या? | इ. नागपूरची, बनारसचा, आसामची, कोचीचा |
| ४. कुठे? | ई. नाव, गाव, वस्तू |
| ५. काय काम / व्यवसाय? | उ. नाव |

**झ. योग्य प्रश्नशब्द वापरू या.** Use the correct question word.

अ. आपले -------------------- काम आहे?

आ. आपण -------------------- राहता?

इ. तुम्ही -------------------- आहात?

ई. तुमचे नाव -------------------- ?

उ. तू आज डब्यात -------------------- आणलंयस?

## ५ एक, दोन, तीन ...

ऐकू या आणि वाचू या. Listen and read.

| | | | |
|---|---|---|---|
| १ एक | ६ सहा | ११ अकरा | १६ सोळा |
| २ दोन | ७ सात | १२ बारा | १७ सतरा |
| ३ तीन | ८ आठ | १३ तेरा | १८ अठरा |
| ४ चार | ९ नऊ | १४ चौदा | १९ एकोणीस |
| ५ पाच | १० दहा | १५ पंधरा | २० वीस |

**क. खालील शब्द अंकात लिहू या.** Write the numbers in figures.

शून्य : ---------, एक : १, चार : ---------, सहा : ---------, सात : ---------,

आठ : ---------, नऊ : ---------, अकरा : ---------, चौदा : ---------,

पंधरा : ---------, सोळा : ---------, अठरा : ---------, एकोणीस : ---------

**ख. किती रुपये? लिहू या.** Read and write the correct answer.

 : एक रुपया

 : अ. ----- रुपये

 : आ. ------ -------

 : इ. ------ -------

 : ई. ------ -------

 : उ. ------ -------

 : ऊ. ------ -------

 : ए. ------ -------

 : ॲ. ------ -------

**ग. किती रुपये? लिहू या.** **Read and write the correct answer.**


= एक रुपया


= अ. --------- रुपया


= आ. --------- ---------


= इ. --------- ---------


= ई. --------- ---------

**तुमच्या माहितीसाठी...**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| + | : | बेरीज (२ अधिक २ = ४) | - | : | वजाबाकी (५ वजा ३ = २) |
| × | : | गुणाकार (४ गुणिले २ = ८) | ÷ | : | भागाकार (६ भागिले ३ = २) |
| = | : | बरोबर | | | |



## ६ जोडाक्षरे शिकू या. Combining consonants.

| क. जोडाक्षरे कशी लिहिली जातात ते पाहू या. Read. | | | | | | | | ख. याचप्रमाणे आता आपण लिहू या. Write. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अक्कल | – | क् | + | क | | = | क्क | अ. अब्ज – ------ + ------ = ब्ज |
| चप्पल | – | प् | + | प | | = | प्प | आ. स्वच्छ – ------ + ------ = ------ |
| गोष्ट | – | ष् | + | ट | | = | ष्ट | इ. बावन्न – ------ + ------ = ------ |
| फोल्डर | – | ल् | + | ड | | = | ल्ड | ई. डॉक्टर – ------ + ------ = ------ |
| पोस्ट | – | स् | + | ट | | = | स्ट | उ. प्रश्न – श् + ------ = ------ |
| **ग. वाचू या.** Read. | | | | | | | | **घ. याचप्रमाणे आता आपण लिहू या.** Write. |
| घड्याळ | – | ड् | + | या | | = | ड्या | अ. स्वाक्षरी – ------ + ------ = स्वा |
| विद्या | – | द | + | या | | = | द्या | आ. पेन्सिल – ------ + ------ = ------ |
| व्याज | – | व् | + | या | | = | व्या | इ. म्यानमार – ------ + ------ = ------ |
| किल्ली | – | ल् | + | ली | | = | ल्ली | उ. स्पॅनिश – ------ + ------ = ------ |
| कम्प्युटर | – | म् | + | प् | + युु | = | म्प्यु | ऊ. इंग्लिश – ------ + ------ = ------ |

| च. वाचू या. Read. | छ. याचप्रमाणे आता आपण लिहू या. Write. |
|---|---|
| ग्राहक – ग् + रा = ग्रा | अ. फ्रान्स – ------ + ------ = फ्रा |
| पत्र – त् + र = त्र | आ. वर्ष – ------ + ------ = ------ |
| चर्चा – र् + चा = र्चा | इ. मित्र – ------ + ------ = ------ |
| सूर्य – र् + य = र्य | ई. ट्रॅम – ------ + ------ = ------ |
| सुऱ्या – र् + य = ऱ्या | उ. कैऱ्या – ------ + ------ = ------ |

ज. खालील गोलातील योग्य अक्षर निवडू या आणि रिकाम्या जागी लिहू या.
Fill in the blanks using the correct alphabets.

ग्रा पै पा ठे
शि शा स्टा रो
का लॉ मॅ
पं ह
ने रा र

ग् + र् + आ = ग्रा

| | | |
|---|---|---|
| १. क् + आ = -------- | २. ह् + अ = -------- | ३. श् + इ = -------- |
| ४. र् + आ = -------- | ५. न् + ए = -------- | ६. श् + आ = -------- |

| | | |
|---|---|---|
| ७. प् + आ = -------- | ८. म् + ॲ = -------- | ९. प् + अं = -------- |
| १०. ल् + ऑ = -------- | ११. ठ् + ए = -------- | १२. र् + ओ = -------- |
| १३. र् + अ = -------- | १४. प् + ऐ = -------- | १५. स् + ट् + आ = -------- |

**झ. वरील अक्षरांपासून कोणते शब्द तयार होतात? शब्दांमधील गाळलेल्या जागा भरून शब्द पूर्ण करू या.** **Complete the word using the above alphabets.**

उदा. ग्राहक

अ. --------फ, आ. --------सा, इ. -------- --------जर, ई. --------ध--------,

उ. --------खा, ऊ. --------म, ए. --------क--------, ॲ. --------ख,

ऐ. --------व, ओ. -------- --------ई

**ट. ऐकू या आणि शब्द लिहू या.** **Listen and write.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. स्टेशन | अ. -------------- | ऊ. व्यवहार | ऊ. -------------- |
| आ. हस्ताक्षर | आ. -------------- | ए. सुट्टी | ए. -------------- |
| इ. तक्ता | इ. -------------- | ॲ. वस्तू | ॲ. -------------- |
| ई. स्वाक्षरी | ई. -------------- | ऐ. आधारकार्ड | ऐ. -------------- |
| उ. पत्र | उ. -------------- | ओ. कम्प्युटर | ओ. -------------- |

**ठ. ऐकू या व म्हणू या.** **Listen and speak aloud.**

| च | च | ज | ज | झ | झ |
|---|---|---|---|---|---|
| चपला | चमचा | जेवण | जप्ती | झेंडू | रिझर्व |
| चेहरा | चांगली | जास्त | जकात | झकास | झाड |
| चंद्र | चोरणे | जन्मतारीख | जमा | झेलणे | झटपट |
| चलन | चावी | ज्येष्ठ | जाणे | झुकझुक | झोपणे |
| चित्र | चालू | जनता | जमीन | झेंडा | झगडा |

दृष्टिक्षेप । Overview

| नामे | | |
|---|---|---|
| तो (पु॰)<br>ए॰व॰सा॰रू॰, अ॰व॰सा॰रू॰<br>(oblique forms) | ती (स्त्री॰)<br>ए॰व॰सा॰रू॰, अ॰व॰सा॰रू॰<br>(oblique forms) | ते (नपुं॰)<br>ए॰व॰सा॰रू॰, अ॰व॰सा॰रू॰<br>(oblique forms) |
| तो तक्ता, ते तक्ते<br>chart, table<br>तक्त्या-, तक्त्यां- | ती ओळख, त्या ओळखी<br>introduction<br>ओळखी-, ओळखीं- | ते अक्षर, ती अक्षरे / रं<br>consonant<br>अक्षरा-, अक्षरां- |
| तो सराव, ते-<br>practice<br>सरावा-, सरावां- | ती बँक, त्या बँका<br>bank<br>बँके-, बँकां- | ते अभिवादन, ती अभिवादने / नं<br>greeting<br>अभिवादना-, अभिवादनां- |
| तो शब्द, ते-<br>word<br>शब्दा-, शब्दां- | ती किल्ली, त्या किल्ल्या<br>key<br>किल्ली-, किल्ल्यां- | ते नाव, ती नावे / वं<br>name<br>नावा-, नावां- |
| तो पैसा, ते पैसे<br>money<br>पैशा-, पैशां- | ती चर्चा, त्या-<br>discussion<br>चर्चे-, चर्चां- | ते गाव, ती गावे / वं<br>place<br>गावा-, गावां- |
| तो फोल्डर, ते-<br>folder<br>फोल्डरा-, फोल्डरां- | ती स्वाक्षरी, त्या स्वाक्षऱ्या<br>signature<br>स्वाक्षरी-, स्वाक्षऱ्यां- | ते पद, ती पदे / दं<br>post<br>पदा-, पदां- |
| तो संगणक, ते-<br>computer<br>संगणका-, संगणकां- | ती गोष्ट, त्या गोष्टी<br>thing, story<br>गोष्टी-, गोष्टीं- | ते खाते / तं, ती खाती<br>account<br>खात्या-, खात्यां- |
| तो / ती ग्राहक, ते / त्या- *<br>customer<br>ग्राहका-, ग्राहकां- | ती पेन्सिल, त्या पेन्सिली<br>pencil<br>पेन्सिली-, पेन्सिलीं- | ते पत्र, ती पत्रे / त्रं<br>letter<br>पत्रा-, पत्रां- |
| तो विभाग, ते-<br>department, section<br>विभागा-, विभागां- | ती मुदतठेव, त्या मुदतठेवी<br>fixed deposit, time deposit<br>मुदतठेवी-, मुदतठेवीं- | ते व्याज-<br>interest<br>व्याजा- |
| तो / ती विभागप्रमुख, ते / त्या- *<br>head of the department<br>विभागप्रमुखा-, विभागप्रमुखां- | ती कर्जवसुली-<br>loan recovery<br>कर्जवसुली- | ते कर्ज, ती कर्जे / र्जं<br>loan<br>कर्जा-, कर्जां- |

| | | |
|---|---|---|
| तो / ती शिपाई, ते / त्या- *<br>peon<br>शिपाया-, शिपायां- | | ते बचत खाते / तं, ती बचत खाती<br>saving account<br>बचत खात्या-, बचत खात्यां- |
| तो / ती रोखपाल, ते / त्या- *<br>cashier<br>रोखपाला-, रोखपालां- | | ते चालू ते / तं, ती चालू खाती<br>current account<br>चालू खात्या-, चालू खात्यां- |
| तो / ती अधिकारी, ते / त्या- *<br>officer, officer in charge<br>अधिकाऱ्या-, अधिकाऱ्यां- | | ते पेन, ती पेने / नं<br>pen<br>पेना-, पेनां- |

*** these nouns are both masculine and feminine**

### क्रियापदे

असणे – to be    वाचणे – to read    ऐकणे – to listen, to hear

करणे – to do    लिहिणे – to write

### प्रश्नशब्द

काय – what    कोण – who    कुठे – where

कुठले / कुठल्या – from where

### इतर शब्द

उद्या – tomorrow    मध्ये – in

### शिष्टाचार शब्द

नमस्कार / नमस्ते – hello    अच्छा – ok / bye    टाटा – bye

उद्या भेटू – see you tomorrow

### नाम + क्रियापद जोड्या

माहिती देणे – to give information    अभिवादन करणे – to greet

रुजू होणे – to join the service or job

# २ दैनंदिन कामकाज









## चला, शिकू या...

- स्वत:ची खुशाली सांगणे आणि इतरांची विचारणे
- २१ ते १०० – १,००० – १०,००० – १,००,००० अंक शिकणे
- वाजले किती? : वेळ विचारणे, सांगणे
- बँकेच्या कामकाजाच्या वेळा सांगणे
- खाते उघडणे
- साधा वर्तमानकाळ शिकणे
- अपूर्ण वर्तमानकाळ शिकणे
- आज्ञा, सूचना, सल्ला देणे, विनंती करणे (आज्ञार्थ आणि विध्यर्थ)

## १ कसे आहात तुम्ही?

### क. खालील संवाद ऐकू या व वाचू या. Listen and read.

शिवकुमार : गुड मॉर्निंग, उषामॅडम.

उषा गायकवाड : शिवकुमार... सुप्रभात. कसे आहात? कसं चाललंय काम?

शिवकुमार : मी... मी फाईन. सॉरी, माझं मराठी जरा...

उषा गायकवाड : 'मी मजेत किंवा उत्तम' असं म्हणू शकता तुम्ही. आणि मराठीची काळजी करू नका. आता महाराष्ट्रात बदली झालीये म्हणजे हळूहळू शिकालच मराठी.



शिवकुमार : हो, ते आहेच. तुम्ही कशा आहात?

उषा गायकवाड : मी उत्तम.

शिवकुमार : उषामॅडम, तुम्हाला किती वर्षं झाली या शाखेत?

उषा गायकवाड : मला या वर्षी १० वर्षं होतील.

शिवकुमार : अरे वा! म्हणजे जुन्या एम्प्लॉयी आहात बँकेच्या.

उषा गायकवाड : माझ्यापेक्षा जुने म्हणजे आपले जेधेसर. ते गेली १२ वर्षं आहेत या शाखेत. त्यांची सेवानिवृत्ती आली आता जवळ.

शिवकुमार : सेवानिवृत्ती?

उषा गायकवाड : म्हणजे रिटायरमेंट.

शिवकुमार : काय म्हणता! जेधेसर साठीचे वाटत नाहीत.

उषा गायकवाड : ते त्यांच्या हसत्या-खेळत्या स्वभावामुळे.

शिवकुमार : बरं मॅडम, मला आपल्या ... राजारामपुरी शाखेचा फोन नंबर हवाय. कुठे मिळेल?

उषा गायकवाड : राजारामपुरी शाखेचा? घ्या लिहून. तेवीस, सदतीस, चव्वेचाळीस, नऊ.

शिवकुमार : काय काय काय??? जरा सावकाश, उषामॅडम.

उषा गायकवाड : बरं. सांगते पुन्हा. दोन, दोन वेळा तीन, सात, दोनदा चार आणि नऊ.

शिवकुमार : थँक्यू. आय मीन, आभारी आहे.

**थोडक्यात...**

- आपण / तुम्ही
  - कसे आहात?
  - कशा आहात?
- तू
  - कसा आहेस?
  - कशी आहेस?

| | |
|---|---|
| मी बरा / बरी आहे. | मी मस्त आहे. |
| मी ठणठणीत आहे. | मी मजेत आहे. |
| मी उत्तम आहे. | मी ठीक आहे. |

## ख. योग्य उत्तर निवडू या. Select the correct answer.

अ. तू कसा आहेस?

१. मी ठीक आहोत. ☐

२. मी ठीक आहेस. ☐

३. मी ठीक आहे. ☐

आ. सुची कशी आहे?

१. आम्ही ठीक आहोत. ☐

२. ती मजेत आहे. ☐

३. ती घरी नाही. ☐

इ. मानसी आणि रुपाली कशा आहेत?

१. ती उत्तम आहेत. ☐

२. ती उत्तम आहे. ☐

३. त्या मस्त आहेत. ☐

ई. नेत्रा आणि अभी, कसे आहात तुम्ही?

१. आम्ही मजेत आहोत. ☐

२. आपण मजेत आहोत. ☐

३. मी मजेत आहे. ☐

उ. पैसाहेब कसे आहेत आता?

१. तुम्ही ठीक आहात. ☐

२. ते ठीक आहेत. ☐

३. तो ठीक आहेस. ☐

ऊ. वैभव कसा आहे?

१. तुम्ही ठीक नाहीत. ☐

२. ती ठीक नाहीस. ☐

३. तो ठीक नाही. ☐

ग. ऐकू या आणि वाचू या. Listen and read.

१ ते ५० अंक

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ११ | अकरा | २१ | एकवीस | ३१ | एकतीस | ४१ | एक्केचाळीस |
| २ | दोन | १२ | बारा | २२ | बावीस | ३२ | बत्तीस | ४२ | बेचाळीस |
| ३ | तीन | १३ | तेरा | २३ | तेवीस | ३३ | तेहेतीस | ४३ | त्रेचाळीस |
| ४ | चार | १४ | चौदा | २४ | चोवीस | ३४ | चौतीस | ४४ | चव्वेचाळीस |
| ५ | पाच | १५ | पंधरा | २५ | पंचवीस | ३५ | पस्तीस | ४५ | पंचेचाळीस |
| ६ | सहा | १६ | सोळा | २६ | सव्वीस | ३६ | छत्तीस | ४६ | सेहेचाळीस |
| ७ | सात | १७ | सतरा | २७ | सत्तावीस | ३७ | सदतीस | ४७ | सत्तेचाळीस |
| ८ | आठ | १८ | अठरा | २८ | अठ्ठावीस | ३८ | अडतीस | ४८ | अठ्ठेचाळीस |
| ९ | नऊ | १९ | एकोणीस | २९ | एकोणतीस | ३९ | एकोणचाळीस | ४९ | एकोणपन्नास |
| १० | दहा | २० | वीस | ३० | तीस | ४० | चाळीस | ५० | पन्नास |

घ. कोणता अंक ऐकला? त्याभोवती गोल करू या. Listen and circle the number.

अ. १८ ११ १७

आ. २१ १९ ३१

इ. ३४ २४ १४

ई. २९ ३९ ४९

उ. ३७ ३६ ३८

**तुमच्या माहितीसाठी...**

अंक असे शिका

२ १

एकवीस

च. ऐकू या व वाचू या. Listen and read.

५१ ते १०० अंक

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | एक्कावन्न | ६१ | एकसष्ट | ७१ | एक्काहत्तर | ८१ | एक्क्याऐंशी | ९१ | एक्क्याण्णव |
| ५२ | बावन्न | ६२ | बासष्ट | ७२ | बहात्तर | ८२ | ब्याऐंशी | ९२ | ब्याण्णव |
| ५३ | त्रेपन्न | ६३ | त्रेसष्ट | ७३ | त्र्याहत्तर | ८३ | त्र्याऐंशी | ९३ | त्र्याण्णव |
| ५४ | चोपन्न | ६४ | चौसष्ट | ७४ | चौऱ्याहत्तर | ८४ | चौऱ्याऐंशी | ९४ | चौऱ्याण्णव |
| ५५ | पंचावन्न | ६५ | पासष्ट | ७५ | पंचाहत्तर | ८५ | पंचाऐंशी | ९५ | पंचाण्णव |
| ५६ | छप्पन्न | ६६ | सहासष्ट | ७६ | शहात्तर | ८६ | शहाऐंशी | ९६ | शहाण्णव |
| ५७ | सत्तावन्न | ६७ | सदुसष्ट | ७७ | सत्त्याहत्तर | ८७ | सत्त्याऐंशी | ९७ | सत्त्याण्णव |
| ५८ | अठ्ठावन्न | ६८ | अडुसष्ट | ७८ | अठ्ठ्याहत्तर | ८८ | अठ्ठ्याऐंशी | ९८ | अठ्ठ्याण्णव |
| ५९ | एकोणसाठ | ६९ | एकोणसत्तर | ७९ | एकोणऐंशी | ८९ | एकोणनव्वद | ९९ | नव्व्याण्णव |
| ६० | साठ | ७० | सत्तर | ८० | ऐंशी | ९० | नव्वद | १०० | शंभर |

छ. दूरध्वनी / मोबाईल क्रमांक विचारू या. Ask telephone number / mobile number.



**तुमच्या माहितीसाठी...**

**अंक असे बनतात**

१०० पुढील संख्या लिहिताना अशा प्रकारे लिहितात :

१०१ – एकशे एक, १०२ – एकशे दोन, ... ९९९ – नऊशे नव्व्याण्णव

त्यापुढे...

१,००० – एक हजार    १,००,००० – एक लाख / एक लक्ष

१०,००० – दहा हजार    १०,००,००० – एक दशलक्ष / दहा लाख

१,००,००,००० – एक कोटी

**ज. खालील संख्या वाचू या आणि अक्षरांत लिहू या.** **Read and write the numbers in words.**

उदा॰ १,७१३ : एक हजार सातशे तेरा

अ. १,०१२ : ----------------------------------------

आ. ५,५२५ : ----------------------------------------

इ. २९१ : ----------------------------------------

ई. १०,४१९ : ----------------------------------------

उ. ११,४४,३५५ : ----------------------------------------

**झ. खाली अक्षरांत दिलेल्या संख्या अंकात लिहू या.** **Write the numbers in figures.**

उदा॰ सहाशे त्रेपन्न : ६५३

अ. दोन हजार नऊशे एकोणनव्वद : --------------------

आ. अठरा हजार तीनशे एकोणतीस : --------------------

इ. पन्नास हजार सतरा : --------------------

ई. त्र्याहत्तर लाख एक्याऐंशी : --------------------

उ. एक कोटी सत्तावन्न लाख आठशे चाळीस : --------------------

### ट. संवाद मोठ्याने वाचू या. Read the conversation aloud.

साबळे : शिवकुमार, हा एक अहवाल आला आहे क्षेत्रीय कार्यालयाकडून. तो जरा वाचून दाखवा बरं.

शिवकुमार : कोल्हापूर क्षेत्रात आपल्या बँकेच्या एकूण २४० शाखा आहेत. त्यातल्या शहरी १०९ आणि ग्रामीण १३१ शाखा आहेत. या वर्षात ५ शाखा नवीन उघडणार आहेत. त्यापैकी २ शहरी भागात आणि ३ ग्रामीण भागात उघडणार आहेत. एकूण शाखांपैकी ग्रामीण भागातील २५ शाखांना या वर्षी नफा झाला नाही. तसेच शहरी शाखांपैकी १८ शाखांना तोटा झाला. कारण त्यांची एकूण ५९० कोटींची अनुत्पादित कर्जे बुडीत खात्याला वर्ग केली. या वर्षीचा कोल्हापूर क्षेत्राचा एकूण नफा १०१२ कोटी इतका आहे. पुढच्या वर्षासाठी आपल्या क्षेत्राचा संकल्पित नफा १५०० कोटी इतका असणार आहे.

### ठ. खालील संवाद वाचू या. Read.




साबळे : शिवकुमार, कॅशिअरला तिजोरीतून कॅश काढून द्या. म्हणजे ते काम सुरू करतील. रजिस्टरला कॅश दिल्याच्या नोंदी करा. आज पेन्शनचा दिवस आहे म्हणून जास्त कॅश द्या. मला नोंदी दाखवा.

शिवकुमार : सर, हे बघा रजिस्टर. सर, कम्प्युटरवर टॅली करतो ना आपण?

साबळे : हो, बरोबर आहे. पण या रजिस्टरमध्ये लिहिणं महत्त्वाचं आहे. एक रेकॉर्ड म्हणून. दोन्ही कॅशिअरांच्या सह्या घेतल्या?

शिवकुमार : हो, सर.

| किमया चौधरी | गौरव साळुंके |
|---|---|
| २००० x २०० = ४,००,००० | २००० x २०० = ४,००,००० |
| ५०० x १००० = ५,००,००० | ५०० x १००० = ५,००,००० |
| १०० x १००० = १,००,००० | १०० x १००० = १,००,००० |
| एकूण = १०,००,००० | एकूण = १०,००,००० |
| सही : | सही : |

| संख्या | अक्षरांत संख्या |
|---|---|
| अ. ४७८३ | १. दहा हजार नऊ |
| आ. १,८९,५७० | २. तेरा हजार नऊशे सत्तावीस |
| इ. १३,९२७ | ३. तीनशे एकोणपन्नास |
| ई. १,००,६६,६०० | ४. चार हजार सातशे त्र्याऐंशी |
| उ. ९९९ | ५. एक कोटी सहासष्ट हजार सहाशे |
| ऊ. ८४८५ | ६. एक लाख एकोणनव्वद हजार पाचशे सत्तर |
| ए. १०,००९ | ७. नऊशे नव्याण्णव |
| ॲ. ३४९ | ८. आठ हजार चारशे पंचाऐंशी |

उत्तरे

| | |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

## २ कोण काय करतं?

**क. वाचू या.** Read.

शिवकुमार – स्नेहा, तुम्ही काय करता?

स्नेहा – मी कम्प्युटर ऑपरेटर आहे. मी सर्व व्यवहारांच्या नोंदी करते.

शिवकुमार – गौरव, तुम्ही इथे काय करता?

गौरव – मी रोखपाल आहे. मी रोख भरणा स्वीकारतो आणि रोख पैसे देतो.

शिवकुमार – गायकवाडमॅडम, तुम्ही?

गायकवाड – मी अधिकारी आहे. मी मुदतठेवींचे काम बघते.

### साधा वर्तमानकाळ

**ख. खालील तक्ता पूर्ण करू या.** Complete the table.

| सर्वनामे | करणे<br>करणे | बघणे<br>बघणे | देणे<br>देणे |
|---|---|---|---|
| मी | करतो / करते | ------------------- | ------------------- |
| आम्ही / आपण | करतो | ------------------- | ------------------- |
| तू | करतोस / करतेस | ------------------- | ------------------- |
| तुम्ही / आपण | करता | बघता | ------------------- |
| तो | करतो | ------------------- | देतो |
| ती | करते | ------------------- | ------------------- |
| ते | करते / करतं | ------------------- | ------------------- |
| ते / त्या / ती | करतात | ------------------- | ------------------- |

**ग. खालील वाक्यांमध्ये क्रियापदाची योग्य रूपे लिहू या.** Write the correct forms of the verbs.

अ. मी बँकेत शाखाप्रबंधक पदावर काम (करणे) -------------------.

आ. शिवकुमार बचत विभागाचे काम (बघणे) -------------------.

इ. ते आमचे ग्राहक (असणे) -------------------.

ई. रत्ना मोकाशी कर्जाची माहिती ग्राहकांना (सांगणे) -------------------.

उ. शाखाप्रबंधक साबळे शिवकुमारला त्याचे टेबल (दाखवणे) -------------------.

ऊ. ग्राहक (अ.व.) नियम (वाचणे) -------------------.

**घ. सराव. उदाहरणाप्रमाणे प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

**Answer the questions as shown in the example.**

उदा॰ तुम्ही काय करता? (बँकेत काम करणे) मी बँकेत काम करतो / करते.

अ. तुम्ही काय करता? (बँकेत मुदतठेवींचे काम बघणे)

आ. तू काय करतेस? (बँकेत व्यवहारांच्या नोंदी करणे)

इ. तू काय करतोस? (बँकेत रोख पैसे देणे)



ई. तो काय करतो? (बँकेत रोख पैसे स्वीकारणे)

उ. त्या काय करतात? (बँकेत ग्राहकांना मदत करणे)

ऊ. ते काय करतात? (बँकेत ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरे देणे)

ए. आपण काय काम करता? (बँकेच्या सर्व कामकाजावर लक्ष ठेवणे)

**च. खालील कवितेमध्ये 'लपणे' ह्या क्रियापदाचे योग्य रूप लिहून कविता पूर्ण करू या.**

**Write the correct forms of the verb 'लपणे'.**

**लपंडाव**

कळीमध्ये ------------- (ते) फूल; फुलामध्ये ------------- (ती) बी;
बियांमध्ये ------------- (ते) झाड; नारळामध्ये ------------- (तो) माड.
दर्यामध्ये ------------- (तो) ढग; ढगामध्ये ------------- (ती) नदी;
नदीमध्ये ------------- (ते) पाणी; गळ्यामध्ये ------------- (ते) गाणी (अ॰ व॰).
या खेळाचे सांगा नाव : 'लपंडाव! लपंडाव!'

- विंदा करंदीकर
(कवितासंग्रह : सशाचे कान)

## ३ किती वाजले?

### क. खालील संवाद वाचू या. Read.

मॅनेजर साबळे : शिवकुमार, ह्या कार्यक्रमाचा वृत्तांत आपल्याला आपल्या मुख्य कार्यालयाला कळवायचा आहे. मी सांगतो तशी ई-मेल तुम्ही लिहा. काय, जमेल ना?

शिवकुमार : हो, सर, प्रयत्न करतो. सांगा सर.

साबळे : उद्या सांगतो. आज खूप उशीर झाला आहे. किती वाजले आहेत?

शिवकुमार : सिक्स थर्टी, सर.

साबळे : म्हणजे साडेसहा. कधी शिकणार तुम्ही मराठी आकडे? उद्या बँक किती वाजता सुरू होणार?

शिवकुमार : सर, दहा वाजता. बरोबर?


साबळे : शाब्बास! आपटेसाहेबांबरोबर आपली मीटिंग किती वाजता आहे?

शिवकुमार : इलेव्हन थर्टी म्हणजे साडेअकरा वाजता. आणि साडेएक वाजता कर्जवसुलीला जायचंय.

साबळे : साडेएक म्हणत नाहीत. दीड म्हणतात.

शिवकुमार : हो. आणि मग अडीच वाजता जेवायची सुट्टी ना?

साबळे : अगदी बरोबर. ठीक आहे. उद्या भेटू.





सव्वा वाजला



अडीच वाजले



सव्वापाच वाजले



दीड वाजला



साडेपाच वाजले



पावणेसहा वाजले

**ख. किती वाजले आहेत, ते लिहू या.** **What’s the time?**



एक वाजला



दोन वाजले



अ. ---------------



आ. ---------------



इ. ---------------



ई. ---------------



उ. ---------------



ऊ. ---------------

**ग. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे किती वाजले आहेत ते लिहू या.**

**Write as shown in the example.**

| | | |
|---|---|---|
| उदा० |  | सव्वाबारा वाजले आहेत.<br>सव्वाबारा झाले आहेत.<br>बारा वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. |
| अ. |  | पावणेपाच वाजले आहेत.<br>--------------------------------------------<br>पाच वाजायला पंधरा मिनिटे बाकी आहेत. |
| आ. |  | --------------------------------------------<br>--------------------------------------------<br>-------------------------------------------- |
| इ. |  | --------------------------------------------<br>--------------------------------------------<br>-------------------------------------------- |
| उ. |  | दीड वाजला आहे.<br>--------------------------------------------<br>एक वाजून तीस मिनिटे झाली आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ऊ. |  | |
| ए. |  | |
| ॲ. |  | |
| ऐ. |  | |

### घ. बँकेच्या कामकाजाच्या वेळा

**अ. ऐकू या व योग्य पर्याय निवडू या.** **Listen and select the correct option.**

**किती वाजता?**



१. बँक ---------------ला उघडते.

क. ९.१५ ख. ८.४५ ग. ९.३०

२. बँकेचे काऊंटर --------------- पर्यंत असतात.

क. ३.३० ख. ३.१५ ग. ३.००

३. बँकेतील जेवणाच्या सुट्टीची योग्य वेळ कोणती?

क. १.०० ते १.३० ख. १.३० ते २.०० ग. १.०० ते २.००

४. थोरातबाईंच्या मुलीच्या शाळेची बस तिला किती वाजता बँकेजवळ सोडते?

क. ४.१५ वाजता ख. ४.४५ वाजता ग. ३.४५ वाजता

५. खालीलपैकी योग्य पर्याय कोणता?

क. दर शनिवारी बँकेला सुट्टी असते.

ख. महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी बँक ९.३०ला उघडते.

ग. महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी बँक अर्धा दिवस चालू असते.

तुमच्या माहितीसाठी




## आ. खालील उताऱ्यामध्ये वेळा अक्षरात लिहिल्या आहेत त्या अंकात लिहू या.

**Write the time in digits.**



शिवकुमार त्याच्या आईला आणण्यासाठी रेल्वेस्थानकावर बरोबर (१) --------------- दीड वाजता पोहोचला. ट्रेन (२) --------------- पावणेदोन वाजता येणार होती. पण (३) ------------- एक चाळीसला रेल्वेची उद्‌घोषणा झाली की ट्रेन (४) --------------- तीस मिनिटे उशिरा येणार आहे' म्हणजे (५) --------------- सव्वादोनला. "अरे बाप रे! मी तर (६) --------------- अडीच वाजता त्या थोरातबाईंना नवीन खाते उघडण्यासाठी बोलावले आहे. कसा पोहोचणार मी वेळेवर?" शिवकुमार मनाशीच म्हणाला. त्याने (७) --------------- दोन पंचवीसला साबळेसाहेबांना फोन करून सगळी कल्पना दिली. ट्रेन (८) --------------- दोन वाजून पन्नास मिनिटांनी आली. त्याने आईला उतरवून घेतले आणि रिक्षाने घरी नेले. तोपर्यंत (९) --------------- चार वाजून पंधरा मिनिटे झाली होती. तो घरून लगेच बँकेत जायला निघाला आणि (१०) --------------- पंधरा मिनिटांत म्हणजे (११) --------------- साडेचारला बँकेत पोहोचला.

इ. खाली वेगवेगळ्या वेळा दिल्या आहेत. त्या वेळांना तुम्ही कामाच्या दिवशी काय करता आणि सुट्टीच्या दिवशी काय करता ते लिहू या.

Write what do you do at home and in the bank at the given time.

| वेळ | बँकेत | घरी |
|---|---|---|
| उदा. दु. १.३० वाजता | बँकेत थंडगार डबा खातो / खाते. | घरी गरमागरम जेवतो / जेवते. |
| अ. सकाळी सव्वासहा वाजता | ------------------------ ------------------------ | ------------------------ ------------------------ |
| आ. सकाळी साडेनऊ वाजता | ------------------------ ------------------------ | ------------------------ ------------------------ |
| इ. दुपारी अडीच वाजता | ------------------------ ------------------------ | ------------------------ ------------------------ |
| ई. दुपारी साडेचार वाजता | ------------------------ ------------------------ | ------------------------ ------------------------ |
| उ. संध्याकाळी पाच वाजता | ------------------------ ------------------------ | ------------------------ ------------------------ |
| ऊ. रात्री साडेदहा वाजता | ------------------------ ------------------------ | ------------------------ ------------------------ |

**उत्तरासाठी चौकटीत दिलेल्या वाक्यांची मदत घेऊ या किंवा स्वतंत्र वाक्येही लिहू शकता.**

झोपेतून उठणे, उशिरापर्यंत झोपणे, उठून व्यायाम करणे, लांब फिरायला जाणे, मित्रांबरोबर चहा पिणे, बबनचा चहा येणे, भरपूर नाश्ता करणे, घरातली कामे करणे, बँकेतले काम चालू होणे, कर्जवसुलीच्या कामाला निघणे, दुसऱ्या दिवशीच्या कामांचा आराखडा करणे, बँकेत कामाची आवराआवर करणे, गाणी ऐकणे, सिनेमाला जाणे, बहिणीला फोन करणे, आईबरोबर गप्पा मारणे, झोपणे ...

## ४ बँकेत खातं उघडायचंय?

**क. खालील संवाद वाचू या व खालील तक्ता पूर्ण करू या.**
**Read and complete the table.**

ग्राहक : नमस्कार. मला बँकेत खातं उघडायचंय.

शिवकुमार : या. बसा. कशासाठी उघडायचंय खातं?

ग्राहक : मला खात्यात चेक भरायचे आहेत.

शिवकुमार : नाव काय आपलं?

ग्राहक : श्याम कांबळे.

शिवकुमार : काय करता आपण?

ग्राहक : मी स्टेशनरीचं एक दुकान सुरू केलंय. त्यामुळे रोजची जमा रक्कम खात्यात भरायची आहे.

शिवकुमार : मग तुम्ही करंट अकाऊंट म्हणजे चालू खातं उघडा. कारण तुमच्यासाठी ते सोयीचं आहे. हा फॉर्म भरा.

ग्राहक : अजून कोणती कागदपत्रं लागतील?

शिवकुमार : आधार कार्ड, पॅन कार्ड, तुमच्या व्यवसायाच्या जागेची कागदपत्रं आणि दोन फोटो घेऊन या. उद्या आपण तुमचं खातं उघडू.

| संवादातील क्रियापदाचे रूप | मूळ क्रियापद | संवादातील क्रियापदाचे रूप | मूळ क्रियापद |
|---|---|---|---|
| ---------------------- | बसणे | ---------------------- | भरणे |
| ---------------------- | उघडणे | ---------------------- | येणे |

वरील संवादामध्ये आलेली क्रियापदाची रूपे सूचना किंवा आज्ञा करण्यासाठी वापरली जातात.

| तुमच्या माहितीसाठी... |
|---|
| औपचारिक / अनौपचारिक |
| • बँकिंग क्षेत्रात ग्राहकांना बहुतांशी औपचारिकरित्याच संबोधले जाते.<br>उदा॰ या, बसा, हा फॉर्म भरा<br>• त्यातूनही समोरच्या व्यक्तीशी असलेले नाते आणि जवळीक यावर संबोधन औपचारिक की अनौपचारिक हे ठरते. |

**थोडक्यात -**

| | तू | | तुम्ही | |
|---|---|---|---|---|
| | होकारात्मक | नकारात्मक | होकारात्मक | नकारात्मक |
| भरणे | भर | भरू नकोस | भरा | भरू नका |
| येणे | ये | येऊ नकोस | या | येऊ नका |


**ख. सराव.** **Pattern drill.**

येणे पटकन या. करणे पटकन ------------------------.

आणणे पटकन ------------------------. जाणे पटकन ------------------------.

निघणे पटकन ------------------------. पोहोचणे पटकन ------------------------.

**सार्वजनिक ठिकाणी असलेल्या सूचनांच्या पाट्या तुम्ही वाचल्या असतीलच.**







**ग. वरीलप्रमाणे खालील सूचनांची आज्ञार्थी रूपे लिहू या.** **Make imperative.**

अ. रांगेत उभे (राहणे) ------------------------.

आ. पैसे मोजून (घेणे) ------------------------.

इ. पैसे काढण्याच्या स्लिपवर खाते क्रमांक (लिहिणे) ----------------.

ई. खिसेकापूंपासून सावध (राहणे) ------------------------.

उ. मोबाईलवर (न बोलणे) ------------------------.

ऊ. फलकावरच्या सूचना (वाचणे) ------------------------.



### घ. विनंती करणे

**अ. खालील प्रश्न व उत्तरांच्या जोड्या लावू या.** Match the columns.


| | |
|---|---|
| १. तुम्ही रांगेत उभे राहता का? | क. हो, आणते हं. |
| २. जेधे सर, मला जरा ती फाईल देता का? | ख. कुठे आहे रांग? |
| ३. अरे सुभाष, सातपुतेबाईंना जरा बोलावतोस का? | ग. ही घ्या. |
| ४. सातपुतेबाई, पाणी आणता का? | घ. त्या बघा येत आहेत. |

**अशा प्रकारे सूचना अथवा आज्ञा करण्याऐवजी विनंतीदेखील केली जाते.**

| क्रियापद | तुम्ही | तू | |
|---|---|---|---|
| | | पु० | स्त्री० |
| देणे | देता का? | देतोस का? | देतेस का? |
| आणणे | आणता का? | आणतोस का? | आणतेस का? |


### च. विध्यर्थ

काही ठिकाणी सूचना या पद्धतीनेही लिहिल्या जातात.









**क्रियापदांच्या या रूपांना विध्यर्थी रूपे म्हणतात. क्रियापदाच्या या रूपातून विनंतीचा भाव किंवा योग्य नियम सांगण्याचा भाव असतो.**

<table>
<tr><th>सर्वनाम</th><th>+ तृतीया</th><th>(तो) दरवाजा</th><th>(ते) दरवाजे</th><th>(ती) बँक</th><th>(त्या) बँका</th><th>(ते) खाते</th><th>(ती) खाती</th></tr>
<tr><td>मी</td><td>मी</td><td>उघडावा</td><td>उघडावे(त)</td><td>उघडावी</td><td>उघडाव्या(त)</td><td>उघडावे / उघडावं</td><td>उघडावी(त)</td></tr>
<tr><td>आम्ही / आपण</td><td>आम्ही / आपण</td><td>उघडावा</td><td>उघडावे(त)</td><td>उघडावी</td><td>उघडाव्या(त)</td><td>उघडावे / उघडावं</td><td>उघडावी(त)</td></tr>
<tr><td>तू</td><td>तू</td><td>उघडावास</td><td>उघडावेस</td><td>उघडावीस</td><td>उघडाव्यास</td><td>उघडावेस / उघडावंस</td><td>उघडावीस</td></tr>
<tr><td>तुम्ही / आपण</td><td>तुम्ही / आपण</td><td>उघडावा(त)</td><td>उघडावे(त)</td><td>उघडावी(त)</td><td>उघडाव्या(त)</td><td>उघडावे(त) / उघडावं(त)</td><td>उघडावी(त)</td></tr>
<tr><td>तो</td><td>+ ने = त्याने</td><td rowspan="4">उघडावा</td><td rowspan="4">उघडावे</td><td rowspan="4">उघडावी</td><td rowspan="4">उघडाव्या</td><td rowspan="4">उघडावे / उघडावं</td><td rowspan="4">उघडावी</td></tr>
<tr><td>ते</td><td>+ ने = त्याने</td></tr>
<tr><td>ती</td><td>+ ने = तिने</td></tr>
<tr><td>ते<br>ती<br>त्या</td><td>+ नी = त्यांनी</td></tr>
</table>

**च. आता, ४-ग मधील वाक्ये विध्यर्थात लिहू या.**

**Write the sentences in 4-kh in subjunctive.**

अ. उदा॰ रांगेत उभे राहावे.

आ. ______________________________________________

______________________________________________.

इ. ______________________________________________

______________________________________________.

ई. ______________________________________________

______________________________________________.

टीप - वाक्यात कर्म दिलेले नसेल तर क्रियापद नेहमी नपुंसकलिंगी एकवचनी राहते.

टीप - विध्यर्थ – नकारार्थी वाक्ये
बोलणे – बोल + ऊ + नये / नयेत = बोलू नये

उ. मोबाईलवर बोलू नये.

ऊ. -----------------------------------------------
-----------------------------------------------.

**छ. खाली आज्ञार्थी वाक्ये दिली आहेत. तीच वाक्ये विध्यर्थी करून लिहू या.**

**Convert the imperative sentences in subjunctive.**

अ. सगळ्यांनी बँकेत वेळेवर या.

-----------------------------------------------

आ. ग्राहकांना सगळी माहिती नीट द्या.

-----------------------------------------------

इ. बँकेत मोबाईल बंद ठेवा.

-----------------------------------------------

ई. ग्राहकांनो, रांगेत उभे राहा, गर्दी करू नका.

-----------------------------------------------

उ. शिवकुमार, तुम्ही मराठी शिका.

-----------------------------------------------

ऊ. जोसेफ, खुर्चीत बसून झोपू नका.

-----------------------------------------------

ए. गायकवाड, कामाचा कंटाळा करू नका.

-----------------------------------------------

ॲ. सांगितलेली सगळी कागदपत्रे आणा.

-----------------------------------------------

ऐ. फॉर्म नीट भरा.

-----------------------------------------------

ओ. चोरांपासून सावध राहा.

-----------------------------------------------



## ५ बँकेतील कामे

**क. कोण काय काम करत आहे? चित्रे व त्याखालील वाक्ये यांच्या जोड्या लावू या.**

**Match the pictures with the sentences in the table.**




| | |
|---|---|
| अ. कॅश काउंटरवर एक माणूस पैसे जमा करत आहे. | आ. पाटीलसाहेब शिपायाला रागवत आहेत. |
| इ. मनिषा कम्प्युटरवर काम करत आहे. | ई. मि॰ भंडारी खुर्चीवर बसत आहेत. |
| उ. आशिष चहा पीत आहे. | ऊ. एक बाई अर्ज भरत आहेत. |
| ए. शिपाई काही फोल्डर्स घेऊन जात आहे. | ॲ. समता पुस्तक / डायरी वाचत आहे. |
| ऐ. मि॰ जोशींच्या फाईलमधील कागद खाली पडत आहेत. | |

| चित्र क्र॰ | वाक्य क्र॰ |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

| चित्र क्र॰ | वाक्य क्र॰ |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

**ख. आता वरील वाक्यांतील क्रियापदे ओळखून खालील तक्ता पूर्ण करू या.**
**Search the verbs in the above sentences and complete the table.**

| क्रियापद | धातू | अपूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|
| १. एक माणूस (पैसे जमा) (करणे) | कर | ---------------------- आहे |
| २. पाटील साहेब (रागवणे) | रागव | ---------------------- आहेत |
| ३. मनिषा (काम) (करणे) | कर | ---------------------- आहे |
| ४. मि॰ भंडारी (बसणे) | बस | ---------------------- आहेत |
| उदा॰ आशिष चहा (पिणे) | पी | पीत आहे |
| ५. एक बाई (अर्ज) (भरणे) | भर | ---------------------- आहेत |
| ६. शिपाई (जाणे) | जा | ---------------------- आहे |
| ७. समता (वाचणे) | वाच | ---------------------- आहे |
| ८. (कागद खाली) (पडणे) | पड | ---------------------- आहेत |

**ग. संवाद वाचू या.** **Read.**

**जेवणाची सुट्टी**

सुभाष कदम : चला शिवकुमारसाहेब, जेवणाची सुट्टी झाली. अजून काम करताय?

शिवकुमार : मी या कांबळ्यांशी बोलतोय. येतोच पाच मिनिटांत.

कांबळे : मी फॉर्म भरतोय.

शिवकुमार : सगळी माहिती नीट भरा. घरी जाऊनच भरा आता. शिपाई दरवाजा बंद करतायत.

सुभाष कदम : शिवकुमारसाहेब, तुम्हाला साबळेसाहेब डबा खायला बोलावतायत.

| | | |
|---|---|---|
| शिवकुमार | : | हो जातो. पण साबळेसाहेब तर फोनवर बोलतायत. कदम, मला सांगा, इथे टॉयलेट कुठे आहे? |
| सुभाष कदम | : | ते बघा, पाठीमागे, डाव्या बाजूला आहे स्वच्छतागृह. |
| शिवकुमार | : | आणि डबा खायची खोली कुठे आहे? |
| सुभाष कदम | : | ती काय, समोर आहे. आणि आपल्या बँकेशेजारीच चहाची टपरी आहे. आत्ता मस्त ताजा चहा करतोय चहावाला. |
| शिवकुमार | : | आणि साबळेसाहेब कुठे आहेत? |
| सुभाष कदम | : | एवढा वेळ खाली केबिनमध्येच होते; आत्ता वरच्या मजल्यावर गेलेत कर्जविभागात. आता तुम्हीपण वरच जा. साहेब थांबलेत तुमच्यासाठी. |

**संवाद 'ग' मध्ये आलेली क्रियापदांची हिरव्या रंगातील रूपे बघू या.**

### घ. ही संवादात्मक रूपे आहेत. त्यांच्यासमोर त्यांची लिखित रूपे लिहू या.

**Fill in the blanks using the correct forms of the verbs.**

| क्रियापदाचे रूप – बोलताना | क्रियापदाचे रूप – लिहिताना |
|---|---|
| करताय | ---------------------- आहात |
| बोलतोय | ---------------------- आहे |
| भरतोय | ---------------------- आहे |
| करतायत | ---------------------- आहेत |
| बोलावतायत | ---------------------- आहेत |
| बोलतायत | ---------------------- आहेत |
| करतोय | ---------------------- आहे |

### च. आता वरील संवाद ऐकू या. Listen.

### अपूर्ण वर्तमानकाळ – क्रियापद – बोलणे

| वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान |
|---|---|---|
| क्रियापद (वाचणे) | लिहिताना (औपचारिक) | बोलताना (संभाषणात्मक) |
| मी बोलतो | मी बोलत / बोलतो आहे | बोलतो + य = मी बोलतोय |
| मी बोलते | मी बोलत / बोलते आहे | बोलते + य = मी बोलतेय |
| आम्ही / आपण बोलतो | आम्ही / आपण बोलत / बोलतो आहोत | बोलतो + य = आम्ही / आपण बोलतोय |
| | | बोलतो + होत = आम्ही / आपण बोलताहोत |
| तू बोलतोस | तू बोलत / बोलतो आहेस | बोलतो + यस = तू बोलतोयस |
| तू बोलतेस | तू बोलत / बोलते आहेस | बोलते + यस = तू बोलतेयस |
| तुम्ही / आपण बोलता | तुम्ही / आपण बोलत / बोलता आहात | बोलता + य = तुम्ही / आपण बोलताय |
| | | बोलता + हात = तुम्ही / आपण बोलताहात |
| तो बोलतो | तो बोलत / बोलतो आहे | बोलत + य = तो बोलतोय |
| ते बोलतात | ते बोलत आहेत | बोलता + यत = ते बोलतायत |
| | | बोलता + हेत = ते बोलताहेत |
| ती बोलते | ती बोलत / बोलते आहे | बोलते + य = ती बोलतेय |
| त्या बोलतात | त्या बोलत आहेत | बोलता + यत = त्या बोलतायत |
| | | बोलता + हेत = त्या बोलताहेत |
| ते बोलते | ते बोलत / बोलते आहे | बोलतं + य = ते बोलतंय |
| ती बोलतात | ती बोलत आहेत | बोलता + यत = ती बोलतायत |
| | | बोलता + हेत = ती बोलताहेत |

| तुमच्या माहितीसाठी... |
|---|
| क्रियापदांची संवादात्मक रूपे वापरल्यामुळे संवादात सहजता येते. |

छ. सराव.

**वरीलप्रमाणे 'मोजणे' क्रियापदाच्या अपूर्ण वर्तमानकाळी रूपांचा तक्ता लिहू या.**
**Fill in the blanks using the correct forms of the verb 'मोजणे'.**

| | |
|---|---|
| मी पैसे मोजत आहे / मोजतोय. | ------------------------------ |
| ------------------------------ | ------------------------------ |
| ------------------------------ | ------------------------------ |
| ------------------------------ | त्या पैसे मोजत आहेत / मोजतायत. |
| ------------------------------ | ------------------------------ |

ज. **खाली अपूर्ण वर्तमानकाळातील वाक्ये दिली आहेत. त्यातील क्रियापदांची संवादात्मक रूपे लिहू या व वाक्ये बोलून दाखवू या.** **Following sentences are in the continuous present tense. Rewrite the sentences using the spoken forms of the verbs and read them aloud.**

अ. कॅशिअर पैसे मोजत आहे –
------------------------------



आ. ग्राहक फॉर्म भरत आहे. –
------------------------------

इ. शाखाव्यवस्थापक सूचना देत आहेत. –
------------------------------





ई. ग्राहक रांगेत उभे राहत आहेत. –
------------------------------

उ. शिवकुमार काम करत आहे. –
------------------------------

ऊ. सुरक्षारक्षक दरवाजा लावत आहे. –
------------------------------

झ. खालील चित्राच्या वर्णनाची वाक्ये अपूर्ण वर्तमानकाळात लिहू या.

Describe the picture in continuous present tense.



अ. हत्ती (केळी खाणे) ----------------------------------------

आ. लहान मुलगा (मस्ती करणे) ----------------------------------------

इ. आई (त्याला ओरडणे) ----------------------------------------

ई. कुत्रा (भुंकणे) ----------------------------------------

उ. पक्षी आकाशात (उडणे) ----------------------------------------

ट. खालील वाक्ये अपूर्ण वर्तमानकाळात लिहू या. Write in the continuous present tense.

अ. सकाळी ९ वाजता बँक उघडते.

----------------------------------------

आ. सर्व कर्मचारी ९.३० पासून काम करतात.

----------------------------------------

इ. बबन चहा आणतो.

----------------------------------------

ई. सगळे चहा पितात.

----------------------------------------

उ. शाखाप्रबंधक कर्मचाऱ्यांना सूचना देतात.

---------------------------------------------------------------------------

ऊ. शिपाई ग्राहकांना रांगेत उभे राहायला सांगतात.

---------------------------------------------------------------------------

ए. बँकेच्या सुट्टीमध्ये शिपाई मोबाईलवर गाणी ऐकतात.

---------------------------------------------------------------------------

ॲ. बँकेच्या मुख्य कार्यालयातून सतत फोन येतात.

---------------------------------------------------------------------------

## दृष्टिक्षेप । Overview

| नामे | | |
|---|---|---|
| **तो (पु.)** | **ती (स्त्री.)** | **ते (नपुं.)** |
| तो व्यवसाय ते-<br>profession<br>व्यवसाया-, व्यवसायां- | ती संख्या, त्या-<br>number<br>संख्ये-, संख्यां- | ते दुकान, ती दुकाने / नं<br>shop<br>दुकाना-, दुकानां- |
| तो फलक, ते-<br>notice board, black board<br>फलका-, फलकां- | ती तिजोरी, त्या तिजोऱ्या<br>vault<br>तिजोरी-, तिजोऱ्यां- | ते आवार, ती आवारे / रं<br>campus<br>आवारा-, आवारां- |
| तो डबा, ते डबे<br>tiffin<br>डब्या-, डब्यां- | ती नोंद, त्या नोंदी<br>record<br>नोंदी-, नोंदीं- | ते जेवण, ती जेवणे / णं<br>meal<br>जेवणा- जेवणां- |
| तो दरवाजा, ते दरवाजे<br>door<br>दरवाजा-, दरवाजां- | जमा रक्कम<br>money collection<br>रकमे-, रकमा- | ते भाषण, ती भाषणे / णं<br>talk, lecture<br>भाषणा-, भाषणां- |
| तो वेळ, -<br>time<br>वेळा- | ती वेळ, त्या वेळा<br>certain point of time<br>वेळे-, वेळां- | ते वातावरण, -<br>atmosphere<br>वातावरणा- |
| तो गारवा, -<br>coolness<br>गारव्या- | ती शांतता, -<br>silence<br>शांतते- | |
| तो उशीर, -<br>late<br>उशिरा- | ती सूचना, त्या-<br>instruction, suggestion<br>सूचने-, सूचनां- | |
| तो कार्यक्रम, ते-<br>programme<br>कार्यक्रमा-, कार्यक्रमां- | ती (चहाची) टपरी, त्या टपऱ्या<br>tea stall<br>टपरी-, टपऱ्यां- | |

| | | |
|---|---|---|
| तो / ती सहकारी, ते / त्या- *<br>co-worker, colleague<br>सहकाऱ्या- , सहकाऱ्यां- | ती सहजता, -<br>ease<br>सहजते- | |
| तो स्वभाव, -<br>nature, attitude<br>स्वभावा- | ती रांग, त्या रांगा<br>queue<br>रांगे-, रांगां- | |
| तो हत्ती, ते हत्ती<br>elephant<br>हत्ती-, हत्तीं- | ती परीक्षा, त्या-<br>examination<br>परीक्षे-, परीक्षां- | |
| | ती तयारी, -<br>preparation<br>तयारी- | |
| | ती खुशाली, -<br>well being<br>खुशाली- | |
| | ती बदली, त्या बदल्या<br>transfer<br>बदली-, बदल्यां- | |
| | ती सेवानिवृत्ती, -<br>retirement<br>सेवानिवृत्ती- | |

*** these nouns are same for both masculine and feminine**

### क्रियापदे

भरणे – to fill  थांबणे – to stop, to wait  थुंकणे – to spit

ओलांडणे – to cross  घाबरणे – to get frightened

लावणे – to close (उदा॰ दरवाजा)

### क्रियाविशेषण / अव्यय

पाठीमागे – behind  समोर – in front of  शेजारी – beside

खूप – lot of, plenty  नीट – neat, proper  पटकन – quickly

### विशेषण

| | | |
|---|---|---|
| संवादात्मक – communicative | क्षेत्रीय – regional | जुना – old |
| संकल्पित – targeted | ताजा – fresh | हसताखेळता – happy |

### नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या

| नाम / इतर शब्द + क्रियापद | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| सावध राहणे | to be alert, beware |
| शांतता राखणे | to observe silence |
| डबा खाणे | to have packed lunch |
| सूचना देणे | to give instruction |
| वाट पाहणे | to wait |
| सुरुवात करणे | to start |
| कंटाळा येणे | to get bored |
| मदत करणे | to help |
| मजा येणे | to enjoy |
| स्वागत करणे | to welcome |



# ३ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड









## चला, शिकू या...

- पासबुक, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड यांची माहिती देणे
- पैसे काढणे, पैसे भरणे, चेक भरणे या व्यवहारांची माहिती देणे
- साधा भूतकाळ, पूर्ण वर्तमानकाळ, अपूर्ण भूतकाळ यांचा वापर शिकणे
- खाली, वर, समोर, बाजूला, अलीकडे-पलीकडे यांचा वापर शिकणे
- स्वच्छ, नीट, चांगला, छान, सुंदर इ. विशेषणांचा / क्रियाविशेषणांचा वापर शिकणे

## १ अर्जाखाली सही करा.

### क. खालील संवाद ऐकू या अणि वाचू या. Listen and read.

शिवकुमार : या, कांबळे. सगळी कागदपत्रं आणलीत का?

कांबळे : बघा, बरोबर आहेत ना?

शिवकुमार : ह्या अर्जाखाली सही करायची राहिली आहे.

कांबळे : कुठे?

शिवकुमार : इथे. तुमचं पेन टेबलाखाली पडलंय. आणि आधारकार्डाची फोटोकॉपी लागेल. बँकेसमोर टपरी आहे, तिथे तुम्हाला कॉपी काढून मिळेल.

कांबळे : खातं उघडताना मला वीस हजार भरायचे आहेत. स्लिप कुठे मिळेल?

शिवकुमार : पलीकडच्या काऊंटरवर मिळेल. म्हणजे मॅनेजरच्या केबिनच्या पलीकडे. आणि मॅनेजरच्या केबिनच्या अलीकडे काऊंटर आहे, तिथे पैसे भरा.

कांबळे : समोर खुर्ची आहे तिथे बसून लिहू का?

शिवकुमार : हो, हो. खुर्चीवर बसून आरामात लिहा.




कांबळे : मला पाणी मिळेल का प्यायला?

शिवकुमार : दाराच्या अलीकडेच कूलर आहे बघा.

कांबळे : मला क्रेडिट कार्डाची माहितीही हवी आहे.

शिवकुमार : पैसे भरून झाले की या, मी सांगतो.


कांबळे : सर, झाले पैसे भरून. बसू का?

शिवकुमार : या. बसा. हे तुमचं डेबिट कार्ड. तुमच्या खात्यात जी शिल्लक असेल तेवढे पैसे तुम्हाला एटीएममधून काढता येतील. आणि वस्तू खरेदीही करता येतील. पण तुम्ही क्रेडिट कार्ड घेतलंत तर ते वापरून तुमच्या खात्यात पैसे नसले तरीही तुमच्या कार्डाच्या मर्यादेपर्यंत पैसे वापरता येतात. ते तुम्ही नंतर बँकेत जमा करायचे आहेत. क्रेडिट कार्ड वापरून तुम्ही पैसे खर्च करता म्हणजे एका अर्थाने ते तुमचं कर्ज असतं. जेवढे दिवस तुम्ही पैसे वापरता तेवढ्या दिवसांचं व्याज तुम्हाला भरावं लागतं. तुमच्या खात्यातले व्यवहार पाहून तुमच्या क्रेडिट कार्डाची मर्यादा ठरवली जाते. मग तुम्हाला क्रेडिट कार्ड दिलं जातं.

कांबळे : धन्यवाद, शिवकुमार सर!

**ख. वरील संवादातील निळ्या रंगातील शब्द पाहू या.**

**Read the words in blue in the above dialogue.**




| तुमच्या माहितीसाठी... |
|---|
| अव्यये / स्थलवाचक क्रियाविशेषणे<br>Postpositions / Adverbs of place |
| खाली, वर, समोर, पलीकडे, अलीकडे, मागे, शेजारी, मध्ये या शब्दांमुळे स्थान कळते. ही अव्यये क्रियाविशेषणे म्हणूनही वापरतात. |

**ग. चित्रातील कर्मचारी कुठे आहे? लिहू या.** **Where is the employee? Write.**



उदा. कर्मचारी खुर्चीमागे उभा आहे.



अ

______________________________________________

______________________________________________




आ

______________________________________________

______________________________________________

जवळ = पाशी



इ

______________________________________________


______________________________________________



ई

______________________________________________

______________________________________________



उ

______________________________________________


______________________________________________

**घ. चित्रे पाहून जोड्या जुळवू या.** **Match the columns.**

खाली पडलंय पेन. अ

१



झेरॉक्स मशीन? हे काय तुमच्या मागे. आ

२


टेबलापुढेच ठेव खुर्ची. इ

३


ही फाईल माझ्या टेबलावर ठेव. ई

४


**च. चित्रात कुठे काय दिसतंय ते सांगू या.** **Describe the picture using correct postpositions.**

(पुतळा, इमारत, सायकलवाला, ट्रक, दुकानं, जाहिरात, जिलबीवाला, फळवाला, बस, मोटारसायकली)




१. चौकामध्ये एक पुतळा आहे.

२. ______________________________

३. ______________________________

४. ______________________________

५. ______________________________

६. ______________________________

७. ______________________________

८. ______________________________

९. ______________________________

१०. ______________________________

**छ. अलीकडे... पलीकडे... चित्र आणि वाक्यांच्या जोड्या लावू या.** **Match the columns.**

बँकेच्या अलीकडे शाळा आहे. अ

१



नोकरी, घर, पैसा ह्यापलीकडे जाऊनही विचार करायला हवा. आ

२



इंटरनेटच्या वापरामुळे अलीकडे बँकेतली गर्दी कमी झालीये. इ

३



बँकेच्या पलीकडे मॉल आहे. ई

४


| | |
|---|---|
| अलीकडे – ह्या बाजूला (स्थलवाचक) on this side of | पलीकडे – त्या बाजूला (स्थलवाचक) on the other side of |
| अलीकडे – आजकाल, सध्या, आधी, अगोदर (कालवाचक) nowadays, these days | पलीकडे – हा विषय सोडून, ह्या गोष्टीशिवाय beyond |

## ज. खालीलपैकी कोणते वाक्य कोणत्या कार्डाच्या बाबतीत योग्य आहे?

**Debit card or credit card? Select the correct option.**

| | डेबिट कार्ड | क्रेडिट कार्ड |
|---|---|---|
| अ. जर खात्यात रक्कम असेल तर हे कार्ड वापरता येते. | | |
| आ. खात्यात पैसे नसतानाही हे कार्ड वापरता येते. | | |
| इ. हे कार्ड वापरून खर्च केलेले पैसे म्हणजेच बँकेकडून घेतलेले एकप्रकारचे कर्ज. | | |
| ई. ह्या कार्डाची मर्यादा तुमच्या खात्यातल्या व्यवहारांवर अवलंबून असते. | | |
| उ. ह्या कार्डावर खर्च केलेल्या पैशांवर व्याज लागत नाही. | | |

## झ. डेबिट आणि क्रेडिट कार्डासंबंधातील काही नियम वाचू या व खालील तक्त्यात त्यांची योग्य विभागणी करू या. **Read the Dos and Don’ts and divide them in the correct column.**

**डेबिट किंवा क्रेडिट कार्ड कसे वापरावे?**

अ. कुठल्याही दुकानात, उपाहारगृहात कार्डाद्वारे पैसे देताना आपल्या डोळ्यादेखत व्यवहार करावा. व्यवहार झाल्यावर आठवणीने कार्ड परत घ्यावे.



आ. भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांना सोडून कुठल्याही अवैध कामासाठी किंवा नियमबाह्य वापरासाठी कार्डाचा उपयोग करू नये.

इ. कार्ड हरवल्याची आणि ते गोठवल्याची माहिती तुमच्या बँकेला कळवल्यानंतर तुम्हाला नवीन डेबिट / क्रेडिट कार्ड मिळू शकते.

ई. तुमच्या डेबिट / क्रेडिट कार्डाचा चार आकडी पिन क्रमांक नेहमी गुप्त ठेवावा. कुणालाही सांगू नये किंवा लिहून ठेवू नये.

उ. तुमचे डेबिट किंवा क्रेडिट कार्ड हरवले तर कार्डाच्या मागच्या बाजूवर किंवा तुम्हाला बँकेने दिलेल्या नियम पुस्तिकेवर दिलेल्या क्रमांकावर ताबडतोब कळवून कार्ड गोठवून टाकावे. म्हणजे ते कार्ड कोणही वापरू शकणार नाही.

ऊ. मशीनमधून येणारी पावती तपासून घ्यावी.

ए. तुमच्या बँक खात्याच्या उताऱ्याशी ही पावती पडताळून पाहावी.

| कार्ड वापरताना ही काळजी घ्यावी : | कार्ड हरवले? |
|---|---|
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |

## २ ग्राहकांच्या शंका

क. संवाद ऐकू या व खालील तक्ता भरू या. Listen and fill in the table below.

| | संवाद अ | संवाद आ | संवाद इ |
|---|---|---|---|
| ग्राहकाची शंका | | | |
| शिवकुमारचे उत्तर | | | |

## ३ ह्याआधी कुठे होतास तू?

**(होता, झालो, संपली आहे, जेवलोत, करत होतो...)**

**क. खालील संवाद वाचू या.** Read.



जेधे : शिवकुमार, या की चहा घ्यायला.

शिवकुमार : येतो, जेधे साहेब. पण तुम्ही मला 'ए शिवकुमार' म्हटलं तरी चालेल. आधीच्या शाखेमध्येही मी तसा लहान असल्यामुळे सगळे मला एकेरी हाक मारायचे.

जेधे : (हसून) बरं. ह्याआधी कोणत्या शाखेत होतास तू?

शिवकुमार : ह्याआधी मी बनारसच्या गंगापूर शाखेत होतो.

जेधे : तू मूळचा बनारसचाच ना?



शिवकुमार : नाही, आम्ही आधी रुद्रप्रयागमध्ये होतो. म्हणजे मी रुद्रप्रयागमध्येच जन्मलो, पण मी लहान असतानाच आम्ही बनारसला आलो आणि तिथेच स्थायिक झालो.

जेधे : म्हणजे तुझं बालपण बनारसमध्ये गेलं तर. मग, तुझं शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणही तिथेच झालं का?

शिवकुमार : शालेय शिक्षण बनारसमध्येच झालं, पण मग दिल्लीला गेलो महाविद्यालयीन शिक्षणासाठी.

जेधे : अरे वा! आणि आता नोकरीनिमित्ताने कोल्हापुरात आलास.

शिवकुमार : (हसून) हो.

जेधे : छान. अशीच तुला नवनवीन शहरं पाहायला मिळोत.

शिवकुमार : थँक्यू सर. मलाही आवडेल नवीन शहरं पाहायला.

**ख. संवादातील हिरवे शब्द पाहू या व खालील तक्ता पूर्ण करू या.**

**Read the green words in the above dialogue and complete the table.**

| सर्वनामे (Pronouns) | क्रियापदे (Verbs) | | |
|---|---|---|---|
| | साधा भूतकाळ (Simple past tense) | मूळ रूप (Infinitive) | साधा वर्तमानकाळ (Simple present tense) |
| तू | होतास | होणे (असणे) | आहेस |
| आम्ही | होतो | होणे (असणे) | ---------------------- |
| मी | जन्मलो | जन्मणे | ---------------------- |
| आम्ही | झालो | होणे | होतो |
| मी | गेलो | जाणे | ---------------------- |

**'असणे', 'होणे'** **to be, to become**

मी बँकेत अधिकारी आहे.

बँकेत ग्राहकांनी गर्दी केली की मी अस्वस्थ होतो.

कोल्हापूरला येण्याआधी मी बनारसला होतो.

मागच्या वर्षी मी बँकेची परीक्षा पास झालो.

| सर्वनामे (pronouns) | असणे (साधा वर्तमानकाळ) (Simple present tense) | होणे (साधा वर्तमानकाळ) (Simple present tense) | असणे (साधा भूतकाळ) (Simple past tense) | होणे (साधा भूतकाळ) (Simple past tense) |
|---|---|---|---|---|
| मी (पु॰) | आहे | होतो | होतो | झालो |
| मी (स्त्री॰) | | होते | होते | झाले |
| आम्ही / आपण | आहोत | होतो | होतो | झालो |
| तू (पु॰) | आहेस | होतोस | होतास | झालास |
| तू (स्त्री॰) | | होतेस | होतीस | झालीस |
| तुम्ही / आपण | आहात | होता | होता / होतात | झालात |
| तो | आहे | होतो | होता | झाला |
| ती | | होते | होती | झाली |
| ते | | होते / होतं | होते / होतं | झाले / झालं |
| ते | आहेत | होतात | होते | झाले |
| त्या | | | होत्या | झाल्या |
| ती | | | होती | झाली |

### ग. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.
Pattern drill.

**शिक्षक**

मीटिंग
मीटिंग कशी झाली तुमची?
समारंभ
व्याख्यान
मुलाखत
कार्यक्रम
परीक्षा

**विद्यार्थी**

मीटिंग कशी झाली तुमची?

घ. खालील तक्ता पूर्ण करू या. Complete the table.

| सर्वनामे (pronouns) | येणे (साधा वर्तमानकाळ) (Simple present tense) | येणे (साधा भूतकाळ) (Simple present tense) | जाणे (साधा वर्तमानकाळ) (Simple past tense) | जाणे (साधा भूतकाळ) (Simple past tense) |
|---|---|---|---|---|
| मी (पु.) | येतो | आलो | -------------- | गेलो |
| मी (स्त्री.) | -------------- | आले | जाते | गेले |
| आम्ही / आपण | -------------- | आलो | -------------- | गेलो |
| तू (पु.) | -------------- | आलास | -------------- | गेलास |
| तू (स्त्री.) | -------------- | आलीस | -------------- | गेलीस |
| तुम्ही / आपण | येता | आलात | -------------- | गेलात |
| तो | -------------- | आला | -------------- | गेला |
| ती | -------------- | आली | -------------- | गेली |
| ते | -------------- | आले / आलं | जाते / जातं | गेले / गेलं |
| ते | -------------- | आले | -------------- | गेले |
| त्या | | आल्या | | गेल्या |
| ती | | आली | | गेली |

**च. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.**
**Pattern drill.**

शिक्षक


त्या
त्या आल्या का मुंबईहून?
तो
ते (अ॰व॰)
तू (स्त्री॰)
आपण

विद्यार्थी

त्या आल्या का मुंबईहून?

**छ. साधा भूतकाळ – सकर्मक क्रियापदे - Simple past tense – transitive verbs**

**आजची कामे – शिवकुमारला रोजची कामे डायरीत लिहिण्याची सवय आहे. कामे झाली की ती नोंदही तो करतो. पाहू या त्याची डायरीतील आजची कामे.**




शिवकुमारने अहवाल पाठवला.

शिवकुमारने साबळेंना नोंदी दाखवल्या.

| तुमच्या माहितीसाठी... |
|---|
| भूतकाळ |
| भूतकाळात अकर्मक क्रियापद कर्त्याप्रमाणे चालवले जाते तर सकर्मक क्रियापद कर्माप्रमाणे. |

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण, तुम्ही / आपण / | ए॰व॰<br>अ॰व॰ | कार्यक्रम केला<br>कार्यक्रम केले | सजावट केली<br>सजावटी केल्या | भाषण केले / केलं<br>भाषणे / भाषणं केली |
| त्याने / त्यांनी, तिने / त्यांनी, त्याने / त्यांनी | | | | |
| तू | ए॰व॰<br>अ॰व॰ | कार्यक्रम केलास<br>कार्यक्रम केलेस | सजावट केलीस<br>सजावटी केल्यास | भाषण केलेस / केलंस<br>भाषणे / भाषणं केलीस |

**ज. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा बोलू या.**
**Pattern drill.**

शिक्षक

घर

मुलाच्या शिक्षणासाठी त्याने <u>घर</u> विकले.

गाडी

कारखाना

ऑफिस

घरातले दागिने

विद्यार्थी

मुलाच्या शिक्षणासाठी त्याने घर विकले.

**झ. वाचू या व रिकाम्या जागा भरू या. Fill in the blanks.**

**बँक आणि आर्थिक क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वे –**

**अ. रघुराम राजन**



रघुराम राजन हे वयाने सर्वात लहान असलेले रिझर्व बँकेचे गव्हर्नर (असणे) होते. त्यांनी सप्टेंबर २०१३ ते सप्टेंबर २०१६ या काळात रिझर्व बँकेचे प्रमुख व्यवस्थापक (governor) म्हणून काम (ते) (करणे) (१) ---------------. चलन फुगवट्यावर नियंत्रण आणून रुपयाचे मूल्य पूर्ववत आणण्याची महत्त्वाची कामगिरी (ती) त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत पार (पाडणे) (२) ---------------.

रघुराम राजन यांचा जन्म (तो) फेब्रुवारी ३, १९६३ रोजी भोपाळ येथे (होणे) (३) ---------------.

सुवर्ण पदकासह इलेक्ट्रिकल इंजिनिअरची पदवी घेऊन त्यांनी अहमदाबादच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मधून १९९१ साली व्यवस्थापनाची पदवी (ती) (घेणे) (४) ——————. शिकागो विश्वविद्यालयामध्ये ते प्रोफेसर (असणे) (५) ------------. २०१२ मध्ये भारताचे प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती (ती) (होणे) (६) --------------. रिझर्व बँकेतून कार्यमुक्त झाल्यावर ते बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंट्स येथे व्हाईस चेअरमन या पदावर कार्यरत आहेत.

**आ. अरुंधती भट्टाचार्य**



१९७७ साली प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून भारतीय स्टेट बँकेमध्ये अरुंधती भट्टाचार्य रुजू (१) -------------. भारतीय स्टेट बँकेच्या त्या पहिल्या महिला अध्यक्ष होत. आपल्या ३६ वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी परकीय चलन, ट्रेझरी, रिटेल ऑपरेशन्स, मानव संसाधन आणि गुंतवणूक बँकिंगमध्ये काम (ते) (२) -------------- आहे. यामध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया कॅपिटल मार्केट्सच्या मुख्य कार्यकारी पदाचाही समावेश आहे. नवीन प्रकल्पांच्या प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक या पदावर त्यांनी बँकेच्या न्यूयॉर्क ऑफिसमध्येही काम केले आहे. एसबीआय जनरल इन्श्युरन्स, एसबीआय कस्टडीयल सर्व्हिसेस, एसबीआय पेन्शन फंड्स प्रा. लि. यांसारख्या अनेक नवीन व्यवसायांची सुरुवात (ती) त्यांनी (३) --------------. ३० सप्टेंबर २०१३ रोजी त्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अध्यक्ष नियुक्त (४) --------------. बँकेच्या महिला कर्मचाऱ्यांना बाळंतपणासाठी किंवा शिशुसंगोपनासाठी, तसेच पुरुष कर्मचाऱ्यांनाही शिशुसंगोपनासाठी दोन वर्षांच्या सुट्टीची (ती) योजना जाहीर (५) ——————. २०१६मध्ये फोर्ब्सने प्रसिद्ध केलेल्या जगातील सर्वात प्रभावी महिलांच्या यादीत अरुंधती भट्टाचार्य यांचे नाव २५वे आहे. याच वर्षी, एफसी टॉप १०० ग्लोबल थिंकर्स फॉर फॉरेन पॉलिसी मॅगझिनमध्ये त्यांना स्थान (ते) (६) -------------. फॉर्च्यूनने एशिया पॅसिफिकमध्ये चौथ्या सर्वात शक्तिशाली महिला म्हणून त्यांचे नाव (ते) समाविष्ट (७) --------------. २०१७मध्ये इंडिया टुडे मासिकाच्या २०१७च्या यादीत भारतातील ५० सर्वात शक्तिशाली लोकांच्या यादीत त्यांचे स्थान १९वे आहे.

**ट. खालील गोष्ट साधा भूतकाळ वापरून पूर्ण करू या.**

**Fill in the blanks using the simple past tense of the given verbs.**

**बचतीतून नफा**



एक (तो) व्यापारी (असणे) (१) --------------. त्याला चार (ती) मुले (असणे) (२) ------------. त्याने आपल्या मुलांची परीक्षा घ्यायचे (ठरवणे) (३) --------------. तो (म्हणणे) (४) --------------, "शंभर रुपयांत एक खोली भरेल असे काहीतरी आणा." चारही मुलांनी विचार (करणे) (५) ------------. एका मुलाने शंभर रुपयांचा (तो) कापूस (आणणे) (६) -------------. पण (ती) खोली (भरणे) (७) ------------- नाही. दुसऱ्या मुलाने शोधण्यातच शंभर (ते) रुपये खर्च करून (टाकणे) (८) -------------. तिसऱ्या मुलाने खूप (तो) शोध (घेणे) (९) ----------- पण त्याला काहीच (सुचणे) (१०) ----------- नाही. चौथा मुलगा हुशार (असणे) (११) --------------. त्याने वीस रुपयांच्या चार (त्या) पणत्या (आणणे) (१२) ----------- आणि वीस रुपयांचे (ते) तेल (आणणे) (१३) ----------- (त्या) वाती (आणणे) (१४) --------------. पणत्या (लावणे) (१५) -------------- आणि प्रकाशाने सगळी खोली (भरणे) (१६) --------------. शंभर रुपयांमधले उरलेले साठ रुपये मुलाने बँकेतल्या खात्यात (भरणे) (१७) ------------. वडील खूश (होणे) (१८) ------------. हाच मुलगा आपला व्यापार सांभाळू शकेल, असे त्यांना (वाटणे) (१९) --------------.

**ठ. वाचू या.** **Read.**

**अ. जेवणाच्या सुट्टीनंतर**

आपल्या बँकेची जेवणाची वेळ आता संपली आहे. शिवकुमारचा डबा खाऊन झाला आहे. साबळे आणि शिवकुमार चहा पिऊन आले आहेत. काही ग्राहक शाखाप्रबंधकांना भेटण्यासाठी थांबले आहेत. कॅशिअरने कॅश टॅली केली आहे. शिवकुमारने पुन्हा कामाला सुरुवात केली आहे. आता तीन वाजले आहेत. पाऊस थांबला आहे. त्यामुळे हवेत गारवा आला आहे. उषा गायकवाडांना मात्र कामाचा कंटाळा आला आहे. त्या घरी जायला निघाल्या आहेत.

### आ. काय चाल्लंय?

शाखाधिकारी : अरे सुभाष, तू दरवाजा लावलायस ना?
सुभाष : हो साहेब, मी मुख्य दरवाजा लावलाय.
शाखाधिकारी : मग ते लोक तिकडे का बसलेयत?
सुभाष : त्यांना पासबुक भरून हवंय. किमया मॅडम त्यांना पासबुक भरून देतायत.
शाखाधिकारी : किमया, तुमची कॅश टॅली झालीये का?
किमया : हो सर, कॅश टॅली झालीये.
शाखाधिकारी : शिवकुमार कुठेयत?
सुभाष : ते कॅश ठेवण्यासाठी व्हॉल्टमध्ये गेलेत.

**पूर्ण वर्तमानकाळ – Present perfect tense**
पूर्ण वर्तमानकाळ – क्रियापदाचे भूतकाळी रूप + असणे
उदा. आपल्या बँकेची जेवणाची वेळ आता संपली आहे.

| सर्वनामे (Pronouns) | पूर्ण वर्तमानकाळ (Present perfect tense) | | सर्वनामे (Pronouns) | पूर्ण वर्तमानकाळ (Present perfect tense) | |
|---|---|---|---|---|---|
| | (लिहिताना) | (बोलताना) | | (लिहिताना) | (बोलताना) |
| मी (पु.) | ---------- आहे | जेवलोय | तो | ---------- आहे | जेवलाय |
| मी (स्त्री.) | जेवले आहे | जेवलेय | ती | ---------- आहे | जेवलीय |
| आम्ही / आपण | ---------- आहोत | जेवलोत | ते | ---------- आहे | जेवलंय |
| तू (पु.) | ---------- आहेस | जेवलायस | ते | ---------- आहेत | जेवलेयत |
| तू (स्त्री.) | ---------- आहेस | जेवलीयस | त्या | ---------- आहेत | जेवल्यायत |
| तुम्ही / आपण | जेवला आहात | जेवलाहात | ती | ---------- आहेत | जेवलीयत |

**ढ. फोनवरील संभाषण ऐकून रिकाम्या जागा भरू या.** **Listen and fill in the blanks.**

**ग्राहक मेळावा**

(मुख्य कार्यालयातून आपटेसाहेबांचा फोन येतो.)

"साबळेसर, तुमच्यासाठी हेडऑफिसमधून फोन आला आहे. तुम्ही ग्राहकांशी (अ) --------------- असं सांगू का?"

"नको. (आ) --------------- मी फोन. नमस्कार आपटेसाहेब, बोला. हो, ग्राहक मेळावा आयोजित केलाय. सगळी तयारी (इ) ---------------. शिपाई आणि इतर कर्मचारी बँकेची सजावट (ई) ---------------. काही ग्राहकही मदतीला (उ) --------------- आहेत. पाहुण्यांची यादी झालीये. आणि सगळ्यांना आमंत्रणेही (ऊ) ---------------. शिवकुमार थोडंफार मराठी (ए) ---------------. तो आत्ता त्याचं भाषण तयार करत (ॲ) ---------------. सगळे जण त्याची गंमत करतायत. हो, तोच तो. बनारसहून आला आहे. तुम्ही ओळखता का त्याला? अच्छा! त्याच्या मुलाखतीमुळे तो तुमच्या लक्षात आहे. हो, कामाला चांगलाय मुलगा. ठीक आहे, मी फोन (ऐ) ---------------."

**त. शिवकुमारने कार्यक्रमामध्ये भाषण केले. वाचू या.** **Read.**



नमस्कार,

मी सर्वांचे स्वागत करतो. मी बनारसचा आहे. कोल्हापूरला प्रथमच आलो आहे. मला कोल्हापूर खूप आवडले आहे. पण मला मराठी नीट बोलता येत नाही. मी मराठी शिकत आहे. माझे सहकारी मला मदत करतात. इथली हवा मला आवडली आहे. वातावरण चांगले आहे. काम करायला मजा येते. तुम्ही बँकेत माझे स्वागत केले आहे त्याबद्दल मी तुमचा आभारी आहे.
धन्यवाद!

### थ खालील संवादातील भूतकाळातील क्रियापदे अधोरेखित करू या.

**Underline the verbs in the past tense.**

#### ग्राहक मेळाव्यानंतर



इशिता : शिवकुमार, ग्राहक मेळाव्याचा कार्यक्रम कसा झाला? मी नेमकी रजेवर होते ना! कार्यक्रमाला नव्हते.

शिवकुमार : कार्यक्रम छान झाला.

इशिता : तू भाषण केलंस का?

शिवकुमार : हो, मी बोललो ना! खूप घाबरलो होतो पण मजा आली. ग्राहकांनीसुद्धा कामात मदत केली. ते थोरात तर खूप धावपळ करत होते.

साबळे : तुम्ही छान भाषण केलंत. सगळ्यांना आवडलं. रिजनल मॅनेजर आपटे साहेबसुद्धा तुमचं कौतुक करत होते. "तुम्ही लवकर मराठी बोलायला लागलात." असं म्हणत होते.

शिवकुमार : थँक यू, म्हणजे, धन्यवाद, सर! सर, तुमच्या सूचनेप्रमाणे कार्यक्रमाचा अहवाल हेड ऑफिसला पाठवला. ठेवीदारांना आभाराची पत्रंही लिहिली.

साबळे : बचत आणि चालू खात्यांच्या विभागाचं काम तुम्ही शिकलात. आता उद्यापासून मुदतठेवींच्या विभागामध्ये गायकवाडबाईंबरोबर काम करा. सध्या तिथे काम जास्त आहे आणि त्यांना मदतीची गरज आहे.

शिवकुमार : हो, सर.

साबळे : परवाच्या कार्यक्रमाची सगळी बिलं माझ्या टेबलावर पाठवा.

शिवकुमार : ती बिलंच तयार करत होतो, सर. थोड्या वेळात पाठवतो.

### द. आता, संवादातील हिरव्या रंगातील क्रियापदे पाहू या..

**Have a look at the verbs marked in green.**

> **अपूर्ण भूतकाळ (Continuous past tense)**
> करत होते, म्हणत होते, करत होतो या क्रियापदांच्या रूपांवरून क्रिया चालू होती असे कळते. या क्रियापदांना चालू किंवा अपूर्ण भूतकाळ म्हणतात.
> अपूर्ण भूतकाळ - धातू + त + होणे
> कर + त + होतो, होते, होत्या ...

**ध. उतारा वाचून त्यातील चालू भूतकाळातील क्रियापदांची यादी करू या.**
**Make a list of the verbs in the continuous past tense.**

### रविवारचा आराम



आज रविवार. शिवकुमार गादीवर लोळत पडला होता. पण फोनची घंटा वाजत होती म्हणून त्याला उठावं लागलं. फोनवर मित्राशी बोलता बोलता एकीकडे तो नाश्त्याची तयारी करत होता. तो पोहे परतत होता आणि दुसऱ्या शेगडीवर चहा उकळत होता. पोहे आणि चहा घेऊन तो खिडकीजवळ आला. त्याने पाहिलं की बाहेर जोरात पाऊस कोसळत होता, वाहतूक अगदी हळूहळू पुढे सरकत होती. प्रत्येक गाडी चिखल उडवत होती. बाहेर जायचं नाही असं त्याने ठरवलं आणि घरातच लॅपटॉपवर एक छान चित्रपट पाहात बसला. शेजारचे काका आले आणि गप्पा मारत बसले. “काय, आज पोह्यांचा बेत का?” त्यांनी विचारलं. इकडे टेबलावरचा चहा गार होत होता. शिवकुमारने चहा गरम केला, काकांनाही दिला आणि मग आरामात चित्रपट पुन्हा सुरू केला. गरमागरम चहा पीतपीत तो चित्रपट पाहात होता. उदा. उडवत होती, पाहात होता

| | | |
|---|---|---|
| ---------- ---------- | ---------- ---------- | ---------- ---------- |
| ---------- ---------- | ---------- ---------- | ---------- ---------- |
| ---------- ---------- | ---------- ---------- | ---------- ---------- |

**न. खालील वाक्ये साध्या भूतकाळात लिहू या.** **Write the sentences in simple past tense.**

उदा. चहा गार होत होता. – चहा गार झाला.

अ. पाऊस पडत होता. ------------------------------

आ. चिखल उडत होता. ------------------------------

इ. वाहतूक हळूहळू पुढे सरकत होती. ------------------------------

ई. फोनची घंटा वाजत होती. ------------------------------

उ. तो चित्रपट पाहात राहिला. ------------------------------

ऊ. तो फोनवर मित्राशी बोलत होता. ------------------------------

ए. शिवकुमार पोहे परतत होता. ------------------------------

## ४ स्वच्छता सप्ताह

**क. वाचू या.** Read.



मंगला सातपुते : शिवकुमारसाहेब, साबळेसाहेबांनी मीटिंगसाठी लगेच केबिनमध्ये बोलावलंय.

शिवकुमार : कसली मीटिंग आहे?

मंगला सातपुते : अहो साहेब, उद्यापासून स्वच्छता सप्ताह आहे ना! त्यासंबंधीच असेल.



साबळे : आले का सगळे? स्वच्छता सप्ताहाचा आराखडा तयार करण्यासाठी आपण आत्ता जमलो आहोत.

उषा गायकवाड : सर, दोन पातळ्यांवर आपण कार्यक्रमाची आखणी करू या.

शिवकुमार : म्हणजे?

उषा गायकवाड : या आठवड्यात कोणती कामं करायची त्याचं नियोजन, हा झाला पहिला टप्पा. या टप्प्यात स्वच्छ आणि सुंदर परिसर, नीटनेटकी बँक, प्रसन्न वातावरण, चकाचक फर्निचर, कचऱ्याचे व्यवस्थापन ही उद्दिष्टे असतील. दुसऱ्या टप्प्यामध्ये सप्ताहानंतर कायमच स्वच्छता राहावी यासाठी प्रत्येकाला जबाबदाऱ्या वाटून द्यायच्या. म्हणजे फक्त सप्ताहापुरतीच स्वच्छता करायची असं नाही. उलट पुन्हा सप्ताह साजरा करण्याची वेळ येणार नाही अशी स्वच्छता नेहमीच राखायची.

साबळे : फारच उत्तम योजना आहे.

शिवकुमार : आपण झाडणं पुसणं करायचं? पण त्या कामासाठी येतात ना कामगार?

साबळे : पण तरीही बघा कशी दिसतेय आपली बँक! आपली स्वच्छता आपणच करू या. आता स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्येसुद्धा कपात केलीये आपल्या हेडऑफिसने. शिवकुमार, आता जुन्या कल्पना विसरा. नवे विचार समजून घ्या.

**विशेषणे (Adjectives)**

विशेषणे नामाबद्दल जास्त माहिती सांगतात, नामाचे वर्णन करतात.

उदा. सुंदर मुलगी, सुंदर फुले, सुंदर परिसर

किंवा चांगला संवाद, चांगली चर्चा, चांगले गाणे

**ख. खालील तक्ता वाचू या.** Read.

| नाम (Noun) | विशेषणांचा वापर (Usage of the adjectives) | | |
|---|---|---|---|
| ती बँक | स्वच्छ बँक | सुंदर बँक | छान बँक |
| तो परिसर | स्वच्छ परिसर | सुंदर परिसर | छान परिसर |
| ते टेबल | स्वच्छ टेबल | सुंदर टेबल | छान टेबल |
| त्या बँका | स्वच्छ बँका | सुंदर बँका | छान बँका |
| ते परिसर | स्वच्छ परिसर | सुंदर परिसर | छान परिसर |
| ती टेबले | स्वच्छ टेबले | सुंदर टेबले | छान टेबले |

**अविकारी विशेषणे**
(Non-inflectional adjectives)
(नामाच्या लिंगानुसार न बदलणारी विशेषणे)

**ग. आता हा तक्ता वाचू या.** Read.

| नाम (Noun) | विशेषणांचा वापर (Usage of the adjectives) | | |
|---|---|---|---|
| ती बँक | चांगली बँक | नीटनेटकी बँक | मोठी बँक |
| तो परिसर | चांगला परिसर | नीटनेटका परिसर | मोठा परिसर |
| ते टेबल | चांगले / चांगलं टेबल | नीटनेटके / नीटनेटकं टेबल | मोठे / मोठं टेबल |
| त्या बँका | चांगल्या बँका | नीटनेटक्या बँका | मोठ्या बँका |
| ते परिसर | चांगले परिसर | नीटनेटके परिसर | मोठे परिसर |
| ती टेबले | चांगली टेबले | नीटनेटकी टेबले | मोठी टेबले |

**विकारी विशेषणे**
(Inflectional adjectives)
(नामाच्या लिंगानुसार बदलणारी विशेषणे)

**घ. खालील वाक्यांमध्ये कंसातील विशेषणाचे योग्य रूप लिहू या.**
**Write the correct form of adjectives given in the brackets.**

(गोड, खूप, गरमागरम, नवा, आकर्षक, सुंदर, मोठा, भव्य, चांगला, अप्रतिम)

उदा. शिवकुमारने भिंतीवर सुंदर (ती)चित्रे लावली.

अ. बँकेच्या समोर ---------------- (ते)झाड आहे.

आ. ग्राहक मेळाव्यात शिवकुमारने ---------------- (ते)भाषण केले.

इ. मेळाव्याला सर्व कर्मचारी ---------------- (तो)पोशाख घालून आले होते.

ई. बँकेचे ---------------- (ते)बॅनर सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होते.

उ. मराठीत भाषण केल्याबद्दल साबळेसाहेबांनी शिवकुमारचे ---------------- (ते)कौतुक केले.

ऊ. अमृताने ---------------- (तो)आवाजात मराठी भावगीत गायले.

ए. मेळाव्यासाठी ---------------- (ती)सजावट केली होती.

ॲ. बँकेच्या मुख्य दरवाजासमोर ---------------- (ती)रांगोळी काढली होती.

ऐ. सर्व पाहुण्यांना ---------------- (ते)बटाटेवडे आणि (तो)चहा दिला.

ओ. शाखाप्रबंधक साबळे यांनी बँकेच्या ---------------- (त्या)योजनांची माहिती दिली.

**च. काही नामे आणि काही विशेषणे दिली आहेत. प्रत्येक नामाला प्रत्येक विशेषण जोडायचे आहे.** **Write as shown in the example.**

(नामाचे लिंग व वचन आणि विशेषणाचा प्रकार लक्षात घ्यायचा आहे.)

उदा. विशेषण : चांगले; नामे : काम, कंटाळा, मुलगी
चांगले काम, चांगला कंटाळा, चांगली मुलगी

| | बँक | खाते | ग्राहक (अ.व.) | मेळावा |
|---|---|---|---|---|
| नवा | | | | |
| हुशार | | | | |
| चकाचक | | | | |
| बोलका | | | | |




**तुमच्या माहितीसाठी...**

विशेषणांचा वापर (Usage of the adjectives)

- योग्य विशेषण योग्य नामाला वापरायला हवे.
- 'चांगला' कंटाळा असतो का? कंटाळा या नामाला खूप, थोडा, वाईट अशी विशेषणे लागू शकतील.
- बँक 'हुशार' असते का? बँक या नामाला कार्यक्षम, आधुनिक, जुनी इत्यादी विशेषणे लागू शकतील.
- तसेच, बोलकी बँक म्हणता येणार नाही. ग्राहकांशी संवाद साधणारी बँक असे म्हणता येईल.
- तसेच मेळावा या नामाला चांगला, छान, उत्साही असे म्हणता येईल.

**छ. खालील नामांसाठी चौकोनातील योग्य विशेषणे शोधून लिहू या. (एका नामाला अनेक विशेषणेसुद्धा लागू शकतील.)** **Find out suitable adjectives for the given nouns.**

तत्पर आळशी स्वच्छ धोधो वाईट मळक्या कामसू शांत गोड
पावसाळी शुद्ध नीटनेटकी काटेकोर फाटक्या रंगीत लाकडी
मस्त कंटाळा जुनी वाहणारे फायदेशीर लख्ख खमंग अचूक
शहाणे कोऱ्या बोलणे घाणेरडा फार हिरवीगार पारदर्शक लाल
जरासा योग्य पुरेशी अशिक्षित

| नाम | विशेषण / विशेषणे |
|---|---|
| योजना | उदा. फायदेशीर, जुनी, पारदर्शक |
| १. प्रकाश | |
| २. ग्राहक | |
| ३. भजी | |
| ४. टेबल | |
| ५. झाडे | |
| ६. सिग्नल | |
| ७. परिसर | |
| ८. पाऊस | |
| ९. माहिती | |
| १०. कागद | |
| ११. कर्मचारी | |
| १२. हस्ताक्षर | |
| १३. चहा | |
| १४. पाणी | |

| | |
|---|---|
| १५. नोटा | |
| १६. हिशेब | |
| १७. केबिन | |

**ज. खालील अर्ज वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

**Read and answer the following questions.**

दिनांक : १३ / ८ / २०१८

पोलीस इन्स्पेक्टर,
खेरवाडी पोलीस ठाणे
मुंबई

विषय : डेबिटकार्डाचा दुरुपयोग झाल्याची तक्रार नोंदवणे.

महोदय,

मी, संतोष माकुडे, राहणार कलानगर, मुंबई, अशी विनंती करतो की कृपया माझी तक्रार नोंदवून घ्यावी. काल, दिनांक १२ / ८ /२०१८ रोजी संध्याकाळी ७ ते ७.१५ च्या दरम्यान माझे डेबिटकार्ड वापरले गेल्याचे माझ्या लक्षात आले. त्यावेळी मी गाडी चालवत होतो म्हणून माझ्या मोबाईलवर आलेले 'ओटीपी'चे मेसेज मी पाहिले नव्हते. घरी आल्यावर मी ते वाचले. मी लगेच माझ्या बँक खात्याची शिल्लक तपासल्यावर माझ्या लक्षात आले, की माझ्या खात्यातील एकूण ३०,००० रुपये ऑनलाईन खर्च केले गेले आहेत.

मी ह्यापूर्वी कधीही माझ्या खात्याबद्दल वा माझ्या डेबिटकार्डाबद्दल कोणतीही माहिती कोणालाही दिलेली नाही. तेव्हा कृपया माझी तक्रार नोंदवून घ्यावी आणि माझ्या खात्यातून गेलेल्या रकमेचा तपास लावावा ही विनंती. सोबत माझ्या घराचा पत्ता देत आहे आणि बाकीच्या तपशिलासाठी आवश्यक ती कागदपत्रे जोडली आहेत.

आपला नम्र,

(संतोष माकुडे)

पत्ता : फ्लॅट क्रमांक १३२ / ए, जगत विद्या, कलानगर, बांद्रा (पू.) मुंबई ४०००५१

**अ. चूक की बरोबर ते लिहू या.** True or false.

१. संतोष माकुडे यांनी शाखाधिकाऱ्यांना उद्देशून हा अर्ज लिहिला आहे. ----------------

२. श्री॰ माकुडे यांचे डेबिट कार्ड हरवले आहे. ----------------

३. पावणे सात ते सात दरम्यान हे त्यांच्या लक्षात आले. ----------------

४. त्यांना आलेल्या मेसेजमुळे माकुडे यांच्या झाला प्रकार लक्षात आला. ----------------

५. श्री॰ माकुडे यांनी त्यांच्या खात्याची माहिती पूर्वी एका एजंटला दिल्यामुळे त्यांच्या कार्डाचा दुरुपयोग झाला. ----------------

**दृष्टिक्षेप ।** Overview

| नामे | | |
|---|---|---|
| **तो (पु॰)** | **ती (स्त्री॰)** | **ते (नपुं॰)** |
| तो खर्च, ते -<br>expenditure<br>खर्चा-, खर्चां- | ती टपरी, त्या टपऱ्या<br>small makeshift shop<br>टपरी-, टपऱ्यां- | ते सफरचंद, ती सफरचंदे / दं<br>apple<br>सफरचंदा-, सफरचंदां- |
| तो व्यवहार, ते -<br>transaction<br>व्यवहारा-, व्यवहारां- | ती शिल्लक, -<br>balance<br>शिलकी- | ते पुस्तक, ती पुस्तके / कं<br>book<br>पुस्तका-, पुस्तकां- |
| तो मेळावा, ते मेळावे<br>get together<br>मेळाव्या-, मेळाव्यां- | ती वस्तू, त्या -<br>article<br>वस्तू-, वस्तूं- | ते भाषण, ती भाषणे / णं<br>talk, speech<br>भाषणा-, भाषणां- |
| तो / ती ठेवीदार, ते / त्या - *<br>depositor<br>ठेवीदारा-, ठेवीदारां- | ती मर्यादा, त्या -<br>(sanctioned) limit<br>मर्यादे-, मर्यादां- | ते काम, ती कामे / मं<br>work<br>कामा-, कामां- |
| तो चौक, ते -<br>square<br>चौका-, चौकां- | ती खुर्ची, त्या खुर्च्या<br>chair<br>खुर्ची-, खुर्च्यां- | ते कौतुक, ती कौतुके / कं<br>admiration, appreciation<br>कौतुका-, कौतुकां- |
| तो उत्साह, -<br>enthusiasm<br>उत्साहा- | ती रजा, त्या रजा<br>leave<br>(to remain absent on duty)<br>रजे-, रजां- | ते व्यवस्थापन, -<br>management<br>व्यवस्थापना- |
| तो चिखल, -<br>mud<br>चिखला- | ती मजा, -<br>enjoyment<br>मजे- | ते उद्दिष्ट, ती उद्दिष्टे / ष्टं<br>goal<br>उद्दिष्टा- , उद्दिष्टां- |

| | | |
|---|---|---|
| तो आराखडा, ते आराखडे<br>plan<br>आराखड्या-, आराखड्यां- | ती मदत, -<br>help<br>मदती- | ते कामकाज, -<br>work<br>कामकाजा- |
| तो आठवडा, ते आठवडे<br>week<br>आठवड्या-, आठवड्यां- | ती धावपळ, -<br>running here and there for work<br>धावपळी- | ते डोके / कं, ती डोकी<br>head<br>डोक्या-, डोक्यां- |
| तो टप्पा, ते टप्पे<br>step<br>टप्प्या-, टप्प्यां- | ती गादी, त्या गाद्या<br>mattress<br>गादी-, गाद्यां- | |
| तो विचार, ते -<br>thought<br>विचारा-, विचारां- | ती मुदतठेव, त्या मुदतठेवी<br>time deposit<br>मुदतठेवी-, मुदतठेवीं- | |
| तो पोशाख, ते -<br>costume<br>पोशाखा-, पोशाखां- | ती गरज, त्या गरजा<br>need<br>गरजे-, गरजां- | |
| तो चित्रपट, ते -<br>movie<br>चित्रपटा-, चित्रपटां- | ती सजावट, त्या सजावटी<br>decoration<br>सजावटी-, सजावटीं- | |
| तो पुतळा, ते पुतळे<br>statue<br>पुतळ्या-, पुतळ्यां- | ती मागणी, त्या मागण्या<br>demand<br>मागणी-, मागण्यां- | |
| तो चलनफुगवटा, -<br>inflation<br>चलनफुगवट्या- | ती पातळी, त्या पातळ्या<br>level<br>पातळी-, पातळ्यां- | |
| तो / ती सल्लागार, ते / त्या - *<br>adviser<br>सल्लागारा- सल्लागारां- | ती जबाबदारी, त्या जबाबदाऱ्या<br>responsibility<br>जबाबदारी-, जबाबदाऱ्यां- | |
| | ती कपात, त्या कपाती<br>cut<br>कपाती-, कपात्यां- | |
| | ती सुट्टी, त्या सुट्ट्या<br>recess, holiday, break<br>सुट्टी-, सुट्ट्यां- | |
| | ती उद्घोषणा, त्या -<br>announcement<br>उद्घोषणे-, उद्घोषणां- | |

*** these nouns are both masculine and feminine**

## क्रियापदे

सांगणे – to tell
भरणे – to deposit
ठेवणे – to put
शिकणे – to learn
झोपणे – to sleep
वाजणे – to ring
सरकणे – to move
राखणे – to maintain
दिसणे – to look
आणणे – to bring
पोचणे – to reach
पडणे – to fall
वापरणे – to use
पाठवणे – to send
गाणे – to sing
लोळणे – to relax
परतणे – to sauté
जमणे – to gather
येणे – to come
उघडणे – to open
बोलावणे – to call
तपासणे – to check, to examine

## क्रियाविशेषण / अव्यय

लवकर – fast
परवा – day before yesterday OR day after tomorrow
उत्स्फूर्त – spontaneous
हळूहळू – slowly
आरामात – leisurely
अलीकडे – nowadays

## नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या

| नाम / इतर शब्द + क्रियापद | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| खरेदी करणे | to purchase |
| मागणी करणे | to demand |
| लक्ष वेधणे | to attract attention |
| पडताळून पाहणे | to tally |
| पार पाडणे | to fulfil a responsibility / task |
| वेळा सांगणे | to tell the timings |
| संवाद साधणे | to converse |
| गप्पा मारणे | to chitchat |
| रांगोळी काढणे | to draw a decorative design |
| गोठवून टाकणे | to block |

# ४ नेट बँकिग











## चला, शिकू या...

- ग्राहकांना नेट बँकिंग / मोबाईल बँकिंगची माहिती देणे
- शक्यता, क्षमता यांविषयी बोलणे
- इच्छा, गरज बोलून दाखवणे
- रंग ओळखता येणे
- पूर्ण भूतकाळ शिकणे
- संबंध, मालकी हक्क दाखवणे (षष्ठी विभक्तिप्रत्यय)
- सामान्यरूपे शिकणे

## १ नेट बँकिंगची सुविधा

### क. खालील संवाद वाचू या. Read.

मॅनेजर साबळे : शिवकुमार, माझ्या केबिनमध्ये या.

शिवकुमार : हो, सर.

मॅनेजर साबळे : हे आपले जुने ग्राहक आहेत. भोसले. यांचा वाहतुकीचा व्यवसाय आहे. यांना नेट बँकिंगची माहिती हवी आहे. मी त्यांना सांगणार आहे. मराठीतून माहिती कशी सांगायची, ते तुम्हाला शिकता यावं म्हणून तुम्हाला मुद्दाम बोलावलं.



शिवकुमार : हो, सर, मी ऐकतो. इथे बसू का?

साबळे : हो, बसा. भोसले, तुम्हीही बसा. सांगा, कसा काय चाललाय धंदा?

भोसले : धंदा छान चाललाय. पण माझे ट्रक आता लांबच्या राज्यात जाऊ लागले आहेत. त्यामुळे पैसे पाठवण्याची मोठीच समस्या झाली आहे. माझ्या ऑफिसमधूनच किंवा घरूनही पैसे पाठवता यायला पाहिजेत किंवा तिकडून मला लगेच मिळायलाही हवेत. कसं करता येईल?

साबळे : त्यासाठीच तर नेट बँकिंगची सुविधा आहे आपल्याकडे. तुम्ही ही सुविधा घेतलीत तर तुमची सगळी अडचण दूर होईल. नेट बँकिंगमध्ये तुमच्या संगणकावरून म्हणजेच कम्प्युटर किंवा लॅपटॉपवरून किंवा तुमच्या मोबाईलवरूनही तुम्ही बँकेचे सर्व व्यवहार करू शकता. तुम्ही तुमचे चालू खाते उघडून बघू शकता. पूर्वी झालेले व्यवहार बघू शकता. तुमच्या खात्याचे स्टेटमेंट म्हणजे खातेउतारा घेऊन त्याची छापील प्रतही तुम्ही काढू शकता.

भोसले : हो. पण मला पैसे लगेच मिळायला हवेत आणि ताबडतोब दुसऱ्या व्यक्तीला पाठवताही यायला हवेत. ते कसं काय जमणार? अहो, चेक दिला की तो वटायला म्हणजे क्लिअर व्हायलाच चार दिवस थांबावं लागतं.

साबळे : हो, तेच सांगतोय. तुमच्या व्यवहाराचे पैसे तुम्ही लगेच पाठवू शकता किंवा तुमच्या खात्यात जमा करायला दुसऱ्यांना सांगू शकता. आणि हे व्यवहार लगेच होतात. चेकच्या व्यवहारात लागतो तसा वेळ अजिबात लागत नाही.

भोसले : काय करावं लागेल नेट बँकिंग सुरू करायला?

साबळे : शिवकुमार तुम्हाला अर्ज देतील. तो भरून द्या. आणि तीन दिवसांत तुम्हाला आमच्या मुख्य ऑफिसकडून पत्र येईल. त्यामध्ये ते सुरू करायची सगळी पद्धत दिलेली असेल.

त्याप्रमाणे तुम्ही सगळं करून तुमचा एक पासवर्ड तयार करा. तो कसा करायचा त्याच्या काही अटी असतात. त्याप्रमाणे तुम्ही तो जर योग्य पद्धतीने केलात तर एका दिवसात तुमचं नेट बँकिंगचं खातं तुमच्या लॅपटॉपवर सुरू होईल.

भोसले : पण हे सगळं सुरक्षित असतं का? आपण तर सध्या सायबर चोरीच्या किती घटना ऐकतो!

साबळे : त्यासाठी काय काळजी घ्यायची, खातं कसं वापरायचं हे सगळं आम्ही सांगू. तशी काळजी तुम्ही घेतलीत तर नेट बँकिंगचे व्यवहार अगदी शंभर टक्के सुरक्षित असतात. तुम्ही अर्ज द्या. तुमच्या मदतीला शिवकुमार आहेत. काहीही अडचण आली तरी संकोच न करता विचारा, फोन करा. सध्या रोज तुम्हाला बँकेत यावं लागतंय. एकदा नेट बँकिंग सुरू झालं ना की बघा तुमचे बँकेतले हेलपाटे एकदम कमी होतील. घरी वेळेवर जेवायला जाल.

भोसले : अरे वा! वा! खरंच इतकं सोपं आहे का?

साबळे : शिवाय तुमची सगळी बिलं तुम्ही नेट बँकिंगने भरू शकता. त्या कामांसाठी तुम्हाला नोकराला पाठवायला नको. अजून काय पाहिजे? बोला. शिवकुमार, कळलं का तुम्हाला आमचं बोलणं?

शिवकुमार : हो. थोडं थोडं कळलं. काही शब्द अवघड आहेत. अर्थ कळला नाही.

साबळे : हं, विचारा. कशाकशाचा अर्थ नाही कळला?

शिवकुमार : ‘हवं’, ‘पाहिजे’ म्हणजे काय?

टीप : हिरव्या रंगातील क्रियापदांकडेही लक्ष द्या. क्रियापदांची ही रूपे पुढील पाठात आपण शिकणार आहोत.

**इच्छा, गरज व्यक्त करणे – to express the wishes and needs**

| | | |
|---|---|---|
| मला | (तो) अर्ज | पाहिजे |
| | (ती) फाईल | |
| | (ते) पेन | |
| | (ते) अर्ज | पाहिजेत |
| | (त्या) फाइली | |
| | (ती) पेने / पेनं | |

| | | |
|---|---|---|
| मला | (तो) अर्ज | हवा आहे / हवाय |
| | (ती) फाईल | हवी आहे / हवीय |
| | (ते) पेन | हवे / हवं आहे / हवंय |
| | (ते) अर्ज | हवे आहेत / हवेत |
| | (त्या) फाइली | हव्या आहेत / हव्यात |
| | (ती) पेने / पेनं | हवी आहेत / हवीत |

**तुमच्या माहितीसाठी...**

हवंय / पाहिजे – to want / need

- इच्छा, गरज व्यक्त करण्यासाठी हवे / हवं आहे (हवंय), पाहिजे (असणे) ही क्रियापदे वापरतात.
- 'हवे आहे' वापरताना वाक्यातील नामाच्या लिंगानुसार बदल होतो.
- दोन्ही जरी समानार्थी शब्द असले तरी 'पाहिजे'मध्ये थोडा आग्रह आहे.
- हवे, पाहिजे यांच्यानंतर साहाय्यकारी क्रियापद लिहावे किंवा बोलावे लागतेच असे नाही.

**ख. सराव. अधोरेखित शब्दांऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.**
**Pattern drill.**

शिक्षक

मला लिहायचं आहे. – पेन
<u>मला लिहायचं आहे. मला पेन हवं आहे.</u>
मला तहान लागली आहे. – पाणी
माझी तब्येत बरी नाही. – रजा
अर्ज लिहायचा आहे. – कागद
आज खूप काम आहे. – थोडा वेळ

विद्यार्थी

मला लिहायचं आहे. मला पेन हवं आहे.

**ग. खालील वाक्ये 'पाहिजे आहे' किंवा 'हवे / हवं आहे' वापरून पुन्हा लिहू या. (कंसात नामाचे लिंग दिले आहे.)** **Rewrite the sentences as shown in the example.**

उदा. साबळेसाहेबांना हिरवी फाईल हवी आहे. साबळेसाहेबांना हिरवी फाईल पाहिजे आहे.

अ. ग्राहक हो, तुम्हाला काय हवं आहे? ---------------------------------------------

आ. आम्हाला (ती) कर्जमाफी पाहिजे आहे. ---------------------------------------------

इ. कर्मचाऱ्यांना (तो) बोनस पाहिजे आहे. ---------------------------------------------

ई. सर्वांना बँकेत चांगलं (ते) वातावरण पाहिजे आहे. ---------------------------------------------

उ. शिवकुमार, तुम्हाला कम्प्युटर हवा का? ---------------------------------------------

ऊ. किमया, तुम्हाला किती (ती) कॅश पाहिजे? ---------------------------------------------

घ. 'पाहिजे' च्या जागी हवा / हवी / हवे ची योग्य रूपे वापरून वाक्ये पुन्हा लिहू या.
Rewrite the sentences using the correct form of हवा / हवी / हवे.

अ. साबळेसाहेबांना फाईल लगेच पाहिजे आहे. (ती फाईल)

_______________________________________________

आ. बापटांना व्याजाची रक्कम पाहिजे आहे. (ती रक्कम)

_______________________________________________

इ. ग्राहकांना बँकेत पाणी पाहिजे आहे. (ते पाणी)

_______________________________________________

ई. सर्वांना आत्ता चहा पाहिजे आहे. (तो चहा)

_______________________________________________

उ. त्यांना मुदतठेवींचे व्याजाचे दर पाहिजे आहेत. (तो दर)

_______________________________________________

ऊ. "सातपुतेबाई, इथं पासबुकं पाहिजेत." (ते पासबुक)

_______________________________________________

ए. बाहेर ग्राहकांना बसण्यासाठी खुर्च्या पाहिजे आहेत. (ती खुर्ची)

_______________________________________________

ॲ. बँकेच्या आवारात सावलीसाठी झाडे लावायला पाहिजे आहेत. (ते झाड)

_______________________________________________

ऐ. पाणी कोणाला पाहिजे?


_______________________________________________

_______________________________________________

ओ. पासबुक कोणाला भरून पाहिजे आहे?

_______________________________________________

_______________________________________________



च. आता, वरील संवादातील (१ - क) केशरी शब्द पाहू या.

**Have a look at the words marked in orange.**

**शकणे – to be able to**

शक्यता, मानवी क्षमता दाखवण्यासाठी 'शकणे' हे क्रियापद वापरले जाते.
उदा॰ नेट बँकिंगमुळे मोबाईलवरूनही मी बँकेचे सर्व व्यवहार करू शकतो.
श्वेता खरंतर डावखुरी आहे. पण ती उजव्या हातानेही लिहू शकते.
धातू + ऊ + शकणे
कर + ऊ + शकणे = करू शकतो, शकते, शकतात ...
अशा वाक्यरचनेत करणे, लिहिणे अशी क्रियापदे मुख्य क्रियापदे असतात तर शकणे हे साहाय्यक क्रियापद असते. त्यांना एकत्रितपणे संयुक्त क्रियापदे म्हणतात.

| सर्वनामे (Pronouns) | करणे (मुख्य क्रियापद) (to do – main verb) | शकणे (साहाय्यक क्रियापद) (to be able to – auxiliary verb) |
|---|---|---|
| मी (पु॰) | करू | शकतो |
| मी (स्त्री॰) | | शकते |
| आम्ही / आपण | | शकतो |
| तू (पु॰) | | शकतोस |
| तू (स्त्री॰) | | शकतेस |
| तुम्ही / आपण | | शकता |
| तो | | शकतो |
| ती | | शकते |
| ते | | शकते / शकतं |
| ते | | शकतात |
| त्या | | |
| ती | | |

शिक्षक

तुम्ही
उद्या येऊ शकता का तुम्ही?
तो
ते (अ०व०)
त्या
तू (स्त्री०)
आपण

विद्यार्थी

उद्या येऊ शकता का तुम्ही?

### ज. नेट बँकिंगचे फायदे. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये करू या.

**Make sentences as shown in the example.**

(आपण) बँकेचे सर्व व्यवहार मोबाईलवरून करणे – नेट बँकिंगमुळे आपण बँकेचे सर्व व्यवहार मोबाईलवरूनही करू शकतो.



अ. (तुम्ही) खात्यातील रक्कम बघणे –

_______________________________________________

आ. (तू) ऑनलाईन खरेदी करणे –

_______________________________________________

इ. (आपण) मोबाईलवरून बिलं भरणे –

_______________________________________________

ई. (त्या) पैसे पाठवणे –

_______________________________________________

उ. (तो) रेल्वेचे तिकिट काढणे –

_______________________________________________

### झ. खालील वाक्ये वाचून ती कोणत्या गटात जातील ते ठरवू या.

**Read and divide the sentences in the correct column.**

आपला पासवर्ड नियमितपणे बदलणे.

अ. आपला पासवर्ड शक्य तितका सोपा ठेवणे.

आ. आपले ऑनलाईन बँकिंग सत्र पूर्ण झाल्यावर त्यातून योग्य पद्धतीने लॉगआऊट करून बाहेर पडणे.



इ. आपला इंटरनेट बँकिंग पासवर्ड गोपनीय ठेवणे.

ई. वारंवार आपले खाते तपासणे.

उ. बँकेकडून आलेली पिन, पासवर्ड अशी माहिती असलेली कागदपत्रे जपून ठेवणे.

ऊ. असुरक्षित साईट्स वरून विविध सॉफ्टवेअर्स, प्रोग्रॅम्स डाऊनलोड करणे.

ए. सार्वजनिक ठिकाणचे संगणक वापरताना विशेष काळजी घेणे.

ॲ. मोबाईल नोटिफिकेशनच्या सुविधेचा वापर करणे.

ऐ. जर बँकेचे अधिकारी फोनवर पिन, पासवर्ड विचारत असतील तर तो सांगणे.

| काय करावे (dos) | काय करू नये (don'ts) |
|---|---|
| आपला पासवर्ड नियमितपणे बदलणे. | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |
| ---------------------------------------- ---------------------------------------- | ---------------------------------------- ---------------------------------------- |

**ट. आता वरील वाक्ये उदाहरणात दाखवल्याप्रमाणे आवश्यक ते बदल करून पुन्हा लिहू या.**
**Rewrite the sentences as shown in the example.**

**इंटरनेट बँकिंगसंदर्भात ग्राहकांसाठी सूचना :** उदा. आपला पासवर्ड नियमितपणे बदला.
किंवा आपला पासवर्ड नियमितपणे बदलावा.

अ. ---------------------------------------------------------------------------

आ. ---------------------------------------------------------------------------

इ. ---------------------------------------------------------------------------

ई. ---------------------------------------------------------------------------

उ. ---------------------------------------------------------------------------

ऊ. ---------------------------------------------------------------------------

ए. ---------------------------------------------------------------------------

ॲ. ---------------------------------------------------------------------------

ऐ. ---------------------------------------------------------------------------

## २ रंगांची दुनिया

**क. खालील वर्णन वाचू या.** **Read.**



मघाशी मस्त पाऊस पडत होता आणि आता छान सोनेरी ऊन पडलंय. हे शहर आहे; तरीसुद्धा जागा मिळेल त्या फटीतून हिरवी गवताची पाती आणि नाजूक, पोपटी पानांची रोपटी उगवून आली आहेत. डांबरी रस्ते पावसाने धुतल्यामुळे काळेभोर दिसतायत. त्यांच्यावरचे पांढरे झेब्राक्रॉसिंगचे पट्टे उठून दिसतायत. आणि आकाशात बघा, ऊन-पावसाच्या खेळामुळे इंद्रधनुष्य पडलंय. सगळे रंग एकाच कमानीत! तां ना पि हि नि पा जा.

म्हणजे काय? बघू या.

| | | |
|---|---|---|
| लाल | नारिंगी | पिवळा |
| हिरवा | निळा | आकाशी |
| जांभळा | काळा | पांढरा |
| गुलाबी | तपकिरी | राखाडी |

**ख. सराव. अधोरेखित शब्दांऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा बोलू या.**
**Pattern drill.**

शिक्षक

ती फाईल - हिरवा
मला जरा ती हिरवी फाईल देता का?
तो चार्जर - काळा
ते पेन - लाल
त्या फाइली - गुलाबी
ते कागद (अ॰व॰) - पांढरा
ती डायरी - तपकिरी

विद्यार्थी

मला जरा ती हिरवी फाईल देता का?

| **तुमच्या माहितीसाठी...** |
|---|
| विकारी-अविकारी रंग<br>(Colours - inflectional and non-inflectional) |
| रंगही विशेषणांसारखे विकारी-अविकारी असतात.<br>उदा॰ लाल पेन, लाल फाईल इ॰ - अविकारी<br>हिरवे पेन, हिरवी फाईल इ॰ - विकारी |

ग. खालील चित्रे, त्यांची नावे आणि रंग यांच्या जोड्या लावू या. आवश्यक तेथे विशेषणाचे योग्य रूप लिहू या. Match the columns.

| चित्र | नाम | रंग |
|---|---|---|
|  अ | कागद | नारिंगी |
|  आ | टेबल | पांढरा |
|  इ | फोल्डर | काळा |
|  ई | घड्याळ | पिवळा |
|  उ | दरवाजाची मूठ | सोनेरी |
|  ऊ | डायरी | राखाडी |
|  ए | पैशाचे पाकीट | निळा |
|  ॲ | पर्स | तपकिरी |

**घ. कोणती फाईल कोणत्या कामासाठी वापरायची ते ठरवू या.** **Decide, which file to use for which department and make sentences as shown in the example.**

(कर्ज प्रकरणांसाठी, तक्रारींसाठी, क्लिअरिंग विभागासाठी, रोखीच्या व्यवहारांसाठी, बचत विभागासाठी)



उदा. लाल फाईल मुदतठेवींसाठी

अ. ------------------------------------------------

आ. ------------------------------------------------

इ. ------------------------------------------------------------

ई. ------------------------------------------------------------

उ. ------------------------------------------------------------

ऊ. ------------------------------------------------------------

ए. ------------------------------------------------------------

## ३ शहाणा ग्राहक

**क. खालील गोष्ट वाचू या.** **Read.**

एक शहाणा ग्राहक होता. त्याचे नाव श्री. काटकसरे. त्याचे एका बँकेत बचत खाते होते. त्याला शाखाप्रबंधकांनी नेट बँकिंगची माहिती सांगितली होती. त्याप्रमाणे त्याने नेट बँकिंग सुरू केले होते. त्याला पाच वर्षे झाली होती. अगदी पहिल्या दिवसापासून नेट बँकिंगमुळे आपले पैसे कसे आणि कुठे वाचले ते त्याने एका डायरीत लिहून ठेवले होते.

बँकेत न जावे लागल्यामुळे वाचलेले पेट्रोलचे पैसे, वाचलेला वेळ याचा प्रत्येक वेळचा हिशेब त्याने लिहून ठेवला होता. आणि तेवढे पैसे बाजूला काढून ठेवले होते. प्रत्येक बिल लॅपटॉपवर भरल्यामुळे वाचलेला हेलपाट्यांचा खर्चही त्याने लिहून ठेवला होता. तेही पैसे त्याने साठवले होते.

आता पाच वर्षांनी त्याने ते पैसे मोजले आणि त्याला खूप आनंद झाला. कारण ती रक्कम खूपच मोठी झाली होती. ते होते वीस हजार रुपये!

ते वीस हजार रुपये घेऊन तो त्याच्या गावी गेला आणि तिथल्या गरीब मुलांच्या शिक्षणासाठी ती रक्कम शाळेला दिली. गावाने त्याचा सत्कार केला.

### ख. वरील गोष्टीमधील लाल रंगातील क्रियापदे पुन्हा वाचू या.

Read the verbs marked in red in the above story.

**पूर्ण भूतकाळ – Past perfect tense**

- ही क्रियापदे भूतकाळात पूर्ण झालेली क्रिया दाखवतात. भूतकाळात पूर्ण झालेली क्रिया म्हणून याला पूर्ण भूतकाळ म्हणतात.
- उदा. पाच वर्षांनी ती रक्कम खूपच मोठी झाली होती.
- पूर्ण भूतकाळ - क्रियापदाचे भूतकाळी रूप + 'असणे'चे भूतकाळी रूप
- साध्या भूतकाळाप्रमाणेच पूर्ण भूतकाळातही सकर्मक क्रियापदे कर्माप्रमाणे चालतात, अकर्मक क्रियापदे कर्त्याच्या लिंगाप्रमाणे चालतात.

### ग. खालील तक्ता पूर्ण करू या. Complete the table.

पूर्ण भूतकाळ – अकर्मक क्रियापद 'बसणे' Past perfect tense – intransitive verb 'to sit'

| सर्वनामे | बसणे (पूर्ण भूतकाळ) | सर्वनामे | बसणे (पूर्ण भूतकाळ) |
|---|---|---|---|
| मी (पु.) | बसलो होतो | तो | ------------ ------------ |
| मी (स्त्री.) | ------------ होते | ती | ------------ ------------ |
| आम्ही / आपण | बसलो ------------ | ते | बसले ------------ / ------------ होतं |
| तू (पु.) | बसला होतास | ते | ------------ ------------ |
| तू (स्त्री.) | ------------ ------------ | त्या | ------------ ------------ |
| तुम्ही / आपण | ------------ होतात | ती | ------------ ------------ |

**घ. खालील तक्ता पूर्ण करू या.** Complete the table.
**पूर्ण भूतकाळ – सकर्मक क्रियापद ‘ठेवणे’** Past perfect tense – transitive verb ‘to keep’

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण, तुम्ही / आपण / | ए.व. | कागद ----------- होता | फाईल ठेवली -------- | पेन -------- होते / ठेवलं -------- |
| त्याने / त्यांनी, तिने / त्यांनी, त्याने / त्यांनी | अ.व. | कागद ठेवले -------- | फाइली ——— होत्या | पेने -------- होती |
| तू | ए.व. अ.व. | कागद ठेवला ------- कागद ठेवले होतेस | फाईल ठेवली होतीस फाइली ठेवल्या ------- | पेन ठेवले -------- पेने / पेनं ठेवली होतीस |

**च. खालील वाक्यांमध्ये पूर्ण भूतकाळाचे योग्य रूप लिहू या.** Fill in the blanks using the correct form of the past perfect tense.

(करणे(२), देणे, बसणे, साठवणे, होणे, आवडणे, म्हणणे(२), जाणे, असणे)

अ. सातपुतेबाईंनी (ते)टेबल स्वच्छ ---------------- ----------------.

आ. साबळेसाहेबांनी (ती)सूचना ---------------- ----------------.

इ. थोरातबाई खुर्चीवर ---------------- ----------------.

ई. त्यांनी पाच वर्षांमध्ये खूप (ते)पैसे ---------------- ----------------.

उ. मुदतठेवींचे व्याजाचे दर वाढवल्यामुळे ग्राहक खूष ———————— ————————.

ऊ. नेट बँकिंगचे मोबाईल (ते)ॲप तरुणांना ---------------- ----------------.

ए. कार्यक्रमाला वेळेवर येतो, असं आपटेसाहेब ---------------- ----------------.

ॲ. “मी रांगोळी काढते”, किमया ---------------- ----------------.

ऐ. “गायकवाडबाई, तुम्ही कुठे गेला होतात?”

ओ. “रक्षाबंधनाला बँकेला (ती)सुट्टी ---------------- ---------------- का?

ऑ. मेळाव्यामध्ये शिवकुमारने मराठीत (ते)भाषण ---------------- ----------------.

**छ. खालील उतारा पूर्ण भूतकाळ वापरून लिहू या.** **Rewrite the text below using the past perfect tense.**

बँकेत खूप गर्दी झाली आहे. एकूण कर्मचाऱ्यांपैकी तीन कर्मचारी रजेवर आहेत. मॅनेजरसाहेबांना भेटायला एक मोठे उद्योजक आले आहेत. त्यामुळे ते फारच कामात आहेत. साबळ्यांनी एक काम शिवकुमारला ताबडतोब करायला सांगितले. इथे काऊंटरला ग्राहकांनाही काम लवकर करून हवे आहे. कुठले काम आधी करावे हे त्याला कळले नव्हते. जेवणाची सुट्टी झाली तरी गर्दी कमी झाली नाही. त्याने प्रशांत जेधेला मदतीला बोलावले. त्यात वीज गेल्यामुळे कम्प्युटर बंद पडले आहेत. सगळे लोक वीज येण्याची वाट पाहात थांबले आहेत.

बँकेत खूप गर्दी ------------------------------------------------------------.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------.

## ४ मुदतठेव विभागातील एक संवाद

**क. वाचू या.** **Read.**

गायकवाड : या जोशी. काय काम आहे तुमचं?

जोशी : ही माझी मुदतठेवीची पावती. तिची मुदत संपली आहे.

गायकवाड : मग काय करायचं? पैसे तुमच्या खात्यात जमा करू?

जोशी : सध्या व्याजाचा दर काय आहे?

गायकवाड : तीन वर्षांसाठी व्याजाचा दर चांगला आहे.

जोशी : शेअरमार्केटची काय स्थिती आहे ते बघतो आणि तुम्हाला कळवतो.

गायकवाड : अहो, शेअरमार्केटपेक्षा तुमची ठेव बँकेत जास्त सुरक्षित असते. केव्हाही पैसे लागले तर आम्ही तुम्हाला लगेच पैसे देऊ शकतो.

जोशी : असं म्हणताय? मग तीन वर्षांसाठी माझ्या पावतीची मुदत वाढवून द्या. नकोच शेअरमार्केटच्या फंदात पडायला.

**वरील संवादातील निळ्या रंगातील अक्षरे विभक्तिप्रत्यय आहेत.**
**(the blue letters in this dialogue are suffixes)**

**चा, ची, चे, चे, च्या, ची – genitive suffixes**

- दोन वस्तू, व्यक्ती यांमधील संबंध किंवा नाते दर्शवण्यासाठी नामे आणि सर्वनामे यांना षष्ठी विभक्तिप्रत्यय लावला जातो.
  - चा, ची, चे → एकवचनी विभक्तिप्रत्यय
  - चे, च्या, ची → अनेकवचनी विभक्तिप्रत्यय

थोडक्यात

शिवकुमारचा लॅपटॉप (तो)

किमयाची गाडी (ती)

सुभाषचे/चं पेन (ते)

त्याचप्रमाणे

शिवकुमारचे लॅपटॉप (ते)

किमयाच्या गाड्या (त्या)

सुभाषची पेने/पेनं (ती)

| | **पुल्लिंगी** **एकवचन/अनेकवचन** | **स्त्रीलिंगी** **एकवचन/अनेकवचन** | **नपुंसकलिंगी** **एकवचन/अनेकवचन** |
|---|---|---|---|
| **मी** | माझा / माझे | माझी / माझ्या | माझे / माझं / माझी |
| **तू** | तुझा / तुझे | तुझी / तुझ्या | तुझे / तुझं / तुझी |
| **तो / ते** | त्याचा / त्याचे | त्याची / त्याच्या | त्याचे / त्याचं / त्याची |
| **ती** | तिचा / तिचे | तिची / तिच्या | तिचे / तिचं / तिची |
| **आम्ही** | आमचा / आमचे | आमची / आमच्या | आमचे / आमचं / आमची |
| **आपण** | आपला / आपले | आपली / आपल्या | आपले / आपलं / आपली |
| **तुम्ही** | तुमचा / तुमचे | तुमची / तुमच्या | तुमचे / तुमचं / तुमची |
| **ते / त्या / ती** | त्यांचा / त्यांचे | त्यांची / त्यांच्या | त्यांचे / त्यांचं / त्यांची |

**ख. गाळलेल्या जागी कंसातील सर्वनामांची षष्ठी विभक्तीची रूपे लिहू या.**
**Fill in the blanks using the correct genitive pronoun.**

**(कंसात नामाचे लिंग दिले आहे. – the gender of the noun is mentioned in the bracket.)**

उदा॰ (तनुजा) – तिचे चेकबुक(ते) हरवले आहे.

अ. (टीना) - ------------------------ अक्षर(ते) सुंदर आहे.

आ. (चेतन) - ------------------------ शर्ट(तो) छान आहे.

इ. (बाळ) ------------------------ बाटली(ती) नवी आहे.

ई. (राहुल आणि मी) --------------------- बस(ती) चुकली म्हणून आम्हाला उशीर झाला.

उ. (देशमुखसाहेब) ------------------------ लक्ष(ते) कुठे आहे?

ऊ. तो लॅपटॉप (मी) ------------------------ आहे.

ए. हे पेन (रिटा) ------------------------ आहे.

**ग. खालील संवादामध्ये सर्वनामाची षष्ठी वापरून रिकाम्या जागा भरू या. मदतीसाठी नामांची लिंगे कंसात दिली आहेत.**
**Fill in the blanks using the correct genitive pronoun.**

“हे (मी) ------------------ (१) (ते)पासबुक आहे आणि हे माझ्या बायको ---------------
(२) पासबुक आहे. ही (आम्ही) --------------------- (३) पासबुकं भरून देता का?
(तुम्ही) --------------------- (४) (तो)प्रिन्टर चालू आहे ना? काय म्हणता? चालू नाही?
मॅनेजरसाहेब कुठे आहेत? (ते) ---------------------
(५) (ती)केबिन तर बंद दिसतेय. (तुम्ही) ------------------
(६) (ते) नाव सांगा. मला तक्रार करायची आहे. मॅनेजर त्या
काऊंटरवर बसले आहेत, (ते) त्यांचा (तो) प्रिंटर चालू आहे. मी
त्यांच्याकडूनच पासबुक भरून घेतो.”



घ. **खालील उताऱ्यात सर्वनामांच्या षष्ठीची योग्य रूपे लिहू या.**
**Fill in the blanks using the correct genitive pronoun.**

(तुम्ही) तुमच्या मुदतठेवीची मुदत अजून संपलेली नाही. (ती) ____________________ (१) (ती)मुदत संपायला अजून सहा महिने आहेत. (मी) ____________________ (२) (तो)सल्ला आहे की तुम्ही मुदतीपूर्वी रक्कम काढू नये. (तुम्ही) ____________________ (३) (ते)नुकसान होईल.

तुम्हाला व्याज खूपच कमी मिळेल. मुदत संपली की (आम्ही) आमच्या दुसऱ्या योजनेमध्ये तुम्ही हे पैसे गुंतवा. अशी (मी) ____________________ (४) आपल्याला (ती)विनंती आहे. (तुम्ही) ____________________ (५) मुलांशीही तुम्ही बोला. (ते) ____________________ (६) (ते)मत विचारा.

## ५ रंगकाम आणि दुरुस्ती

क. **खालील उतारा वाचू या व उताऱ्यातील षष्ठीचे विभक्तिप्रत्यय (चा, ची, चे, चे, च्या, ची) लागलेले शब्द अधोरेखित करू या.** **Read the paragraph and underline the words having the suffixes चा, ची, चे, चे, च्या, ची.**



प्रशांत जेधे कर्जवसुलीसाठी बाहेर निघाले आहेत. त्यांच्या मनात विचार आला... मॅनेजर साबळ्यांच्या केबिनमध्ये काम चालू आहे. भिंतीचा रंग गेला आहे, एका खुर्चीचा पाय मोडला आहे आणि टेबलाची काच फुटली आहे. दिव्यांची बटणेही बिघडली आहेत. केबिनच्या भिंतींना फिका निळा आणि खिडक्यांना गडद निळा रंग देणार आहेत. दिव्यांना नवी पांढरीशुभ्र बटणे बसवणार आहेत. टेबलाला आणि खुर्च्यांना चकचकीत तपकिरी पॉलिश करणार आहेत. ही कामे होईपर्यंत साबळे माझ्या खुर्चीवर बसणार आहेत. मी कर्जवसुलीच्या कामासाठी बाहेर जाणार, त्यामुळे शिवकुमारसमोर आज ग्राहकांची रांग लागेल. कारण आज शिवकुमारला दोघांचे काम करावे लागेल. शिवकुमारवरील कामाचे ओझे कमी करण्यासाठी स्वत: साबळे त्याला मदत करतील, पण केबिनमध्ये वाजलेला फोन कोणाचा आहे हे कसे कळणार?

**ख. आता उताऱ्यातील अधोरेखित केलेल्या शब्दांना विभक्तिप्रत्यय जोडताना काय बदल झाला आहे? त्या बदलाप्रमाणे शब्दांची खालील तक्त्यात विभागणी करू या.**

**Divide the underlined words in the following table as per the examples.**

| काहीच बदल नाही (no change) | अ - आ | अ - ई | ए - -यां |
|---|---|---|---|
| केबिन – केबिन- | टेबल – टेबला- | भिंत – भिंती- | साबळे – साबळ्यां |
| | | | |
| | | | |
| | | | |

**सामान्यरूप – Oblique form**

विभक्तिप्रत्यय जोडताना शब्दाच्या मूळ रूपात काही बदल होतात. शब्दाच्या या बदललेल्या रूपाला सामान्यरूप असे म्हणतात.
उदा॰ काम – कामाचे ओझे, भिंत – भिंतीचा रंग
लक्षात ठेवा :
अव्यय किंवा पदे जोडतानाही शब्दाचे सामान्यरूप होते.
उदा॰ काम – कामासाठी, भिंत – भिंतीवर

**ग. सामान्यरूपांच्या बाबतीतील अशा काही टीपा आपणही शोधून काढू या.**

**Find out some useful tips to remember the oblique forms of the nouns.**

**टीप** : खुर्ची, कर्जवसुली या नामांची रूपे बदलली का? ईकारान्त एकवचनी स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप होताना मूळ रूपात बदल होत नाही. पण अनेकवचनी नामाचे मात्र सामान्यरूप होते.
उदा॰ खुर्च्या – खुर्च्यां

घ. पाठातील काही नामांची सामान्यरूपे लिहू या. Complete the table.

| नाम / एकवचन | अनेकवचन | ए॰व॰सारू॰ | अ॰व॰सारू॰ |
|---|---|---|---|
| ती चोरी | ------------- | ------------- | ------------- |
| ती गोष्ट | ------------- | ------------- | ------------- |
| ती मदत | ------------- | ------------- | ------------- |
| ती पद्धत | ------------- | ------------- | ------------- |
| ते शिक्षण | ------------- | ------------- | ------------- |
| तो दिवस | ------------- | ------------- | ------------- |
| तो व्यवहार | ------------- | ------------- | ------------- |
| ते व्याज | ती व्याजे | ------------- | ------------- |
| ते खाते | ती खाती | खात्या- | खात्यां- |
| ती बँक | ------------- | ------------- | ------------- |

च. खालील वाक्यांमध्ये शब्दाच्या सामान्यरूपाला विभक्तिप्रत्यय जोडू या. Fill in the blanks.

अ. (पुस्तक) ------------------ पाने फाटली आहेत.

आ. (ग्राहक - अ॰व॰) ------------------ पासबुके लवकर भरून द्या.

इ. (केबिन) ------------------ दार लावा.

ई. माझ्या (लॉकर) लॉकरची किल्ली हरवली आहे.

उ. (पत्र) ------------------- मजकूर शिवकुमारने लिहिला होता.

ऊ. त्याने (भाषण) ------------------- तयारी केली होती.

ए. (सुरक्षारक्षक) सुरक्षारक्षकाची बंदूक त्याच्या खांद्यावर होती.

ॲ. आज (गायकवाडबाई) ------------------- डोकं दुखत होतं.

ऐ. सुभाष कदमांनी (दरवाजा) ------------------- कुलूप काढले.

ओ. आज (कोण) ------------------- कॅश लवकर जुळली?

ए॰व॰
चा
ची
चे
अ॰व॰
चे
च्या
ची

**छ. नामांची योग्य सामान्यरूपे करून त्यांना विभक्ती जोडून वाक्ये पूर्ण करू या.**

**Fill in the blanks using the oblique forms of the nouns in the brackets and adding the correct genitive suffix. (चा, ची, चे, चे, च्या, ची)**

उदा॰ ग्राहकांचे समाधान झाले.

अ. (ग्राहक – अ॰व॰) ------------------- (ती)रांग लागली.

आ. (कर्मचारी – अ॰व॰) ------------------- (ती)धावपळ उडाली.

इ. (रोखपाल) ------------------- (ती)रोकड संपली.


ई. (लोक – अ॰व॰) ------------------- (ती)गडबड सुरू झाली.

उ. “(तिजोरी) ------------------- (ते)कुलूप काढा;

(आम्ही) ------------------- पैसे आम्हाला द्या.”

ऊ. (शिवकुमार) ------------------- (ते)काम झटपट; पैसे दिले पटापट.

ए. (बँक) ------------------- कामकाजाची वेळ संपली.



**ज. खालील परिपत्रक वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

**Read the following circular and answer the questions.**

एएक्स१/सीएसडी/स्वच्छता पंधरवडा/ डिसेंबर २४, २०१८
बँकेच्या सर्व शाखा आणि व्यवस्थापकीय कार्यालये,
महोदय / महोदया,

विषय : १६ जाने. ते ३१ जाने. २०१९ या काळात स्वच्छता पंधरवडा पाळणे.

आपल्याला माहीत आहेच की महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीनिमित्त संपूर्ण भारत स्वच्छ राखण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दिनांक २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत अभियान जाहीर झाले. आपल्या बँकेनेही आपल्या सर्व शाखा आणि व्यवस्थापकीय कार्यालये स्वच्छ करण्याची मोहीम उघडली आहे.

आता केन्द्र सरकारने १६ जाने. ते ३१ जाने. २०१९ या काळात देशभर स्वच्छता पंधरवडा पाळण्याची सूचना केली आहे. या अभियानाचा भाग म्हणून खाली दिलेल्या गोष्टी करायच्या आहेत.

१. आपल्या बँकेच्या सर्व शाखा आणि कार्यालये १६ जाने. ते ३१ जाने. २०१९ या काळात स्वच्छता पंधरवडा साजरा करतील. यात ऑफिस / शाखा यांचा परिसर स्वच्छ करणे, निवासी परिसर तसेच सार्वजनिक जागा स्वच्छ करणे, जनजागृती करणे, सार्वजनिक शौचालये, गटारे साफ करणे, कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावणे इत्यादी कामांचा समावेश असेल. या पंधरवड्यातील २६ जाने. हा विशेष दिवस म्हणून साजरा होईल. सर्व कर्मचाऱ्यांनी या कामांमध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे. उल्लेखनीय कामांना झोनल ऑफिसकडून प्रसिद्धीमाध्यमांद्वारे प्रसिद्धी दिली जाईल.

२. कर्मचाऱ्यांनी या संदर्भातील त्यांच्या सूचना आपल्या 'कल्पना व्यासपीठ" या पोर्टलवर १४ जानेवारी २०१९ पर्यंत नोंदवाव्यात.

३. सर्व शाखा आणि कार्यालयांमधील शौचालये ग्राहकांसाठी खुली करावीत. अनेक ठिकाणी त्यावर "बँक कर्मचाऱ्यांसाठी राखीव" अशी पाटी लावलेली असते. या पाट्या काढून टाकाव्यात.

४. बँकेचे आणि शाखेचे नामफलक सुव्यवस्थित, स्पष्ट आणि स्वच्छ आहेत याकडे लक्ष द्यावे.

५. बँकेतील सूचना फलक, व्याजदराचे फलक, शाखेच्या कामकाजाच्या वेळांचे फलक हे स्वच्छ, सुस्पष्ट आणि सहज दिसतील असे लावलेले असावेत. खराब झालेले असल्यास नवे रंगवून घ्यावेत. जुनी कालबाह्य झालेली पत्रके, पोस्टर्स, फलक काढून टाकावेत.

६. जुनी कागदपत्रे, फोल्डर्स यांची मुख्य कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांप्रमाणे योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यास आत्तापासूनच सुरुवात करावी.

७. वापरात नसलेले फर्निचर, कम्प्युटर हार्डवेअर काढून टाकून शाखेचा आतला आणि बाहेरचा परिसर स्वच्छ आणि नीटनेटका दिसावा.

पूर्तता

१. सर्व शाखांनी स्वच्छता पंधरवडा कसा पाळला, कोणती कामे केली याचा साद्यंत अहवाल प्रादेशिक कार्यालयाला २ फेब्रुवारी २०१९च्या आत सादर करावा.

आपले,

भास्कर चव्हाण श्रीनिवास आपटे
उपमुख्यप्रबंधक मुख्यप्रबंधक

**झ. एका वाक्यात उत्तरे लिहू या.** **Write the answers in one sentence.**

अ. प्रस्तुत परिपत्रक कोणाला उद्देशून आहे?

------------------------------------------------------------------------.

आ. परिपत्रकाचा विषय काय आहे?

------------------------------------------------------------------------.

इ. स्वच्छता पंधरवडा पाळण्याची सूचना कोणी केली आहे?

------------------------------------------------------------------------.

ई. परिपत्रक कोणी पाठवले आहे?

------------------------------------------------------------------------.

उ. स्वच्छता पंधरवडा पूर्ण झाल्यावर काय करायचे आहे?

------------------------------------------------------------------------.

**ट. खालील शब्दांसाठी कंसातील योग्य शब्द लिहू या व वरील परिपत्रकात ते शब्द अधोरेखित करू या.** **Choose the correct synonym for the words below and underline it in the above passage.**

(उल्लेखनीय, निवासी परिसर, विल्हेवाट लावणे, साद्यंत, मोहीम, स्पष्ट, पंधरवडा, अभियान, कालबाह्य)

अ. पंधरा दिवस – ------------------------------------------------------------

आ. राहण्याची जागा – --------------------------------------------------------

इ. उपक्रम – ----------------------------------------------------------------

ई. एखादा विषय लोकांपर्यंत पोहोचवणे – ----------------------------------------

उ. व्यवस्था लावणे – ---------------------------------------------------------

ऊ. विशेष – ----------------------------------------------------------------

ए. वाचता येण्याजोगे – --------------------------------------------------------

ॲ. उपयोगात नसलेले – -------------------------------------------------------

ऐ. तपशीलवार, सुरुवातीपासून शेवटपर्यंत – ---------------------------------------

**दृष्टिक्षेप । Overview**

| नामे | | |
|---|---|---|
| **तो (पु.)** | **ती (स्त्री.)** | **ते (नपुं.)** |
| तो निवासी परिसर, ते -<br>residential area<br>निवासी परिसरा / परिसरां- | ती माहिती, -<br>information<br>माहिती- | ते ठिकाण, ती ठिकाणे / णं<br>place<br>ठिकाणा-, ठिकाणां- |
| तो संकोच,-<br>hesitation, shyness<br>संकोचा- | ती सुविधा, त्या -<br>facility<br>सुविधे-, सुविधां- | ते शिक्षण, -<br>education<br>शिक्षणा- |
| तो हेलपाटा, ते हेलपाटे<br>futile trip / make several trips to get a work done<br>हेलपाट्या-, हेलपाट्यां- | ती समस्या, त्या-<br>problem<br>समस्ये-, समस्यां- | ते नुकसान<br>loss, damage<br>नुकसाना- |
| तो वेळ<br>period, time<br>वेळा- | ती अडचण, त्या अडचणी<br>difficulty<br>अडचणी-, अडचणीं- | ते मत, ती मते / तं<br>opinion<br>मता-, मतां- |
| तो हिशेब, ते-<br>calculation<br>हिशेबा-, हिशेबां- | ती प्रत, त्या प्रती<br>copy<br>प्रती-, प्रतीं- | ते कुलूप, ती कुलुपे / पं, कुलपे / पं<br>lock<br>कुलुपा- / पा-, कुलुपां- / पां- |
| तो सत्कार, ते-<br>felicitation<br>सत्कारा-, सत्कारां- | ती व्यक्ती, त्या-<br>person<br>व्यक्ती-, व्यक्तीं- | ते अभियान, ती अभियाने / नं<br>mission<br>अभियाना-, अभियानां- |
| तो सल्ला, ते सल्ले<br>advice<br>सल्ल्या-, सल्ल्यां- | ती अट, त्या अटी<br>condition<br>अटी-, अटीं- | |
| तो महिना, ते महिने<br>month<br>महिन्या-, महिन्यां- | ती घटना, त्या-<br>incident<br>घटने-, घटनां- | |
| तो खांदा, ते खांदे<br>shoulder<br>खांद्या-, खांद्यां- | ती काळजी, त्या काळज्या<br>worry, care<br>काळजी-, काळज्यां- | |
| तो पंधरवडा, ते पंधरवडे<br>fortnight<br>पंधरवड्या-, पंधरवड्यां- | ती तहान, -<br>thirst<br>तहाने- | |

| | | |
|---|---|---|
| | ती तब्येत, त्या तब्येती<br>health<br>तब्येती-, तब्येतीं- | |
| | ती वर्गणी, त्या वर्गण्या<br>contribution<br>वर्गणी-, वर्गण्यां- | |
| | ती इच्छा, त्या-<br>will<br>इच्छे-, इच्छां- | |
| | ती गोष्ट, त्या गोष्टी<br>story<br>गोष्टी-, गोष्टीं- | |
| | ती रक्कम, त्या रकमा<br>amount<br>रकमे-, रकमां- | |
| | ती पावती, त्या पावत्या<br>receipt<br>पावती-, पावत्यां- | |
| | ती चूक, त्या चुका<br>mistake<br>चुकी-, चुकां- | |
| | ती जनजागृती, -<br>social awareness<br>जनजागृती- | |
| | ती बंदूक, त्या बंदुका<br>gun<br>बंदुकी-, बंदुकां- | |

**क्रियापदे**

विचारणे – to ask
मोडणे – to break
बिघडणे – to get spoilt
दुखणे – to pain
बदलणे – to change
मिळणे – to get, to receive
कळणे – to understand
देणे – to give
संपणे – to expire
फुटणे – to crack, to burst
हरवणे – to lose
गुंतवणे – to invest
साठवणे – to collect, to accumulate

**क्रियाविशेषण / अव्यय**

ताबडतोब – immediately    वेळेवर – on time    योग्य – suitable, proper
लांब – far away    अजिबात – not at all    लगेच – immediately

**विशेषण**

अवघड – difficult    शहाणा – wise    उल्लेखनीय – remarkable
साद्यंत – detailed    स्पष्ट – clear    समानार्थी – synonymous
गरीब – poor    सोपे / सोपं – easy    कालबाह्य – outdated
सुव्यवस्थित – neat and tidy

**क्रियापद एक – अर्थ अनेक**

भरणे – to fill    to deposit    to pay

**नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या**

| नाम / इतर शब्द | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| खरेदी करणे | गुंतागुंतीच्या गोष्टीत अडकणे<br>to get involved in complicated things |
| सत्कार करणे | चांगल्या कामासाठी गौरवणे<br>to felicitate |
| हेलपाटे घालणे / मारणे | एकाच कामासाठी सारखी ये-जा करणे<br>frequently going and coming to get the work done |
| विल्हेवाट लावणे | व्यवस्था लावणे<br>to dispose off |

# ५ मुदतठेवी, आवर्तीठेव











## चला, शिकू या...

- मुदतठेवींचे प्रकार जाणून घेणे
- आवर्तीठेव खाते उघडणे
- ज्येष्ठ नागरिक बचत योजनेची माहिती देणे
- पब्लिक प्रॉव्हिडंड फंडाबद्दल सांगणे
- साधा भविष्यकाळ शिकणे
- आत्ता, आधी, नंतर, शिवाय, सह, साठी, करता, इ॰ अव्ययांचा वापर शिकणे

## १ बचत योजनेसाठी

### होईल, येतील, मिळेल...

**क. संवाद वाचू या.** Read.



साबळेसाहेब शिवकुमार, आज एक तारीख आहे त्यामुळे मुदतठेव विभागामध्ये ग्राहकांची गर्दी होईल. गायकवाडबाई जरा उशिरा येतील. तुम्ही त्यांच्या टेबलावर काम करा.

शिवकुमार : हो, सर.

साबळेसाहेब काही अडचण आली तर मला विचारा.

वत्सलाबाई : माझ्या बचत खात्यात पाच लाख रुपये आहेत. तुम्ही मला सांगा की जास्त व्याज मला कुठल्या योजनेमध्ये मिळेल?

शिवकुमार : काळेबाई, तुमचं वय काय आहे?

वत्सलाबाई : माझं वय बासष्ट.

शिवकुमार : तुम्हाला ज्येष्ठ नागरिक बचत योजनेमध्ये म्हणजेच Senior Citizen Saving Scheme मध्ये पैसे ठेवता येतील. मात्र पाच वर्षे ते पैसे काढता येणार नाहीत. चालेल का? पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर मुदत वाढवता येईल. शिवाय पाच लाखावर या चालू वर्षासाठी तुम्हाला आयकरही भरावा लागणार नाही.

वत्सलाबाई : छान! मला सध्या तरी हे पैसे लागणार नाहीत. पण मला त्याच्यावर तिमाही व्याज मिळेल का?



शिवकुमार : म्हणजे तुम्हाला दर तीन महिन्यांनी व्याज हवंय. हो ना? दर तीन महिन्यांनी तुमच्या बचत खात्यात व्याज जमा होईल.

वत्सलाबाई : हा घ्या चेक. मला पावती उद्या मिळेल ना?

शिवकुमार : हो. मी तुमची पावती तयार ठेवीन / ठेवेन.

वत्सलाबाई : धन्यवाद, शिवकुमारसाहेब.

**ख. संवादातील लाल रंगातील क्रियापदे पाहू या. खालील कोष्टकात ह्या क्रियापदांची मूळ रूपे लिहू या.** **Write the infinitive forms of the verbs marked in red in the above dialogue.**

| | |
|---|---|
| अ. होईल | होणे |
| आ. येतील | ------------- |
| इ. मिळेल | ------------- |
| ई. लागणार | ------------- |
| उ. येणार | ------------- |
| ऊ. ठेवीन / ठेवेन | ------------- |

**साधा भविष्यकाळ – Simple future tense**

क्रियापदांच्या या रूपांमुळे क्रिया भविष्यकाळात घडणार आहे हे कळते.
म्हणून याला साधा भविष्यकाळ म्हणतात.
वरील यादीवरून भविष्यकाळ वापरण्याचे दोन प्रकार दिसतात.
उदा॰ येईल, होईल, मिळेल आणि येणार, लागणार (नाही)
दोन्ही भविष्यकाळच आहेत. फक्त पद्धत वेगवेगळी आहे.

**'-णार' जोडून तयार होणाऱ्या भविष्यकाळाच्या रूपामध्ये कर्त्याप्रमाणे बदल होत नाही. भविष्यकाळाचे हे रूप त्याच्या नकारार्थी रूपासाठीही वापरले जाते. कसे, ते पाहू या.**

| एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|
| मी | करणार | नाही | आम्ही / आपण | करणार | नाही |
| तू | | नाहीस | तुम्ही / आपण | | नाही |
| तो / ती / ते | | नाही | ते / त्या / ती | | नाहीत |

ग. खालील तक्ता पूर्ण करू या. Complete the table.

| सर्वनामे Pronouns | येणे to come | होणे to become | करणे to do | बसणे to sit |
|---|---|---|---|---|
| मी (पु.) मी (स्त्री.) | येईन | -------------- | करेन / करीन | -------------- |
| आम्ही / आपण | -------------- | होऊ | करू | -------------- |
| तू (पु.) तू (स्त्री.) | -------------- | होशील | -------------- | बसशील |
| तुम्ही / आपण | याल | व्हाल | कराल | -------------- |
| तो ती ते | -------------- | होईल | -------------- | बसेल |
| ते त्या ती | येतील | -------------- | करतील | -------------- |

घ. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.
Pattern drill.

शिक्षक

मी
उद्या येईन मी लवकर.

ती
आम्ही
त्या
तू
तुम्ही

विद्यार्थी

उद्या येईन मी लवकर.

मी उद्या लवकर येईन. /
उद्या मी लवकर येईन. /
उद्या येईन मी लवकर. /
उद्या येईन लवकर.

**च. सराव. अधोरेखित शब्दांऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.**
**Pattern drill.**

शिक्षक

किमया – ती फाईल – देणे
किमया, जरा ती फाईल देशील का?

जेधे सर – ती फाईल – देणे
संतोष – पाणी – आणणे
गायकवाड मॅडम – काऊंटर – सांभाळणे
मोकाशीबाई – पंखा – बंद करणे
संदीप – हे पासबुक – बघणे

विद्यार्थी

किमया, जरा ती फाईल देशील का?

**छ. करणार, देणार, घेणार इत्यादी भविष्यकाळाच्या क्रियापदांच्या रूपांचा नम्रपणे विनंती करण्यासाठी वापर केला जातो.**

उदा.

साबळेसाहेब, चहा घेणार का आमच्याबरोबर?

माझं पासबुक भरून देणार का?

मला पाणी मिळेल का?

सही करायला पेन देणार का?

**ज. सराव. उदाहरणाप्रमाणे बदल करून वाक्ये पुन्हा म्हणू या. Pattern drill.**

शिक्षक

माझ्या खात्याची शिल्लक सांगाल का?

तुम्ही दोन हजाराच्या नोटा द्याल का?
सातपुतेबाई, टेबल पुसून घ्याल का?
माझं एक काम कराल का?
आम्हाला कॅश जुळवायला मदत कराल का?
हे पासबुक फाटलंय, बदलून मिळेल का?
आपण काय खाल? मिसळ की आंबोळी?

विद्यार्थी

माझ्या खात्याची शिल्लक सांगणार का?



**झ. खालील वाक्यांमध्ये गाळलेल्या जागी क्रियापदाचे साध्या भविष्यकाळाचे रूप वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

**Fill in the blanks using the simple future tense of the verbs given in the bracket.**

[ करणे (२), आणणे, मिळणे, होणे (३), भरणे (२), वाढणे, काढणे, वाढणे, देणे (२)]

अ. दुपारी चार वाजता चहावाला चहा --------------.

आ. काव्यांना ८% दराने त्यांच्या ठेवीवर व्याज --------------.

इ. मला अर्ज लिहिण्यासाठी कागद द्याल का?

ई. "शिवकुमार, घाबरू नका. आम्ही तुम्हाला मदत --------------.




उ. तुमचा चेक उद्या क्लिअर --------------.

ऊ. माझ्या कर्जाचा हप्ता मी पुढच्या आठवड्यात --------------.

ए. नवीन योजना लागू -------------- त्यामुळे आपलं काम खूप --------------.

ॲ. त्यामुळे बँकेचा नफाही --------------.

ऐ. मी बँकेतून पैसे -------------- आणि तुम्हाला --------------.

ओ. मला वाटतं की तू माझं काम --------------.

ऑ. तुम्ही जेव्हा पैसे भराल तेव्हा खातं सुरू होईल.

| **तुमच्या माहितीसाठी...** |
| --- |
| धनादेश, खाते पुस्तक इ. |
| धनादेश – cheque<br>खाते पुस्तक – passbook<br>पैसे भरण्याचे पावती पुस्तक / भरणापुस्तक – slip book<br>डिमांड ड्राफ्ट – demand draft |

## २ संचित ठेव म्हणजेच Cumulative deposit...

### क. संवाद वाचू या. Read.



शिवकुमार : अहो गायकवाडबाई, बरं झालं तुम्ही आलात. मला बरेच शब्द तुम्हाला विचारायचे आहेत. मासिक, तिमाही, सहामाही आणि संचित म्हणजे काय जरा सांगता का?

गायकवाडबाई : हो, का नाही! आधी तुम्हाला धन्यवाद देते. मी येईपर्यंत तुम्ही माझं काम सांभाळलंत. हे बघा, दर महिन्याला म्हणजे मासिक, दर तीन महिन्यांनी म्हणजे तिमाही किंवा त्रैमासिक, दर सहा महिन्यांनी म्हणजे सहामाही. आणि मुदत संपल्यावर मुद्दल आणि व्याज एकदम देणारी ठेव म्हणजे संचित ठेव. म्हणजे ज्याला तुम्ही cumulative deposit म्हणता ते. आपापल्या गरजेनुसार ग्राहक ठेवीचा योग्य प्रकार निवडतात किंवा आपण त्यांना त्यांच्यासाठी आवश्यक असलेली योजना सुचवतो.



शिवकुमार : हे शब्द मी लक्षात ठेवीन. कारण मी काय सांगतोय हे ग्राहकांना कळायला हवं.

गायकवाडबाई : छान! तुम्हाला मराठी समजायलाही लागलंय आणि बोलताही यायला लागलंय.

### ख. एका शब्दात उत्तरे देऊ या. Answer in one word.

**मुदतठेवींचे प्रकार**

अ. दर तीन महिन्यांनी व्याजाची रक्कम मिळणारी ठेव –

____________________________________________

आ. दर महिन्याला व्याजाची रक्कम मिळणारी ठेव –

____________________________________________

इ. दर सहा महिन्यांनी व्याजाची रक्कम मिळणारी ठेव –

____________________________________________

ई. मुद्दल आणि व्याज एकदम देणारी ठेव –

____________________________________________

| तुमच्या माहितीसाठी... | |
|---|---|
| महिने व त्यांचा वापर | |
| जानेवारी<br>फेब्रुवारी<br>मार्च<br>एप्रिल<br>मे<br>जून<br>जुलै<br>ऑगस्ट<br>सप्टेंबर<br>ऑक्टोबर<br>नोव्हेंबर<br>डिसेंबर | चालू महिना – चालू महिन्यात<br><br>पुढचा महिना – पुढच्या महिन्यात<br><br>मागचा / गेला महिना – मागच्या / गेल्या महिन्यात<br><br>पुढचे वर्ष – पुढच्या वर्षी<br><br>मागचे / गेले वर्ष – मागच्या वर्षी / गेल्या वर्षी<br><br>एका महिन्याने, दोन महिन्यांनी, तीन महिन्यांनी ... |

ग. सराव. अधोरेखित शब्दांऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.
**Pattern drill.**

शिक्षक

दोन महिने
तुमच्या ठेवीची मुदत दोन महिन्यांनी संपेल.

एक महिना
तीन महिने
पाच महिने
एक वर्ष
चार वर्षे

विद्यार्थी

तुमच्या ठेवीची मुदत दोन महिन्यांनी संपेल.

**घ. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.**
**Pattern drill.**

**शिक्षक**

<u>आठवडा</u>

पुढचा आठवडा
मागचा आठवडा
चालू आठवडा
एक आठवडा
चार आठवडे

**विद्यार्थी**

आठवड्यात




**च. रिकाम्या जागी कंसातील क्रियापदाचे योग्य रूप भरू या.** **Fill in the blanks.**

**ठेवी संकलन सप्ताह**

“उद्या आपल्या बँकेच्या नव्या योजना जाहीर होतील (होणे). मग परवापासून आपल्या शाखेमध्ये ग्राहकांची खूप गर्दी (अ) -------------- (होणे). प्रत्येकाला फॉर्म घेण्याची घाई (आ) ------------ (होणे). शिवकुमार, सातपुतेबाई तुम्हाला फॉर्मचा गठ्ठा (इ) ------------ (देणे), तो तुम्ही हाताशी ठेवा. ग्राहक अनेक शंका (ई) -------------- (विचारणे). तुम्ही त्यांना उत्तरे देऊ शकाल ना? आपले पंचवीस कोटी ठेवींचे लक्ष्य म्हणजेच टार्गेट आपल्याला गाठता (उ) -------------- (येणे) ना? सगळ्यांनी झटून काम केले तर काहीच अवघड नाही. हे आपण करू शकलो तर विभागीय अधिकारी आपटेसाहेब आपलं कौतुक (ऊ) ------------ (करणे) शिवाय आपल्या शाखेला बक्षीस (ए) ------------- (मिळणे) ते वेगळंच. मग सगळे तयारीत राहणार? आता आठवडाभर कृपया कोणी रजा मागू नका म्हणजे झालं. हा सप्ताह पार पडल्यावर आपण रविवारी एका छोट्याशा सहलीला (ॲ) -------------- (जाणे).”

**छ. क्रियापदाचे योग्य रूप लिहून रिकाम्या जागा भरू या.** **Fill in the blanks.**

अ. खातं उघडताना जशी सही केली होती तशीच चेकवर करा म्हणजे चेक पास ------------ (होणे).

आ. तुमच्या एटीएम चा पिन क्रमांक तुम्ही कुणालाही सांगितला तर त्याचा दुरुपयोग केला -------------- (जाणे).

इ. ह्या फॉर्मवर सही करा म्हणजे तुमच्या खात्यातून पैसे आवर्ती जमा ठेव खात्यात जमा -------------- (होणे).

ई. तुमची सही जुळत नाही त्यामुळे तुम्हाला पैसे -------------- -------------- (न मिळणे).

उ. नेट बँकिंगची सुविधा तुम्ही घ्या म्हणजे तुम्ही घरून बँकेचे व्यवहार करू ------------ (शकणे).

ऊ. आत्ता तीन वाजले आहेत, चार वाजता चहा -------------- (येणे).

ए. साबळेसाहेब, दहा मिनिटांतच मी कॅश टॅली -------------- (करणे).

अॅ. मी सर्व नियम -------------- (वाचणे) आणि मगच निर्णय -------------- (घेणे).

ऐ. आज गर्दी नाही, त्यामुळे ग्राहकांची वेळ संपल्यावर आपण सगळे मिळून साफसफाई -------------- (करणे).

ओ. आम्ही आज भरलेला चेक उद्या क्लिअर -------------- (होणे) का?

ऑ. मी मराठीतून प्रश्न विचारला तर तुम्हाला -------------- (समजणे) का?

**ज. कंसात दिलेल्या क्रियापदांची भविष्यकाळाची रूपे योग्य जागी वापरून उतारा पूर्ण करू या.**
**Fill in the blanks.**

(करणे, मारणे, झोपणे, उठणे, जाणे, खाणे, करणे, बघणे)

सुट्टीच्या दिवशी शिवकुमारचा दिनक्रम असा असणार आहे.

उद्या मी लवकर (अ) ____________. छानपैकी व्यायाम (आ) ____________. मग कोल्हापूरचा खास तांबडा पांढरा रस्सा (इ) --------------. 'सैराट' नावाचा मराठी सिनेमा (ई) --------------. त्यानंतर मित्रांबरोबर पंचगंगा घाटावर फिरायला (उ) --------------. घरी फोन करून सगळ्यांशी भरपूर गप्पा (ऊ) --------------, थोडावेळ परीक्षेचा अभ्यास (ए) --------------. नंतर मस्त (अॅ) --------------.

**झ. आता खालील गोष्ट वाचू या. गोष्ट वाचून तिला योग्य शीर्षक देऊ या.**
**Give a suitable title to the story below.**

शीर्षक - ----------------------

आळशीरामला भूक लागली. तो मनात म्हणाला, “कोण मला जेवायला देणार? जेवणासाठी तर पैसे लागतात. कोण मला पैसे देणार?” मित्र म्हणाला, “अरे, लग्न कर म्हणजे बायको जेवायला देईल.” आळशीराम म्हणाला, “अरे, कोण मला मुलगी देणार? त्यासाठी पैसे कमवावे लागणार, ते बँकेत साठवावे लागणार. नंतर कोणीतरी मुलगी माझ्याशी लग्न करेल. लग्न केलं तरी ती कधी स्वयंपाक करणार आणि कधी मला जेवायला वाढणार! शिवाय ती सारखी माहेरी जाणार, साड्या घेण्यासाठी हट्ट करणार आणि सारखं हॉटेलात जेवायला जाऊ असं म्हणणार. ते जाऊ दे. मला आत्ता भूक लागलीये. तू जेवायला देणार का?” मित्र म्हणाला, “हो, देतो. पण तू माझं एक काम करणार का? दुकानातून गहू आणणार? नंतर ते दळून आणणार? मग मी पोळ्या करीन आणि तू भाजी कर.” आळशीराम तिथून हळूच निघून गेला.

**ट. हा उतारा ‘देणार, करणार’ अशा रूपांऐवजी ‘देईन, करीन’ या रूपातील क्रियापदे वापरून लिहू या.** **Rewrite the paragraph replacing the ‘देणार, करणार’ forms with the ‘देईन, करीन’ forms of simple future tense.**

आळशीरामला भूक लागली. तो मनात म्हणाला, “कोण मला जेवायला देईल? जेवणासाठी तर पैसे लागतात. कोण मला पैसे देईल?” ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

## ठ. संवाद ऐकू या आणि नंतर वाचू या. Listen and read.

**कसे वाचवू पैसे?**



शिवकुमार : या बोराडेबाई. काय काम आहे?

बोराडेबाई : हे बघा साहेब, मला एक विचारायचं आहे.

शिवकुमार : हो विचारा ना! काय विचारायचंय? तुम्हाला काय मदत करू?

बोराडेबाई : माझा पगार दर महिन्याला एक तारखेला होतो. पण एका आठवड्यातच तो खर्चही होतो. मला बचत करायची आहे. काय करू?

शिवकुमार : अगदी बरोबर. बचतीशिवाय तुम्ही मोठे खर्च करू शकणार नाही. तुमचा पगार आपल्या शाखेतल्या खात्यातच जमा होतो ना? मग तुम्ही आवर्ती जमा ठेव खातं उघडा. म्हणजेच रिकरिंग डिपॉझिट खातं. दर महिन्याला ठरावीक रक्कम त्या खात्यात भरायची. त्याची मुदत संपल्यानंतर व्याजासकट सगळे पैसे तुम्हाला मिळतात. मुदत संपण्याआधी तुम्हाला रिकरिंगच्या खात्यातून पैसे काढता येणार नाहीत. त्यामुळे बचत तर होईलच; शिवाय एकरकमी पैसे हातात येतील.

बोराडेबाई : हे चांगलं आहे. मी आवर्ती जमा ठेव खातं उघडते. दरमहा १०००/- रु. मी भरीन. दोन वर्षांनी मला किती पैसे मिळतील?

शिवकुमार : सांगतो. तुम्हाला दोन वर्षांनंतर २४०००/- आणि त्यावर ६% दराने व्याज अशी रक्कम मिळेल.

बोराडेबाई : अरे वा! म्हणजे माझ्या पोराची फी निघेल त्यातून. पण एखाद्या महिन्याला मी विसरले पैसे भरायला तर काय करायचं?

शिवकुमार : काळजी करू नका. हा घ्या खातं उघडायचा फॉर्म आणि शिवाय हा सूचनेचा फॉर्म. याच्यावर तुमचा बचत खातेक्रमांक लिहा. म्हणजे आम्हीच तुमच्या खात्यातून दर महिन्याच्या एक तारखेला पैसे कापून घेऊ आणि रिकरिंग खात्यात जमा करू.

बोराडेबाई : म्हणजे स्टँडिंग इन्स्ट्रक्शन असं म्हणा की!

**आता, आत्ता, आधी, नंतर – now, prior, later**

ही कालवाचक क्रियाविशेषणे क्रिया केव्हा घडली किंवा घडणार आहे याविषयी अधिक माहिती देतात.
यांपैकी आधी आणि नंतर ही नामाला जोडूनही वापरता येतात. अशा वेळी नामाचे सामान्यरूप होते.

**शिवाय x सह / सकट – without x with / including**

ही अव्यये नामाला जोडून वापरली जातात. अशा वेळी नामाचे सामान्यरूप होते.
उदा. पेनाशिवाय कसं लिहिणार तुम्ही?
मुदत संपल्यावर व्याजासकट सगळे पैसे तुम्हाला मिळतात.

**ड. चौकटीतील शब्द रिकाम्या जागी भरू या.** **Fill in the blanks.**

अ. आधी काम करू, ------------- विश्रांती घेऊ.

आ. आता मला भूक लागलीये. ------------- खायला दे, नंतर कामाचं बघू.

इ. पेन नाही तुमच्याकडे? पेना ------------- कसं लिहिणार तुम्ही?

ई. आता मला खाते उतारा हवा आहे; पासबुक ------------- दिलंत तरी चालेल.

उ. आलात तर तुमच्या ------------- , नाहीतर तुमच्याशिवाय!

| |
|---|
| आता<br>नंतर<br>शिवाय<br>आधी<br>सह /<br>सकट |

**टीप :**

- 'आधी', 'नंतर' आणि 'शिवाय' ही अव्यये स्वतंत्रपणेही वापरता येतात तसेच नामाला जोडूनही वापरतात. नामाला जोडून वापरताना नामाचे सामान्यरूप होते.
  उदा॰ सही बरोबर करा, त्यानंतर पैसे मिळतील. पेनाशिवाय कसं लिहिणार तुम्ही?
- 'नंतर' या अव्ययाचा वापर दोन्ही प्रकारे होतो तरी अर्थ समान आहे.
- परंतु 'शिवाय' या अव्ययाचा अर्थ मात्र वापराप्रमाणे बदलतो.
  उदा॰ मी आधारकार्ड दिलंय, शिवाय निवासी जागेचा पुरावाही दिलाय. (and) पेन नाही तुमच्याकडे? पेनाशिवाय कसं लिहिणार तुम्ही? (without)

**ढ. खालील वाक्यांमध्ये योग्य ठिकाणी 'आत्ता', 'नंतर', 'शिवाय', 'सह' ही अव्यये वापरून वाक्ये पूर्ण करू या.** **Fill in the blanks using the words 'आत्ता', 'नंतर', 'शिवाय', 'सह'.**

उदा॰ साबळे आत्ता नाहीयेत, शिवाय जेवायची सुट्टीसुद्धा झालीये. दोननंतर या.

अ. मी फोटो ------------- दिला तर चालेल का? ------------- मी आणला नाहीये.

आ. कॉफी ------------- माझं काही अडत नाही, पण चहा मात्र लागतोच.

इ. पण तरी तू ------------- कॉफी घे. ------------- चहा प्यायला जाऊ.

ई. कॉफी घे. ------------- बिस्किटही घे.

उ. शिवकुमार ------------- हे काम कोण करणार?

ऊ. ------------- हे काम करायला कोणाला वेळ नाही.



ए. थोड्या वेळा-------------- शिवकुमार येईल, तेव्हा तुमचं काम होईल.

ॲ. फोटो आणा, -------------- तुमचं पासबुक घेऊन जा.

ऐ. -------------- माझ्याकडे आधारकार्ड नाही, मी काय करू?

ओ. उद्या पत्नी-------------- बँकेत या म्हणजे त्यांची सही घेता येईल.

ऑ. दुकानाच्या विम्या-------------- दुकानाची सर्व कागदपत्रं तयार आहेत.

**ण. खाली मुदत ठेवींबद्दल नेहमी विचारले जाणारे प्रश्न व त्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. त्यांच्या जोड्या लावू या.** **Match the questions and answers.**

**प्रश्न :**

अ माझ्या पावतीची मुदत संपली आहे हे मुदत संपल्यानंतर १५ दिवसांनी माझ्या लक्षात आलं. तरी मी महिन्यातून एकदा माझ्या ठेवींच्या पावत्या तपासते. आता माझं १५ दिवसांचं व्याज बुडेल का?

आ मी आधी संचित ठेव ठेवली आहे; पण आता मला तिमाही व्याज हवे आहे.

इ ठेवीवरच्या व्याजातून कर कधी आणि का कापतात?

ई पण माझं उत्पन्न कमी आहे. मला आयकर भरावा लागत नाही. मग मी काय करायचं?

**उत्तरे :**

१ तुमच्या सर्वप्रकारच्या मुदतठेवींवरचे व्याज जर वर्षाला १०,००० रु. पेक्षा जास्त होत असेल तर कर (TDS) कापला जातो. दरवर्षी ३१ मार्चला (TDS) कर कापतात.

२ नाही, असं कसं बुडेल? बँक ग्राहकांच्या पैशांची काळजी घेते. तुमच्या पावतीचं आता संगणकावर आपोआप नूतनीकरण होतं. तुम्ही न सांगता. मात्र तुम्हाला जर पावतीचे पैसे हवे असतील तर मात्र वेळेवरच सांगावं लागतं. तुम्हाला आत्ता पावतीचे पैसे हवे असतील तर मात्र तुमचं १५ दिवसांच्या व्याजाचं नुकसान होईल.

३ तुम्ही १५H हा फॉर्म भरून द्या. या फॉर्मद्वारे तुम्ही जाहीर करता की तुम्ही आयकर भरत नाही. म्हणून व्याजावरचा कर कापू नये. हा फॉर्म दरवर्षी एप्रिल महिन्यात तुम्हाला भरून द्यावा लागतो. त्याची नोंदणी झाल्यावर तुमच्या ठेवींवरच्या व्याजावरचा कर (TDS) कापला जात नाही.

४ आता तुम्हाला या ठेवीची मुदत संपल्यावरच तिचं रूपांतर तिमाही व्याज ठेवीत करता येईल. जर लगेच तसं करायचं असेल तर ठेवीची पावती मोडून मुदतपूर्व पैसे घ्यावे लागतील आणि नंतर पुन्हा नवी पावती करावी लागेल. पण यात तुमचं व्याजाचं खूप नुकसान होईल.

## ३ सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी योजना

### साठी, करता

**क. खालील उतारा वाचू या.** Read.



प्रत्येकाला आपल्या भविष्याची तरतूद करता यावी याकरिता सरकारने पब्लिक प्रॉव्हिडंड फंड म्हणजेच सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी योजना आणली. ती पीपीएफ (PPF) या नावाने लोकप्रिय झाली. अतिशय सोयीची आणि लवचीक अशी ही योजना आहे. पंधरा वर्षांसाठी हे खाते उघडावे लागते. दरवर्षी एक लाख रुपयांपर्यंत रक्कम यात भरता येते. यावर मिळणाऱ्या व्याजाचा दरही आकर्षक असतो. गरज पडल्यास पहिल्या पाच वर्षांनंतर जमा केलेल्या रकमेतील ५०% रक्कम काढता येते. पण रक्कम न काढता पैसे जमा करत राहिल्यास पंधरा वर्षांनंतर खूप मोठी रक्कम मिळते. नंतर कितीही वेळा खात्याची मुदत तुम्ही वाढवू शकता. यात जमा केलेल्या रकमेवरचा आयकर भरावा लागत नाही. आयकरातून सूट मिळवण्यासाठी व्यावसायिकांना, पगारदार लोकांना ही योजना एक वरदानच ठरली आहे. व्यापाऱ्यांसाठीसुद्धा ही योजना उपयोगाची आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँका ही योजना राबवतात. देशभरात या योजनेतून जमा झालेला पैसा सरकार अनेक चांगल्या योजना राबवण्याकरिता वापरते.

**साठी / करिता (करता) – for**

Postpositions: वरील उदाहरणांतील 'साठी' आणि 'करिता (करता)' हे शब्द 'शब्दयोगी पदे' आहेत. ती हेतू दर्शवतात, म्हणून त्यांना 'हेतुवाचक शब्दयोगी पदे' म्हणतात.

**ख. खालील वाक्यांमधील 'साठी' आणि 'करता'च्या जागा बदलून काही फरक पडतोय का ते पाहू या.**

उदा॰ बँकेची स्वच्छता करण्यासाठी सगळे कर्मचारी गोळा झाले.
बँकेची स्वच्छता करण्याकरता सगळे कर्मचारी गोळा झाले.

अ. बँकेतील सर्व अन्यभाषक अधिकाऱ्यांसाठी मराठीचा वर्ग सुरू होणार आहे.

______________________________________________

आ. प्रत्येक चित्रपटात "तुझ्यासाठी काहीपण" हा संवाद असतोच.

______________________________________________



इ. देशाकरता लढणारे कुटुंबाकरता वेळ देऊ शकत नाहीत.

______________________________________

______________________________________

ई. "अहो किमयाताई, दिवाळीसाठी कोऱ्या करकरीत नोटा द्या, बरं का!"

______________________________________

______________________________________

उ. "आपल्याकरता खास कोल्हापुरी जेवणाचा बेत केलाय."

______________________________________________________________

## ग. जोड्या लावू या. Match the columns.

| | |
|---|---|
| अ. मुदतठेव | १. Cumulative Deposit |
| आ. आवर्ती ठेव | २. Senior Citizen Saving Scheme |
| इ. संचित ठेव | ३. Public Provident Fund |
| ई. ज्येष्ठ नागरिक बचत योजना | ४. Recurring Deposit |
| उ. भविष्य निर्वाह निधी योजना | ५. Fixed / Time Deposit |



## ४ वृत्तपत्र निवेदन

### क. खालील वृत्तपत्र निवेदन वाचू या व त्याखालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.

**Read the press release and answer the questions.**

प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

डिसेंबर 19, 2016

**बँकांनी 2005 पूर्व बँक नोटा ठेवी/जमामध्ये स्वीकाराव्यात - आरबीआयचे स्पष्टीकरण**

भारतीय रिझर्व बँक येथे स्पष्ट करत आहे की, बँकांनी रु.500 व रु.1000 च्या 2005-पूर्व नोटा जमा/ठेवी म्हणून स्वीकाराव्यात, परंतु त्या पुनः (ग्राहकांना) देण्यात येऊ नयेत. ह्या नोटा केवळ रिझर्व बँकेच्या कार्यालयांमध्येच बदलून दिल्या जाऊ शकतील.

भारत सरकारने, राजपत्र अधिसूचना क्र. 2652 दि. नोव्हेंबर 8, 2016 अन्वये, भारतीय रिझर्व बँकेने दिलेल्या विद्यमान मालिकेतील रु.500 व रु.1000 च्या बँक नोटा (विहित बँक नोटा), वरील अधिसूचनेत दिलेल्या व्याप्ती पर्यंत, नोव्हेंबर 9, 2016 पासून वैध चलन असणे बंद झाले आहे. त्यामुळे, ह्या एसबीएनमध्ये, रु.500 व रु.1000 च्या 2005 पूर्व बँक नोटांचाही समावेश आहे.

वाणिज्य बँका, 2005-पूर्व नोटा स्वीकारत नसल्याबाबत, देशाच्या निरनिराळ्या भागातील जनतेकडून तक्रारी/प्रश्न येत असल्याने रिझर्व बँकेने हे स्पष्टीकरण दिले आहे. रिझर्व बँकेने असेही स्पष्ट केले आहे की, जून 30, 2016 रोजी तिने दिलेल्या सूचनांनुसार, 2005 पूर्व नोटा बदलून घेण्याची जनतेला दिलेली सुविधा, जुलै 1, 2016 पासून रिझर्व बँकेच्या पुढील कार्यालयांमध्येच देण्यात आली होती. ह्याचा अर्थ असा नव्हता की, ग्राहकांच्या खात्यात जमा करण्यासाठी बँका ह्या नोटांचा स्वीकार करणार नाहीत. 2005 पूर्व बँक नोटा बदलून घेण्याची सुविधा, रिझर्व बँकेच्या पुढील कार्यालयात उपलब्ध आहे - अहमदाबाद, बंगळुरु, बेलापुर, भोपाळ, भुवनेश्वर, चंदीगढ, चेन्नई, गुवाहाटी, हैद्राबाद, जयपुर, जम्मु, कानपुर, कोलकाता, लखनौ, मुंबई, नागपुर, नवी दिल्ली, पाटणा, तिरुवनंतपुरम आणि कोची.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/1565**

**ख. चूक की बरोबर ते लिहू या.** **True or false.**

अ. रु. ५०० व रु. १००० च्या नोटा अवैध चलन म्हणून घोषित करणे हा प्रस्तुत वृत्तपत्र निवेदनाचा विषय आहे. ------------------

आ. रु. ५०० व रु. १००० च्या २००५ च्या आधीच्या नोटा फक्त ठेवी किंवा जमा म्हणून स्वीकारल्या जातील असे यात नमूद केले आहे. ------------------

इ. अवैध नोटा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या कार्यालयात बदलून मिळतील.

------------------

ई. रिझर्व बँकेच्या ठरावीक कार्यालयांतच नोटा बदलून घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

------------------

उ. रिझर्व बँकेने वरील स्पष्टीकरण देण्यामागचे कारण जनतेकडून येत असलेले प्रश्न, तक्रारी हे आहे. ------------------

**ग. खालील इंग्रजी शब्दांसाठी योग्य तो मराठी शब्द लिहू या व वरील निवेदनात अधोरेखित करू या.** **Choose the correct Marathi word and underline it in the above passage.**

(वैध चलन, विहित, अधिसूचना, विद्यमान मालिका, स्पष्टीकरण, वाणिज्य बँका, अन्वये, व्याप्ती)

अ. clarification – ------------------------------------------

आ. notification – ------------------------------------------

इ. according to – ------------------------------------------

ई. present series – ------------------------------------------

उ. prescribed – ------------------------------------------

ऊ. authorized usage – ------------------------------------------

ए. scope – ------------------------------------------

ॲ. commercial banks – ------------------------------------------

दृष्टिक्षेप । **Overview**

| नामे | | |
|---|---|---|
| तो (पु.) | ती (स्त्री.) | ते (नपुं.) |
| तो स्वयंपाक, -<br>meal preparation<br>स्वयंपाका- | ती पावती, त्या पावत्या<br>deposit receipt<br>पावती-, पावत्यां- | ते लग्न, ती लग्ने / ग्नं<br>marriage<br>लग्ना-, लग्नां- |
| तो हप्ता, ते हप्ते<br>instalment<br>हप्त्या-, हप्त्यां- | ती ठेव, त्या ठेवी<br>deposit<br>ठेवी-, ठेवीं- | ते भविष्य, ती भविष्ये / ष्यं<br>future<br>भविष्या-, भविष्यां- |
| तो पंधरवडा, ते पंधरवडे<br>fortnight<br>पंधरवड्या-, पंधरवड्यां- | ती भूक, त्या भुका<br>hunger<br>भुके-, भुकां- | ते वरदान, ती वरदाने / नं<br>boon<br>वरदाना-, वरदानां- |
| तो पगार, ते पगार<br>salary<br>पगारा-, पगारां- | ती बायको, त्या बायका<br>wife<br>बायको-, बायकां- | ते सार्वजनिक क्षेत्र,<br>ती सार्वजनिक क्षेत्रे / त्रं<br>public sector<br>क्षेत्रा-, क्षेत्रां- |
| तो पुरावा, ते पुरावे<br>proof<br>पुराव्या-, पुराव्यां- | ती विश्रांती, -<br>rest, relaxation<br>विश्रांती- | |
| तो खातेउतारा, ते खातेउतारे<br>statement of account<br>खातेउताऱ्या-, खातेउताऱ्यां- | ती जागा, त्या -<br>place<br>जागे-, जागां- | |
| तो व्यापारी, ते -<br>trader<br>व्यापाऱ्या-, व्यापाऱ्यां- | ती तरतूद, त्या तरतुदी<br>provision<br>तरतुदी-, तरतुदीं- | |
| तो बेत, ते -<br>menu<br>बेता-, बेतां- | ती सोय, त्या सोयी<br>convenience, facility<br>सोयी-, सोयीं- | |

**क्रियापदे**

राबवणे – to implement    कमवणे – to earn    संपणे – to finish

वाढणे – to expand, to grow, to enhance    सांभाळणे – to look after

समजणे – to understand, to know    लढणे – to fight

दाखवणे – to show, to indicate

### क्रियाविशेषण / अव्यय

मासिक – per month, monthly
तिमाही, त्रैमासिक – quarterly
सहामाही – half yearly
वार्षिक – yearly
संचित – cumulative
एकरकमी – wholesome amount

### विशेषण

निवासी – residential
लोकप्रिय – popular
लवचीक – flexible
पगारदार – salaried
व्यावसायिक – professional
खास – special
कोऱ्या करकरीत – brand new

### क्रियापद एक – अर्थ अनेक

**करणे**

काम करणे – to do the work
स्वयंपाक करणे – to cook
नाश्ता करणे – to have breakfast
मदत करणे – to help
तक्रार करणे – to complain
मजा करणे – to enjoy

### नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या

| नाम / इतर शब्द | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| वेळ देणे | to spare some time |
| बेत करणे | to plan a special event |
| वरदान ठरणे | proved to be a boon |
| योजना राबवणे | to implement the scheme |
| गप्पा मारणे | to chat with |
| पैसे ठेवणे | to deposit money with bank |
| पावतीची मुदत वाढवणे | to enhance time frame of the deposit |
| गोळा होणे | to gather |

# ६ बँक लॉकरचे व्यवहार









## चला, शिकू या...

- लॉकर देणे / उघडणे
- लॉकरच्या किल्लीचे महत्त्व समजावून सांगणे
- 'नॉमिनेशन'ची माहिती देणे, महत्त्व सांगणे
- द्वितीया, चतुर्थी आणि तृतीया विभक्तिप्रत्ययांचा वापर शिकणे
- आणि, किंवा, पण, परंतु, कारण, म्हणून, यामुळे या उभयान्वयी अव्ययांचा वापर शिकणे
- जर - तर, सुद्धा, तरी, तरीसुद्धा या अव्ययांचा वापर शिकणे
- क्रियापद : लागणे

## १ सेफ डिपॉझिट लॉकर घेताना...

### क. खालील संवाद ऐकू या आणि वाचू या. Listen and read.




शोभा भोसले : कदम, मला लॉकरची माहिती कोण देईल?

सुभाष कदम : ते बचत विभागाचे अधिकारी आहेत ना, शिवकुमार, ते देतील.

शोभा भोसले : अहो, त्यांच्याशी हिंदीत बोलावं लागेल. साबळेसाहेब भेटतील का? कारण मला खूप प्रश्न विचारायचे आहेत.

कदम : हो, भेटतील ना. त्यांच्या केबिनमध्ये आहेत.

शोभा भोसले : येऊ का साबळेसाहेब?

साबळे : हो. या ना भोसलेबाई. काय सेवा करू आपली?

शोभा भोसले : काय साहेब, लाजवताय! मला लॉकरबद्दल विचारायचंय.

साबळे : बसा, बसा. तुम्ही चहा घेणार की कॉफी?

शोभा भोसले : चहा चालेल.

साबळे : अहो कदम, चहा सांगा आणि शिवकुमारला बोलावून घ्या. या शिवकुमार. तुम्हाला मुद्दाम बोलावलं. हं, बोला भोसलेबाई.

शोभा भोसले : आम्ही चाललोय गावाला. त्यामुळे घरात जोखमीच्या वस्तू ठेवून जायची भीती वाटते. म्हणून म्हटलं, लॉकरची चौकशी करावी.

साबळे : लॉकर घेण्यासाठी तुम्हाला तीस हजार रुपये ठेव ठेवावी लागेल आणि मग बाकीच्या औपचारिक गोष्टी, म्हणजे फॉर्म भरणं, इन्डेम्निटी बॉण्ड लिहून देणं, लॉकरचं भाडं देण्यासाठी तुमच्या खात्यातून पैसे कापून घेण्यासाठी सूचना देणं इत्यादी गोष्टी हे शिवकुमार तुम्हाला सांगतील.

शोभा भोसले : किती असतं लॉकरचं भाडं?

साबळे : लॉकरच्या आकाराप्रमाणे भाडं वाढत जातं. तुम्हाला काय ठेवायचं आहे लॉकरमध्ये त्याची यादी करा. मग लॉकर बघून घ्या आणि ठरवा कुठला लॉकर घ्यायचा ते.

शोभा भोसले : हो, यादी आणलीये मी. ही पहा.

साबळे : यादी मला दाखवू नका. तुम्ही तुमच्या लॉकरमध्ये काय ठेवलं आहे हे बँकेला माहीत नसतं. ते ठेवणं, काढणं ही सर्वस्वी ग्राहकाची जबाबदारी असते.

शोभा भोसले : पण मग आमच्या वस्तू कशा सुरक्षित राहणार?

साबळे : अहो, बँकेची व तुमची अशा दोन किल्ल्या एकाच वेळी लावल्याशिवाय लॉकर उघडताच येत नाही. तुमचा लॉकरमधला ऐवज शंभर टक्के सुरक्षित असतो.

शोभा भोसले : काय काय ठेवता येतं लॉकरमध्ये?

साबळे : तुमचे किमती दागिने, अतिशय मौल्यवान वस्तू असं ठेवता येतं. शिवाय महत्त्वाची कागदपत्रंही ठेवता येतात.

शोभा भोसले : म्हणजे लॉकर घेणं फायद्याचंच आहे. पण तीस हजाराची ठेव कशासाठी ठेवायला लागते?

साबळे : सांगतो. तुम्ही सर्व कागदपत्रांची पूर्तता करा. नंतर पुन्हा या मग आपण सविस्तर बोलू. शिवकुमार, यांच्याकडून सर्व फॉर्म भरून घ्या. या आपल्या फार जुन्या आणि प्रतिष्ठित ग्राहक आहेत बरं का! देवस्थानच्या विश्वस्तांपैकी या एक आहेत.

शिवकुमार : हो, सर. ते फॉर्म्स कुठे...

साबळे : फॉर्म तुम्हाला जेथे किंवा कदमही देतील.

**आणि, किंवा, पण, त्यामुळे ... – and, or, but, because of ...**

- दोन शब्द किंवा वाक्ये जोडण्यासाठी किंवा दिलेल्या माहितीत आणखी भर घालण्यासाठी ‘आणि’, ‘व’, ‘शिवाय’ या अव्ययांचा वापर करतात.
  (to combine two words, sentences)

  उदा. माझे आजोबा ८३ वर्षांचे आहेत, आणि आजी ८० वर्षांची.

- ‘किंवा’, ‘की’ ही अव्यये पर्याय देण्यासाठी वापरली जातात. (to suggest an alternative)

  उदा. तुम्ही चहा घेणार, की कॉफी?
  हा फॉर्म निळ्या, किंवा काळ्या शाईने भरावा.

- दोन विरुद्ध घटना किंवा वाक्ये जोडण्यासाठी तसेच अट घालण्यासाठी ‘पण’, ‘परंतु’ या अव्ययांचा वापर केला जातो.
  (to introduce an idea which contrasts what has been said)

  उदा. आपल्या तक्रारी थोडक्यात, पण मुद्देसूदपणे सांगाव्यात.

- दोन घटनांचा संबंध दर्शवण्यासाठी ‘कारण’ व ‘म्हणून’, ‘त्यामुळे’ ही अव्यये वापरतात आणि वाक्ये जोडतात. यांपैकी ‘कारण’ हे अव्यय ती घटना का घडली हे दाखवते व ‘म्हणून’, ‘त्यामुळे’ ही अव्यये तिचा परिणाम दाखवतात.
  (to show the reason; कारण = because of; म्हणून, त्यामुळे = that’s why)

  उदा. मला मुदतठेव विभागाची विशेष माहिती नाही, कारण मी अजून त्या विभागात काम केलं नाही. मी मुदतठेव विभागात अजून काम केलं नाही, त्यामुळे मला त्या विभागाची विशेष माहिती नाही.

**ख. जोड्या जुळवू या.** **Match the columns.**

| | |
|---|---|
| अ. निवृत्तिवेतनधारकांनी माझ्याकडे सुटे पैसे मागितले | १. पण व्याज मात्र चांगल्या दराने मिळाले पाहिजे. |
| आ. ग्राहकांना पैसे कमी मुदतीसाठी ठेवायचे आहेत | २. म्हणून मी तुम्हाला धन्यवाद देते. |
| इ. तुम्हाला मी सगळी माहिती दिली | ३. कारण तो मला सहज समजला. |
| ई. तुम्ही माझे काम झटपट केलेत | ४. आणि मी त्यांना दिले. |
| उ. मराठी चित्रपट मला आवडला | ५. आणि मोकाशीबाई माझ्याकडे चहाला येणार आहेत. |
| ऊ. साबळेसाहेब, गायकवाडबाई, प्रशांत, किमया | ६. परंतु एक गोष्ट सांगायला विसरलो. |

**ग. रिकाम्या जागी आणि, पण, परंतु, म्हणून, कारण या अव्ययांचा वापर करून वाक्ये पूर्ण करू या.** **Fill in the blanks.**

अ. बँकेत खातं उघडताना आधार कार्ड ---------------- राहत्या जागेचा पुरावा अशा दोन्ही गोष्टी लागतात.

आ. काळे धावतपळत बँकेत आले ---------------- बँक बंद झाली होती.

इ. "तुम्ही बसने या ---------------- स्वत:च्या वाहनाने या, ---------------- बँकेत वेळेवर येत जा," साबळेसाहेब किमयाला म्हणाले.

ई. भोसलेबाईंना दागिने सुरक्षित ठेवायचे होते ---------------- त्यांनी लॉकर घेतला.

उ. मी आज बँकेत येणार नाही ---------------- माझी तब्येत बरी नाही.

ऊ. म्हात्रे, तुम्ही सगळी कागदपत्रं दिलीत, ---------------- फोटो द्यायचे विसरलात.

ए. मॅनेजर साबळ्यांना बँकेमध्ये नेहमी शांतता, स्वच्छता ---------------- शिस्त हवी असते.

ॲ. बँकेची परीक्षा दिली ---------------- लगेच कोल्हापूरच्या शाखेत मी रुजू झालो.

**घ. आणि, व, पण, परंतु, म्हणून, कारण, तरीसुद्धा ही अव्यये योग्य ठिकाणी वापरून खालील वाक्यांच्या जोड्या लावू या.** Match the columns.

उदा. पहिल्या वाक्याचा क्रमांक + अव्यय + दुसऱ्या वाक्याचा क्रमांक

| | | |
|---|---|---|
| अ. श्री. व सौ. जोशी, दोघांनाही खाते वापरायचे आहे | अ + म्हणून + १ | १. त्यांनी संयुक्त खाते उघडले. |

| | | |
|---|---|---|
| आ. बँकेची उलाढाल वाढली | | २. त्याला मराठीत नीट सांगता येईना. |
| इ. बँकेने चांगला व्याजाचा दर दिला | | ३. त्यांचा चेक बँकेने पास केला नाही. |
| ई. गायकवाडबाई परीक्षा पास झाल्या | | ४. बँकेने कमी दराने कर्जे मंजूर केली. |
| उ. किमयाला ताप आला होता | | ५. मॅनेजर साबळे त्याच्या मदतीला आले. |
| ऊ. सरंजाम्यांच्या खात्यात पुरेसे पैसे होते | | ६. कॅशिअरची कॅश पटकन जुळली. |
| ए. सरंजाम्यांचा चेक बँकेने पास केला नाही | | ७. बँकेच्या ठेवी वाढल्या. |
| ॲ. बँक लॉकरचे नियम सांगायचा प्रयत्न शिवकुमारने केला | | ८. कॅश जुळवून ती घरी गेली. |
| ऐ. त्याला मराठीत सांगता येईना | | ९. त्यांची सही जुळत नव्हती. |
| ओ. संदीप चव्हाणांचे काम झाले होते | | १०. राहत्या जागेचा पुरावा दिला. |
| ऑ. बँकेत शांतता राखावी | | ११. ग्राहकांनी सजावट केली. |
| औ. आज बँकेत खूप गडबड होती | | १२. शिवकुमारला मदत करण्यासाठी ते थांबले. |
| अं. शेडग्यांनी आधारकार्ड, पॅनकार्ड | | १३. पैशाच्या देवाणघेवाणीचे व्यवहार चालू असतात. |
| अः. बँक कर्मचाऱ्यांनी स्वच्छता केली | | १४. त्यांना बढती मिळाली नाही. |

**च. खालील वाक्ये 'कारण' च्या जागी 'म्हणून' आणि 'म्हणून' च्या जागी 'कारण' अव्यय वापरून पुन्हा लिहू या.** **Rewrite the sentences using कारण or म्हणून, however applicable.**

उदा. बस वाटेतच बंद पडली म्हणून मला यायला उशीर झाला.

मला यायला उशीर झाला कारण बस वाटेतच बंद पडली.

अ. शिवकुमारला मराठी शिकायचे आहे म्हणून तो मराठीच्या वर्गाला जातो.

---

---

आ. भोसलेबाईंनी लॉकर घेतला कारण त्यांना दागिने सुरक्षित ठेवायचे होते.



---

---

---

इ. माझी तब्येत बरी नाही म्हणून मी आज बँकेत येत नाही.

---

---

ई. जहागिरदारांना ज्येष्ठ नागरिक बचत योजनेमध्ये गुंतवणूक करायची आहे म्हणून मी त्यांना वयाचा दाखला आणायला सांगितला.

---

---

उ. बँकेत गर्दी झाली होती म्हणून कदमांनी ग्राहकांना रांगेत उभे राहायला सांगितले.

---

---

ऊ. पाऊस पडला म्हणून चिखल झाला.

---

---

ए. उशीर झाला होता म्हणून किमया धावतपळत बँकेत आली.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

ॲ. ग्राहक वेगवेगळ्या ठेव योजना निवडतात कारण प्रत्येकाची गरज वेगळी असते.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

ऐ. काळ्यांना खातेउतारा मिळाला नाही कारण प्रिंटर बंद होता.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

ओ. जोशींचे एटीएम कार्ड हरवले होते म्हणून जोशींनी ते कार्ड ब्लॉक केले.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

ऑ. कॅशिअरने कांबळ्यांना स्लिप नीट भरायला सांगितले कारण नोटांचा तपशील लिहिला नव्हता.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

औ. आज सुट्टी होती म्हणून शिवकुमारने सहलीचा बेत ठरवला.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

अं. आज साबळे येणार नाहीत कारण त्यांची तब्येत बरी नाही.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

अः. भविष्य निर्वाह निधीचा लाभ सर्वांना मिळावा हा उद्देश आहे म्हणून सर्व राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये सार्वजनिक भविष्य निर्वाह निधीची योजना राबवली जाते.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------



छ. खालील संवाद ऐकू या. Listen.

**लॉकरची किल्ली सांभाळा बरं का!**

**पण, सुद्धा, ही – also**

उदा. साबळे चांगलं मराठी बोलतात.
शिवकुमार चांगलं मराठी बोलतात.
शिवकुमारपण / शिवकुमारसुद्धा / शिवकुमारही चांगलं मराठी बोलतात.

**जर-तर – if ... then, जरी-तरी – even if (conditional clause)**

उदा. लॉकर उघडताना जर सही जुळली नाही तर लॉकर उघडता येणार नाही.

- जरी – तरी या अव्ययांनी दोन वाक्ये जोडली जातात तेव्हा त्यातील मुख्य वाक्यात काही अंशी विरोध असतो. (concessive clause)

उदा. जर ऐन वेळी पाऊस पडला, तर ग्राहक मेळावा रद्द करावा लागेल.
जरी ऐन वेळी पाऊस पडला, तरी ग्राहक मेळावा रद्द करावा लागणार नाही.

उदा. जर किल्ली हरवली तर लॉकर फोडावा लागतो.
किल्ली हरवली तर लॉकर फोडावा लागतो.

ऐन वेळी पाऊस पडला, तरी / तरीसुद्धा ग्राहक मेळावा रद्द करावा लागणार नाही.
(even if जर and जरी are skipped, it doesn't make a difference.)

ज. रिकाम्या जागी जर-तर, सुद्धा, ही, पण यांपैकी योग्य अव्यय भरू या. Fill in the blanks.

अ. ---------------- ही बस चुकली ---------------- नंतर एक तास बस येणार नाही.

आ. रांगेत उभे राहिलात ---------------- तुमचे काम लवकर होईल.

इ. शिवकुमार, सगळे घरी गेले. काम झालं असेल ____________ तुम्ही ____________ जा.

ई. व्याजावर ---------------- व्याज मिळेल अशी ठेव योजना कुठली?

उ. पीपीएफचे मासिक स्टेटमेंट तयार असेल ---------------- आजच पाठवून द्या.

ऊ. तू ---------------- लगेच चहा आणलास ---------------- उत्साह येईल आणि काम ---------------- पटकन होईल.

ए. बँकेच्या लॉकरमध्ये तुम्ही दागिने ---------------- ठेवू शकता आणि महत्त्वाची कागदपत्रे ---------------- ठेवू शकता.

ॲ. काम करताना ---------------- कंटाळा आला ---------------- काहीतरी वेगळे काम करावे.

ऐ. कधीकधी चांगले काम करून ---------------- यश मिळत नाही.

**झ. खालील उताऱ्यात जर-तर, सुद्धा, तरीसुद्धा, किंवा या अव्ययांचा वापर करू या.**
**Fill in the blanks.**

**कागदपत्रांची पूर्तता**

"अहो काळे, तुम्ही अजूनसुद्धा तुमच्या राहत्या जागेचा पुरावा आणून दिलेला नाही. तरी --------------- (अ) मी तुम्हाला खात्यात पैसे भरायची मुभा दिली. पण --------------- (आ) तुम्ही तुमचं लाईट बिल किंवा फोनचं बिल आणून दिलं नाहीत --------------- (इ) तुम्हाला पैसे काढता येणार नाहीत. तुम्ही अजून फोटो --------------- (ई) दिले नाहीत. या दोन्ही गोष्टी तुम्ही आणून द्या. तुम्ही स्वत: या --------------- (उ) तुमच्या मुलाला पाठवलंत तरी --------------- (ऊ) चालेल. --------------- (ए) तुमच्या खात्यात सगळे व्यवहार तुम्हाला करायचे असतील --------------- (ॲ) तुम्हाला सर्व नियमांची पूर्तता करावी लागेल. साबळेसाहेब --------------- (ऐ) तुम्हाला हेच सांगतील. तुम्ही खूप जुने ग्राहक आहात हे मला माहीत आहे, --------------- (ओ) सगळी औपचारिकता तुम्हाला पूर्ण करावी लागेल."

**ट. आपल्या कल्पना वापरून खालील वाक्यांश पूर्ण करू या.** **Complete the sentences using your own ideas.**

अ. मी आज पन्हाळा शाखेत जाणार आहे आणि ------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

आ. तुम्ही पीपीएफमध्ये पैसे गुंतवा किंवा ------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

इ. जर या महिन्याचं टारगेट पूर्ण झालं नाही, तर ------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

ई. तुम्हाला लॉकर मिळेल पण ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

उ. उद्या बँक अर्धा दिवसच चालू राहील कारण ---------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

ऊ. --------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------ म्हणून मला उशीर झाला.

## २ कामच काम

### क. खालील उतारा वाचू या. Read.



आज शिवकुमारला खूप काम होते. प्रत्येक ग्राहकाला योजना समजावताना त्याची दमछाक होत होती. त्याला एक युक्ती सुचली. आवश्यक कागदपत्रांची यादी करून त्याने एका स्टँडला लावली आणि सांगितले की आता तुम्हाला काही शंका असेल तर विचारा. योजनेला फारच चांगला प्रतिसाद मिळाला. शिवकुमार म्हणाला, "साबळेसर, आपल्याला या योजनेमध्ये जर पाचशेपेक्षा जास्त खाती मिळाली तर बँकेला चांगला नफा होईल. मला खात्री आहे."
"सगळे कामाला लागले तर काहीच अवघड नाही," साबळे म्हणाले. सर्व ग्राहकांना फॉर्मचे वाटप झाले. कर्मचाऱ्यांना जेवायची सुट्टीसुद्धा घेता आली नाही.

**ला, ना – Suffixes for accusative and dative**

- हे द्वितीया व चतुर्थी विभक्तिप्रत्यय आहेत. ला हा एकवचनी व ना हा अनेकवचनी प्रत्यय आहे.
  (ला is used for singular and ना is used for plural)

  उदा॰ बँक - बँकेला - एकवचन
  बँका - बँकांना - अनेकवचन

**ख. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.**
**Pattern drill.**

शिक्षक

<u>बँकेला</u>

ग्राहकाला
कर्मचाऱ्याला
कामगाराला
शिपायाला

विद्यार्थी

बँकांना

**सर्वनामांची द्वितीया, चतुर्थीची रूपे – Accusative and dative pronouns**

| सर्वनाम : एकवचन | विभक्तिप्रत्यय लावून होणारे रूप | सर्वनाम : अनेकवचन | विभक्तिप्रत्यय लावून होणारे रूप |
|---|---|---|---|
| मी | मला | आम्ही / आपण | आम्हाला / आपल्याला |
| तू | तुला | तुम्ही | तुम्हाला / आपल्याला |
| तो<br>ती<br>ते | त्याला<br>तिला<br>त्याला | ते<br>त्या<br>ती | त्यांना |

**ग. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.**
**Pattern drill.**

शिक्षक

मी
<u>मला</u> जरा पाणी देता का?

तो
आम्ही
ते
त्या

विद्यार्थी

मला जरा पाणी देता का?

**घ. खालील वाक्यांमध्ये योग्य ठिकाणी 'ला' आणि 'ना' हे विभक्तिप्रत्यय जोडून वाक्ये पूर्ण करू या. Fill in the blanks.**

उदा。 त्यांना खरेदीला जायचे आहे.

अ. (तो) -------------- नाही, (ती) -------------- पाणी हवे आहे.

आ. (त्या) -------------- लॉकरचे सर्व नियम सांगा.

इ. बँकेची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शिवकुमार -------------- खूप मेहनत करावी लागली.

ई. जिना चढून बँकेत आल्यामुळे आजीबाई -------------- धाप लागली म्हणून त्या (ती भिंत) -------------- टेकून बसल्या.

उ. (ती मुलाखत) ———————— जाताना (तुम्ही) ———————— खूप ताण आला होता का?

ऊ. (आपण) -------------- काय हवे आहे? चहा की कॉफी?

ए. (ते पाखरू – अ。व。) -------------- दगड मारू नका.

**च. आता वरील उतारा तृतीया विभक्तिप्रत्यय वापरून पुढीलप्रमाणे लिहिता येईल. कसा ते पाहू या. Read the paragraph in the instrumental case.**

आज शिवकुमारने खूप काम केले. प्रत्येक ग्राहकाने प्रश्न विचारून त्याची दमछाक केली. मग त्याने एक युक्ती केली. आवश्यक कागदपत्रांची यादी करून भिंतीशी लावली. आणि सांगितले की आता एकेकाने शंका विचारा.
या योजनेला शिवकुमारने चांगला प्रतिसाद मिळवला. शिवकुमार म्हणाला, "जर आपल्या शाखेने या योजनेमध्ये पाचशेपेक्षा जास्त खाती उघडली तर एका वर्षाने चांगला नफा होईल, मी खात्रीने सांगतो." सगळ्यांशी गोड बोलून साबळेसाहेबांनी काम करून घेतले. ग्राहकांनीही सहकार्य केले. कर्मचाऱ्यांनी तर जेवायची सुट्टीसुद्धा घेतली नाही.

**ने, नी, शी – Suffixes of the instrumental case**

- हे तृतीया विभक्तिप्रत्यय आहेत. ने, शी हे एकवचनी व नी, शी हे अनेकवचनी प्रत्यय आहेत.

उदा。 ग्राहक - ग्राहकाने - एकवचन
ग्राहक - ग्राहकांनी - अनेकवचन

**छ. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून शब्द पुन्हा म्हणू या.**
**Pattern drill.**

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| बँक - बँकांनी | बँक - बँकांनी |
| ग्राहक | |
| कर्मचारी | |
| कामगार | |
| शिपाई | |

**ज. खालील वाक्यांमध्ये योग्य जागी ने, नी, शी इत्यादी प्रत्यय वापरू या. Fill in the blanks.**

अ. बँकेच्या (ते ग्राहक-अ॰व॰) --------------- आता एटीएम --------------- मैत्री केली आहे.

आ. (ते कर्मचारी-अ॰व॰) कर्मचाऱ्यांनी (ते ग्राहक-अ॰व॰) ग्राहकांशी (ते सौजन्य) सौजन्याने वागायचे ठरवले आहे. कारण हा सौजन्यसप्ताह चालू आहे.

इ. किमया --------------- कॅश मोजून घेतली.

ई. (ते एकमेक-अ॰व॰) --------------- चर्चा करून प्रश्न सुटेल.

उ. भोसल्यांना साडेआठ टक्के (तो दर) --------------- गृहकर्ज मिळाले.

ऊ. (ते लोक-अ॰व॰) --------------- बँकेचे सर्व नियम पाळायचे असे ठरवले.

ए. शिवकुमार --------------- (ते सहकारी-अ॰व॰) -------------- वाद न घालण्याचे ठरवले. (तो) ------------- विचार केला की “पाण्यात राहून (ते मासे-अ॰व॰) ------------- वैर” नको.



‘पाण्यात राहून माशाशी वैर’ या म्हणीच्या अर्थाशी खाली दिलेल्या वाक्यांपैकी कोणत्या वाक्याचा अर्थ जुळतो त्यावर ✓खूण करू या. **Select the correct alternative.**

१. पाण्यात राहायचं आणि माशांसारखं पोहायचं.

२. माशांशी वैर करायचं असेल तर पाण्यात राहावं लागतं.

३. ज्या लोकांबरोबर राहायचं आहे त्यांच्याशी शत्रुत्व निर्माण करू नये.

४. पाण्यात राहून शत्रुत्व निर्माण करू नये.

**झ. खालील उताऱ्यामध्ये ने, शी, नी आणि स, ला हे विभक्तिप्रत्यय योग्य ठिकाणी वापरून उतारा पूर्ण करू या.** **Fill in the blanks.**

मीटिंगमध्ये कर्मचाऱ्यां--------- (अ) बोलताना साबळें--------- (आ) विचार केला. ग्राहकां---------ही (इ) खूश ठेवले पाहिजे आणि कर्मचाऱ्यां---------सुद्धा (ई) विश्वासात घेतले पाहिजे. प्रत्येका--------- (उ) कोणते काम सांगायचे हे त्यां--------- (ऊ) मना--------- (ए) ठरवले. शिवकुमार--------- (ॲ) ग्राहकां--------- (ऐ) बोलण्याची जबाबदारी द्यावी. त्या--------- (ओ) मराठी बोलण्याचा सराव होईल आणि ग्राहकांच्या अनावश्यक प्रश्नां--------- (ऑ) थोडा लगाम बसेल. गायकवाडबाई--------- (औ) फॉर्म भरून घ्यायला सांगावे. प्रशांत जेधे--------- (ऋ) खाती उघडण्यास सांगावे. कारण तो कम्प्युटरवर भराभर काम करतो. आता योजने--------- (ऌ) गती येईल. हां, ही टीम छान काम करेल. त्यां--------- (अं) उत्साह आला आणि ते कर्मचाऱ्यां--------- (अ:) उत्साहाने बोलू लागले.

## ३ वादविवाद

**क. आता हा संवाद ऐकू या.** **Listen.**

**सगळ्यांचे आवाज चढले होते. एकटे साबळे शांतपणे पण ठामपणे ग्राहकांशी बोलत होते. शिवकुमारच्या शब्दसंपदेमध्ये आज खूप भर पडली. कोणते आहेत ते शब्द?**

**ख. वादविवादात खालीलपैकी कोणते शब्द आले आहेत? अधोरेखित करू या.**
**Underline the words that have come in the dialogue.**

गलबलाट कलकलाट आरडाओरडा

धडपड गडबड कटकट

बडबड किलबिलाट वटवट

पटपट सटसट

उदा॰ आरडाओरडा, ----------------------------------------------------------------

**ग. वादविवाद मिटवण्यासाठी कोणते शब्द वापरले आहेत?** **Write the imperative expressions used in the dialogue.**

उदा॰ शांत रहा.

___________________________________ ___________________________________

___________________________________ ___________________________________

___________________________________ ___________________________________

**घ. खालील वाक्ये योग्य शब्द वापरून पूर्ण करू या.** **Fill in the blanks.**

अ. शाळेमध्ये वर्गात मुलांचा -------------- चालू असतो.

आ. मिरवणुकीतला -------------- ऐकून शिवकुमार खिडकीपाशी आला.

इ. पालकांच्या सूचना म्हणजे मुलांसाठी --------------.

ई. सारखी -------------- करणारा माणूस लोकांना आवडत नाही.

उ. वादळाने झाड पडले तेव्हा एकदम -------------- उडाली.

## ४ संयुक्त खाते आणि नॉमिनेशन यातील फरक

**क. संवाद वाचू या.** **Read.**



साबळे : शिवकुमार, हे आपले ग्राहक श्रीयुत सरंजामे. यांना संयुक्त खातं आणि नॉमिनेशन यातला फरक समजावून सांगा आणि त्यांच्या शंकांचं निरसन करा.

शिवकुमार : नमस्कार. बसा सरंजामे. काय शंका आहे तुम्हाला?

सरंजामे : संयुक्त खातं म्हणजे काय?

शिवकुमार : म्हणजे एकापेक्षा जास्त खातेदारांचं एक खातं. बघू तुमचं पासबुक. हेच पाहा, हे तुमचं आणि तुमच्या पत्नीचं संयुक्त खातं आहे. यात तुम्ही दोघंही व्यवहार करू शकता. पैसे ठेवणं, काढणं, चेक देणं वगैरे. तुमच्या दोघांपैकी एकाच्या माघारी जो मागे राहील त्याच्या नावे हे खातं चालू राहील. या खात्यातील सर्व व्यवहारांची जबाबदारी तुमच्या दोघांचीही असते.

सरंजामे : पण मग नॉमिनेशन कशासाठी करायचं?

शिवकुमार : तुमच्या दोघांच्याही माघारी या खात्यातले पैसे ज्या व्यक्तीला मिळावेत असं तुम्हाला वाटतं त्या व्यक्तीच्या नावे तुम्ही नॉमिनेशन म्हणजेच नामनिर्देशन करू शकता. पण तुम्ही आहात तोपर्यंत नॉमिनीचं काहीच काम नाही. तो खात्याचे कुठलेही व्यवहार करू शकत नाही.

सरंजामे : म्हणजे नॉमिनी माझा मुलगा असायला पाहिजे का?

शिवकुमार : असं अजिबात नाही. नॉमिनी ही व्यक्ती वारसदारच असते असं नाही. ती एक जबाबदार व्यक्ती असेल जी तुमच्या इच्छेनुसार तुमच्या या खात्यातल्या पैशाची योग्य विल्हेवाट लावू शकेल.

सरंजामे : पण यात बँकेची भूमिका काय आहे?

शिवकुमार : बँकेची भूमिका अशी, की तुमच्यानंतर तुम्ही भरलेल्या नॉमिनेशनच्या फॉर्ममध्ये जी व्यक्ती नॉमिनी म्हणून नोंदलेली आहे तिला खात्यातले पैसे देणे. नॉमिनीशी संपर्क साधून ती व्यक्ती तीच आहे याची खात्री करून घेऊन बँक त्या खात्यातील पैसे नॉमिनीच्या म्हणजे नामनिर्देशित व्यक्तीच्या हवाली करते, म्हणजे बँकेची जबाबदारी संपते.

सरंजामे : पण कायदेशीर वारसदारांचे काय?

शिवकुमार : ते कायद्याने त्या रकमेवर हक्क सांगू शकतात. आणि ते नॉमिनीवर बंधनकारक आहे.

सरंजामे : धन्यवाद शिवकुमार. बऱ्याच दिवसांपासून डोक्यात असलेला गोंधळ आज मिटला.

**ख. वरील संवादामध्ये आपण आतापर्यंत शिकलेले विभक्तिप्रत्यय (चा, ची, चे / ला, ना / ने, ई, शी) जोडलेले शब्द आले आहेत; त्यांची यादी करू या.**

**Enlist the words ending with (चा, ची, चे / ला, ना / ने, ई, शी).**

| चा, ची, चे / चे च्या, ची | ला, ना | ने, ई, शी / नी, ई, शी |
|---|---|---|
| उदा॰ बँकेची | | कायद्याने |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## ५ 'लागणे' – क्रियापद एक – अर्थ अनेक

**क. खालील उतारा वाचू या.** Read.

**उताऱ्यातील 'लागणे' क्रियापदाची रूपे ठळक केली आहेत. त्यांचे अर्थ समजून घेऊ या.**

Understand the different meanings of 'लागणे'.

आज मॅनेजर साबळे सकाळपासून रागावलेले होते. शिवकुमार आणि प्रशांतला बोलताना पाहून ते म्हणाले, "चला कामाला **लागा** (१), गप्पा नकोत." त्यांचे ते शब्द शिवकुमारला **लागले** (२). घाईघाईने बचत विभागाकडे जाताना त्याला टेबलाचा कोपरा जोरात **लागला** (३). सुभाषने थंडगार पाणी त्याला दिले पण तेही त्याला कडू **लागले** (४). तो कामाला **लागला** (५). एरवी जे काम पंधरा मिनिटांत होते त्याच कामाला आज अर्धा तास **लागला** (६). नंतर भूक **लागली** (७) तरी त्याला काही खाण्याची इच्छा नव्हती. डब्यात आज काही गोड नव्हते. त्याला तर रोज काहीतरी गोड पदार्थ **लागतोच** (८). चहा प्यायला गेला तेव्हा टपरीवर एक छान गाणे **लागले** होते (९). ते ऐकल्यावर मात्र त्याचा मूड **लागला** (१०). काम संपवून शेजारच्या चित्रपटगृहात चित्रपट **लागला** होता (११) तो पाहायला जायचे त्याने ठरवले.

**ख. 'लागणे' क्रियापदाचे विविध अर्थ खाली दिले आहेत. उताऱ्यातील कोणत्या वाक्याशी तो अर्थ जुळतो ते त्या अर्थासमोर लिहू या.**

Select the correct meaning of the verb लागणे from the above passage.

उदा. कामाला सुरुवात करणे – ५ (कामाला लागणे)

| | |
|---|---|
| अ. मन दुखावणे | |
| आ. वेळ खर्च होणे | |
| इ. जाणीव होणे | |
| ई. खूश होणे | |
| उ. सुरू असणे | |
| ऊ. इजा होणे | |
| ए. चव कळणे | |
| ॲ. हवे असणे | |

## ६ परिपत्रक – Circular

### क. खालील परिपत्रक वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.

**Read and answer the questions.**

<u>आर्थिक नियोजन आणि लेखा विभाग</u>

बँकेच्या सर्व शाखा आणि कार्यालयांसाठी

दिनांक : २२ नोव्हेंबर २०१९
फाईल क्र. ३०९

प्रिय महोदय / महोदया,

विषय : लॉकरच्या भाड्यावर सेवाकर

दिनांक ०६.०८.२०१२ रोजी प्रसृत केलेल्या क्र. एक्स१/आ नि आ ले/सेवाकर/एप्रिल-१२/२०१२-१३ या परिपत्रकाद्वारे सर्व शाखांना सल्ला देण्यात आला होता, की अग्रक्रमाने लॉकरच्या भाड्यांची वसुली शाखांनी करावी आणि कुठलीही भाडेवसुली शिल्लक राहणार नाही याची खबरदारी घ्यावी.

शाखाप्रबंधकांना हे माहीत आहे, की लॉकरच्या भाड्याच्या उत्पन्नाला अधिकृत स्थान देण्याच्या दृष्टीने ते रोकड स्वरूपात बँकेच्या नफा/तोटा पत्रकात दाखवण्याचे बँकेचे धोरण आहे. परंतु वित्तीय अधिनियम १९९४ च्या तरतुदींनुसार बँकेने लॉकर भाड्याच्या उत्पन्नावर सेवाकर देणे अनिवार्य आहे. त्यानुसार ज्या लॉकर्सचे भाडे देय आहे पण त्याची वसुली झालेली नाही याची माहिती शाखा बीएस-१७ए या तक्त्याद्वारे सादर करत आहेत. या तक्त्यांच्या आधारे मुख्य कार्यालयाद्वारे अधिनियमाच्या तरतुदींनुसार सेवाकर भरला जातो. म्हणून बीएस-१७ए हा तक्ता सादर करण्यापूर्वी त्यात लिहिलेल्या तपशिलाची नीट तपासणी करूनच पाठवावा जेणेकरून मुख्य कार्यालय सेवा कराची योग्य रक्कम भरू शकेल.

सध्या थकीत लॉकर भाड्याची वसुली 'बीजीएल-९७६२८ – लॉकर भाडे वसुली' या शीर्षकाखाली जमा केली जात आहे. पण यामुळे अशा थकीत भाड्यावर दोनवेळा सेवाकर भरला जाईल. म्हणून बीजीएल-९७६२४ – दिनांक ०१.०४.२०१२ पासून 'थकीत लॉकरभाडे वसुली' या नावाने स्वतंत्र खाते उघडण्याचा निर्णय झाला आहे. बीएस-१७ए मध्ये दाखवलेली, देय लॉकर भाड्यातील थकीत लॉकरभाडे वसुली ही वरील खात्यात जमा केली जाईल.

त्यामुळे सर्व शाखांना सूचित करण्यात येत आहे की लॉकरभाड्याच्या लेखांकनासाठी लॉकरभाडे वसुलीचे योग्य वर्गीकरण करून वरील सूचनांचे पालन करावे.

कोणत्याही स्पष्टीकरणासाठी किंवा सूचनांसाठी संपर्क साधावा.

आपले,

| | |
|---|---|
| (अतुल भंडारे) | (वा॰ पां॰ श्रीखंडे) |
| महाप्रबंधक | सहाय्यक महाप्रबंधक |
| आ॰नि व लेखा॰ | आ॰नि व लेखा॰ |

**अ. खालील इंग्रजी शब्दांसाठी योग्य तो मराठी शब्द लिहू या आणि वरील परिपत्रकात अधोरेखित करू या.** **Write the correct Marathi word for the following words in English and underline them in the above paragraph.**

(अधिकृत, खबरदारी, अधिनियम, सेवाकर, वर्गीकरण, थकीत, अग्रक्रम, लेखांकन)

१. service tax – ------------------------------------------------

२. priority – ------------------------------------------------

३. precaution – ------------------------------------------------

४. authorized – ------------------------------------------------

५. law – ------------------------------------------------

६. overdue – ------------------------------------------------

७. accounting – ------------------------------------------------

८. classification – ------------------------------------------------

**आ. चूक की बरोबर ते लिहू या.** **True or false.**

१. वरील परिपत्रक केवळ बँकांच्या मुख्य शाखांना उद्देशून आहे.
------------

२. लॉकरच्या भाड्यांची वसुली हा प्रस्तुत परिपत्रकाचा विषय आहे.
------------

३. सेवाकराच्या नियमांनुसार लॉकर भाड्यावर सेवाकर देणे हे बँकांना बंधनकारक आहे.
------------

४. नियमित लॉकरभाडे आणि थकीत लॉकर भाडे असे वर्गीकरण करणे अपेक्षित आहे.
------------

दृष्टिक्षेप । **Overview**

| नामे | | |
|---|---|---|
| **तो (पु॰)** | **ती (स्त्री॰)** | **ते (नपुं॰)** |
| तो प्रश्न, ते-<br>question<br>प्रश्ना-, प्रश्नां- | ती बढती, त्या बढत्या<br>promotion<br>बढती-, बढत्यां- | ते महत्त्व, -<br>importance<br>महत्त्वा- |
| निवृत्तीवेतनधारक, -ते-<br>pensioner<br>निवृत्तिवेतनधारका-,<br>निवृत्तिवेतनधारकां- | उपस्थिती,-<br>presence<br>उपस्थिती- | ते नामनिर्देशन<br>nomination |
| तो दर, ते-<br>rate<br>दरा-, दरां- | ती जोखीम, त्या जोखमी<br>risk<br>जोखमी-, जोखमीं- | ते सौजन्य, -<br>courtesy<br>सौजन्या- |
| तो साक्षीदार, ते-<br>witness<br>साक्षीदारा-, साक्षीदारां- | ती चौकशी, त्या चौकश्या<br>inquiry<br>चौकशी-, चौकश्यां | ते गृहकर्ज, ती गृहकर्जे / र्जं<br>home loan<br>गृहकर्जा-, गृहकर्जां- |
| तो प्रतिसाद, ते-<br>response<br>प्रतिसादा-, प्रतिसादां- | ती भीती, -<br>fear<br>भीती- | ते सहकार्य, -<br>cooperation<br>सहकार्या- |
| तो दगड, ते-<br>stone<br>दगडा-, दगडां- | ती पूर्तता, -<br>compliance<br>पूर्तते- | ते वाटप,-<br>distribution<br>वाटपा- |
| तो वारसदार, ते-<br>heir<br>वारसदारा-, वारसदारां- | ती मेहनत,<br>efforts<br>मेहनती- | ते शत्रुत्व<br>rivalry<br>शत्रुत्वा- |
| नामित, -<br>nominee<br>नामिता-, नामितां-मददतले | ती भूमिका, त्या-<br>role<br>भूमिके-, भूमिकां- | |
| तो हक्क, ते-<br>claim<br>हक्का-, हक्कां- | ती गुंतवणूक, त्या गुंतवणुकी<br>investment<br>गुंतवणुकी-, गुंतवणुकीं- | |
| तो आकार, ते -<br>form<br>आकारा-, आकारां- | ती दमछाक,-<br>tiredness<br>दमछाकी- | |

| | | |
|---|---|---|
| तो दाखला, ते दाखले<br>certificate<br>दाखल्या-, दाखल्यां- | ती युक्ती, त्या युक्त्या<br>trick<br>युक्ती-, युक्त्यां- | |
| तो फरक, ते-<br>difference<br>फरका-, फरकां- | ती खात्री, -<br>assurance<br>खात्री- | |
| तो मासा, ते मासे<br>fish<br>माशा-, माशां- | | |
| तो ऐवज, ते-<br>valuable things<br>ऐवजा-, ऐवजां- | | |
| तो विश्वस्त, ते-<br>trustee<br>विश्वस्ता-, विश्वस्तां- | | |
| तो नमुना, ते नमुने<br>specimen<br>नमुन्या-, नमुन्यां- | | |
| तो व्याप, ते-<br>tedious task<br>व्यापा-, व्यापां- | | |

**क्रियापदे**

वागणे – to behave    ठरवणे – to decide    विसरणे – to forget

काढणे – to remove, to withdraw    मारणे – to hit, to kill

लाजवणे – to make someone feel obliged    ठेवणे – to keep

आवडणे – to like    जुळणे – to tally    टाळणे – to avoid

**क्रियाविशेषण / अव्यय**

मुद्दाम – deliberately, intentionally    सर्वस्वी – in all respects

सविस्तर – elaborately, in details    झटपट – quickly    संयुक्त – joint

उगीच – for no reason    कायदेशीर – legal    माघारी – return

## विशेषण

| | | |
|---|---|---|
| औपचारिक – formal | प्रतिष्ठित – prestigious | मौल्यवान – valuable |
| वेळखाऊ – time consuming | किमती – expensive | खर्चिक – costly |
| खूप – plenty | | |

## क्रियापद एक – अर्थ अनेक

| | | |
|---|---|---|
| लागणे | कामाला लागणे | to start work |
| | मनाला, व्यक्तीला लागणे | to get hurt |
| | शरीराच्या एखाद्या भागाला काहीतरी लागणे (इजा होणे) | to hit against something |
| | कडू, गोड, तिखट ... लागणे | to taste |
| | वेळ लागणे | to take time |
| | भूक लागणे | to feel hungry |
| | एखादी गोष्ट नेहमी खाण्यासाठी लागणे (हवी असणे) | to need desperately |
| | (टी.व्ही.वर / रेडिओवर) गाणे लागणे | music tuned on the radio or elsewhere |
| | मूड लागणे | get in the mood |
| | चित्रपट लागणे | show running in the theatre |

**नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या**

| नाम / इतर शब्द | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| मुभा देणे | to grant deliverance |
| संवाद साधणे | to interact, to have dialog |
| धाप लागणे | to breathe very fast |
| मैत्री करणे | to get familiar with |
| वाद घालणे | to argue |
| शंकांचे निरसन करणे | to clear the doubts |
| गरज पडणे | to be in need |
| हवाली करणे | to give the possession / responsibility |
| शेरेबाजी करणे | to pass comments |
| पार पाडणे / पडणे | to fulfil or to complete a work |
| आवाज चढणे | to speak in high pitch with anger |

आपण करत असलेले काम
जास्तीत जास्त चांगले आणि मनापासून करू या.

महाराष्ट्राचे नाव देशातच नव्हे
तर जगात उज्ज्वल करूया.



1 मे
महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा !

# ७

# सण, उत्सव आणि भटकंती









## चला, शिकू या...

- महाराष्ट्रातील सण आणि उत्सव यांविषयी माहिती घेणे
- महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीविषयी जाणून घेणे
- महाराष्ट्रातील खेळांविषयी माहिती करून घेणे
- प्रेक्षणीय ठिकाणांविषयी माहिती करून घेणे
- भाववाचक नामे शिकणे
- त, ई, आ विभक्तिप्रत्ययांचा वापर शिकणे

## १ दिन दिन दिवाळी

**क. खालील संवाद ऐकून रिकाम्या जागा भरू या.** **Listen and fill in the blanks.**

(सौंदर्य, भाऊबीज, धमाल, भेटीगाठी, स्वच्छता, दिवाळी, रोषणाई, चिवडा, कमतरता, उत्सुकता, आकाशकंदील, उत्साहाने, शंकरपाळी, कृतज्ञता, गोडी)

शिवकुमार : आज शहरात वेगळंच वातावरण दिसतंय. लोक ---------------- (१) कामाला लागलेत. ---------------- (२), सजावट सुरू झालीये.

कदम : अहो, शिवकुमारसाहेब, ---------------- (३) आली ना दोन दिवसांवर! त्याची तयारी. आता बघाच तुम्ही. एकदम वेगळंच दिसेल कोल्हापूर. सगळीकडे ---------------- (४), पणत्या, दिवे, सडे-रांगोळ्या, ---------------- (५) काही विचारू नका. आता या शहराचं ---------------- (६) आणखीच खुलेल.

शिवकुमार : मिठाईसुद्धा करतात का?

कदम : अहो, दिवाळीत इतके पदार्थ करतात की काही विचारू नका.

शिवकुमार : कोणकोणते पदार्थ असतात?

कदम : चकली, ---------------- (७), वड्या, शेवेचे वेगवेगळे प्रकार आणि कितीतरी! लाडू, ---------------- (८), चिरोटे, करंजी, अनारसे यांची ---------------- (९) तर अहाहा.

शिवकुमार : आणखी काय काय करतात दिवाळीत?

कदम : अहो, बरीच ---------------- (१०) असते बघा! आणि शिवाय जेवणाव्यतिरिक्त इतर पक्वान्नंही असतातच. माझ्या तोंडाला तर आत्ताच पाणी सुटलंय. दिवाळीत तुम्ही या आमच्याकडे फराळाला.

शिवकुमार : नक्कीच आवडेल मला यायला.

कदम : अहो, शिवकुमारसाहेब, हा नात्यांचा सण आहे. त्यामुळे तुम्हाला आम्ही तुमच्या कुटुंबियांची ---------------- (११) भासू देणार नाही.

शिवकुमार : दिवाळी म्हणजे दिव्यांचा सण हे ऐकलं होतं. पण, नात्यांचा सण म्हणजे?

कदम : म्हणजे असं बघा, दिवाळी चार-पाच दिवस साजरी केली जाते. प्रत्येक

दिवशी एकेका नात्याला महत्त्व असतं. नवरा-बायको, वडील-मुलगी यांच्या नात्यासाठी पाडवा, भाऊ-बहिणीच्या नात्यासाठी ---------------- (१२). आपल्या महाराष्ट्रात शेतकरी बांधवांसाठी महत्त्वाचा असणारा दिवस म्हणजे वसुबारस. याच दिवशी ते वर्षभर त्यांना मोलाची साथ देणाऱ्या गाई-वासरांची पूजा करून त्यांच्याप्रती ---------------- (१३) व्यक्त करतात. आणि दिवाळीच्या निमित्ताने नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांच्या ---------------- (१४) तर होतातच. म्हणूनच, सगळी नाती साजरी करण्याचा हा सण आहे.

शिवकुमार : मलाही आता दिवाळीबद्दल खूप ---------------- (१५) वाटतेय.

**ख. आता, वरील संवादातील उत्तरांची यादी करू या.** Make a list of the answers.

| | | | |
|---|---|---|---|
| तो उत्साह | ---------------- | ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- | ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- | ती धमाल | ---------------- |
| ---------------- | ---------------- | ---------------- | ---------------- |

**भाववाचक नामे – Abstract nouns**

- ह्या सर्व नामांतून भाव व्यक्त होतो म्हणून यांना 'भाववाचक नामे' असे म्हणतात.
- फार कमी भाववाचक नामांचे अनेकवचनी रूप होते.

**तुमच्या माहितीसाठी...**

**काही विचारू नकोस / नका – don't ask**

- घटनेची तीव्रता वर्णन करण्यासाठी 'काही विचारू नकोस / नका' हा गमतीशीर वाक्यांश बोलताना वापरला जातो. केवळ तीन शब्दात त्या घटनेची पराकोटीची मजा, आश्चर्य, गांभीर्य त्यातल्या तपशीलाशिवायही ऐकणाऱ्यांच्या मनावर ठसते.
- तू ⟶ काही विचारू नकोस
- तुम्ही ⟶ काही विचारू नका

पुणेरी फोडणी

नाना : काल तू का आला नाहीस? इतकं मस्त झालं ना जेवण! काही विचारू नकोस.

अप्पा : बरं, नाही विचारत.

ग. खालील तक्त्यात काही भाववाचक नामे दिली आहेत, ती लक्षात ठेवू या. Read.

| पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|
| वादविवाद | सुरक्षितता | प्रोत्साहन |
| तणाव | जबाबदारी | भांडण |
| उत्साह | चालढकल | मित्रत्व |
| नीटनेटकेपणा | टाळाटाळ | शत्रुत्व |
| प्रामाणिकपणा | भरभराट | देवपण |
| दानशूरपणा | जाणीव | मोठेपण |
| दयाळूपणा | स्वच्छता | प्रामाणिकपण |
| कष्टाळूपणा | प्रसन्नता | शौर्य |
| चमत्कारिकपणा | गरिबी | औदार्य |
| नि:स्वार्थीपणा | वकिली | गांभीर्य |
| ओलावा | आपुलकी | धैर्य |
| गारवा | इमानदारी | तारुण्य |
| | कीर्ती | साम्य |
| | नम्रता | |

**घ. कंसातील योग्य भाववाचक नाम वापरून रिकाम्या जागा भरू या. नामाच्या लिंगानुसार क्रियापदाचे रूप लिहायचे आहे.** **Fill in the blanks.**

(उत्सुकता, टिप्परघाई, प्रोत्साहन, आत्मविश्वास, आश्चर्ये, महत्त्व, गुंतवणूक, मजा, आश्चर्य, स्वच्छता, उत्कंठा, धमाल)

उदा॰ सणात मजा करताना हे विसरू नये की स्वच्छता हीसुद्धा आपलीच जबाबदारी असते.

अ. लग्नाची वेळ जवळ आली आणि सगळ्यांची ---------------- ---------------- (उडणे).

आ. जगात सात ---------------- ---------------- (असणे) असे म्हणतात.

इ. स्पर्धेत कोण जिंकणार याची ---------------- शिगेला ---------------- (पोचणे).

ई. तिला परीक्षेचे ---------------- वाटत नाही, पण लावणीचा सराव ती मन लावून ---------------- (करणे).

उ. चित्रपट केवळ ---------------- म्हणून बघायचा ---------------- (नसणे), त्यातला आशय जाणून घ्यायचा असतो.

ऊ. शासनाच्या धोरणामुळे खेळाडूंना खेळातच करिअर घडवण्यासाठी ---------------- ---------------- (मिळणे).

ए. बँकेच्या गुंतवणुकीच्या नव्या योजनेला भरघोस प्रतिसाद मिळाल्यामुळे शिवकुमारचा ---------------- ---------------- (वाढणे).

ॲ. कॉलेजच्या शेवटच्या दिवशी सगळ्यांनी खूप ---------------- ---------------- (करणे).

ऐ. "---------------- कशी ---------------- (करणे)?" हे शिकवणारे वर्ग जोरात चालतात.

ओ. संपूर्ण देशात ---------------- मोहीम राबवली तर काही ---------------- वाटायला नको.

च. खालील चौकोनात खूप शब्द लिहिले आहेत त्यातील भाववाचक नामे ओळखू या व त्यांच्या लिंगांनुसार त्यांचे वर्गीकरण करू या. **Select the abstract nouns and categorise them according to the gender.**

टेबल भिंत कचरापेटी अस्वच्छता ग्राहक आवाज
कम्प्युटर पेन विचार रांग कागदपत्रे शंका
समाधान उलाढाल अंक नोंद केबिन भूक
घाबरगुंडी कलकलाट दरवाजा काळजी शांतता
घर चहा वडापाव मिसळ चव पैसे लबाडी
दिवाळी जाणीव रेल्वेस्टेशन बस दमणूक जेवण
गारवा राग आनंद सुगंध तणाव आरडाओरडा

भाववाचक नामे :

| तो | ती | ते |
|---|---|---|
| गारवा | लबाडी | पेन |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**छ. खालील उताऱ्यात योग्य भाववाचक नामांचा वापर करू या. मदतीसाठी नामाचे पहिले अक्षर लिहिले आहे.** **Fill in the blanks using the correct abstract nouns.**

ठेवी ठेवण्यासाठी ग्राहकांना प्रो---------------- (अ) देणे गरजेचे आहे. अनेक प्रकारे गुंतवणूक करता येते. पण बँकेतल्या गुंतवणुकीत सु---------------- (आ) आहे, हे पटवून देण्याची ज---------------- (इ) आपली आहे. वेळोवेळी योग्य सूचना देणे, बदल समजावून सांगणे, व्याजाबद्दलच्या सूचनांचे पालन करणे ही ज---------------- (ई) बँक कर्मचाऱ्यांची आहे. त्यात चा---------------- (उ) किंवा टा---------------- (ऊ) करता कामा नये. वा---------------- (ए) किंवा भांडणाला आमंत्रण देऊ नये. ग्राहकांवरच बँकेची भ---------------- (ॲ) अवलंबून आहे याची जा---------------- (ऐ) ठेवली पाहिजे. कामात उ---------------- (ओ) हवा. बँकेतील वातावरणात त---------------- (ऑ) असू नये आणि बँकेच्या परिसरात प्र---------------- (औ), स्व---------------- (अं) व नी---------------- (अः) राखला पाहिजे.

**ज. पुढील वाक्यांमध्ये भाववाचक नामांना योग्य विभक्ती किंवा अव्यय जोडायचे आहे.** **Fill in the blanks.**

उदा. ग्राहक आणि बँक कर्मचारी दोघांनीही प्रामाणिकपणाने व्यवहार करावेत.

(गारवा, तणाव, कलकलाट, जबाबदारी, विश्वास, स्वच्छता, उत्साह, भांडण, आश्चर्य, थंडी, दमणूक, राग, समाधान, चव, शंका)

अ. लोक ----------------ने बँकेत पैसे ठेवतात. त्यामुळे आपल्याला ----------------ची जाणीव असली पाहिजे.

आ. हवेतल्या ----------------मुळे काम ----------------त झाले.

इ. कामाने झालेल्या ----------------तही एक ----------------ची जाणीव होती.

ई. ----------------च्या भरात साबळे शिवकुमारला जोरात बोलले.

उ. बँकेचा चकाचक परिसर पाहून ग्राहकांच्या ----------------ला पारावार राहिला नाही.

ऊ. ----------------त चहा प्यायला की तरतरी येते.

ए. ग्राहकांच्या ----------------मुळे शिवकुमारचे डोके दुखू लागले.

ॲ. ते दोघे सारखे भांडतात पण ----------------तही मजा असते.

ऐ. ---------------- चे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे.

ओ. ग्राहकांच्या सर्व ---------------- चे निरसन झाले पाहिजे.

### झ. महाराष्ट्रातील आणखी काही सण

**बैलपोळा, नागपंचमी आणि मकरसंक्रांत**

बैलपोळा, नागपंचमी आणि मकरसंक्रांत हे शेतकऱ्यांचे सण आहेत. बैल आणि नाग, साप हे शेतकऱ्याचे मित्र. बैल शेत नांगरतात, पेरणीचं यंत्र ओढतात, विहिरीतून पाणी ओढतात आणि वाहतुकीसाठीही त्यांचा उपयोग होतो. बैलांच्या कष्टांशिवाय शेती होणारच नाही.

त्याचप्रमाणे शेतात बिळं करून राहणारे नाग साप शेतातले उंदीर पकडून खातात. शेतकरी कष्ट करून धान्य पिकवतो पण उंदरांमुळे धान्याची नासाडी होते. पण सापांमुळे उंदीर कमी होतात आणि धान्याची नासाडी होत नाही.

या दोन्ही प्राण्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे दोन्ही सण आहेत. पोळ्याच्या दिवशी बैलांना सजवून मिरवणूक काढतात. त्या दिवशी त्यांना आराम देतात, कामाला लावत नाहीत. नागपंचमीच्या दिवशी नागाच्या वारुळापाशी जाऊन पूजा करतात.

बैलपोळ्याच्या दिवशी पुरणपोळी हे पक्वान्न करतात. नागपंचमी या सणाला पुरणाचे दिंड करतात. ही दोन्ही पक्वान्ने भरपूर देशी तूप घालून खातात. कोल्हापुरात विशेषकरून हे सण साजरे केले जातात कारण या जिल्ह्यात शेतीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे शेतकरी खूप आहेत. त्यांच्या दृष्टीने हे सण महत्त्वाचे आहेत.

मकरसंक्रांतीला शेतात पिके तयार होतात. आपल्या शेतात पिकलेल्या धान्य, फळे भाजीपाला आणि शेंगा, ऊस यांचा नमुना एकमेकांना देण्याची प्रथा आहे. मातीच्या मडक्यातून ही देवाणघेवाण होते. त्याला वानवळा असे म्हणतात. गुळाची पोळी खाऊन हा सण साजरा करतात. पतंग उडवण्याचा खेळ खेळतात.

### ट. खाली शब्दांचे गट दिले आहेत. ते कोणत्या सणाशी संबंधित आहेत त्या सणाचे किंवा उत्सवाचे नाव त्या गटासमोर लिहू या.

**Fill in the blanks using the correct festival.**

(नागपंचमी, बैलपोळा, ईद, दिवाळी, मकरसंक्रांत)




अ. पणत्या, आकाशकंदील, रांगोळ्या, ओवाळणी, फराळ, अभ्यंगस्नान
: ----------------

आ. बैलांची मिरवणूक, पुरणपोळी, बैलांची पूजा : --------------

इ. शेतातला वानवळा, गुळाची पोळी, मातीची मडकी, पतंग
: ----------------

ई. गणपतीची मूर्ती, आरती, मोदक, विसर्जन मिरवणूक : गणेशोत्सव

उ. शिरखुर्मा, भेटीगाठी, नमाज, नवे कपडे : ----------------

ऊ. नागाच्या प्रतिमेची पूजा किंवा वारुळाची पूजा, पुरणाचे दिंड : ----------------

## ठ. संवाद ऐकू या व त्याखालील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहू या.

**Listen and answer the questions.**

**सण, उत्सव आणि बँकेचे व्यवहार**

अ. संवादात कोणकोणत्या सणांचा उल्लेख आला आहे?

--------------------------------------------------------------------------------

आ. कोल्हापूरचा मराठी माणूस कोणत्या महोत्सवांसाठी भरपूर पैसे खर्च करतो?

--------------------------------------------------------------------------------

इ. कोल्हापुरातील कुस्तीविषयी संवादात कोणती माहिती आली आहे? स्वत:च्या शब्दांत लिहू या.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ई. ठेवी संकलन सप्ताहासाठी आवश्यक असलेली खालील कामे कोण करणार आहे?

१. संभाव्य ग्राहकांची यादी करणे - --------------------

२. ठेव सप्ताहासाठी एक पत्रक लिहिणे - --------------------

३. पत्रकाची मोठी पोस्टर्स तयार करून ठिकठिकाणी लावणे - --------------------

### पुणेरी फोडणी

| | | |
|---|---|---|
| बँक अधिकारी | : | तुम्ही कॅशिअरच्या जागेसाठी अर्ज केलाय का? मला सांगा, काही अनुभव आहे तुम्हाला? |
| पक्या | : | म्हनजे काय सर! गणेशोत्सवाची वर्गणी गोळा करण्याचा तीन वर्षांचा अनुभव आहे. |
| बँक अधिकारी | : | कॅश टॅली करता येते? |
| पक्या | : | सकाळपासून वर्गणी गोळा करत असतो. संध्याकाळी खिशात जे शिल्लक असतात तेवढे जमा करतो. ते टॅलीच असतात ना ! |

## २ खवय्यांचा महाराष्ट्र

### क. संवाद वाचू या. Read.

**चव ओळखणार त्यालाच जेवायला मिळणार**



मंगला सातपुते : अहो साहेब, किमयाताईंनी हे पदार्थ तुम्हाला दिलेत. त्यांची चव घ्यायला सांगितली आहे तुम्हाला.

शिवकुमार : बघू. अरे बापरे! साखर, मीठ, कारलं, मिरची, आवळा, चिंच. माहीत आहे चव. यात काय नवीन?

मंगला सातपुते : ते विचारा किमयाताईंना. येतीलच त्या.

किमया : शिवकुमार, यांच्या चवींची नावं सांगा. तरच आज डबा खायला मिळणार आहे.

शिवकुमार : आधी मी जेवतो, मग सांगतो. फार भूक लागलीये.

किमया : नाही, टाळाटाळ नकोय. आधी test of tastes. आणि मग जेवण.

शिवकुमार : साखर गोड आहे. मिरची तिखट आहे. एवढंच येतं मला.

किमया : हे मीठ. कसंय? खारट. हे कारलं. हे कडू आहे. आवळा तुरट असतो आणि चिंच आंबट. लक्षात राहील?

शिवकुमार : सोप्पं आहे. तिखट, गोड, कडू, खारट, तुरट आणि आंबट. बरोबर?

किमया : अगदी बरोबर. आज मी डब्यात एक तिखट पदार्थ आणलाय. चिवडा. ताजा कुरकुरीत चिवडा. अहो साबळेसाहेब, या, गायकवाडबाई, या ना, चिवड्याची चव बघा.

साबळे : अरे वा! फारच चटकदार, कुरकुरीत झालाय.

शिवकुमार : कुरकुरीत म्हणजे काय?

साबळे : चिवडा खाताना आवाज होतोय ना कुरकुर, म्हणून कुरकुरीत.

शिवकुमार : किती छान शब्द आहे! अजून आहेत असे शब्द?

किमया : हो, कितीतरी! पण आपली जेवणाची सुट्टी संपलीये. उद्या सांगीन.

**ख. खालील पदार्थ आणि चव यांच्या जोड्या जुळवू या. एकच चव अनेक पदार्थांना असू शकेल.** **List the food items as per the taste.**

लाडू, लिंबू, आंबा, कैरी, मिसळ, आवळा, सुपारी, मिरची, खीर, मेथी, अननस, तुरटी, मटण रस्सा, बटाटावडा, मीठ

अ. तिखट

---------------

---------------

---------------

आ. गोड

---------------

---------------

---------------





इ. खारट

---------------

---------------

---------------

ई. कडू

---------------

---------------

---------------

उ. तुरट

---------------

---------------

---------------

ऊ. आंबट

---------------

---------------

---------------



ग. हे आहेत खास महाराष्ट्रीय पदार्थ. तुम्हाला यातले कोणते पदार्थ माहीत आहेत? जोड्या जुळवू या. Match the following.

अ

____________________

आ

____________________

इ

____________________

ई

____________________

उ

____________________

ऊ

____________________

ए

____________________

अॅ

____________________

ऐ

____________________

ओ

____________________

ऑ

____________________

औ

____________________

ऋ

____________________

अं

____________________

आं

____________________

| | | |
|---|---|---|
| तो बटाटावडा,<br>ते बटाटेवडे | तो मासा, ते मासे<br>(माशाची थाळी) | ते भजे / भजं, ती भजी |
| तो मिसळपाव, ते- | तो मटणाचा रस्सा<br>आणि ती भाकरी,<br>त्या भाकऱ्या | ती साबुदाणा खिचडी |
| ती पुरणपोळी,<br>त्या पुरणपोळ्या | ती बासुंदी, - | तो शिरा, - |
| तो कोंबडीवडा<br>, ते कोंबडीवडे | तो मोदक, ते मोदक | ती वडी, त्या वड्या |
| ते फोडणीचे पोहे, - | ते श्रीखंड, - | ते थालीपीठ, ती<br>थालिपीठे / थालिपीठं |

**घ. संवाद वाचू या.** **Read.**

**तोंडाला सुटेल पाणी**



शिवकुमार : चला, जेवायची सुट्टी झालीये. आणि आज आपल्या एक ग्राहक यास्मिनजींनी शिरखुर्मा दिलाय. चला लवकर.

किमया : शिरखुर्मा... वा. बघू, आण इकडे.

शिवकुमार : मस्त झालाय ना?

गायकवाडबाई : नुसता मस्तच? असं म्हण की फारच स्वादिष्ट झालाय.

किमया : त्याला शिकवायला लागेल. कालचा चिवडा कसा होता?

शिवकुमार : आठवलं. कुरकुरीत! हो ना?

किमया : अगदी बरोबर. अजून काय असतं कुरकुरीत? चकली, भजी, वेफर्स. मिसळ असते झणझणीत, भेळ असते चटकदार, करंजी असते खुसखुशीत, बाकरवडीसुद्धा खुसखुशीत, चिवडा आणि कोथिंबिरीच्या वड्या असतात खमंग, रसगुल्ला आणि गुलाबजाम गुलगुलीत, खरवस, बर्फी लुसलुशीत, खीर स्वादिष्ट तर मसालेदार वांग्याची भाजी आणि मसालेभात.

शिवकुमार : हे शब्द फेर धरून नाचातयत माझ्या डोक्यात. आत्ता तर मी हा स्वादिष्ट शिरखुर्मा खातो.

च. पदार्थ आणि विशेषणे यांच्या जोड्या लावू या. Match the columns.

| पदार्थ | विशेषण |
|---|---|
| अ. भाकरी | १. लज्झतदार |
| आ. फळे | २. स्वादिष्ट |
| इ. बटाटावडा | ३. ताजी |
| ई. मिसळ | ४. कुरकुरीत |
| उ. भजी | ५. रसरशीत |
| ऊ. चिवडा | ६. झणझणीत |
| ए. चिरोटे | ७. चविष्ट |
| ॲ. श्रीखंड | ८. खुसखुशीत |
| ऐ. लस्सी | ९. चमचमीत |

छ. खालील पदार्थांना कोणती विशेषणे लागू शकतील? कंसातील विशेषणांमधून निवडू या.
Give the correct adjectives.

(खमंग, खुसखुशीत, स्वादिष्ट, चविष्ट, लुसलुशीत, गुळगुळीत, रसरशीत, चमचमीत, चटकदार, मसालेदार, खुमासदार, कुरकुरीत, मधुर, गरमागरम)

उदा. चकली : खमंग, कुरकुरीत, चटकदार

अ. चिवडा : ------------------------------------------------

आ. पुरणपोळी : ------------------------------------------------

इ. खीर : ------------------------------------------------

ई. पोहे : ------------------------------------------------

उ. मिसळ : ------------------------------------------------

ऊ. रसगुल्ला आणि गुलाबजाम : ------------------------------------------------

ए. आंबे : ------------------------------------------------

ॲ. घावन : ------------------------------------------------

ऐ. भजी : ------------------------------------------------

ओ. रस्सा : ------------------------------------------------

ऑ. खरवस : ------------------------------------------------

औ. करंजी : ------------------------------------------------

## ३ लावणी महोत्सव

### क. खालील उतारा वाचू या. Read.

गेल्या आठवड्यात लावणी महोत्सव झाला. महोत्सवात अनेक प्रकारच्या लावण्या सादर झाल्या. लावणी नृत्यांगना इतक्या ऐटीत आणि ठसक्यात लावण्या सादर करत होत्या की सगळे श्वास रोखून पाहत होते. रात्री सुरू झालेला कार्यक्रम पहाटेपर्यंत चालला. दिवसा शांत असलेला परिसर रात्री उजळून निघाला होता. मांडवात भरपूर रोषणाई केलेली होती. पुढची नृत्यांगना कोण? प्रेक्षकांत उत्सुकता दाटली होती. तेवढ्यात लावणीसम्राज्ञी साक्षात सुरेखा पुणेकर थाटात रंगमंचावर आल्या. वातावरणात चैतन्य सळसळलं. खुर्च्यांत रेलून बसलेले लोक एकदम ताठ झाले. शिट्ट्या आणि टाळ्यांच्या गजरात निवेदनही नीट ऐकू येत नव्हतं.

### ख. उताऱ्यातील निळ्या रंगातले विभक्तिप्रत्यय पाहू या. Read.

**त, ई, आ – Suffixes for locative**

- ऐटीत : त, रात्री : ई, दिवसा : आ
- त, ई, आ हे सप्तमीचे विभक्तिप्रत्यय आहेत.
- केव्हा, कशात, कशा, कधी हे प्रश्नशब्द वापरून विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देताना सप्तमी विभक्ती वापरावी लागते.

### ग. रिकाम्या जागी योग्य प्रश्नशब्द लिहू या. Fill in the blanks.

कधी, कशात, केव्हा, कशा

अ. लावणी महोत्सव -------------------- झाला?

लावणी महोत्सव मागच्या आठवड्यात झाला.

आ. लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर रंगमंचावर ------------------ आल्या?

लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर थाटात रंगमंचावर आल्या.

इ. परिसर -------------------- शांत असायचा?

परिसर दिवसा शांत असायचा.

ई. लोक -------------------- रेलून बसले होते?

लोक खुर्च्यांत रेलून बसले होते.

**घ. खालील वाक्ये त, ई, आ हे प्रत्यय वापरून पुन्हा लिहू या. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे नामाचे योग्य रूप करू या.** **Fill in the blanks.**

अ. (ती बँक) ------------------------ ठेवी संकलन सप्ताह चालू आहे.

आ. किमया (तो डबा) ------------------------ रोज नवीन पदार्थ आणते.

इ. (ती मिसळ) --------------------- पोहे, मटकीची उसळ, फरसाण या सगळ्याचं मिश्रण असतं.

ई. (ते गाठोडं) गाठोड्यात गाठोडं, (ते) त्यात पेटी, (ती पेटी) पेटीत डबा, (तो डबा) डब्यात कोल्हापुरी साज.

उ. (तो गळा) --------------------- कोल्हापुरी साज, (ते नाक) --------------------- नथ, (ते हात) --------------------- बिलवर, (ते बोट) --------------------- अंगठी, (ते पाय – अ॰व॰) ---------------------पैंजण, असे दागिने मराठी स्त्री घालते.

ऊ. तुझ्याकडे वाहन नसेल तर (पाय) ------------------------ बँकेत जा.

ए. (दिवस) --------------------- कडक ऊन्ह आणि (रात्र) --------------------- थंडी असं हवामान आहे.

**च. त, ई, आ विभक्तींचा वापर करून उतारा पूर्ण करू या.** **Fill in the blanks.**

(आकाश) --------------------- (१) ढग, (ढग) --------------------- (२) पाऊस. पाऊस पडला (शेत) ------------------ (३). शेतातल्या (माती) ----------------- (४). (माती) --------------------- (५) रुजलं बी. (शेत) --------------------- (६) आलं पीक. धान्य भरलं (पोते) --------------------- (७). पोती गेली (बाजार) ----------------- (८). धान्य पोचलं घराघरात. समृद्धी आली (दार) ----------------- (९). पैसा आला (खिसा) --------------- (१०). खिशातला पैसा (बँक) --------------- (११), बँकेतला (खाते) ------------------------ (१२). खात्यातून गेला पुन्हा (अर्थव्यवस्था) ------------------- (१३). असा रुपया सारखा (प्रवास) ------------------- (१४) असतो. या खात्यातून त्या (खाते) --------------------- (१५) फिरत असतो. आणि या साखळीतला बँक हा एक महत्त्वाचा दुवा असतो.

**छ. अधोरेखित केलेल्या शब्दांच्या ऐवजी त्या जागी कंसातील योग्य तो शब्द लिहून वाक्ये पुन्हा लिहू या.** **Rewrite the sentences using the below words instead of the underlined phrases.**

(रस्तोरस्ती, गावोगावी, क्षणोक्षणी, घरोघरी, पानोपानी)

अ. महाराष्ट्रातल्या <u>प्रत्येक गावात</u> आमच्या बँकेची शाखा आहे.

---------------------------------------------------------------------------

आ. आता <u>प्रत्येक घरात</u> टी.व्ही. असतो.

---------------------------------------------------------------------------

इ. <u>प्रत्येक रस्त्यावर</u> वाहतूक ठप्प झाली होती.

---------------------------------------------------------------------------

ई. <u>प्रत्येक क्षणी</u> पुराचं पाणी वाढत होतं.

---------------------------------------------------------------------------

उ. <u>प्रत्येक पानावर</u> त्याने सुंदर कविता लिहिल्या होत्या.

---------------------------------------------------------------------------

**रस्तोरस्ती, गावोगावी, क्षणोक्षणी ...**

- रस्तोरस्ती, गावोगावी, क्षणोक्षणी, घरोघरी, पानोपानी याचप्रमाणे पावलोपावली, गल्लोगल्ली, देशोदेशी अशा प्रकारच्या शब्दांमध्ये सप्तमीच्या प्रत्ययांचा वापर होतो.

- पावलोपावली – प्रत्येक पावलावर,
- गल्लोगल्ली – प्रत्येक गल्लीत,
- देशोदेशी – प्रत्येक देशात

**ज. चौकटीतील शब्द वापरून वाक्ये तयार करू या.** **Fill in the blanks.**

अ. मी बँकेत लॉकर घेतला कारण आजकाल दिवसाढवळ्या चोऱ्या होऊ लागल्या आहेत.

आ. समारंभात मला --------------- तिची आठवण येत होती.

इ. आता --------------- एटीएम मशिनं बसवल्यामुळे खातेदारांची सोय झाली आहे.

ई. --------------- आपल्या ठेवी संकलन सप्ताहाची बॅनर्स लागली आहेत.

उ. नृत्यांगनेला बघण्याची लोकांची उत्सुकता --------------- वाढत होती.

| |
|---|
| गल्लोगल्ली |
| दिवसाढवळ्या |
| क्षणोक्षणी |
| रस्तोरस्ती |
| पावलोपावली |

## ४ महाराष्ट्रातील भटकंती

**क. खालीलपैकी कोणती ठिकाणे तुमच्या परिचयाची आहेत?**

**Which of these places do you know? Write the correct name or the city.**

| | ठिकाणाचे नाव | कुठे / कोणत्या शहरात |
|---|---|---|
| अ  | गेट वे ऑफ इंडिया | मुंबई |
| आ  | अजिंठा-वेरूळ | ---------------- |
| इ  | ---------------- | कोल्हापूर |
| ई  | झिरो मैल | ---------------- |

उ



| | |
|---|---|
| त्र्यंबकेश्वर | ---------------- |

ऊ



महाबळेश्वर

ए



| | |
|---|---|
| ---------------- | पुणे |

ॲ



| | |
|---|---|
| पन्हाळा | ---------------- |

ऐ



| | |
|---|---|
| खंडोबाचे मंदिर | ---------------- |

**ख. महाराष्ट्रात कुठे काय बघता येईल? संवाद लिहू या. 'क' मधील ठिकाणांचाही वापर केला जाऊ शकतो. खाली आणखी काही ठिकाणे दिली आहेत व मदतीसाठी काही वाक्यांशही दिले आहेत.** **Write a dialogue using the following phrases.**

**ठिकाणे / पर्यटनस्थळे**

ऐतिहासिक रंकाळा तलाव, कोल्हापूर

जुन्नरचे लेण्याद्रीचे एकसंध बेसाल्ट खडकात

खोदलेले लेणे

बाबा आमटे यांचे आनंदवन

पाचगणी

राजा केळकर संग्रहालय, पुणे

कोकणचा समुद्रकिनारा आणि

सागरी किल्ले

शिवाय साडेतीनशे भव्य गड आणि किल्ले संपूर्ण महाराष्ट्रभर विखुरले आहेत.

राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये कोल्हापूर आणि विदर्भ या भागात खूप आहेत.

**वापरण्याजोगे वाक्यांश**

--- हे ठिकाण भेट देण्यासारखे / पाहण्यासारखे आहे

--- जाऊ शकतोस / शकतेस / शकता बसने / ट्रेनने जाता येते

--- या ठिकाणी उन्हाळ्यात / पावसाळ्यात / हिवाळ्यात जावे

--- मध्ये --- पहावे / करावे / खावे

--- येथील नैसर्गिक आश्चर्य सर्वश्रुत आहे

--- ऐतिहासिक माहिती / प्राचीन वस्तू / दगडातले कोरीव काम यासाठी हे ठिकाण प्रसिद्ध आहे

--- येथे राहण्याची / खाण्या-पिण्याची उत्तम सोय आहे / व्यवस्था होऊ शकते



## ५ परिपत्रक – Circular

### क. खालील परिपत्रक वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.

**Read and answer the questions.**

**संसाधने नियोजन विभाग**

एक्स१/नियोजन/२०१९-२० दिनांक – ०७/०१/२०२०
बँकेच्या सर्व शाखा आणि कार्यालयांसाठी

कर्मचारी बंधू/भगिनीं,

विषय : निष्क्रिय अनिवासी खाती

आपल्या बँकेमध्ये अनिवासी खातेदारांच्या ठेवींचे प्रमाण अतिशय कमी आहे आणि ते प्रमाण वाढवण्यासाठी खूप प्रयत्न करणे अतिशय गरजेचे आहे. हे सत्यच आहे की नवीन अनिवासी खातेदार मिळवणं हे फार अवघड आहे पण असलेल्या खातेदारांच्या ठेवींची स्थिती जास्त सुधारणे हे काम त्यामानाने सोपे आहे.

आमच्या निरीक्षणानुसार २२.५८ कोटींची जमा असलेल्या अनिवासी खातेदारांचे ८४४१ सीआयएफ निष्क्रिय आहेत.

अशा अनिवासी भारतीय खातेदारांची यादी यूएलसीमध्ये नियोजन या शीर्षकांतर्गत उपलब्ध करून दिली आहे. शाखांना अशी सूचना देण्यात येत आहे, की त्यांनी प्रत्येक अनिवासी खातेदाराशी संपर्क साधावा, त्यांच्याकडून नवी केवायसी ची कागदपत्रे भरून घ्यावीत आणि त्यांची खाती पुन्हा चालू करून घ्यावीत. या खातेदारांशी ई-मेलद्वारा किंवा त्यांच्या स्थानिक नातेवाईकांद्वारे संपर्क साधता येऊ शकतो.

अशा प्रत्येक खातेदाराशी निश्चितपणे संपर्क साधला जावा आणि प्रत्येक खात्यामध्ये व्यवहार चालू करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जावेत.

सर्व शाखांना सुचवण्यात येते, की अनिवासी खातेदारांच्या ठेवी जास्त सुदृढ व्हाव्यात, त्यात चांगली वाढ व्हावी यासाठी अनिवासी भारतीयांशी चर्चा करण्याच्या संधीचा फायदा घ्यावा.

निष्क्रिय खात्यांची यादी खालील लिंकवर उपलब्ध आहे.

ULC-BMNET-Planning-NR accounts-Inoperative accounts

आपले,

भास्कर चव्हाण
उप महाप्रबंधक
नियोजन विभाग

श्रीनिवास आपटे
महाप्रबंधक
नियोजन विभाग

**अ. खालील इंग्रजी शब्दांसाठी योग्य तो मराठी शब्द लिहू या आणि वरील परिपत्रकात अधोरेखित करू या.** **Write the correct Marathi word for the following words in English and underline them in the above paragraph.**

(सर्वतोपरी, निष्क्रिय, सुदृढ, अनिवासी, संधीचा फायदा घेणे, संपर्क साधणे)

१. inoperative – ------------------------------------

२. non-residential – ------------------------------------

३. to contact – ------------------------------------

४. in all respects – ------------------------------------

५. healthy – ------------------------------------

६. to grab an opportunity – ------------------------------------

**आ. एका वाक्यात उत्तरे लिहू या.** **Write the answers in one sentence.**

१. प्रस्तुत परिपत्रकाचा विषय काय आहे?

------------------------------------------------------------------------.

२. अनिवासी निष्क्रिय खाती सुरू करण्यासाठी कोणत्या सूचना देण्यात आल्या आहेत?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------.

३. परिपत्रकात आलेल्या विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या लिहू या.

------------------------------------------------------------------------.



दृष्टिक्षेप । **Overview**

| नामे | | |
|---|---|---|
| **तो (पु॰)** | **ती (स्त्री॰)** | **ते (नपुं॰)** |
| तो सण, ते-<br>festival with rituals<br>सणा-, सणां- | ती खाद्यसंस्कृती,-<br>food culture<br>खाद्यसंस्कृती- | ते पक्वान्न, ती पक्वान्ने / न्नं<br>sweet dish<br>पक्वान्ना-, पक्वान्नां- |
| तो उत्सव, ते-<br>festival<br>उत्सवा-, उत्सवां- | ती धमाल,-<br>enjoyment<br>धमाली- | ते कुटुंबीय (अ॰व॰)<br>family members<br>कुटुंबियां- |
| तो पदार्थ, ते-<br>cuisine<br>पदार्था-, पदार्थां- | त्या भेटीगाठी (अ॰व॰)<br>meeting on happy notes<br>भेटीगाठीं- | ते प्रोत्साहन, ती प्रोत्साहने / नं<br>motivation<br>प्रोत्साहना-, प्रोत्साहनां- |
| तो खेळ, ते-<br>games<br>खेळा-, खेळां- | ती रोषणाई,-<br>lighting<br>रोषणाई- | ते भांडण, ती भांडणे / णं<br>quarrel<br>भांडणा-, भांडणां- |
| तो प्रकार, ते-<br>type<br>प्रकारा-, प्रकारां- | ती कमतरता,-<br>absence<br>कमतरते- | ते मित्रत्व,-<br>friendliness<br>मित्रत्वा- |
| तो फराळ, ते-<br>special delicacies made for Diwali<br>फराळा-, फराळां- | ती उत्सुकता,-<br>curiosity<br>उत्सुकते- | ते शत्रुत्व,-<br>enmity<br>शत्रुत्वा- |
| तो तणाव, ते-<br>stress<br>तणावा-, तणावां- | ती कृतज्ञता,-<br>gratitude<br>कृतज्ञते- | ते शौर्य,-<br>bravery<br>शौर्या- |
| तो विषय, ते-<br>subject<br>विषया-, विषयां- | ती गोडी,-<br>sweetness<br>गोडी- | ते औदार्य,-<br>generosity<br>औदार्या- |
| तो प्रामाणिकपणा,-<br>honesty<br>प्रामाणिकपणा- | ती साखळी, त्या साखळ्या<br>chain<br>साखळी-, साखळ्यां- | ते गांभीर्य,-<br>seriousness<br>गांभीर्या- |
| तो दानशूरपणा,-<br>generosity<br>दानशूरपणा- | ती चालढकल,-<br>procrastinate<br>चालढकली- | ते धैर्य,-<br>courage<br>धैर्या- |

| | | |
|---|---|---|
| तो दयाळूपणा,-<br>kindness<br>दयाळूपणा- | ती टाळाटाळ,-<br>avoidance<br>टाळाटाळी- | ते साम्य, ती साम्ये / म्यं<br>similarity<br>साम्या-, साम्यां- |
| तो कष्टाळूपणा,-<br>hardworking nature<br>कष्टाळूपणा- | ती भरभराट,-<br>prosperity<br>भरभराटी- | ते आश्चर्य, ती आश्चर्ये / र्यं<br>surprise<br>आश्चर्या-, आश्चर्यां- |
| तो चमत्कारिकपणा,-<br>weirdness<br>चमत्कारिकपणा- | ती जाणीव, त्या जाणीवा<br>awareness<br>जाणीवे-, जाणीवां- | ते धोरण, ती धोरणे / णं<br>policy<br>धोरणा-, धोरणां- |
| तो ओलावा,-<br>moisture<br>ओलाव्या- | ती प्रसन्नता,-<br>happiness<br>प्रसन्नते- | ते समाधान,-<br>satisfaction / contentment<br>समाधाना- |
| तो भाग, ते-<br>area<br>भागा-, भागां- | ती गरिबी,-<br>poverty<br>गरिबी- | ते कष्ट (अ॰व॰)<br>hard work<br>कष्टां- |
| तो आत्मविश्वास,-<br>self confidence<br>आत्मविश्वासा- | ती आपुलकी,-<br>affection<br>आपुलकी- | ते वारूळ, ती वारुळे / ळं<br>snake hole<br>वारुळा-, वारुळां- |
| तो संदेश, ते-<br>message<br>संदेशा-, संदेशां- | ती इमानदारी,-<br>loyalty<br>इमानदारी- | ते तूप,-<br>indigenous ghee<br>तुपा- |
| तो खेळाडू, ते-<br>sportsman<br>खेळाडू-, खेळाडूं- | ती कीर्ती,-<br>fame<br>कीर्ती- | ते धान्य, ती धान्ये / न्यं<br>grains<br>धान्या-, धान्यां- |
| तो शेतकरी, ते शेतकरी<br>farmer<br>शेतकऱ्या-, शेतकऱ्यां- | ती नम्रता,-<br>modesty<br>नम्रते- | ते फळ, ती फळे / ळं<br>fruit<br>फळा-, फळां- |
| तो बैल, ते-<br>bull<br>बैला-, बैलां- | ती टिप्परघाई,-<br>haste<br>टिप्परघाई- | ते मडके / कं, ती मडकी<br>earthen pot<br>मडक्या-, मडक्यां- |
| तो साप, ते-<br>snake<br>सापा-, सापां- | ती उत्कंठा,-<br>excitement<br>उत्कंठे- | ते मीठ,-<br>salt<br>मिठा- |
| तो नमुना, ते नमुने<br>sample<br>नमुन्या-, नमुन्यां- | ती चव, त्या चवी<br>taste<br>चवी-, चवीं- | ते निवेदन, ती निवेदने / नं<br>narration<br>निवेदना-, निवेदनां- |

| | | |
|---|---|---|
| तो पतंग, ते-<br>kite<br>पतंगा-, पतंगां- | ती नासाडी,-<br>destruction<br>नासाडी- | ते गाठोडे / डं, ती गाठोडी<br>bundle<br>गाठोड्या-, गाठोड्यां- |
| तो फेटा, ते फेटे<br>headgear<br>फेट्या-, फेट्यां- | ती मिरवणूक, त्या मिरवणुका<br>procession<br>मिरवणुकी-, मिरवणुकां- | ते बोट, ती बोटे / टं<br>finger<br>बोटा-, बोटां |
| तो कुस्तीगीर, ते-<br>wrestler<br>कुस्तीगिरा-, कुस्तीगिरां- | ती प्रथा, त्या-<br>custom<br>प्रथे-, प्रथां- | ते नाक, ती नाके / कं<br>nose<br>नाका-, नाकां- |
| तो आवळा, ते आवळे<br>Indian gooseberry<br>आवळ्या-, आवळ्यां- | ती उलाढाल, त्या उलाढाली<br>turnover<br>उलाढाली-, उलाढालीं- | ते आकाश,-<br>sky<br>आकाशा- |
| तो ठसका,-<br>audacious, artistic manner<br>ठसक्या- | ती सुगी,-<br>harvest<br>सुगी- | ते उन्ह, ती उन्हे / न्हं<br>sunrays<br>उन्हा-, उन्हां- |
| तो थाट, ते-<br>glory<br>थाटा-, थाटां- | ती साखर, त्या साखऱ्या<br>sugar<br>साखरे-, साखऱ्यां- | ते शेत, ती शेते / तं<br>farm<br>शेता- शेतां- |
| तो डबा, ते डबे<br>container<br>डब्या-, डब्यां- | ती चिंच, त्या चिंचा<br>tamarind<br>चिंचे-, चिंचां- | ते पोते / तं, ती पोती<br>sack<br>पोत्या-, पोत्यां |
| तो दागिना, ते दागिने<br>jewellery / ornaments<br>दागिन्या-, दागिन्यां- | ती नृत्यांगना, त्या-<br>dance<br>नृत्यांगने-, नृत्यांगनां- | ते घर, ती घरे / रं<br>house<br>घरा-, घरां- |
| तो हात, ते-<br>hand<br>हाता-, हातां- | ती ऐट,-<br>poise, show<br>ऐटी- | ते पान, ती पाने / पानं<br>leaf<br>पाना-, पानां- |
| तो पाय, ते-<br>here used as ankles<br>पाया-, पायां- | ती टाळी, त्या टाळ्या<br>clap<br>टाळी-, टाळ्यां- | ते लेणे / णं, ती लेणी<br>cave<br>लेण्या-, लेण्यां- |
| तो गळा, ते गळे<br>neck<br>गळ्या-, गळ्यां- | ती पेटी, त्या पेट्या<br>box<br>पेटी-, पेट्यां- | ते राष्ट्रीय उद्यान,<br>ती राष्ट्रीय उद्याने / नं<br>national park<br>राष्ट्रीय उद्याना-, राष्ट्रीय उद्यानां- |
| तो ढग, ते-<br>cloud<br>ढगा-, ढगां- | ती समृद्धी,-<br>prosperity<br>समृद्धी- | ते अभयारण्य,<br>ती अभयारण्ये / ण्यं<br>reserve forest<br>अभयारण्या-, अभयारण्यां- |

| | | |
|---|---|---|
| तो खिसा, ते खिसे<br>pocket<br>खिशा-, खिशां- | ती अर्थव्यवस्था, त्या-<br>economy<br>अर्थव्यवस्थे-, अर्थव्यवस्थां- | ते नियोजन,-<br>planning<br>नियोजना- |
| तो प्रवास, ते-<br>travel<br>प्रवासा-, प्रवासां- | | |
| तो दुवा, ते दुवे<br>link<br>दुव्या-, दुव्यां- | | |
| तो पूर, ते-<br>flood<br>पुरा-, पुरां- | | |
| तो गड, ते-<br>mountain fort<br>गडा-, गडां- | | |
| तो किल्ला, ते किल्ले<br>fort<br>किल्ल्या-, किल्ल्यां- | | |

**क्रियापदे**

खुलणे – to bloom/ to enhance
भासणे – to feel
पकडणे – to catch
नांगरणे – to plough
पिकवणे – to grow/ to cultivate
रेलणे – to recline
उडवणे – to blow/ to play flying
सुधारणे – to improve
पटवणे – to convince
ओढणे – to pull

**क्रियाविशेषण / अव्यय**

वेळोवेळी – time to time
अवलंबून – depending
उपलब्ध – available
आजकाल – now a days
निश्चितपणे – surely
सर्वतोपरी – by all means

**नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या**

| नाम / इतर शब्द | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| टिप्परघाई उडणे | last moment rush |
| आमंत्रण देणे | to invite |
| डोक्यात / मनात फेर धरणे | repeatedly coming in mind |
| चैतन्य सळसळणे | rushing liveliness |
| उत्सुकता दाटणे | extreme curiosity |
| फायदा घेणे | to take advantage |
| ठप्प होणे | to cease |

**वाक्प्रचार**

तोंडाला पाणी सुटणे – to drool    कामाला लावणे – to make someone work

उत्सुकता शिगेला पोचणे – curiosity reaching at its peak

श्वास रोखून पाहणे – to forget to breathe due to excitement

पारावार न राहणे – surely    to have extreme feelings – by all means

# ८ कर्ज प्रकरणे










## चला, शिकू या...

- कर्ज योजनांची माहिती देणे
- कर्जांच्या विविध प्रकारांविषयी माहिती देणे
- 'ताना' प्रत्यय जोडून क्रियापदांचा वापर शिकणे
- तुलनावाचक शब्द शिकणे
- ऊन, हून विभक्तिप्रत्ययांचा वापर शिकणे
- पासून, पर्यंत, केव्हापासून, कुठपर्यंत यांचा वापर शिकणे

## १ कर्ज विभागाची ओळख

### क. संवाद वाचू या. Read.



साबळे : शिवकुमार, आपला ठेवी संकलन सप्ताह फारच यशस्वी झाला. तुमचं खास अभिनंदन! फार चांगलं काम केलंत. तुम्हाला माहीत आहे की ठेवी या आपली देणी म्हणजे liabilities आहेत आणि कर्जं आपली मालमत्ता म्हणजे assets आहेत. आता आपल्याकडे ठेवींचं प्रमाण खूप झालंय. रिझर्व बँकेने ठरवून दिलेल्या गुणोत्तरामध्ये, म्हणजे ratio मध्ये ठेवी आणि कर्ज असणं गरजेचं आहे. आपली देणी म्हणजेच liabilities भागवण्याइतकं आपलं उत्पन्न असायला हवं. म्हणून आता आपण कर्जांच्या योग्य वितरणाकडे लक्ष पुरवू या.

शिवकुमार : हो, सर.

साबळे : चला तर मग. शिवकुमार, आजपासून तुम्ही कर्ज विभागाचं काम बघा. तिथे रत्ना मोकाशी आहेत. त्यांच्या मदतीने काम शिकून घ्या. गहाणखत, सात बाराचा उतारा, पीक कर्ज या संकल्पना समजून घ्या.

शिवकुमार (कर्ज विभागात) : हो, मला आवडेल सर.

रत्ना मोकाशी : या, शिवकुमार. बरं झालं आलात. हे बघा, सध्या शेतीच्या पूरक उद्योगांसाठी एका नव्या योजनेची घोषणा सरकारने केली आहे. आणि लगेच त्याचं परिपत्रकही आलंय. आज दिवसभरात हे परिपत्रक वाचा. सगळे बारकावे समजून घ्या. उद्या आपल्या मुख्य कार्यालयात या योजनेचं प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्या कार्यशाळेला तुम्ही जावं असं मला वाटतं. कृषी महाविद्यालयातील दोन तज्ज्ञ आणि आपल्या बँकेचे एक अधिकारी कार्यशाळा घेणार आहेत. जाल का?

शिवकुमार : हो जाईन की.

रत्ना मोकाशी : छान. मग तुमचं परिपत्रक वाचून झालं की त्यावर आपण थोडी चर्चा करू म्हणजे उद्याचं प्रशिक्षण तुम्हाला सोपं जाईल.

**ख. कर्जविभागाची ओळख कोणत्या शब्दांनी होते ते उताऱ्यातील शब्द लिहू या.**

**Select and write the words pertaining to the loan department from the above dialogue.**

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**ग. प्रशिक्षणे, कार्यशाळा यांविषयी तुमचे काय मत आहे? खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करू या.**

**Discuss your opinion about trainings and workshops using the following points.**

- कशी – फायद्याची / कंटाळवाणी / वेळखाऊ
- काय शिकायला मिळते?
- वरचेवर आयोजित केली जावीत / केली जाऊ नयेत – का?
- तुमचा वैयक्तिक अनुभव

**घ. प्रशिक्षणाचा आढावा**



कार्यशाळेमध्ये शिवकुमारला खूपच शिकता आलं, अनेक नवीन गोष्टी कळल्या. कर्ज प्रकरण हाताळताना कोणत्या गोष्टी बघायच्या, कागदपत्रे घेताना काय काळजी घ्यायची हे प्रशिक्षणकर्त्यांनी छान सांगितलं. शेतकऱ्यांशी बोलताना काय पथ्यं पाळायची हेही त्यांनी आवर्जून सांगितलं. याशिवाय कर्ज मंजूर करताना, कर्जाची कागदपत्रे तयार करताना कोणत्या गोष्टींची पूर्तता करून घ्यायची तेही सांगितलं. त्यांचे फॉर्म भरताना, खातं उघडताना, आणि प्रत्यक्ष रक्कम वितरित करताना करायच्या गोष्टी त्यांनी बारकाईने समजावून दिल्या. साठ प्रशिक्षणार्थी आले होते. चहा पिताना, जेवताना, यासंबंधीच्या फिल्म्स बघताना सुद्धा या योजनेबद्दलच चर्चा चालू होत्या. सगळ्यांचे आपापल्या शाखांमधले विविध अनुभव ऐकताना मजा आली.

अ. वरच्या उताऱ्यात क्रियापदांची करताना, उघडताना, पिताना अशी रूपे दिसतात. ती कशी तयार होतात ते पाहू या. तक्ता पूर्ण करू या. **Complete the table.**

| क्रियापद<br>**Verb** | मूळ धातू<br>**Stem** | 'ताना' पद लावून झालेले रूप<br>**Stem + ताना** |
|---|---|---|
| १. हाताळणे | हाताळ | हाताळताना |
| २. घेणे | -------------------- | घेताना |
| ३. -------------------- | बोल | बोलताना |
| ४. करणे | कर | -------------------- |
| ५. भरणे | -------------------- | भरताना |
| ६. -------------------- | उघड | उघडताना |
| ७. पिणे | पी | -------------------- |
| ८. जेवणे | जेव | -------------------- |
| ९. बघणे | -------------------- | बघताना |
| १०. ऐकणे | ऐक | -------------------- |

**-ताना – Suffix**

- जेव्हा दोन क्रिया एकाच वेळी घडत आहेत किंवा घडत होत्या असे दाखवायचे असते तेव्हा 'ताना' कृदन्त वापरले जाते.
  (when two actions occur simultaneously the suffix -ताना is added to the stem of the main verb)

- उदा॰ जेवताना तो टी॰व्ही॰ बघतो.

  जेव → क्रिया १ बघ → क्रिया २

### आ. खालील क्रियापदांची 'ताना' लावून रूपे लिहू या.

**Write the stem of the verbs and the verb using the -ताना form.**

| क्रियापद | मूळ धातू | 'ताना' जोडून |
|---|---|---|
| खाणे | खा | खाताना |
| लिहिणे | लिह | लिहिताना |
| वाचणे | --------------------------- | --------------------------- |
| पसरवणे | --------------------------- | --------------------------- |
| भांडणे | --------------------------- | --------------------------- |
| हसणे | --------------------------- | --------------------------- |
| राहणे | --------------------------- | --------------------------- |
| सोडणे | --------------------------- | --------------------------- |
| होणे | --------------------------- | --------------------------- |

**घ. सराव. अधोरेखित शब्दांऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.** **Pattern drill.**

शिक्षक

जाणे
जाताना सांग मला.

निघणे
सोडणे
जेवणे
घेणे
फॉर्म भरणे

विद्यार्थी

जाताना सांग मला.



**ई. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.** **Pattern drill.**

शिक्षक

जेवणे – टी.व्ही. बघणे
मी जेवताना टी.व्ही. बघतो / बघते.

अभ्यास करणे – संगीत ऐकणे
अंघोळ करणे – गाणे
गाडी चालवणे – रेडिओ ऐकणे
प्रवास करणे – मोबाईलवर गेम खेळणे

विद्यार्थी

मी जेवताना टी.व्ही. बघतो / बघते.

**उ. रिकाम्या जागा भरू या.** **Fill in the blanks.**

(ओरडणे, बोलणे, ऐकणे, पसरवणे, चालणे, खाणे, शिकणे, लिहिणे, बसणे)

उदा. खुर्चीवर बसताना शिवकुमारने फाईल टेबलावर ठेवली.

अ. ------------------- बोलू नये.

आ. सूचना ------------------- कदमांच्या पेनातली रिफिल संपली.

इ. अफवा ------------------- परिणामांचा विचार केला पाहिजे.

ई. भाषा ------------------- अडचणी येतातच.

उ. साबळेसाहेब ------------------- शिवकुमार प्रथमच ऐकत होता.

ऊ. "आपण चांगला संवाद साधू शकतो", असं ग्राहकांशी ------------------- शिवकुमारला वाटलं.

ए. आपटेसाहेबांचे भाषण ------------------- प्रशांतचा फोन वाजला.

ॲ. रस्त्याने ------------------- शिवकुमारच्या डोक्यात कार्यशाळेचा विचार होता.

## २ प्रशिक्षणातून काय मिळाले?

**(-हून, -पेक्षा ...)**

**क. खालील संवाद वाचू या.** **Read.**



शिवकुमार : मोकाशीबाई कालचं प्रशिक्षण आणि कार्यशाळा फारच चांगली झाली. मागच्या पुणे शाखेच्या कार्यशाळेपेक्षाही चांगली झाली असं म्हणाले मुख्य प्रबंधक.

रत्ना मोकाशी : आपल्या सगळ्यांच्या मेहनतीचं चीज झालं म्हणजे.

शिवकुमार : हो तर. मोकाशीबाई, कोल्हापूरला पाण्याचा काही प्रश्न नाही. इतर जिल्ह्यांहून आपल्या जिल्ह्याची परिस्थिती खूपच चांगली आहे. शाखेमध्ये पूरक उद्योगांचे एकाहून एक चांगले पर्याय आपल्याला देता येतील.

रत्ना मोकाशी : कोणते पर्याय या भागात लागू करता येणार नाहीत ते सांगा बरं.

शिवकुमार : कापसावर प्रक्रिया करण्याचे उद्योग आपल्याकडे नाहीत, तसेच मेंढीपालन आणि लोकर प्रक्रिया उद्योगही इथे नाहीत. त्याचप्रमाणे फळे प्रक्रिया उद्योग अगदी मर्यादित भागातच देता येईल. तो उद्योग कोल्हापूरपेक्षा महाबळेश्वर, पाचगणी या भागात जास्तकरून आहे. आणि तो भाग सातारा प्रभागात येतो. पण याहून अनेक चांगले पर्याय आपल्या जिल्ह्यासाठी आहेत. दूध आणि दुधाचे पदार्थ, ऊस प्रक्रिया, निर्यात करण्याच्या गुणवत्तेचं मांसाचं उत्पादन, कुक्कुटपालन असे अनेक.

रत्ना मोकाशी : शिवकुमार, तुम्ही तर कमालच केली. माझ्यापेक्षा चांगला अभ्यास केलाय तुम्ही या भागाचा.

शिवकुमार : हो करावाच लागला. कारण शेतीसाठी आणि पूरक उद्योगांसाठी कर्ज देतानाचे धोके आम्हाला अनेक सिनिअर अधिकाऱ्यांनी सांगितले आहेत. अनेक गमतीजमतीही सांगितल्यात.

रत्ना मोकाशी : बँकेच्या सर्व विभागांमध्ये कर्जविभाग जरा जास्त जोखमीचा विभाग आहे.

**तुलनावाचक शब्द – Comparison words**

- दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये किंवा वस्तूंमध्ये तुलना करायची असल्यास -पेक्षा, -मध्ये,
- -हून, सर्वांत, सगळ्यांत या शब्दांचा वापर होतो. (-पेक्षा, -मध्ये, -हून, सर्वांत, सगळ्यांत are used to compare more than two persons of objects.)

उदा॰ आजच्यापेक्षा उद्या जास्त गर्दी होईल. गौरवहून किमया पटपट काम करते.

सर्व शाखांमध्ये आपल्या शाखेचा नफा जास्त आहे. शिवकुमार सर्वांत उंच आहे.

**ख. सराव.** **Pattern drill.**

**सोपं x कठीण : बचतविभाग – कर्जविभाग**

उदा. पहिला विद्यार्थी : मला कर्जविभागाहून बचतविभागात काम करणं सोपं वाटतं.

दुसरा विद्यार्थी : ओह्! पण मला कर्जविभागाहून बचतविभागात काम करणं कठीण वाटतं.

अ. मुतदठेव – क्लिअरिंग विभाग

आ. कर्जविभाग – कर्जवसुली विभाग

इ. बचत विभाग – रोखीचे व्यवहार विभाग

**ग. रिकाम्या जागी योग्य तो तुलनावाचक शब्द लिहू या.** **Fill in the blanks.**

| |
|---|
| पेक्षा (२)<br>सर्वांत<br>मध्ये (२) |

अ. संगणकाच्या जुन्या प्रणाली ---------------- नवीन सीबीएस प्रणालीच मला जास्त आवडते.

आ. मला बसने येण्या ---------------- पायी यायला आवडतं.

इ. हल्ली पीपीएफ अकाऊंट उघडायला ---------------- जास्त मागणी आहे.

ई. सर्व ग्राहकां ---------------- काळे जास्त चिकित्सक आहेत.

उ. सर्व कर्मचाऱ्यां ---------------- कदमच जास्त हुशार आहे.

**घ. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये बनवा.** **Make sentences as shown in the example.**

अ. एव्हरेस्ट – कांचनजंगा – किलीमांजारो (उंच)

कांचनजंगा हा पर्वत किलीमांजारोपेक्षा उंच आहे. पण एव्हरेस्ट सर्वांत उंच पर्वत आहे.

आ. ॲमेझॉन – मिसिसिपी – गंगा (मोठी)

----------------------------------------------------------------------

इ. सायकल – स्कूटर – चारचाकी गाडी (महाग)

----------------------------------------------

----------------------------------------------




ई. महाराष्ट्र – मध्य प्रदेश – गोवा (लहान)

----------------------------------------------

----------------------------------------------

उ. सोने – चांदी – तांबे (स्वस्त)

----------------------------------------------------------------------

### च. खालील उतारा ऐकू या आणि वाचू या. Listen and read.

मागच्या शनिवार आणि रविवारी मी कोल्हापूरहून साताऱ्याला गेलो होतो. साताऱ्याला मित्र असतो. मग तो आणि मी साताऱ्याहून महाबळेश्वरला आणि तिथून पुण्याला गेलो. बनारसहून पुणं खूपच मोठं शहर आहे. पण पुणे किंवा कोल्हापूरहून महाबळेश्वरची हवा जास्त छान आहे. महाबळेश्वरमधील वेगवेगळ्या ठिकाणांहून सह्याद्री पर्वत फार छान दिसतो. हिमालयाहून सह्याद्री लहान असला तरी त्याचे सौंदर्य वेगळेच आहे. सह्याद्री हिमालयाहून जास्त कणखर आणि भरभक्कम वाटतो.

अपेक्षेपेक्षा लवकरच दोन दिवस संपून गेले. पुण्याहून लगेच निघालो आणि कोल्हापूरला आलो. नेहमीपेक्षा ही सुट्टी मजेत गेली. पुढच्या शनिवार रविवारी यापेक्षा मजा येईल कारण आम्ही साताऱ्याच्या अजिंक्यताऱ्यावर जाणार आहोत. शहरात फिरण्यापेक्षा मला गडांवर जायला नक्कीच आवडेल.

**'हून' चा असाही वापर – another usage of 'हून'**

- दोन ठिकाणांमधील प्रवास / अंतर दाखवण्यासाठीही 'हून' आणि 'ऊन' या प्रत्ययाचा वापर होतो.

  उदा. मागच्या रविवारी मी कोल्हापूरहून साताऱ्याला गेलो होतो. (from one place to another)

  कोल्हापूर → साताऱ्याला

  आपल्या बँकेच्या गच्चीतून सूर्योदय फार छान दिसतो. (from)

### छ. उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवू या. (हिरव्या रंगातील शब्दांऐवजी इतर शब्दही वापरता येतील) Make sentences as shown in the example.

उदा. कोल्हापूर → सातारा

कोल्हापूरहून साताऱ्याला जाताना गाडी बंद पडली / उशीर झाला / वाटेत पाऊस लागला / मजा आली / कंटाळा आला.


अ. इथे → तिथे

आ. भारत → परदेश

इ. घर → बँक

ई. बनारस → कोल्हापूर

उ. स्टेशन → घर



## ३ बँकेतले किस्से

### क. वाचू या शिवकुमारने सांगितलेले किस्से. Read.

### अ. विहीर चोरीला गेली!



मराठवाड्यातल्या एका बँकेतला किस्सा आहे. एका शेतकऱ्याने विहीर बांधण्यासाठी कर्ज मागितलं. सगळी कागदपत्रं ठीकठाक. विहिरीचं गहाणखत (mortgage) केलं. पैसे घेऊन गेला. सहा महिने झाले तरी तो बँकेत फिरकलाच नाही. हा नवा अधिकारी त्याच्या घरी गेला.

अधिकारी : राम राम, कोंडिबा. बघू, कुठे बांधली विहीर? आता कर्जाचे हप्ते सुरू होतील. बँकेत या.

कोंडिबा : अहो, काय साहेब! मस्त विहीर बांधली, पण एक दिवस बघतो तर काय, ती चोरीला गेली की, हो!

शेतकरी हुशार. गहाणखत विहिरीचं केलंय हे त्याला चांगलंच माहीत होतं. आता विहीरच चोरीला गेली म्हटल्यावर बँक काय जप्त करणार!

### आ. कोकणातल्या शाखेतला एक किस्सा.

शेतकऱ्याने चौकशी केली की कोणत्या उद्योगांसाठी कर्ज घेता येईल? उद्योगांच्या यादीत 'कोकमांवर प्रक्रिया करणे' हा उद्योग होता. शेतकरी म्हणाला, "मला सोलांचा ज्यूस काढायचं आणि तो बाटलीबंद करण्याचं अशी दोन यंत्रं घ्यायचीयत."

अधिकारी, श्री॰ यादव : तुम्ही म्हणताय तो उद्योग बँकेच्या यादीत नाही.

शेतकरी : अहो, ते काय, साहेब, लिहिलंय ना यादीत! नाही काय म्हणता!

यादव ऐकायला तयार नव्हते. छोटी शाखा असल्यामुळे दुसरा कोणी अधिकारीही तिथे नव्हता. शेतकरी तालुक्याच्या गावाला गेला. तिथल्या शाखाप्रबंधकांना सगळा प्रकार सांगितला. त्यांचं नाव सावंत. सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. सावंत स्वत: शेतकऱ्याबरोबर आले आणि त्यांनी जेव्हा यादवांना सांगितलं, की सोलं म्हणजेच कोकमं, तेव्हा त्यांना पटलं. नाही तर त्या शेतकऱ्याला काही कर्ज मिळालं नसतं. अशी भाषेची गंमत असते.

### इ. बँकेत काम करताना असे काही अनुभव तुम्हालाही आले आहेत का? त्यातून काय शिकायला मिळाले? Discuss your experiences while working at the bank.

## ४ सुरुवातीपासून ... शेवटपर्यंत

### क. वाचू या. Read.

साबळे : मी कालपासून सगळ्या कर्जदारांचा आढावा घेतोय आणि कर्ज घेतल्यापासून ज्यांनी कर्जाचे हप्ते वेळेवर भरले आहेत, असे अनेक कर्जदार मला आढळले आहेत. पूरक उद्योगांसाठी कर्ज देण्याची योजना एक तारखेपासून सुरू होईल , ती एक महिन्यापर्यंत चालेल. मला वाटतं की आपण आपल्या या आधीच्या कर्जदारांना प्राधान्य द्यावं. नव्या अर्जदारांची मात्र नीट छाननी करावी लागेल. अगदी सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्यांचा पाठपुरावा करावा लागेल.

शिवकुमार : सर, कामाला कुठपासून सुरुवात करावी कळत नाहीये. असं करतो, दोन स्वतंत्र याद्या करतो. जुन्या, नियमित खातेदारांची एक आणि नव्या अर्जदारांची दुसरी.

साबळे : बरोबर. आत्तापासूनच कामाला लागा. पुढच्या आठवड्यापर्यंत याद्या तयार झाल्या पाहिजेत. माझ्या केबिनच्या नूतनीकरणाचं काम कधीपर्यंत चालणार आहे कुणास ठाऊक! केव्हापासून वाट पाहतोय मी ते संपण्याची. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सतत ती ठाकठोक आणि ड्रिलिंग मशीनचे आवाज! या आवाजांपासून लांब जाऊन काम करावं असं वाटतंय.

शिवकुमार : हो खरंय सर. पण उद्यापासून रंगकामाला सुरुवात होणार आहे. आज रात्रीपर्यंत आवाजाची सगळी कामं पूर्ण होतील. सर, आज तुमची गाडी दिसत नाही. बँकेत कसे आलात तुम्ही?

साबळे : आज मी घरापासून बँकेपर्यंत पायी आलो. गाडी दुरुस्तीला टाकली आहे. जाताना वर्कशॉपपर्यंत पायी जाईन. तिथून गाडी घेऊन घरी जाईन.

शिवकुमार : सर, आज माझ्याकडे दुचाकी आहे. मला सांगा, तुम्हाला कुठपर्यंत सोडू?

**पासून ... पर्यंत – from ... till**

- काळ किंवा अंतर दर्शवण्यासाठी या 'पासून', 'पर्यंत' या अव्ययांचा वापर करतात. ('पासून', 'पर्यंत' are used to show the tense and the distance)
  उदा. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सतत ठाकठोक चालली आहे. – काळ (tense)
  घरापासून बँकेपर्यंत पायी आलो. – अंतर (distance)
- ही अव्यये जोडीने वापरली जातात तसेच स्वतंत्रपणेही वापरली जातात.
  उदा. उद्यापासून रंगकामाला सुरुवात होईल. – स्वतंत्र वापर

**ख. खाली काही वाक्ये दिली आहेत. त्यातील शब्दांना योग्य प्रकारे ‘पासून’ आणि ‘पर्यंत’ ही अव्यये जोडू या.** **Fill in the blanks.**

उदा॰ १. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आमच्या बँकेच्या शाखा आहेत.
२. कधीपर्यंत संपेल तुमचं काम?

अ. “ही योजना केव्हा ----------------- लागू होणार आहे?”

आ. सकाळ ----------------- ती कॅशमधला फरक शोधत होती पण संध्याकाळ ----------------- तिला फरक मिळाला नाही.

इ. “मघा ----------------- मी बघतोय, तुम्ही फोनवरच बोलत आहात.”

ई. “पुढच्या आठवड्या ----------------- मला याद्या तयार हव्यात.”

उ. काऊंटर ----------------- दरवाजा ----------------- ग्राहकांची रांग लागली होती.

ऊ. एक डिसेंबर ----------------- ३१ डिसेंबर ----------------- कर्जाचे वाटप होणार आहे.

ए. दिवाळी कधी ----------------- आहे? लोक आत्ता -----------------च दिवाळीच्या तयारीला लागले आहेत.

ॲ. “जेधे, परवा ----------------- आज ----------------- तुम्ही किती कर्जवसुली केली ? मला स्टेटमेंट द्या.”

ऐ. “स्टेशन ----------------- बँके ----------------- मी दहा मिनिटांत पायी आलो.”

ओ. “दुपार ----------------- माझं डोकं दुखतंय. काही सुचत नाहीये.”

ऑ. “तुमची जमीन कुठ ----------------- कुठ ----------------- पसरलेली आहे?”

औ. “आमची जमीन इथ ----------------- तिथ ----------------- पसरलेली आहे.”



## ५ विविध प्रकारची कर्जे

**क. खाली कर्जांचे काही प्रकार दिले आहेत. चौकोनातील शब्द किंवा शब्दसमूह कोणत्या कर्जाशी संबंधित आहेत त्याचे वर्गीकरण करू या.** **Choose the correct words / phrases corresponding to the different kinds of loans given below.**

घर खरेदीसाठी कर्ज कुटुंबासाठी चारचाकी शेळी मेंढी पालन रिक्षा खरेदी
धंद्याच्या वाहतुकीसाठी गाडी वॉशिंग मशिन खरेदी मासिक हप्ता निर्यात
सात बाराचा उतारा ट्रक खरेदी फर्निचर खरेदी स्कूटर खरेदी स्टॉक स्टेटमेंट
पर्यटनासाठी / कारखान्यासाठी यंत्रसामग्री पॅकेजिंगचे साहित्य खरेदी शीतगृह
कम्प्लिशन सर्टिफिकेट खेळते / कार्यकारी भांडवल शेतजमीन सुटे भाग उत्पादन
फ्रीज खरेद पीक कर्ज कच्चा माल भागीदारी करार हातगाडी खरेदी
वार्षिक उलाढाल पगाराची स्लीप ठेवीवर कर्ज जामीनदार वाहन निर्मिती
लग्नासाठी कर्ज नफा तोटा ब्रेक इव्हन पॉईंट कर्ज फेडायची क्षमता
कुक्कुटपालन बायोगॅस प्लांट वनशेती फलोत्पादन कॅनिंग युनिट कच्चा माल
गहाण खत भांडवल टेम्पो खरेदी मागणी पत्र स्कूल व्हॅन वाहन परवाना
तयार माल बिगर शेतजमीन हत्यारे आणि साधने कर भरल्याची कागदपत्रे
दुकानाचा परवाना दुभती जनावरे खरेदी व्यवसाय परवाना आयकर विवरणपत्र



उदा. गृहकर्ज – घर खरेदीसाठी कर्ज, मासिक हप्ता, जामिनदार, आयकर विवरणपत्र

अ. फलोत्पादन - ----------------------------------------

----------------------------------------

आ. उपभोक्ता कर्ज - ----------------------------------------

----------------------------------------



इ. शेतीपूरक उद्योग - ----------------------------------------

----------------------------------------

ई. जमीनखरेदीसाठी कर्ज - ----------------------------------------

उ. व्यवसायासाठी / उद्योगासाठी कर्ज - ----------------------------------------

----------------------------------------

ऊ. वाहतूक साधनांसाठी कर्ज - ----------------------------------------

----------------------------------------

**ख. खालील संवाद ऐकू या व वाचू या व दोन-दोन विद्यार्थ्यांचे गट करून तुम्हाला हवा तो कर्जप्रकार निवडून अशा तऱ्हेचे संवाद सादर करू या.** **Role play.**

**साबळेंच्या सूचनेनुसार शिवकुमारला या महिन्यात काही ग्राहकांशी संपर्क साधून त्यांना विविध कर्जप्रकारांबद्दल माहिती द्यायची आहे.**

शिवकुमार : नमस्कार सर, मी एम.वी.सी. बँकेतून बोलतोय.

टेंभे : हं बोला.

शिवकुमार : तुम्ही आमच्या बँकेचे जुने ग्राहक. तुम्हाला गृहकर्ज, वैयक्तिक कर्ज, गाडीसाठी कर्ज अशी काही आवश्यकता आहे का हे विचारायला फोन केला.

टेंभे : मला जरा कार लोनबद्दल माहिती द्याल का?

शिवकुमार : दोन योजना आहेत बँकेच्या. तुम्ही तीन वर्षांसाठी कर्ज घेणार असाल तर व्याजाचा दर ९.७५% आहे आणि पाच वर्षांसाठी अर्धा टक्का जास्त आहे. त्याप्रमाणे तीन वर्षांसाठी तुम्हाला थोडा जास्त हप्ता भरावा लागेल. तुम्ही गाडीचं कोटेशन मला ई-मेल करा आणि त्याप्रमाणे मी हिशोब करून दोन्ही योजनांप्रमाणे हप्ता किती बसेल ते सांगतो.

## ६ कर्जविषयक बातम्या

**क. खालील बातम्यांना योग्य ते शीर्षक देऊ या.**

**Give the appropriate titles to the following passages.**

१. कर्जासाठी साध्या कागदावर हमी घेण्याचा बँकांना पर्याय

२. कर्ज घेता का, कर्ज

३. मुदतीपूर्वीच कर्जमुक्ती

४. पीक कर्जासाठी 'ना हरकत'ची गरज नाही

अ. ----------------------

नागपूर : पीक कर्जासाठी द्याव्या लागणाऱ्या बँकांच्या 'ना हरकत' प्रमाणपत्रातून शेतकऱ्यांना सूट देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पीक कर्ज घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात शेतकरी विविध बँकांकडे अर्ज करतात. अर्जासोबत त्यांना त्यांच्या भागातील सर्व बँकांचे 'ना हरकत' प्रमाणपत्र जोडावे लागते. सध्या देशभर कोरोनाची साथ आहे. या काळातही शेतकरी सामाजिक अंतराची अट न पाळता बँकांपुढे रांगा लावतात. ही बाब अतिशय गंभीर असून याची दखल घेत 'ना हरकत' प्रमाणपत्राची गरज नसल्याचे बँकांना कळवण्यात आले. त्याचा आधार घेऊन शासनानेही महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांना याबाबत शेतकऱ्यांना प्रमाणपत्राची सक्ती करू नये अशी विनंती केली आहे.

(लोकसत्ता)

आ. ------------------------

विदेशी गुंतवणूकदारांच्या सहकार्याने मुकेश अंबानी यांनी जिओमधील हिस्साविक्री करत भागधारकांना दिलेले कर्जमुक्तीचे आश्वासन मुदतीपूर्वीच पूर्ण केले आहे. मार्च २०२० अखेर १,६१,०३५ कोटी रुपयांचा कर्जभार असलेल्या रिलायन्सने गेल्या ५८ दिवसांत फेसबुकसारख्या आघाडीच्या १० विदेशी गुंतवणूकदारांना जिओ प्लॅटफॉर्म्स मधील जवळपास २५ टक्के हिस्सा विकला आहे. यामुळे समूहावरील कर्ज पूर्णत: फेडले जाणार आहे.

(लोकसत्ता, जून २०२०)

इ. ------------------------

**बँक अधिकाऱ्यांचा उद्योजकांमागे धोशा**

नेहमी कर्ज मिळवण्यासाठी कर्जदारांच्या रांगा बँकेमध्ये पाहायला मिळतात. परंतु टाळेबंदीमुळे जखडून गेलेले अर्थव्यवस्थेचे चाक रिझर्व बँकेने सवलती देऊनही अजून रुतलेलेच आहे. बँकांमधून एक लाख ९१ हजार २३० प्रकरणांमध्ये २५ हजार ५५७ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. तसेच बचत गट आणि कृषिपूरक उद्योगांसाठी दोन हजार ६५८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पण कर्ज घेण्यासाठी कर्जदारच बँकेत येत नाहीत असे चित्र आहे. त्यामुळे आता बँकाच उद्योजकांकडे जाऊन कर्ज घ्या असा धोशा लावत आहेत, कर्जदारांशी संपर्क साधून कर्ज घेण्याचा आग्रह करत आहेत.

(लोकसत्ता, मे २०२०)

ई. ------------------------

**टाळेबंदीत छोटी कर्जे मागणाऱ्या व्यावसायिकांना दिलासा मिळू शकतो.**

टाळेबंदीमुळे गेल्या दीड महिन्यापासून किरकोळ व्यापारी, विक्रेत्यांचे व्यवसाय अडचणीत आले असून अनेकांकडे खेळत्या भांडवलाचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे बँकांकडे छोटी कर्जे मागणाऱ्यांची संख्या वाढली आहे. मात्र बँका कर्ज घेऊ इच्छिणाऱ्यांकडून मुद्रांक (स्टँप पेपर) मागत आहेत. प्रत्यक्षात मुद्रांकांची विक्री थांबवण्यात आली असल्यामुळे अशा परिस्थितीत साध्या कागदावर घेतलेले हमीपत्रसुद्धा ग्राह्य धरले जाऊ शकेल. त्यामुळे टाळेबंदीत छोटी कर्जे मागणाऱ्या व्यावसायिकांना एकप्रकारे दिलासा मिळू शकतो, याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. टाळेबंदी उठल्यानंतर पुन्हा मुद्रांक उपलब्ध होतील. त्यानंतर मुद्रांकांवर कर्जदाराकडून हमी घेतली जाऊ शकते. बँकेकडे प्रत्येक अडचणीवर उपाय आहे. त्यासाठी कर्जदाराने बँकेकडे अधिकृत विचारणा केली किंवा पत्र दिले तर अडचणीतून मार्ग काढणे शक्य होते.

(लोकसत्ता, मे २०२०)

## ख. जोड्या जुळवू या. Match the columns.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | 'ना हरकत' प्रमाणपत्र | १. | not to follow the instruction |
| आ. | दिलासा मिळणे | २. | assurance |
| इ. | अट न पाळणे | ३. | to come to a halt / stop |
| ई. | दखल घेणे | ४. | guarantee letter |
| उ. | सक्ती करणे | ५. | to be valid |
| ऊ. | आश्वासन | ६. | running capital |
| ए. | टाळेबंदी | ७. | allied agricultural activity |
| ॲ. | चाक रुतलेले असणे | ८. | small, insignificant |
| ऐ. | कृषीपूरक | ९. | to compel |
| ओ. | धोशा लावणे | १०. | to get relief |
| ऑ. | किरकोळ | ११. | lockdown |
| औ. | खेळते भांडवल | १२. | to take cognizance |
| अं. | हमीपत्र | १३. | no objection certificate |
| अ:. | ग्राह्य धरणे | १४. | to chase somebody |

## ग. खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.

**Read the passage and answer the following questions.**



माणूस जेव्हा निसर्गात परिवर्तन करून एखादी वस्तू निर्माण करतो तेव्हा त्या वस्तूच्या मूल्यापेक्षा तिचा उत्पादनखर्च नेहमीच जास्त असतो. त्यामुळे अनेक प्रकारच्या क्लृप्त्या केल्याशिवाय नफा सुटत नाही. कारण निसर्गाला नफा मंजूर नाही. पण माणूस मात्र नफ्यासाठी नैसर्गिक संसाधनांचे शोषण करतो.

माणूस जेव्हा यंत्रशक्तीचा उपयोग करू लागला तेव्हा ही गोष्ट अधोरेखित झाली. यंत्रांचा व्यापारी उपयोग होण्यासाठी प्रचंड भांडवलाची गरज होती.

उत्पादन करणारी यंत्रे जसं १००० माणसांचं काम करतात तसंच त्यांना कच्चा माल, ऊर्जाही १००० माणसांची लागते. ही यंत्रे चालवणे फायदेशीर होण्यासाठी प्रचंड प्रमाणात उत्पादन करणे



अनिवार्य असते. त्याच्या कच्च्या मालासाठी अनेक निसर्ग निर्मित गोष्टींचा बळी द्यावा लागतो. भांडवल उभारावं लागतं. मग माणसाला पूर्वी सावकारांचं तर आता बँकांचं साहाय्य घ्यावं लागतं. ते साहाय्य म्हणजेच बँका देत असलेली विविध कर्जे. सर्व उत्पादन-साखळी कर्जावर आधारित असते. खाणीतून धातू, जंगलातून कोळसा, समुद्रातून खनिजतेल आणि पाण्यापासून वीज मिळवण्यासाठी, तसेच कारखान्यांना कच्चा माल, यंत्रसामग्री घेण्यासाठी, त्यानंतर व्यापाऱ्यांना झालेले उत्पादन बाजारात आणण्यासाठी आणि ग्राहकांनी ती उत्पादने खरेदी करावीत म्हणून ग्राहकांनाही कर्जे दिल्याशिवाय ही साखळी चालू राहत नाही. या साखळीत कळीची भूमिका कोणाची असेल तर ती असते बँकांची. अगदी जागतिक बँकेपासून ते तुमच्या गल्लीतल्या सहकारी बँकेपर्यंत सर्व बँका ही भूमिका बजावतात.

- प्रकाश गोळे यांच्या 'वास्तव' या पुस्तकातील संपादित अंश

अ. माणूस नैसर्गिक संसाधनांचे शोषण का करतो?

१. नफा मिळवण्यासाठी

२. निसर्गात परिवर्तन आणण्यासाठी

३. अनेक प्रकारच्या कृत्या करण्यासाठी

आ. माणसाला ------------------------ बँकांचं साहाय्य घ्यावं लागतं.

१. १००० माणसांच्या जेवणासाठी

२. भांडवल उभारण्यासाठी

३. निसर्गाचा बळी देण्यासाठी

इ. उत्पादन साखळीतील कोणतेही तीन महत्त्वाचे घटक लिहू या.

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

घ. वर सांगितलेल्या अर्थसाखळीचा एक भाग असलेल्या ग्राहकांना उत्पादने घेण्यासाठी उद्युक्त करणारी एक जाहिरात खाली दिली आहे. ती वाचू या. Read the advertisement below.

# जाहिरात

**वैयक्तिक कर्ज घ्या आणि कुठल्याही गोष्टीसाठी खर्च करा.**

गृहकर्ज किंवा वाहनकर्ज आपल्याला घर किंवा वाहन खरेदी करण्याची अनुमती देते.

पण वैयक्तिक कर्जाला हे बंधन नसते. तुम्ही ते तुमच्या गरजेनुसार कोणत्याही उद्देशासाठी वापरू शकता.

वैयक्तिक कर्ज आपण :

- विदेश पर्यटनासाठी वापरू शकता
- फ्रीज, टीव्ही किंवा लॅपटॉप अशा वस्तू खरेदी करू शकता
- लग्नसोहळा करू शकता
- घराचे नूतनीकरण करून घर आलिशान करू शकता

- आणखी काय पाहिजे?
- आम्ही तुम्हाला तुमच्या अगदी पहिल्या पगारापासूनसुद्धा कर्ज देतो.
- म्हणून त्वरा करा आणि आम्ही देत असलेल्या विविध प्रकारच्या वैयक्तिक कर्जांचे प्रकार पाहा आणि आजच कुठल्याही कर्जासाठी अर्ज करा.

अ. कर्जाच्या इतर प्रकारांसाठी आपणही अशा प्रकारच्या जाहिराती तयार करू या. Using the above example create advertisements for different kinds of loans.

दृष्टिक्षेप । **Overview**

| नामे | | |
|---|---|---|
| **तो (पु.)** | **ती (स्त्री.)** | **ते (नपुं.)** |
| तो बारकावा, ते बारकावे<br>minute thing<br>बारकाव्या-, बारकाव्यां- | ती मालमत्ता, त्या-<br>asset, property<br>मालमत्ते-, मालमत्तां- | ते संकलन, ती संकलने / नं<br>collection<br>संकलना-, संकलनां- |
| तो तज्ज्ञ, ते-<br>expert<br>तज्ज्ञा-, तज्ज्ञां- | ती संकल्पना, त्या-<br>concept<br>संकल्पने-, संकल्पनां- | ते उत्पन्न, ती उत्पन्ने / न्नं<br>income<br>उत्पना-, उत्पन्नां- |
| तो आढावा, ते आढावे<br>review<br>आढाव्या-, आढाव्यां- | ती घोषणा, त्या घोषणा<br>announcement<br>घोषणे-, घोषणां- | ते वितरण,-<br>distribution<br>वितरणा- |
| तो अनुभव, ते अनुभव<br>experience<br>अनुभवा-, अनुभवां- | ती कार्यशाळा, त्या-<br>workshop<br>कार्यशाळे-, कार्यशाळां- | ते गहाणखत, ती गहाणखते / तं<br>mortgage deed<br>गहाणखता-, गहाणखतां- |
| तो परिणाम, ते परिणाम<br>consequence<br>परिणामा-, परिणामां- | ती मेहनत, त्या मेहनती<br>hard work<br>मेहनती-, मेहनतीं- | ते पीककर्ज, ती पीककर्जे / र्जं<br>crop loan<br>पीककर्जा-, पीककर्जां- |
| तो पर्याय, ते-<br>alternative<br>पर्याया-, पर्यायां- | ती निर्यात, त्या निर्याती<br>export<br>निर्याती-, निर्यातीं- | ते प्रशिक्षण, ती प्रशिक्षणे / णं<br>training<br>प्रशिक्षणा-, प्रशिक्षणां- |
| तो कापूस,-<br>cotton<br>कापसा- | ती गम्मतजम्मत,<br>त्या गमतीजमती<br>enjoyable things<br>गमतीजमती-, गमतीजमतीं- | ते मेंढीपालन,-<br>sheep rearing<br>मेंढीपालना- |
| तो धोका, ते धोके<br>danger<br>धोक्या-, धोक्यां- | ती उत्पादन साखळी,<br>उत्पादन साखळ्या<br>production chain<br>उत्पादन साखळी-,<br>उत्पादन साखळ्यां- | ते कुक्कुटपालन,-<br>poultry<br>कुक्कुटपालना- |
| तो पाठपुरावा,-<br>follow-up<br>पाठपुराव्या- | ती तुलना, ते-<br>comparison<br>तुलने-, तुलनां- | ते प्राधान्य, ती प्राधान्ये / न्यं<br>priority<br>प्राधान्या- |
| तो दिलासा,-<br>relief<br>दिलाश्या- | ती अपेक्षा, त्या-<br>expectation<br>अपेक्षे-, अपेक्षां- | ते प्रमाणपत्र, ती प्रमाणपत्रे / त्रं<br>certificate<br>प्रमाणपत्रा-, प्रमाणपत्रां- |

| | | |
|---|---|---|
| तो आधार, ते आधार<br>support<br>आधारा-, आधारां- | ती विहीर, त्या विहिरी<br>well<br>विहिरी-, विहिरीं- | ते आश्वासन, ती आश्वासने / नं<br>assurance<br>आश्वासना-, आश्वासनां- |
| तो उद्योग, ते-<br>industry<br>उद्योगा-, उद्योगां- | ती यादी, त्या याद्या<br>list<br>यादी-, याद्यां- | ते संसाधन, ती संसाधने / नं<br>resource<br>संसाधना-, संसाधनां- |
| तो जिल्हा, ते जिल्हे<br>district<br>जिल्ह्या-, जिल्ह्यां- | ती चोरी, त्या चोऱ्या<br>theft<br>चोरी-, चोऱ्यां- | ते शोषण,-<br>exploitation<br>शोषणा- |
| तो प्रभाग, ते-<br>sub region<br>प्रभागा-, प्रभागां- | ती सक्ती,-<br>compulsion<br>सक्ती- | ते साहित्य,-<br>means<br>साहित्या- |
| तो धंदा, ते धंदे<br>business<br>धंद्या-, धंद्यां- | ती विनंती, त्या विनंत्या<br>request<br>विनंती-, विनंत्यां- | ते पर्यटन, ती पर्यटने / नं<br>tourism<br>पर्यटना-, पर्यटनां- |
| तो सुटा भाग, ते सुटे भाग<br>spare parts<br>सुट्या भागा-, सुट्या भागां- | ती प्रक्रिया, त्या-<br>process<br>प्रक्रिये-, प्रक्रियां- | ते खेळते / तं भांडवल,-<br>running capital<br>खेळत्या भांडवला- |
| तो सात बाराचा उतारा, सातबाराचे उतारे<br>७/१२ extract (a record / document to describe land ownership)<br>सातबाराच्या उताऱ्या-<br>सातबाराच्या उताऱ्यां- | ती अफवा, त्या-<br>rumour<br>अफवे-, अफवां- | ते शीतगृह, ती शीतगृहे / हं<br>cold storage<br>शीतगृहा-, शीतगृहां- |
| तो करार, ते-<br>agreement<br>करारा-, करारां- | ती दुरुस्ती, त्या दुरुस्त्या<br>repair<br>दुरुस्ती-, दुरुस्त्यां- | ते फलोत्पादन, ती फलोत्पादने / नं<br>fruit production<br>फलोत्पादना-, फलोत्पादनां- |
| तो नफा, ते नफे<br>profit<br>नफ्या-, नफ्यां- | ती वनशेती,-<br>forest cultivation<br>वनशेती- | ते मागणीपत्र, ती मागणीपत्रे / त्रं<br>demand letter<br>मागणीपत्रा-, मागणीपत्रां- |
| तो तोटा, ते तोटे<br>loss<br>तोट्या-, तोट्यां- | ती हातगाडी, त्या हातगाड्या<br>hand cart<br>हातगाडी-, हातगाड्यां- | ते हत्यार, ती हत्यारे / रं<br>tool<br>हत्यारा-, हत्यारां- |

| | | |
|---|---|---|
| तो परवाना, ते परवाने<br>license<br>परवान्या-, परवान्यां- | ती गुणवत्ता,-<br>quality<br>गुणवत्ते- | ते साधन, ती साधने / नं<br>tools, means<br>साधना-, साधनां- |
| तो कच्चा माल,-<br>raw material<br>कच्च्यामाला- | ती क्लृप्ती, त्या क्लृप्त्या<br>trick, clever idea<br>क्लृप्ती-, क्लृप्त्यां- | ते ना हरकत प्रमाणपत्र, प्रमाणपत्रे / त्रं<br>no objection certificate<br>प्रमाणपत्रा-, प्रमाणपत्रां- |
| तो पुरवठादार, ते-<br>supplier<br>पुरवठादारा-, पुरवठादारां- | | ते परिवर्तन, ती परिवर्तने / नं<br>transformation / change<br>परिवर्तना-, परिवर्तनां- |
| तो अभ्यास,-<br>study<br>अभ्यासा- | | |
| तो भागधारक, ते-<br>shareholder<br>भागधारका-, भागधारकां- | | |
| तो समूह, ते-<br>group<br>समूहा-, समूहां- | | |
| तो गुंतवणूकदार, ते-<br>investor<br>गुंतवणुकदारा-, गुंतवणुकदारां- | | |
| तो महसूल,-<br>revenue<br>महसुला- | | |
| तो सावकार, ते-<br>money lender<br>सावकारा-, सावकारां- | | |

**क्रियापदे**

संपणे – to get finished    टाकणे – to drop/ throw    घडणे – to happen
हसणे – to laugh    ओरडणे – to shout    सोडणे – to leave
फेडणे – to pay off    वाजणे – to sound    जोडणे – to join/ to attach
बांधणे – to build    भागवणे – to run / to pay off
पसरवणे – to spread    न फिरकणे – not to turn, avoid

### क्रियाविशेषण / अव्यय

आवर्जून – without fail   without fail – meticulously
प्रथमच – first time   पूर्णत: – totally   अधोरेखित – underlined

### विशेषण

यशस्वी – successful   पूरक – supplementary   नैसर्गिक – natural
भरभक्कम – strong   ठीकठाक – alright   विदेशी – foreign
कणखर – determined, firm

### नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या

| नाम / इतर शब्द | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| लक्ष पुरवणे | to pay attention |
| चीज होणे | to come to fruition |
| सुटका होणे | to get relieved |
| दखल घेणे | to take cognizance |
| पथ्य पाळणे | to follow the diet |
| कमाल करणे | to perform a great feat |
| यशस्वी होणे | to be successful |
| समजून घेणे | to understand |
| सोपे / सोपं जाणे | to become easy |
| लागू करणे / होणे | to make applicable/ to become applicable |
| जप्त करणे | to acquire forcefully |

# ९ कर्जवसुली







## चला, शिकू या...

- कर्जवसुलीचे महत्त्व सांगणे
- कर्जवसुलीतील अडचणींविषयी बोलणे
- कर्जवसुलीचे अनुभव सांगणे
- अनुत्पादित आणि बुडीत कर्जे यांतील फरक समजावून सांगणे
- ग्राहकांशी मराठीत संवाद साधण्याच्या फायद्यांविषयी बोलणे
- जेव्हा-तेव्हा, जसा-तसा
- क्रियापदांचा नामांसारखा वापर शिकणे
- शब्दयोगी पद '-मुळे' शिकणे
- पुरेसा-पुरता
- कदाचित–बहुधा–एकंदरीत–नक्की... या शब्दांचा वापर शिकणे
- क्रियापद : चालणे

## ९ कर्जवसुली

### जर-तर, जेव्हा-तेव्हा, जसा-तसा

> आजचा सुविचार
>
> "तुम्ही तुमच्या कर्जाची कर्जफेड वेळेवर केलीत तर तुमच्यासारख्या इतर गरजूंना बँक कर्ज देऊ शकेल."

**क. संवाद वाचू या.** **Read.**

शिवकुमार : या वाक्याचा अर्थ नीट कळला नाही.

साबळे : इकडे या शिवकुमार, मी सांगतो. असं बघा, आपल्या बँकेची कर्ज देण्याची आर्थिक क्षमता पूर्ण झाली आहे. आपल्याकडे असलेल्या ठेवींच्या योग्य त्या प्रमाणात आपण कर्जे दिली आहेत. आता जेव्हा नवीन कर्जदार येईल तेव्हा आपली क्षमता संपलेली असल्यामुळे आपण त्याला कर्ज देऊ शकणार नाही पण जर आधीच्या कर्जदारांनी त्यांच्या कर्जाची परतफेड केली तर आपण नव्या कर्जदारांची मागणी पुरवू शकू. परतफेड न केलेल्या कर्जाचं प्रमाणही वाढलं आहे. आपल्या मुख्य कार्यालयाकडून तसं खरमरीत पत्र आपल्याला आलंय.

शिवकुमार : आलं लक्षात, साबळेसाहेब. त्या वाक्याचा अर्थही कळला. पण कर्जदारांनी कर्जाची फेड केली पाहिजे ना!

साबळे : असं नुसतं म्हणून चालणार नाही. जेव्हा आपण विशेष प्रयत्न करू तेव्हाच कर्जवसुली होईल.

शिवकुमार : मी काय करू शकतो?

साबळे : तुम्हाला आता मराठी चांगलं बोलता येऊ लागलंय, तर रोजचं काम लवकर आवरून तुम्ही कर्जवसुलीसाठी प्रशांत जेध्यांना मदत करा.

शिवकुमार : मी ऐकलंय की कर्जवसुलीसाठी गेलं की लोकांच्या फार शिव्या खाव्या लागतात.

साबळे : पण तुम्हाला कुठे मराठीतल्या शिव्या माहीत आहेत? ते चांगलंच आहे. अहो, जसा प्रदेश तशी भाषा! बोलताना कर्जदाराला काहीही बोलू देत, तुम्ही त्याचा विचार करूच नका. तुमचा मुद्दा तुम्ही सोडू नका. आणि घाबरू नका. आपला शिपाई तुमच्याबरोबर असेल. तुम्ही जेव्हा एखाद्या शाखेचं काम पाहाल तेव्हा हा अनुभव तुमच्या उपयोगी पडेल. चला, कामाला लागा. जसं काम तसा परिणाम हे लक्षात ठेवा.

### जेव्हा-तेव्हा, जसं-तसं
### when ... then, like this ... like that

- जेव्हा-तेव्हा – ही कालदर्शक अव्यये आहेत. (temporal conjunctions)
  उदा. तुम्ही जेव्हा एखाद्या शाखेचं काम पाहाल तेव्हा हा अनुभव तुमच्या उपयोगी पडेल.
- जसं-तसं – ही विशेषणांची / क्रियाविशेषणांची जोडी आहे. नामाच्या लिंगाप्रमाणे जसं-तसं ची रूपे बदलतात. (जसं-तसं are used as adverbs and get inflected according to the gender of the noun. See below table.)
  उदा. जसा प्रदेश तशी भाषा!
  जसं काम तसा परिणाम

| एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|
| तो | ती | ते | ते | त्या | ती |
| प्रदेश | भाषा | काम | प्रदेश | भाषा | कामे / कामं |
| जसा | जशी | जसे / जसं | जसे | जशा | जशी |

**ख. जर-तर. उजळणी करू या. शब्द योग्य क्रमात लावून अर्थपूर्ण वाक्ये तयार करू या.**
**Bring the words in correct order.**

अ. करतील / कर्जवसुली / तर / करून / जर / तुम्ही / सत्कार / दाखवली / तुमचा

_______________________________________________

आ. तर / चांगली / ग्राहकांच्या / घेतल्या / कर्जवसुली / होईल / समजून / अडचणी / जास्त

_______________________________________________

इ. मराठी / जर / शकशील / संवाद / शिकलास / चांगला / ग्राहकांशी / साधू / तर

_______________________________________________

ई. कर्ज / असेल / घे / क्षमता / जर / खरेदीसाठी / यंत्र / कर्ज / तर / फेडण्याची

_______________________________________________

उ. बचत / जर / त्यांनी / कर्जाचा / असती / ते / भरू / शकले / तर / केली / हप्ता / असते

_______________________________________________

### ग. जेव्हा-तेव्हा

**खालच्या चौकटीत दिलेले वाक्यांश अर्थ समजून घेऊन 'जेव्हा-तेव्हा'ने जोडून वाक्ये तयार करू या.** **Make sentences.**

उदा. जेव्हा ग्राहकाला गरज होती तेव्हा त्याला बँकेकडून कर्ज मिळाले नाही.

१. काम संपले २. ग्राहकाला गरज होती. ३. शिवकुमारने संगणक बंद केला. ४. त्याच्या रागाचा पारा खाली आला. ५. बँक बंद झाली होती. ६. रिझर्व बँक रेपो दरात कपात करेल ७. कर्जवसुलीचे प्रमाण कमी झाले ८. श्रीमती बोराडेंनी फोन केला होता. ९. कॅशिअरलाच जबाबदार धरले जाते. १०. कर्जावरील व्याजाचे दर कमी झाले. ११. शिवकुमारने ग्राहकाची अडचण समजून घेतली. १२. त्याला बँकेकडून कर्ज मिळाले नाही. १३. कॅशला फरक लागतो. १४. शाखेचा नफा कमी झाला. १५. कर्जासाठी ग्राहकांची मागणी वाढली.
१६. बँका कमी दराने कर्जे देऊ शकतील.

**तुमच्या माहितीसाठी...**

**'जेव्हा'ची अदलाबदल**

जेव्हा ग्राहकाला गरज होती तेव्हा त्याला बँकेकडून कर्ज मिळाले नाही. हे वाक्य अजून किती प्रकारे लिहिता येईल ते पाहू या.

- ग्राहकाला जेव्हा गरज होती तेव्हा त्याला बँकेकडून कर्ज मिळाले नाही.
- ग्राहकाला गरज होती तेव्हा त्याला बँकेकडून कर्ज मिळाले नाही.

तसेच वाक्यामध्ये 'जेव्हा' शब्द न वापरूनही अर्थामध्ये फरक पडलेला नाही.

### घ. जसा-तसा, जशी-तशी, जसं-तसं

**रिकाम्या जागी 'जसे-तसे'चे योग्य रूप वापरू या.** **Fill in the blanks.**

अ. -------------- त्याचा स्वभाव, -------------- त्याचे वागणे

आ. चेकच्या मागे मी -------------- नोटा लिहिल्या आहेत.

-------------- नोटा मला द्या.

इ. मला केबिनचा रंग -------------- हवा होता,

-------------- ही रंगच्छटा नाही.

ई. -------------- हवामान असेल -------------- कपडे परिधान करावेत.



उ. मी -------------- सांगितलं आहे -------------- फॉर्म भरा.

ऊ. -------------- कर्जवसुलीचे काम सुरू झाले, -------------- कामाचा भार वाढला.

ए. कॉफी प्यायल्यावर -------------- तरतरी येते -------------- सरबत प्यायल्यावर येत नाही.

| तुमच्या माहितीसाठी... |
| --- |
| **'जसे-तसे'ची अदलाबदल** |
| कॉफी प्यायल्यावर जशी तरतरी येते तशी सरबत प्यायल्यावर येत नाही.<br>हे वाक्य अजून किती प्रकारे लिहिता येईल ते पाहू या.<br>• कॉफी प्यायल्यावर येते तशी तरतरी सरबत प्यायल्यावर येत नाही.<br>• कॉफी प्यायल्यावर तरतरी येते तशी सरबत प्यायल्यावर येत नाही.<br>तसेच या दोन्ही वाक्यांमध्ये 'जशी' शब्द न वापरूनही अर्थामध्ये फरक पडलेला नाही. |

## २ कर्जवसुलीसाठी लक्षात घ्यायच्या गोष्टी

**क. ऐकू या व त्यावरील प्रश्नांची उत्तरे देऊ या.** **Listen and answer the questions.**

**ख. चूक की बरोबर ते लिहू या.** **Write true or false.**

अ. बँकेने दिलेल्या कर्जाचा कर्जदाराकडून योग्य वापर केला गेला असल्याचे बँकेकडील पुरावे अभ्यासणे ही कर्जवसुलीच्या दृष्टीने एक महत्त्वाची गोष्ट आहे. ----------

आ. बँकेकडे असलेल्या कागदपत्रांच्या साहाय्याने कर्जदाराची कर्ज फेडण्याची इच्छा आहे की नाही याचा अंदाज बांधता येतो. ----------

इ. कर्ज फेडण्याची इच्छा नसलेल्या कर्जदाराच्या अडचणी समजून घ्याव्या लागतात. ----------

ई. कर्जदाराला एकदम कोर्टात खेचल्यामुळे बँकेची विश्वासार्हता कमी होऊ शकते. ----------

उ. कर्जवसुलीसाठी लक्षात घ्यायच्या कोणकोणत्या गोष्टी ध्वनिफितीत ऐकल्या? त्यांची यादी करू या.

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

ग. वरील उताऱ्यात काही नामे आली आहेत. ती आठवून रिकाम्या जागा भरू या. वाटल्यास ध्वनिफीत पुन्हा ऐकू शकतो. **Fill in the blanks.**

| नामे | | | |
|---|---|---|---|
| ए.व. | अ.व. | ए.व. | अ.व. |
| -------------- | त्या बारकाया | -------------- | त्या पद्धती |
| ती पत | - | -------------- | त्या उलाढाली |
| -------------- | ते आढावे | -------------- | त्या इच्छा |
| -------------- | ते अंदाज | ती अडचण | -------------- |
| -------------- | त्या मदती | -------------- | त्या गरजा |
| ती सवलत | -------------- | -------------- | ती धोरणे |
| तो विश्वास | - | | |

घ. खालील उताऱ्यामध्ये नामांची योग्य रूपे वापरून रिकाम्या जागा भरू या. **Fill in the blanks.**

(धांदल, अडचण, गोंधळ, विनंती, धीर, सवलत, समज, शांतता, आशा)

आजपासून कर्जवसुली सप्ताह आहे. शाखेत खूपच -------------- (अ) चालला आहे. व्याजात काही -------------- (आ) मिळेल या -------------- (इ) ने ग्राहकांनी बँकेमध्ये गर्दी केलेली आहे. साबळ्यांनी सगळ्यांना -------------- (ई) राखण्याची -------------- (उ) केली आहे. शिवकुमार कर्जदारांशी बोलत आहे. प्रत्येकाचे म्हणणे, -------------- (ऊ) ऐकून घेताना तो भांबावून गेला आहे. प्रत्येक ग्राहकाला समजावणे, प्रसंगी त्याला -------------- (ए) देणे, -------------- (ॲ) देणे, सविस्तर बोलण्यासाठी त्यांना पुन्हा बोलावणे हे करताना त्याची -------------- (ऐ) उडत आहे.

**च. खालील तक्त्यात विविध वाक्यांश दिले आहेत. त्यांचा वापर करून शिवकुमार आणि ग्राहक यांच्यातील अनेक संवाद लिहू या.** Make dialogues.

उदा.
शिवकुमार : हे बघा, तुमच्या कर्जाचे तीन हप्ते थकले आहेत. तीन दिवसांच्या आत निम्मी रक्कम तुम्ही भरायला हवी. नाहीतर कारवाई करावी लागेल.

इस्माईलभाई : माझ्या बीबीचं आजारपण झालं, त्यात फार खर्च झाला. पण पुढच्या आठवड्यात मी नक्की पैसे भरतो. मालाचे पैसे आले आहेत. एकरकमी भरून टाकतो.

| शिवकुमार | ग्राहक |
|---|---|
| तुमच्या खात्यातून हप्ते कापून घेण्यासाठी तुम्ही बँकेला या फॉर्मवर सूचना लिहून द्या ताबडतोब. | मी ज्या कंपनीला सुटे भाग पुरवत होतो, त्यांच्याशी केलेला करार संपला. |
| नव्या कराराची प्रत लगेच बँकेत आणून द्या. त्या कंपनीकडून तसं पत्र आणा. | साहेब, विसरलो मी मागच्या महिन्यात आणि आता सगळा पगार खर्च झालाय. |
| कंपनीकडून तुम्हाला लगेच चेक मिळणार आहे का? | नवा करार व्हायला दोन आठवडे लागतील. |
| गॅरंटी आहे ना तुमच्या यंत्राची? | तुम्ही गोडाऊनला सील ठोकलं साहेब? |
| तुम्हाला तीन पत्रं पाठवली तरी तुम्ही उत्तरही दिलं नाही. | माझ्या वर्कशॉपमधलं यंत्र बिघडलं, साहेब. |
| पण बँकेचे पैसे कधी भरणार? | कंपनीचा माणूस येऊन दुसरं यंत्र बसवणार आहे उद्या. |
| काही इलाज नाही, पैसे भरा, बँक सील तोडेल. | यंत्र चालू झालं की लगेच. |
| साखर कारखान्याचं सर्टिफिकेट आणा. | साहेब, उसाचे पैसे आले की लगेच भरतो. |
| तुमच्या परमिटची मुदत संपलीये. असा बेकायदेशीर धंदा करू नका. | माझा ट्रक बँकेच्या दारात आहे, मी कसा धंदा करू? |
| बँक काही करू शकत नाही अशा भ्रमात राहू नका. | ते सगळं करतो मी नियमित, पण मला थोडी मुदत द्या. |
| बँकेत येऊन बोलल्याशिवाय तुमच्या अडचणी आम्हाला कशा कळणार? | |

संवाद क्र. १

__________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

________________________________________

संवाद क्र. २

__________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

________________________________________

संवाद क्र. ३

__________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

________________________________________

संवाद क्र. ४

__________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

________________________________________

## ३ मराठीत संवाद साधण्याचे फायदे

**क. संवाद ऐकून खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.** **Listen and answer the questions.**

**ख. योग्य असलेल्या सर्व पर्यायांपुढे खूण करू या.** **Select the correct option.**

अ. संपतराव आणि कृष्णाजी कोल्हापुरे कशासाठी बँकेत आले आहेत?

१. शिवकुमारशी गप्पा मारायला.
२. साखर कारखान्यासंबंधी तक्रार करायला.
३. त्यांची अडचण सांगायला.
४. अडचण सोडवण्यासाठी मदत मागायला.

आ. संपतराव आणि कृष्णाजी कोण आहेत?

१. संपतराव बँकेचे खातेदार आहेत आणि कृष्णाजी त्यांचे मित्र आहेत.
२. दोघेही बँकेचे खातेदार आहेत.
३. कृष्णाजी खातेदार आहेत आणि संपतराव त्यांच्याबरोबर आले आहेत.
४. दोघे साखर कारखान्याचे कर्मचारी आहेत.

इ. शिवकुमारला पाहून कृष्णाजी कोल्हापुरेंना काय वाटले?

१. यांच्याशी हिंदीत बोलावे लागेल.
२. यांना मराठी समजणार नाही.
३. यांना आपली अडचण समजणार नाही.
४. यांना भेटून काय उपयोग होणार?
५. उगीच या संपतरावांच्या नादी लागलो, वेळ वाया जाणार नुसताच.

ई. शिवकुमारने त्यांची अडचण सोडवली का? कशी?

१. शिवकुमारला त्यांची अडचण काय आहे ते कळले नाही.
२. शिवकुमारने अडचण समजून घेतली आणि ती सोडवली.
३. त्याने साखर कारखान्याच्या मॅनेजर पवारांना विनंती केली.
४. त्याने साखर कारखान्याच्या मॅनेजर पवारांना सूचना केली.

उ. शिवकुमार कोल्हापुरेंची अडचण का सोडवू शकला?

१. बँकेचा अधिकारी असल्यामुळे शिवकुमारने पवारांना सूचना केली.

२. तो पवारांशी हिंदीत बोलला त्यामुळे पवारांनी त्याचे म्हणणे ऐकले.

३. शिवकुमारने अडचण समजून घेऊन मराठीत संवाद साधला म्हणून तो अडचण सोडवू शकला.

४. गोड बोलल्यामुळे शिवकुमारचे म्हणणे पवारांनी ऐकले.

ऊ. मराठीत संवाद साधल्यामुळे काय झाले?

१. शिवकुमारच्या मराठी बोलण्यातल्या चुका ऐकून सगळे हसले.

२. कोल्हापुरेंना वाटले की आपण उगाच यांना भेटायला आलो.

३. कोल्हापुरे आणि पवार दोघांनाही विश्वास वाटला आणि त्याच्या सूचनेला पवारांनी मान दिला.

४. शिवकुमारचे म्हणणे पवारांना कळले नाही.

ए. या प्रसंगात बँकेच्या बाबतीत कोणती गोष्ट घडली?

१. कृष्णाजींनी खुश होऊन बँकेत मोठी रक्कम ठेवली.

२. आपल्या दोन मित्रांसह खाती उघडल्यामुळे बँकेला चांगले ग्राहक मिळाले.

३. शिवकुमारला वेळोवेळी मराठी शिकवल्याचा फायदा झाला.

४. शिवकुमारसारखा चांगला अधिकारी बँकेला लाभला.

**ग. भाषा येत नसल्यामुळे तुम्ही कोणत्या प्रकारच्या अडचणींना तोंड दिले आहे? / कोणते विनोदी अनुभव तुम्हाला आले आहेत? वर्गात सांगू या.**

**Read and share if you have had such experiences.**



एक ज्योतिषी मुलाच्या वडिलांना सांगतो, "अहो, किती भाग्यवंत आहे तुमचा मुलगा काय सांगू ! अशी पत्रिका मी कधी बघितलीच नाही. अहो, मोठा झाल्या वर हा मुलगा लाखो काय करोडो रुपयांशी खेळेल, रोज नोटांच्या थप्प्या इकडच्या तिकडे करेल."
वडील अगदी खूश ! ज्योतिषी दक्षिणा घेऊन पसार !!!
पंधरा वर्षांनंतर ...

मुलगा बँकेत कॅशिअर आहे.


बँकेत एक ग्राहक : साहेब, मला चेक भरायचा आहे. कधीपर्यंत वटेल?

कर्मचारी : २ ते ३ दिवस लागतील सर.

ग्राहक : दोन्ही बँका समोरासमोर तर आहेत, मग एवढा उशीर का?

कर्मचारी : सर, सगळी प्रोसेस व्हावी लागते ना ! म्हणजे उदाहरणच द्यायचं झालं तर असं बघा, समजा हं, म्हणजे समजा हं !! तुम्ही स्मशानभूमीसमोरच अपघातात समजा मेलात तर घरी नेऊन, नातेवाईकांना बोलावून, सगळे सोपस्कार करून, तुम्हाला आंघोळ घालून स्मशानात आणतील की समोरच आहे म्हणून लगेचच आणतील जाळायला?

ग्राहक : अहो काय हे, ठीके, ठीके. व्हायचा तेव्हा होऊ द्या चेक क्लिअर.




| तुमच्या माहितीसाठी... |
| --- |
| **चेक वटणे** |
| चेक क्लिअर होणे म्हणजे चेक वटणे.<br>पण आता थोडे लोकच हे क्रियापद वापरतात. |

**घ. संवाद वाचू या.** **Read.**

शिवकुमार : साबळेसाहेब, हे एक शैक्षणिक कर्ज आपण राहुल अभ्यंकर यांना दिलं आहे. पाच वर्षं झालीत. त्या मुलाचा कोर्स तर आता संपलाय. मी फोन करायचा प्रयत्न करतोय, पण लाईन बिझी असल्यामुळे लागत नाहीये.

साबळे : हो, बरी आठवण केलीत. राहुलचे वडील अनिल अभ्यंकरांशी माझा परिचय आहे. आज जाऊ या त्यांच्याकडे.

(अभ्यंकरांच्या घरी)

अभ्यंकर : या या, साबळेसाहेब. इकडे कसं येणं केलंत?

साबळे : काय करणार? तुमचं येणं होत नाही बँकेत, मग आम्हालाच यावं लागलं. बरं, हे शिवकुमार शर्मा, आपल्याकडे नवीन अधिकारी आले आहेत.

शिवकुमार : नमस्कार, अभ्यंकरसाहेब. आज तुमच्या मुलाला, राहुलला भेटायला आलो आहोत आम्ही.



अभ्यंकर : का बरं? काय विशेष?

शिवकुमार : पाच वर्षांपूर्वी राहुलला जर्मनीला शिक्षणासाठी जाण्यासाठी तुम्ही कर्ज घेतलं होतं. २० लाख रुपये. झाला का त्याचा कोर्स पूर्ण? आला आहे का तो इथे, भारतात?

अभ्यंकर : अरे बापरे! खरंच की. मी तर हे बँकेचं देणं पार विसरूनच गेलो होतो. बसा, बसा, साबळेसाहेब, शिवकुमारसाहेब. राहुल, जरा बाहेर ये रे. हे बँकेचे अधिकारी आलेयत.

राहुल : नमस्कार.

शिवकुमार : तुम्ही ज्या कोर्ससाठी जर्मनीला गेला होतात तो पूर्ण झाला ना? तो पूर्ण झाल्याचं प्रमाणपत्र बँकेला सादर करणं आवश्यक आहे. सध्या काय करताय तुम्ही?

राहुल : मागच्या आठवड्यातच आलो मी आणि पुढच्या महिन्यापासून पुण्यातल्या एका जर्मन कंपनीमध्ये मला नोकरी लागली आहे.

शिवकुमार : तुमच्या शैक्षणिक कर्जाच्या परतफेडीची पद्धत तुम्हाला माहीत आहे ना?

राहुल : हो. आणि माफ करा. मी बँकेत येऊन कागदपत्रं देणं माझं कर्तव्य होतं. पण माझ्या पहिल्या पगारापासूनच मी हप्ते भरणं सुरू करीन.

शिवकुमार : तुम्ही वेळेवर कर्ज फेडणं महत्त्वाचं आहे. तरच दुसऱ्या गरजू विद्यार्थ्याला आम्ही कर्ज देऊ शकू.

राहुल : तुम्हाला पुन्हा त्रास होणार नाही. उद्याच मी बँकेत येऊन प्रमाणपत्रं देतो.

**वरील संवादातील लाल रंगाची क्रियापदाची रूपे बघा. त्याचा उपयोग नामासारखा केलेला आहे.**

**क्रियापदांचा नामांसारखा वापर Gerund**

- मूळ क्रियापदांचा मराठीतही नामांसारखा वापर केला जातो.

  उदा० मी बँकेत येऊन कागदपत्रं देणं माझं कर्तव्य होतं.
  त्याचे वागणे विचित्र वाटले का तुला?

- ही नामे नेहमी नपुंसकलिंगी असतात. → ते देणे / देणं, ते वागणे / वागणं

**च. सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या.** **Pattern drill.**

शिक्षक

सकाळी लवकर ऊठ.
सकाळी लवकर उठणं काही जमणार नाही मला.

रात्री वेळेवर झोप.
जरा शांतपणे बोल.
जरा धीर धरा.
कमी रागव.

विद्यार्थी

सकाळी लवकर उठणं काही जमणार नाही मला.



**छ. कंसातील योग्य क्रियापदे निवडून रिकाम्या जागा भरू या.** **Fill in the blanks.**

[होणं, करणं (२), समजणं, घालणं, म्हणणं, साधणं, देणं (२), घडवणं, येणं]

या कर्जवसुली सप्ताहामध्ये मुख्य प्रबंधकांनी आपल्या शाखेला भेट ------------- (अ) म्हणजे दुष्काळात तेरावा महिना येणं आहे. पण हे चांगलंच आहे. त्या निमित्ताने इतरही प्रश्न त्यांच्या कानावर ------------- (आ) होईल. अनुत्पादित कर्जे नियमित करण्यासाठी आम्ही केलेल्या उपाययोजना त्यांना ------------- (इ) महत्त्वाचं आहे. आत्तापर्यंत २५ कर्जदारांशी संपर्क -------------(ई) शक्य झालं आहे. बारा अनुत्पादित कर्जदारांना जास्तीची कर्जे देऊन कर्जफेड नियमित ------------- (उ) शक्य झालं आहे. सात कर्जखात्यांची पुनर्रचना करून कर्जाचा हप्ता कमी -------------(ऊ) , सहा जणांना त्यांच्या वैयक्तिक अडचणींचा विचार करून १-२ हप्ते उशिरा भरण्याची सवलत ---------- (ए) अशा उपायांमुळे बहुतेक अनुत्पादित कर्जे नियमित ------------- (ॲ) शक्य होईल. कर्जदारांची सकारात्मक मानसिकता ------------- (ऐ) आम्हाला शक्य झालं आहे, असं ------------- (ओ) काही चुकीचं ठरणार नाही.

एक म्हण
दुष्काळात तेरावा महिना
अडचणींमध्ये आणखी भर पडणे किंवा खूप कामांमध्ये आणखी एक काम करावे लागणे



## ४ अनुत्पादित कर्जे, बुडीत कर्जे

**क. वाचू या.** Read.

**अनुत्पादित कर्जे आणि बुडीत कर्जे यांत कोणता फरक आहे?**

अनुत्पादित कर्जे म्हणजे ज्या कर्जांपासून बँकेला मिळणारे उत्पन्न थांबले आहे अशी कर्जे. कर्जदार मुद्दलाचे हप्तेही भरत नाही आणि कर्जावरचे व्याजही भरत नाही. त्यामुळे बँकेचे खरे उत्पन्न दिसत नाही, कारण जे उत्पन्न – म्हणजे इथे कर्जावरचे व्याज – प्रत्यक्षात मिळत नाही; ते उत्पन्न म्हणून दाखवले जाते. या खात्यातील कर्जवसुलीसाठी नेटाने प्रयत्न करावे लागतात. कर्जे अनुत्पादित होण्यामागे कोणती कारणे असतात?

१. कर्जदाराला काहीतरी अडचण येणे.
२. त्याला दिलेले कर्ज अपुरे असणे. त्यातून त्याच्या धंद्याची गरज न भागणे, त्यामुळे धंद्यातून किंवा उद्योगातून पुरेशी कमाई / नफा न होणे.
३. धंदा-उद्योगावर काहीतरी संकट येणे.
४. कर्जदाराला परतफेडीची इच्छा नसणे.

पण बुडीत कर्जे म्हणजे जी कर्जे वसूल होण्याची काहीच शक्यता नाही अशी कर्जे.

१. कर्जदाराने दिवाळखोरी जाहीर करणे
२. कर्जदाराचा मृत्यू होणे
३. संकटामुळे उद्योगधंद्याची वाताहत होणे
४. कर्जदार दुसऱ्या देशात पळून जाणे

या कारणांमुळे कर्जवसुलीची शक्यता संपते आणि कर्जे बुडीत होतात.

अशी कर्जे बँकेच्या एकूण मालमत्तेतून काढून (write off) टाकावी लागतात. नाहीतर बँकेच्या ताळेबंदात मालमत्तेचे आणि नफ्याचे चुकीचे व दिशाभूल करणारे आकडे दिसत राहतात.

**ख. खाली कर्जाची विशिष्ट परिस्थिती दिली आहे. ती वाचून ते अनुत्पादित कर्ज आहे की बुडीत कर्ज आहे ते लिहा.** Read the situations and decide which type of loan is it.

अ. संकेतला बँकेने शैक्षणिक कर्ज दिले होते. त्याला नोकरी लागल्यावर त्याने कर्जाचा एक हप्ता भरला. पण नंतर मंदीमुळे त्याची नोकरी गेली. दुसरी नोकरी मिळेपर्यंत त्याने एक महिना हप्ता न भरण्याची सवलत मागितली.

हे -------------------- कर्ज आहे.

आ. वैशाली रत्नपारखींनी तीन महिने कर्जाचा हप्ता किंवा व्याज भरलेले नाही. बँकेने त्यांच्यावर कोर्टात दावा दाखल केला आहे.

हे -------------------- कर्ज आहे.

इ. कल्पक जाहिरात कंपनीने दिवाळखोरी जाहीर करण्यासाठी कोर्टात अर्ज केला आहे. कंपनीने तसे पत्र बँकेला सादर केले आहे. बँकेने त्यांना खेळत्या भांडवलासाठी पन्नास लाखाचे कर्ज दिलेले आहे.

हे कर्ज -------------------- होऊ शकेल.

ई. श्रीराम आवटे यांचा चार एकरातला ऊस जळाला. विमा कंपनीकडून विम्याची रक्कम मिळायला अजून दोन महिने लागतील. बँकेकडे तसे पत्र आले आहे.

हे कर्ज -------------------- आहे.

उ. विलास बारहाते गृहकर्जाचे हप्ते नियमित भरत होते पण पंचगंगेला आलेल्या पुरामध्ये घर वाहून गेले. विम्याचे नूतनीकरण त्यांनी वेळेवर केले नाही.

हे कर्ज -------------------- आहे.

## ५ कशामुळे – असल्यामुळे – माझ्यामुळे

**क. वाचू या.** **Read.**

या कर्जवसुलीच्या कामामुळे खूप थकायला होतंय. कर्जदारांनी वेळेवर हप्ते न भरल्यामुळे त्यांचं स्वत:चं, बँकेचं आणि समाजाचंही नुकसान होतं हे त्यांना कसं समजावायचं? यामुळे अर्थव्यवस्थेला खीळ बसते, प्रगती खुंटते. कर्ज न फेडण्याची ही मानसिकता कशामुळे निर्माण झाली आहे याचा खरोखर अभ्यासच करायला हवा. तसंच, काय उपाय केल्यामुळे ती बदलेल हाही विचार करायला हवा. सध्यातरी रोजच्या पायपिटीमुळे, कर्जदारांच्या तोंड लपवून पळ काढण्याच्या वृत्तीमुळे, त्यांनी दिलेल्या उलट उत्तरांमुळे मानसिक थकवाही जाणवतोय. फोन, ई-मेलमुळे तर काहीच फरक पडत नाही. प्रत्यक्ष भेटल्यामुळे थोडा फरक पडतो. कागदपत्रांवर सह्या मिळवता येतात. कागदपत्रे नियमित झाल्यामुळे कर्जदारावर जरा दबाव येतो. आज एका सामाजिक कार्यकर्त्याच्या दबावामुळे चार कर्जदारांनी कर्ज फेडण्याची तयारी दाखवली. कोणामुळे का होईना, कर्जवसुलीची टक्केवारी वाढली पाहिजे.

**शब्दयोगी पद '-मुळे' suffix**

- वरील उताऱ्यात मुळे या अव्ययाचा वापर नीट पाहा. नाम, क्रियापद आणि प्रश्नशब्द या सगळ्यांना हे अव्यय जोडता येते. (-मुळे can be added to nouns, verbs or question words to indicate the reason)
- ते जोडताना शब्दाचे सामान्यरूप होते. उदा. भरल्यामुळे आणि भरण्यामुळे

ख. खालील वाक्यांमध्ये '-मुळे' जोडून शब्दाचे योग्य रूप लिहून गाळलेल्या जागा भरू या.
**Fill in the blanks.**

उदा॰ प्रशांत जेधे बँकेत उशिरा (येणे) आल्यामुळे ग्राहकांना थांबावे लागले.

अ. ग्राहकाचे म्हणणे ऐकून (घेणे) ---------------------- ग्राहकाचा राग लगेच कमी होतो.

आ. (व्यायाम) ---------------------- दिवसभर माणूस उत्साही राहतो.

इ. योग्य (नियोजन) ---------------------- कर्ज वेळेवर फेडता येते.

ई. कर्जदाराशी मराठीत (बोलणे) ---------------------- नक्कीच फायदा होतो.

उ. पीक विम्याच्या आलेल्या (पैसे) ---------------------- धनाजी जाधवांनी बँकेचे कर्ज फेडले.

ऊ. साबळे इतके (कसा) ---------------------- चिडले आहेत?

ए. (कोण) ---------------------- कर्जवसुली इतकी झपाट्याने झाली?

ॲ. सूचना फलकावर लिहिलेल्या (सूचना-ए॰व॰) ---------------------- ग्राहकांना कर्जवसुली सप्ताहाची माहिती मिळाली.

ऐ. सतत (ओरडणे) ---------------------- कदमांचा घसा बसला.

## ६ पुरेसा-पुरता

क. संवाद वाचू या. **Read.**

संपतराव : जेधेसाहेब, या घरच्या कटकटींनी मी पुरता वैतागलोय. ते पुरेसं नाही म्हणून की काय, भागीदाराने फसवलं. मला अजून थोडा वेळ द्या.

प्रशांत जेधे : किती वेळ हवा तुम्हाला? संपतराव, पुरेसा वेळ दिला की तुम्हाला! तुमच्या अडचणी पुरेशा समजून घेतल्या. तुम्हाला पुरेशा सवलती दिल्या. अजून काय करायचं बँकेने तुमच्यासाठी?

संपतराव : हे बघा, मी माझ्यापुरतं सांगतो, की माझा वाटा मी उचलतो, पण भागीदाराचे पैसे मी नाही भरणार.

प्रशांत जेधे : संपतराव, आम्ही तुमच्या फर्मला कर्ज दिलंय. तुम्हाला आणि तुमच्या भागीदाराला वेगवेगळं नाही. ते भागीदाराचं काय ते तुम्ही बघून घ्या. तुम्हाला पुरते हप्ते भरावे लागतील. नाहीतर मग कोर्टातच आता भेटू. मी तर आता पुरता थकलोय तुम्हाला समजावून सांगून.

**पुरेसा, पुरता**
**adequate, enough, satisfactory, sufficient**

- हे शब्द नामाला किंवा क्रियापदाला जोडून लिहिले जातात तेव्हा नामाचे / क्रियापदाचे सामान्यरूप होते.

उदा॰ घर – घरापुरता पैसा

**लक्षात ठेवा :**

| (तो) पैसा | (ती) सवलत | (ते) कर्ज | (ते) पैसे | (त्या) सवलती | (ती) कर्जे |
|---|---|---|---|---|---|
| पुरेसा | पुरेशी | पुरेसे | पुरेसे | पुरेशा | पुरेशी |
| पुरता | पुरती | पुरते | पुरते | पुरत्या | पुरती |

**ख. खालील वाक्ये पुरेसा / पुरता ची योग्य रूपे वापरून पूर्ण करू या.** **Fill in the blanks.**

अ. तुमच्या खात्यात ---------------------- शिल्लक आहे. तुम्ही हप्ता भरू शकता.

आ. ---------------------- भूक लागल्यावर शिवकुमार उठला आणि जेवायला गेला.

इ. कर्जदारांशी वाद घालून तो ---------------------- थकला होता.

ई. "तुझ्या ---------------------- चहा माझ्या थर्मासमध्ये आहे. हवाय का?"

उ. ती तशीच आहे, स्वत: ---------------------- बघणारी.

ऊ. शेअर बाजारातील व्यवहारात तो ---------------------- फसला.

ए. हा फॉर्म (भरणे) ---------------------- पेन देता का जरा?

ॲ. हात धुवायला नाही पण (पिणे) ---------------------- पाणी आहे पिंपात.

ऐ. (रिक्षाभाडे) ---------------------- पैसे आहेत माझ्याकडे, पण खरेदी ------------------ नाहीत.

ओ. माझ्याकडे डेबिट कार्ड आहे ना! त्यात (गरज) ---------------------- पैसे आहेत.

## ७ बहुधा जमेल

**कदाचित - बहुधा - एकंदरीत - नक्की - बहुतेक - सामान्यतः - अशक्य - खात्रीने**

**क. संवाद वाचू या.** **Read.**




प्रशांत जेधे : काय मग संपतराव, तुम्ही कधी भरताय तुमचे थकलेले कर्जाचे हप्ते? उद्या भरताय?

संपतराव : उद्या तर अशक्य आहे पण बहुतेक एका आठवड्याने मला पैसे भरता येतील.

प्रशांत जेधे : बहुतेक नाही, नक्की सांगा.
मी उद्याच जाईन कदाचित आमच्या प्रादेशिक कार्यालयात, तेव्हा साहेबांना सांगतो तसं.

संपतराव : नक्की म्हणजे असं पाहा, पण बहुधा जमेल मला.

प्रशांत जेधे : तसं नाही, खात्रीने सांगा. अगदी पक्कं. तरच मी कायदेशीर कारवाई थांबवायला सांगतो.

संपतराव : कारवाई वगैरे काही करू नका. मी पुढच्या आठवड्यात भरतो.

प्रशांत जेधे : एकंदरीत पाहता तुमची मला खात्री वाटत नाही. तुम्ही काही नक्की दिवस सांगायला तयार नाही. सामान्यतः मी कर्जदारावर विश्वास ठेवतो, पण तुमच्या बोलण्याचा विश्वास वाटत नाही.

**कदाचित - बहुधा - एकंदरीत - नक्की - बहुतेक - सामान्यतः - अशक्य - खात्रीने**
**Words of estimative probability**

- संवादातील निळ्या रंगातील क्रियाविशेषणे ही एखाद्या गोष्टीची खात्री किती आहे हे सांगण्यासाठी वापरली जातात.
- या शब्दांचा वापर समोरचा माणूस कसा करतो, यावरून त्याच्या विषयीचा अंदाज बांधता येतो.




**ख. खालील उताऱ्यामध्ये ही क्रियाविशेषणे वापरून उतारा पूर्ण करू या.** **Fill in the blanks.**

आपले आई-वडील कोण असणार हे आपल्याला जन्म घेण्याआधी कळणं ---------------- (अ) असतं. मग आपण जसे मोठे होऊ लागतो तसे आजूबाजूचे लोक आपल्याला विचारू लागतात, की कोण होणार तू मोठेपणी? आई म्हणते, “हा सारखा तिकिटं जमा करत असतो. ---------------------- (आ) हा कंडक्टर होईल.” “छे! सारखा वेडावाकडा नाचत असतो. हा ---------------------- (इ) मायकेल जॅक्सन होणार.” बाबा म्हणतात, “नाही, नाही हा ---------------------- (ई) कुस्तीगीर होणार, कारण सारखा कपडे काढून गादीवर उड्या मारत असतो.” हे काकाचं मत. तर आजी म्हणते, “मी शंभर टक्के ---------------------- (उ) सांगते, की हा डॉक्टर होईल, कारण सारखा मला तपासून इंजेक्शन देत असतो.” असं सगळं अनिश्चित असतं. शेवटी फक्त एकच गोष्ट ---------------------- (ऊ) असते, काय सांगा बरं!

## ८ क्रियापद : चालणे

**क. खालील संवादांमध्ये 'चालणे' क्रियापदाची विविध रूपे वेगवेगळ्या अर्थाने आली आहेत. खाली दिलेल्या कुठल्या अर्थाला कुठला वाक्यांश जुळतो तो क्रमांक अर्थाच्या पुढे लिहू या.**

**Select the correct meaning of the verb चालणे from the passage.**

"काय चाललंय (१) काका तुमचं? रांगेत मध्येच घुसू नका. तुमचा नंबर आला की बोलावतील तुम्हाला. बसा जरा खुर्चीवर. चालत (२) आलात ना! चला, शिवकुमारसाहेब बोलावतायत तुम्हाला," कदम म्हणाले.

"शिवकुमारसाहेब, यंदा पीक अगदी कमी आलं बघा. घर चालवणं (३) कठीण झालंय. असं करा, पुढच्या महिन्यात मी पैसे भरतो, नक्की. त्यात तो पंप चालत (४) नाही आणि दुरुस्त करायलाही कुणी भेटत नाही," शेतकरी म्हणाला.

"ठीक आहे, यावेळी नका भरू हप्ता, पण असं सारखं नाही चालणार (५) काका. तुम्ही बँकेचे पैसे दिले नाहीत तर बँक कशी चालणार?" (६) "कदम, ते समोरचे दुकानदार आहेत ना, काळे, त्यांना बोलवा जरा बँकेत." शिवकुमारने सांगितले.

"नाही साहेब, दुकान बंद आहे. अहो काही चालत (७) नाही त्याचं दुकान." कदम म्हणाले.

किमया भराभरा आली आणि म्हणाली, "या नोटा चालत (८) नाहीत असं सांगितलं मी त्या ग्राहकाला तर ते ऐकतच नाहीत तुमच्याकडे पाठवते त्यांना. चालेल (९) ना?"

अ. काय करत आहात? - ------------------------------

आ. हरकत नाही ना? - ------------------------------

इ. घरखर्च भागवणं - ------------------------------

ई. घेता येत नाहीत, चलनात नाहीत. - ------------------------------

उ. धंदा होत नाही - ------------------------------

ऊ. चालणे. - ------------------------------

ए. सुरू होत नाही. - ------------------------------

ॲ. नेहमी परवानगी मिळणार नाही. - ------------------------------

ऐ. बँकेचे व्यवहार कसे होत राहणार? - ------------------------------

दृष्टिक्षेप । **Overview**

| नामे | | |
|---|---|---|
| **तो (पु.)** | **ती (स्त्री.)** | **ते (नपुं.)** |
| तो सुविचार, ते-<br>a noble thought<br>सुविचारा-, सुविचारां- | ती परतफेड, त्या-<br>pay off<br>परतफेडी-, परतफेडीं- | ते सरबत, ती सरबते / तं<br>syrup<br>सरबता-, सरबतां- |
| तो गरजू, ते-<br>needy<br>गरजू-, गरजूं- | ती शिवी, त्या शिव्या<br>abuse<br>शिवी-, शिव्यां- | ते आजारपण, ती आजारपणे / णं<br>illness<br>आजारपणा-, आजारपणां- |
| तो भार, -<br>load<br>भारा- | ती रंगच्छटा, त्या-<br>colour shade<br>रंगच्छटे-, रंगच्छटां- | ते कर्तव्य, ती कर्तव्ये / व्य<br>duty<br>कर्तव्या-, कर्तव्यां- |
| तो विश्वास, -<br>trust<br>विश्वासा- | ती तरतरी, -<br>refreshment<br>तरतरी- | ते निमित्त, ती निमित्ते / त्तं<br>reason, cause<br>निमित्ता-, निमितां- |
| तो माल, -<br>goods<br>माला- | ती बारकाई, त्या बारकाया<br>minute things<br>बारकाई-, बारकायां- | ते संकट, ती संकटे / टं<br>calamity<br>संकटा-, संकटां- |
| तो गुंता, ते गुंते<br>complication<br>गुंत्या-, गुंत्यां- | ती विश्वासार्हता,-<br>trustworthiness<br>विश्वासार्हते- | |
| तो अपघात, ते-<br>accident<br>अपघाता-, अपघातां- | ती कारवाई, त्या कारवाया<br>proceedings<br>कारवाई-, कारवायां- | |
| तो कारखाना, ते कारखाने<br>factory<br>कारखान्या-, कारखान्यां- | ती अडवणूक, -<br>obstruction<br>अडवणुकी- | |
| तो हंगाम, ते-<br>harvest season<br>हंगामा-, हंगामां- | ती करामत, त्या करामती<br>magic<br>करामती-, करामतीं- | |
| तो त्रास, ते-<br>trouble<br>त्रासा-, त्रासां- | ती पद्धत, त्या पद्धती<br>method, system<br>पद्धती-, पद्धतीं- | |

| | | |
|---|---|---|
| तो धीर, -<br>patience<br>धीरा- | ती दिवाळखोरी,-<br>bankruptcy<br>दिवाळखोरी- | |
| तो मृत्यू, ते-<br>death<br>मृत्यू-, मृत्यूं- | ती वाताहत, त्या वाताहती<br>devastation<br>वाताहती-, वाताहतीं- | |
| तो ताळेबंद, ते-<br>balance sheet<br>ताळेबंदा-, ताळेबंदां- | ती शक्यता, त्या-<br>possibility<br>शक्यते-, शक्यतां- | |
| तो राग, -<br>anger<br>रागा- | ती दिशाभूल, त्या-<br>mislead<br>दिशाभुली-, दिशाभुलीं- | |
| तो भ्रम, ते-<br>illusion<br>भ्रमा-, भ्रमां- | ती मानसिकता,-<br>mentality<br>मानसिकते- | |
| तो दुकानदार, ते-<br>shopkeeper<br>दुकानदारा-, दुकानदारां- | ती टक्केवारी, त्या टक्केवाऱ्या<br>percentage<br>टक्केवारी-, टक्केवाऱ्यां- | |
| तो इलाज, ते-<br>remedy<br>इलाजा-, इलाजां- | ती कटकट, त्या कटकटी<br>irritating chatter, nuisance<br>कटकटी-, कटकटीं- | |
| तो झपाटा, -<br>quickness, swiftness<br>झपाट्या- | ती उपाययोजना, त्या-<br>corrective measures<br>उपाययोजने-, उपाययोजनां- | |
| तो घसा, ते घसे<br>throat<br>घशा-, घशां- | ती पुनर्रचना, त्या-<br>restructuring<br>पुनर्रचने-, पुनर्रचनां- | |
| | ती मंदी, -<br>recession<br>मंदी- | |
| | ती परवानगी, त्या परवानग्या<br>permission<br>परवानगी-, परवानग्यां- | |
| | ती पायपीट, -<br>excessive walking<br>पायपिटी- | |

### क्रियापदे

कळणे – to understand　आवरणे – to finish, wind up　म्हणणे – to say
अभ्यासणे – to study　घडवणे – to build / to make with efforts
चिडणे – to get angry　वैतागणे – to get annoyed　फसवणे – to deceive
पुरवणे – to give, to supply　तपासणे – to examine

### क्रियाविशेषण / अव्यय

आवश्यक – necessary　सामान्यत: – generally　बहुधा, बहुतेक – probably
नियमित – as per norm / regular　एकंदरीत – taking into account
वेगवेगळे – separately　अशक्य – impossible　कदाचित – if possible
नेटाने – persistently

### विशेषण

खरमरीत – harsh　विशेष – special　बेकायदेशीर – illegal
अनुत्पादित – non-operative　बुडीत – non-recoverable



**नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या**

| नाम / इतर शब्द | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| मागणी पुरवणे | to fulfil a demand |
| शिव्या खाणे | to face abusive comments |
| रागाचा पारा खाली येणे | to cool down the anger |
| पळ काढणे | to run away from the unwanted situation |
| फरक लागणे (विशेषकरून बँकेच्या कामकाजासाठी) | not tallying |
| परिधान करणे | to wear |
| अंदाज लावणे, अंदाज बांधणे | to guess, making predictions |
| कोर्टात खेचणे | to take legal action |
| विश्वास गमावणे | to lose the trust |
| भांबावून जाणे | to get confused |
| धांदल उडणे | haste, hastiness |
| खीळ बसणे | to be blocked |
| प्रगती खुंटणे | to hinder progress |
| तोंड लपवणे | to hide oneself |
| वाटा उचलणे | to fulfil calculated self-contribution |
| कानावर घालणे | to inform of the happenings |
| फरक पडणे | to make a difference |

# १० निरोप









## चला, शिकू या...

- ताण आणि जोखीम यांविषयी बोलणे
- बँक कर्मचाऱ्यांना होणारे आजार व त्यांवरील उपायांबद्दल चर्चा करणे
- ग्राहकांचे नेहमीचे प्रश्न आणि अडचणी समजून घेऊन उपाय सुचवणे
- निरोप देणे
- -आयला, -आयचा प्रत्यय लावून क्रियापदांचा वापर शिकणे
- संख्यावाचक विशेषणे : एकेक, अनेक, दुप्पट, तिप्पट इ. शिकणे
- संबोधन शिकणे

## १ ताण आणि जोखीम

### क. वाचू या. Read.

### अ. संवाद

किमया : शिवकुमार सर, माझी कॅश जुळत नाहीये. मला ५००० रु. कमी लागतायत.

शिवकुमार : किमया, शांतपणे पुन्हा बघ. कुणाला जास्त दिले गेलेत का पैसे? जरा आठवायचा प्रयत्न कर. नेहमी तर तुझी कॅश पटकन टॅली होते.

साबळे : काय झालंय? आज कॅश विभागाचं काम का रेंगाळलंय? शिवकुमार चला लवकर, झोनल ऑफिसला जायची वेळ झाली.

किमया : सर मला ५००० रू. फरक लागलाय कॅशमध्ये. काय करायचं आता?

साबळे : हे बघा, शिवकुमारच्या मदतीने सगळे व्यवहार शोधायचा प्रयत्न करा. जर नाही सापडला फरक तर मग तुम्हाला भरायला लागतील पैसे. नाइलाज आहे. कॅश जुळवायला लागेल आणि मगच तिजोरीत टाकायला लागेल.

किमयाला जेवायलाही वेळ मिळाला नाही. जेवणाची सुट्टी न घेता किमया फरक शोधत होती पण काहीच उपयोग झाला नाही. शेवटी पैसे भरावे लागले. "पैसे वाचवायचा कितीही प्रयत्न केला तरी हे असे खर्च होतात." ती म्हणाली. तेव्हापासून काम करायचा तिला ताण येऊ लागला. तिच्या तब्येतीवर याचा काय परिणाम झाला असेल? ती गप्प राहू लागली.




### आ. आज वर्तमानपत्रात आलेली बातमी वाचू या. Read.

आज जागतिक आरोग्य दिन. त्यानिमित्ताने बँक कर्मचाऱ्यांचे सर्वेक्षण केले असता एका स्वयंसेवी संस्थेने नोंदवलेली निरीक्षणे अशी आहेत.
बँकेतील ८०% कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या ताणांखाली कामे करायला लागतात. नुसताच ताण नाही, तर बँकची रोकड हाताळणे, कर्जप्रकरणे हाताळणे, लॉकरची सुविधा हाताळणे अशा कामांमध्ये मोठी जोखीम पेलायला लागते. या जोखमीची जबाबदारी सर्वस्वी त्या संबंधित कर्मचाऱ्यांची असल्यामुळे तो ताण आणि ती जोखीम पेलताना त्यांच्या आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम दिसून येत आहेत. बैठे काम करण्यामुळेही कर्मचाऱ्यांना अनेक व्याधींना तोंड द्यायला लागत असल्याचा निष्कर्ष या सर्वेक्षणातून नोंदवला गेला आहे. बँक कर्मचाऱ्यांमध्ये पुढील व्याधी दिसून आल्या.
डोकेदुखी – ७०% कर्मचारी, पाठदुखी – ५५% कर्मचारी, कंबरदुखी आणि मणक्याचे आजार – ४०%, दातांचे विकार (दात रगडणे, दात खाणे) ७५% कर्मचारी, मधुमेह व रक्तदाब – ४५%, पोटाचे (पचनाचे) विकार – ५०% कर्मचारी.

ख. वरील संवादामध्ये आणि बातमीमध्ये लाल आणि निळ्या रंगातील क्रियापदाची रूपे लक्ष देऊन वाचू या व खालील तक्ता पूर्ण करू या. **Complete the table.**

| मूळ धातू + आयचा<br>stem + आयचा | क्रियापदाचे रूप | मूळ धातू + आयला<br>stem + आयला | क्रियापदाचे रूप |
|---|---|---|---|
| आठव + आयचा | आठवायचा | भर + आयला | भरायला |
| शोध + आयचा | शोधायचा | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**आयचा, आयला**

आयचा – of    आयला – for



**ग. कर्मचाऱ्यांशी संवाद साधला असता या व्याधींची कारणे खालीलप्रमाणे आढळली.**

- सतत एका जागी बसून काम करणे (to continuously sit and work in one place)
- रोकड हाताळतानाच्या जोखमीचा ताण (stress of handling cash)
- खोट्या नोटा स्वीकारल्या जाण्याची धास्ती (burden of accepting counterfeit notes)
- वेळेवर जेवण न करता येणे, पाणी न पिणे (not able to have lunch or drink water on time)
- काळजीपूर्वक कागदपत्रे घेऊनही त्यात त्रुटी राहण्याची जोखीम (risk of mistakes despite meticulously checking the documents)
- कागदपत्रांच्या सत्यतेची जोखीम (responsibility of checking the credibility of documents)
- बँकेत सतत गर्दी असल्यामुळे येणारा दबाव आणि कामाचा ताण (stress and work pressure with regards to constant overcrowding at the bank)
- अंतर्गत स्पर्धा (internal competition)
- गैरसोयीच्या बदल्या (inconvenient transfers)
- शरीरधर्मासाठी वेळेवर जागेवरून उठता न येणे (unable to move from the work station in order to discharge physiological needs)
- कॅशमधील फरक भरावा लागणे यामुळे येणारी निराशा (dismay to repay the difference in cash) कर्जप्रकरणाच्या अपयशाला तोंड द्यावे लागणे यामुळे येणारी निराशा (frustration of being unable to recover the loan from the customer)

**अ. बँकेतील नोकरी, जोखीम आणि ताण यावरचे तुमचे मत काय आहे?**

**आ. तुम्ही कधी अशा प्रकारचा ताण अनुभवला आहे का? त्याची कारणे काय होती? त्या ताणाचा तुमच्या शारीरिक, मानसिक आरोग्यावर काय व कसा परिणाम झाला?**

**च. खाली अवयवांची चित्रे दिली आहेत; चित्रात दाखवलेला त्रास कोणता आहे? चित्राखाली त्याचे नाव लिहून वर्णन करू या.** **Which health problem is described in the picture? Choose the correct word from the brackets.**

(कंबरदुखी, मधुमेह, पाठदुखी, मानदुखी, दातांचे विकार, डोकेदुखी, मनगट दुखणे / आखडणे, उच्च रक्तदाब, हृदयविकार)

अ

______________________

आ

______________________

इ

______________________

ई

______________________

उ

______________________

ऊ

______________________

ए

______________________

ॲ

______________________

ऐ

______________________

**छ. काही कर्मचाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या तेव्हा कर्मचाऱ्यांनी अतिशय मोकळेपणाने त्यांच्या कामातील ताणाबद्दल आणि पत्करावा लागणाऱ्या जोखमीबद्दल अनेक प्रत्यक्ष अनुभव सांगितले.**

**Read.**

श्री. जेधे

पूर्वी प्रत्येक बँकेमध्ये, इतकंच काय तर बँकेच्या प्रत्येक शाखेमध्येसुद्धा संगणकाची वेगळी प्रणाली असायची. त्यामुळे एका शाखेतून दुसऱ्या शाखेत बदली झाल्यावर त्या नव्या शाखेत कुठली संगणक प्रणाली असेल अशी धास्ती असायची. कारण ती प्रणाली माहीत होण्याआधीच कामाला सुरुवात करावी लागायची. अशावेळी रोकड हाताळताना, चेक पास करताना काही चुकलं तर ते लक्षात यायचं नाही. मग सगळ्या बँकांमध्ये एकवाक्यता असावी, यासाठी CBS प्रणाली आली. पण आधीच्या प्रणालीतून या नव्या प्रणालीमध्ये जाताना खूप धोकादायक प्रसंगांना तोंड द्यावे लागले. अनेकांना आर्थिक भुर्दंड सोसावे लागले. अनेक महिला आजारी पडल्या तर काहींनी नोकरीचे राजीनामे दिले. कॅश न जुळल्यामुळे अनेकांना त्या काळात पैशांची भरपाई करावी लागली. सगळ्यांना अनेक दिवस रात्रीपर्यंत काम करावे लागले. याचं मुख्य कारण म्हणजे ज्यांना बँकिंगचे ज्ञान आहे त्यांना संगणकाचे ज्ञान नाही आणि ज्यांना संगणक प्रणालीची चांगली माहिती आहे त्यांना बँकिंगची अजिबात माहिती नाही. त्यामुळे बँक कर्मचाऱ्यांच्या शंका, अडचणी संगणक तंत्रज्ञ समजू शकत नसत.

मनीषा काटदरे

पूर्वी बँकेत इतकी गर्दी असायची, की चार-पाच तासांतून एकदाही जागेवरून उठता यायचं नाही. या सगळ्याचे दुष्परिणाम इतके झाले, की अनेक व्याधीं जडल्या. काही महिला कर्मचाऱ्यांनी राजीनामे दिले. आताही गर्दी असतेच. पूर्वीपेक्षा थोडा फरक पडला आहे.

उषा गायकवाड

काउंटर इतके अरुंद असतात, की ग्राहकांशी फार जवळून संपर्क येतो. त्यामुळे अनेक रोगांचा संसर्ग होण्याची शक्यता वाढते. या कोरोना विषाणूच्या साथीमध्ये तर ही गोष्ट प्रकर्षाने दिसून आली. नोटा हाताळणं म्हणजे असंख्य विषाणूंचा क्षणोक्षणी सामना करणं आहे.

मंगला सातपुते

मला तर वेळेवर डबा खाल्ल्याचं कधी आठवतच नाही. त्यामुळे डोकेदुखी सतत मागे लागलेलीच आहे.

सुभाष कदम

कितीतरी वेळा मी चहावरच भूक भागवतो. मला तर रोकड टॅली होऊन तिजोरीत गेल्याशिवाय हलताच येत नाही. आणि डॉक्टर तर सांगतात की आधी चहा बंद करा. आता तुम्हीच सांगा, काय करायचं?

शिवकुमार

जेधे सरांच्या अनुभवांची मी कल्पनाही करू शकत नाही, कारण मी नवीनच आहे. पण माझा थोड्या दिवसांमधला अनुभव सांगतो. कर्ज प्रकरणांच्या एवढ्या थप्प्या लागलेल्या असतात, की कागदपत्रांची पुरेशी छाननी करायला वेळच मिळत नाही. मग कर्ज वितरणामध्ये काही त्रुटी राहिल्या, तर त्याची जबाबदारी अधिकाऱ्यावर येते. तो ताण झेलतच काम करावं लागतं.

**ज. सराव. अशा विविध प्रकारच्या ताणांखाली काम करणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांना तुम्ही काय सल्ला द्याल?** What suggestion would you give to bank employees working under different kinds of stress?

उदा० व्यवस्थापनाला सांगायला हवं

| काय करायला हवं | काय करू नये |
|---|---|
| व्यवस्थापनाला सांगणे | संकोच करणे |
| व्यायामासाठी वेळ देणे | किरकोळ तक्रारींकडे दुर्लक्ष करणे |
| डॉक्टरांचा सल्ला घेणे | ग्राहकांवर चिडणे |
| संकोच न करता उठणे | |
| वेळेवर जेवणे | |
| पाणी भरपूर पिणे | |

**झ. वरील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करू या.** Discuss taking help of the dos and don'ts from the above table. You may use the following phrases.

- मला वाटतं ...
- ते झालंच, पण ...
- म्हटलं तर ...
- मला हे पटत नाही ...
- मी या मताचा / मताची आहे की ...
- तसं असलं तरी ...
- माझं असं म्हणणं आहे की ...
- मला विचाराल तर
- वेगळा विचार केला
- माझ्या मते ...
- ते ठीक आहे, पण ...
- तुमचं बरोबर आहे,

ट. आता या दृष्टीने बँक कर्मचारी संघटना, बँक व्यवस्थापन आणि जागरुक कर्मचारीवर्ग यांनी योग्य पावले उचलायला सुरुवात केल्यामुळे बराच फरक पडला आहे. ती पावले कोणती ते पाहू. **Have a look at some measures taken by bank employees' unions, management and employees themselves.**

योजलेल्या उपायांमुळे कोणता फरक पडला असेल ते लिहू या. **Write what difference such measures would have made.**

| केलेली उपाययोजना<br>**Measures taken** | काय सुधारणा झाली?<br>**What change did it bring?** |
|---|---|
| अ. बँक सुरू होण्याआधी अर्धा तास व्यायाम आणि योग वर्ग प्रत्येक शाखेमध्ये सुरू केले आहेत. | |
| आ. वेळेवर जेवता यावे यासाठी जेवणाच्या वेगवेगळ्या वेळा ठरवून दिल्या आहेत. | |
| इ. प्रत्येकाने दर अर्ध्या तासाने उठून पाच मिनिटांची विश्रांती घ्यायची आणि त्या वेळात पाणी प्यायचे हा नियम सुरू केला आहे. | |
| ई. नोटा मोजण्यासाठी जास्त आधुनिक आणि कार्यक्षम यंत्रे मागवली आहेत. | |
| उ. कर्ज प्रकरणांच्या कागदपत्रांची छाननी करण्यासाठी झोनल ऑफिसमध्ये स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. | |
| ऊ. हात धुण्यासाठी जास्त वॉश बेसिन्सची आणि साबणाची व्यवस्था केली आहे. | |
| ए. ग्राहकांना रांग लावण्यासाठी मार्ग आखून दिला आहे. | |
| ॲ. ज्याचे काम आहे त्याच व्यक्तीस बँकेत प्रवेश – हा नियम अमलात आणायला सुरुवात केली आहे. | |

## २ ग्राहकांचे नेहमीचे प्रश्न

क. ग्राहक खालील प्रश्न नेहमी विचारतात. त्या प्रश्नांना शिवकुमार कोणती उत्तरे देईल? खाली दिलेल्या उत्तरातून योग्य उत्तर निवडून संबंधित प्रश्नापुढे उत्तराचा क्रमांक लिहू या.
**Combine the questions and answers.**

**प्रश्न :**

१ मला माझ्या ठेवीवर दरमहा व्याज मिळाले पाहिजे.

२ मी हप्ता भरायचा विसरतो.

३ माझ्या खात्यात ही दंडाची रक्कम का डेबिट टाकली आहे?

४ मला बँकेत यायला अजिबात वेळ मिळत नाही.

५ मला हिंदी आणि इंग्रजीतला फॉर्म वाचता येत नाही.

६ माझ्या ठेवीवरचे व्याज परस्पर माझ्या बचत खात्यात जमा करा.

७ माझे एटीएम कार्ड हरवले आहे.

८ मुलीच्या लग्नाचा खर्च झाला त्यामुळे मी या महिन्याला कर्जाचा हप्ता भरू शकत नाही.

९ मी माझ्या सप्लायरला दिलेला चेक परत का गेला? पास का नाही झाला?

१० माझ्या कर्ज प्रकरणाचे काम कधी होईल?

११ तुमचा शिपाई सारखी काहीतरी कटकट करत असतो.

१२ ज्येष्ठ नागरिकांसाठी जास्त व्याज देणारी कोणती योजना आहे?

१३ कुठली ठेव आयकरमुक्त असते?

१४ माझ्या पाच म्हशींमधली एक म्हैस काल मेली.

१५ मला घर बांधायला कर्ज हवं आहे. जमीन माझ्या वडलांच्या नावावर आहे.

१६ आमचं संयुक्त खातं आहे. आम्हाला दोघांपैकी एकाच्या सहीने पैसे काढता येतील का?

१७ माझ्या खात्यात पैसे असतानाही चेक पास का नाही झाला?

१८ उद्या किती वाजता येऊ मी कागदपत्रं घेऊन?

१९ मला माझ्या खात्याचा उतारा हवा आहे.

२० मला माझा स्वत:चा उद्योग सुरू करायचा आहे.

२१ हॅलो, मी लॉकरची किल्ली माझ्या मुलाला देतो, तो लॉकर उघडून वस्तू ताब्यात घेईल.

उत्तरे :

क जमीन जर वडलांच्या नावावर असेल तर वडलांचे आणि तुमच्या सगळ्या कुटुंबियांचे, भावंडांचे ना हरकत प्रमाणपत्र आणावे लागेल. ते आणलंत की बाकीची कागदपत्रे कोणती ते सांगतो.

ख तुम्हाला मासिक व्याज ठेव योजना सोयीची होईल.

ग तुम्ही तशी सूचना बँकेला लिहून द्या, दर महिन्याला तुमच्या खात्यातून हप्ता घेतला जाईल. हा फॉर्म भरून द्या.

घ एटीएमच्या माहिती पुस्तिकेवर एक नंबर दिलेला आहे त्यावर कॉल करून कार्ड गोठवून टाका. नाहीतर बँकेत या, मी तुमचे कार्ड बंद करतो. म्हणजे ते कोणी वापरू शकणार नाही.

च तुमच्या कर्ज प्रकरणाची छाननी चालू आहे. गुरूवारी या. कागदपत्रे योग्य असतील तर तुमचे प्रकरण मंजूर झालेले असेल.

छ खातेउतारा म्हणजे तुम्हाला तुमच्या खात्याचे स्टेटमेंट हवे आहे का?

ज तुम्ही आधी एक चालू खातं उघडा. त्यानंतर तुम्हाला जर बँकेकडून अर्थसाह्य हवे असेल तर तुमच्या उद्योगाची माहिती, कागदपत्रे आणि कर्ज कशासाठी हवे आहे तो तपशील द्या.

झ तुमच्या खात्यात पुरेशी शिल्लक नव्हती म्हणून चेक पास झाला नाही. त्यामुळे दंडाची रक्कम डेबिट टाकली आहे.

ट तुम्ही नेट बँकिंगची सुविधा का नाही घेत? तुम्हाला बँकेत यायला लागणार नाही.

ठ काही हरकत नाही. इकडे या. मी तुम्हाला सांगतो फॉर्म / स्लिप कशी भरायची ते.

ड तुम्हाला ज्या खात्यात व्याज जमा व्हायला हवे आहे तो खातेक्रमांक लिहून हा अर्ज भरून द्या. यालाच स्टँडिंग इन्स्ट्रक्शन म्हणतात.

ढ तुम्ही चेकवर खाडाखोड केली होती त्यामुळे सप्लायरचा चेक परत पाठवावा लागला.

ण शिपाई सांगेल त्या सूचना तुम्ही ऐका ना! तुम्ही ऐकत नाही म्हणून त्याला पुन्हापुन्हा तेच सांगावं लागतं.

त हा एक अर्ज आहे. तो भरून दिला की तुम्हाला या महिन्याचा हप्ता भरण्याची सूट मिळेल. पण ही सवलत वर्षातून एकदाच वापरता येते.

थ बँकेमध्ये पाच वर्षांसाठी ठेवलेली ठेव त्या आर्थिक वर्षासाठी करमुक्त असते. तिचे पैसे मुदत संपल्यावरच काढता येतात.

द त्या म्हशीच्या कानामध्ये ठोकलेला बिल्ला काढून आणा म्हणजे विमा कंपनीकडे तुम्हाला भरपाई मागता येईल. त्या भरपाईचे पैसे तुमच्या कर्ज खात्यात जमा होतील.

ध हॅलो, लॉकर फक्त तुमच्या नावावर आहे, तुमच्या मुलाला नाही उघडता येणार. तुम्हालाच यावं लागेल.

न भारत सरकारची ‘ज्येष्ठ नागरिक बचत योजना’ ही सगळ्यात जास्त व्याज देणारी योजना आहे. आणि तसंही बँकेच्या सर्व ठेवींवर ज्येष्ठ नागरिकांना अर्धा टक्का व्याज जास्त दिलं जातं.

प हो एकाच्या सहीने पैसे काढता येतील पण ‘कोणाच्याही एकाच्या सहीने’ (‘either or surviver’) अशी सूचना खाते उघडण्याच्या अर्जात लिहून द्यावी लागते.

फ तुमच्या खात्यात पैसे होते पण चेकवरची तुमची सही चुकली होती.

ब उद्या तुम्ही साडेदहा वाजता कागदपत्रे घेऊन बँकेत या.

## ३ ए, ओ, अहो ...



### क. संवाद ऐकू या व वाचू या. Listen and read.

साबळे : ए, अरे ए कदम, जरा इकडे ये. जरा शिवकुमारला बोलाव.

कदम : ओ, अहो शिवकुमार साहेब, ओ साहेब, अहो तुम्हाला साबळे साहेब बोलावतायत.

शिवकुमार : अरे यार! (फोनवर) अरे, मी तुला नंतर फोन करतो. साहेब बोलावतायत.

कदम : जरा सगळ्यांनी ऐका, महत्त्वाची सूचना. आत्ता सर्व्हरच्या दुरुस्तीचं काम चालू आहे. अर्ध्यातासाने संगणक चालू होतील.

साबळे : कदम असं नका सांगू, थांबा मीच सांगतो. लोकहो, थोडं समजून घ्या, थोड्या वेळातच सिस्टीम चालू होईल.

ग्राहक : अहो साहेब, नेहमी कशी बिघडते तुमची सिस्टिम? नाहीतर काय, सगळा त्रास आहे ... यांचं नेहमीचंच असतं हे... बघा ना, आता कधी मिळणार आपल्याला पासबुकं भरून ... हो ना, कधीचे उभे आहोत ... छे, बँकेत आलं की नेहमीच वेळ लागतो ... बघा तरी, आम्हाला काय दुसरी काही कामं नाहीत का ...

गायकवाडबाई : बायांनो, किती कलकलाट चाललाय? बँकेत जरा शांतता राखा. आज एवढी गर्दी का आहे? मुलांच्या शिष्यवृत्तीचं वाटप आहे वाटतं. मुलांनो, अजिबात बडबड करू नका, इथे एका बाजूला रांग लावा. अगं किमया, आधी या मुलांचे पैसे देऊन टाक बाई. मला तर या कलकलाटात काम सुचत नाही.

**संबोधन – Vocative**

- वरील संवादात वापरलेल्या हिरव्या रंगातील शब्दांना संबोधन असे म्हणतात.
- हाक मारण्यासाठी, बोलावण्यासाठी, लक्ष वेधून घेण्यासाठी आणि वरिष्ठ आणि ज्येष्ठांना आदर दाखवण्यासाठी संबोधनांचा वापर होतो. (used for addressing, calling or drawing someone's attention)

  उदा० लोकहो, बायांनो

| तुमच्या माहितीसाठी... |
|---|
| **संबोधनांचा वापर** |
| वेगवेगळ्या ठिकाणी ठरावीक संबोधनांचा वापर केला जातो. जसे :<br>**सभा** – बंधू आणि भगिनींनो<br>**संमेलने** – मित्रहो किंवा मित्रांनो किंवा मित्रमैत्रिणींनो<br>**व्याख्यान** – श्रोतेहो, लोकहो<br>**रस्त्यात** – ओ भाऊ, ओ / अहो ताई |

**ख. खालील गोष्टीमध्ये योग्य संबोधने लिहू या.** Fill in the blanks.

साबळेंना रस्त्यात त्यांचा जुना मित्र सुनिल दिसला. त्यांनी हाक मारली, “ ------------------ (अ) काय म्हणतोस? किती वर्षांनी भेटतो आहोत आपण! चल, घरी चहा प्यायला.” घरी गेल्यावर त्यांनी वसुधाला, आपल्या पत्नीला, हाक मारली, “ -------------------- (आ), बघ, कोण आलंय, चहा टाक ना.” चहा पिऊन दोघे व्याख्यानाला गेले. व्याख्याते व्यासपीठावर आले. त्यांनी सुरुवात केली, “ ---------------------- (इ), आजचा विषय महत्त्वाचा आहे. बँकांपुढील आव्हाने ...” व्याख्यान संपल्यावर साबळे पार्किंगमध्ये आले. वाटेतच एक माणूस फोनवर बोलत उभा होता. “ ---------------------- (ई), जरा बाजूला होता का? मला गाडी काढायची आहे. घरी जाताना त्यांच्या सोसायटीमधली मुले चालत जाताना दिसली. त्यांनी गाडी थांबवली आणि म्हणाले, “ --------------------- (उ), चला बसा, मी सोडतो तुम्हाला.”

## ४ बदली

**क. खालील संवाद वाचू या.** Read.

**बदलीचे पत्र**

| | | |
|---|---|---|
| शाखाप्रबंधक साबळे | : | शिवकुमार, आपल्या मुख्य कार्यालयाकडून पत्र आलंय. जरा अनपेक्षित बातमी आहे. आपल्या आजरा शाखेमध्ये तुमची बदली झाली आहे. |
| शिवकुमार | : | काय सांगताय सर! अशी कशी अचानक ऑर्डर आली? |
| साबळे | : | हो ना! मलाही आश्चर्यच वाटतंय. एकेक नवीनच घडतंय! बहुधा आजरा शाखेचे मॅनेजर काही अडचणीमुळे रजेवर गेले, त्यामुळे तुमची बदली झालेली दिसतीये. |
| शिवकुमार | : | बाप रे! आता कसं होणार? |
| साबळे | : | इतका काही ताण घेऊ नका. एकतर शाखा लहान आहे. तिथे एकपट काम असेल<br>तर इथे दुप्पट आहे असं समजा. गाव लहान असल्यामुळे सगळे लोक एकमेकांना ओळखतात, त्याचा तुम्हाला फायदाच होईल काम करताना. अगदी योग्य वेळी तुमचं कृषिउद्योगांचं प्रशिक्षण झालंय. त्याचाही तुम्हाला उपयोग होईल. शिवाय मी आहेच ना मदतीला. तुम्ही घ्या ही बदली. पुढच्या बढतीसाठीसुद्धा याचा तुम्हाला फायदा होईल. |
| कदम | : | काय? शिवकुमारसाहेबांची बदली झाली? अरेरे, लई वाईट झालं. तीन माणसांचं, म्हणजे तिप्पट काम ते एकटे करतात. साबळेसाहेब आपल्या शाखेतले निम्मे ग्राहक मग आजऱ्यालाच जातील बघा. |
| साबळे | : | कदमला कळलं म्हणजे सगळ्यांना कळली बातमी असं समजा. |

**संख्यावाचक विशेषणे – quantitative adjectives**

- दुप्पट, तिप्पट, पाचपट ...
  पट म्हणजे गुणाकार.
  उदा. दोनची दुप्पट म्हणजे २ x २ = ४, त्याचप्रमाणे दोनची तिप्पट म्हणजे २ x ३ = ६
- केवळ संख्यांसाठी 'पट' हे पद न वापरता गुणात्मक तुलना करतानाही वापरतात.
  उदा. आज रस्त्यात नेहमीपेक्षा दुप्पट वाहतूक आहे.
- एकेक, दोघे, तिघे, निम्मे, सगळे, अनेक इ. असे शब्दही संख्यावाचक विशेषणे आहेत.
- नामाच्या लिंगाप्रमाणे या शब्दांची रूपेही बदलतात.
  जसे : निम्मा – निम्मी – निम्मे / निम्मं
  दोघे – दोघी – दोघे / दोघं
  सगळे – सगळ्या – सगळी
  अपवाद – अनेक

**ख. सराव. संख्येपासून विशेषण करण्याची पद्धत लक्षात घेऊन रिकाम्या जागा भरू या.**
**Fill in the blanks following the pattern.**

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| एक | एकपट |
| दोन | --------------- |
| तीन | --------------- |
| चार | --------------- |
| पाच | --------------- |
| सहा | --------------- |
| सात | --------------- |
| आठ | --------------- |
| नऊ | --------------- |
| दहा | --------------- / दसपट |

### ग. खालील वाक्यांमध्ये योग्य संख्यावाचक शब्द वापरून गाळलेल्या जागा भरू या.
**Fill in the blanks.**

अ. बचत गटातील -------------- बायकांनी बँकेत बचत खाती उघडली.

आ. गेल्या वर्षी आमच्या कंपनीला २५ लाख रुपये नफा झाला होता. या वर्षी ५० लाख रुपये नफा झाला. म्हणजे या वर्षी -------------- नफा झाला.

इ. रांगेतून एका वेळी एकाला म्हणजे -------------- आत बोलवा.

ई. बचत गटाच्या दोन बायका आल्या आहेत. "ठीक आहे, -------------- सह्या घ्या."

उ. आपल्या नियोजनाप्रमाणे आज १० लाख कर्जवसुली अपेक्षित होती पण ५ लाख म्हणजे -------------- कर्जवसुली झाली.

ऊ. मराठीतून सूचना दिल्यामुळे -------------- ग्राहकांची सोय झाली.

ए. तीन स्त्रिया कोल्हापुरी साज तयार करण्याचा व्यवसाय करत होत्या. -------------- नाही व्यवसायाची चांगली माहिती होती.

### घ. संबोधन आणि व्यक्ती / वाक्यांश यांच्या जोड्या लावू या. **Match the columns.**

| संबोधन | उत्तराचा क्रमांक | व्यक्ती / वाक्यांश |
|---|---|---|
| अ. ग्राहका, | | १. तुमचे स्वागत आहे. |
| आ. मुलांनो, | | २. भाजीवाले |
| इ. अगं, | | ३. तू राजा आहेस. |
| ई. अहो बाई, | | ४. साहेब |
| उ. अरे यार! | | ५. एक सूचना ऐका. |
| ऊ. अहो, | | ६. शांत उभे राहा. |
| ए. ओ भाऊ, | | ७. खुर्चीवर बसा. |
| ॲ. ग्राहकहो, | | ८. मित्र |
| ऐ. बंधू आणि भगिनींनो, | | ९. ती बघा रिक्षा आली. |
| ओ. अहो ताई, | | १०. मैत्रीण |

### च. बदलीविषयी बोलू काही ...

बदलीविषयी तुमचे काय मत आहे? म्हणजे बदली होणे तुमच्या दृष्टीने फायद्याचे की त्रासदायक? तुमची कधी बदली झाली आहे का? कसा अनुभव होता तो?

## ५ अरेच्चा!, छे! छे!, छान! ...

**क. शिवकुमारची बदली आजरा शाखेमध्ये झाली हे सर्व कर्मचाऱ्यांना कळले. लगेच अनेक प्रतिक्रिया उमटल्या. या बदलीबाबत प्रत्येकाचं काही ना काही म्हणणं होतं. ऐकू या व गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहू या.** Listen to different reactions and fill in the blanks.

अ. ------------------! अशी कशी अचानक बदली झाली?

आ. ------------------! शिवकुमारची बदली?

इ. ------------------, एकच तर वर्ष झालं त्याला आपल्या बँकेत येऊन!

ई. ------------------! आता बरोबर कळेल त्याला ग्रामीण शाखेचा नमुना.

उ. ------------------! इथे आपण शिवकुमारला किती सांभाळून घेत होतो.

ऊ. ------------------, पण तो काम किती मन लावून करतो!

ए. ------------------, तुझा कॅशमधला फरक शिवकुमारनेच शोधून दिला होता हे विसरू नकोस.

ॲ. ------------------! आणि मराठीसुद्धा लवकर शिकला की.

ऐ. आणि एकावेळी दोन दोन टेबलं बघायचा, ------------------!

ओ. ----------------! ---------------! आता त्याचं काम कोण बघणार हा प्रश्नच आहे.



ऑ. ------------------! त्याला म्हणावं बदली रद्द करून घे.

औ. ________________! कधी सोडणार आहेत त्याला? त्याच्याजागी दुसरं कुणी रुजू होतंय का?

ऋ. ------------------! आता तुझ्या डब्यात कुणी वाटेकरी नाही.

अं. ------------------! पण आज डबा खायला का नाही आला शिवकुमार?

अः. ------------------! तो साबळेसाहेबांबरोबर गेला आहे कुठल्यातरी कर्जवसुलीला.

**उद्गारवाचक / केवलप्रयोगी शब्द – Interjections**

- वेगवेगळ्या भावना व्यक्त करण्यासाठी उद्गारवाचक / केवलप्रयोगी शब्द वापरले जातात.
  उदा॰ अरेरे, ओहो
- केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये सामान्यतः वाक्याच्या आरंभी येतात!
- केवलप्रयोगी अव्ययापुढे नेहमी उद्गारवाचक चिन्ह (!) हवे.

**ख. खालील दोन मित्रांच्या संवादात गाळलेल्या जागी योग्य उद्गारवाचक शब्द लिहून उतारा पूर्ण करू या.** **Fill in the blanks.**

कदम : कळली का बातमी? कोल्हापुरातलं बडं प्रस्थ कुकरेजा बिल्डर्स!

गौरव : हं, त्यांचं काय?

कदम : त्यांच्या सिमेंटच्या गोडाऊनवर छापा पडला.

गौरव : (अ) -------------------------! कसा काय?

कदम : साबळेसाहेब पोलिस पार्टीच घेऊन गेले ना.

गौरव : (आ) -------------------------! मोठं धाडसच आहे.

कदम : (इ) -------------------------! कोर्टाची ऑर्डरच होती ना!

गौरव : (ई) -------------------------! आता तुरुंगाची हवा खावी लागेल तेव्हा कळेल त्याला!

कदम : (उ) -------------------------! पण सकाळीच गेलेले साबळेसाहेब अजून कसे नाही आले?

(ऊ) -------------------------! (ए) -------------------------! काही खरं नाही साहेबांचं.

गौरव : (ॲ) -------------------------! फार काम करतात ते सकाळ-संध्याकाळ.

## ६ निरोप समारंभ

**क. संवाद वाचू या.** **Read.**

कदम : आज काम झाल्यावर सगळ्यांना दहा मिनिटं थांबायला सांगितलंय साबळेसाहेबांनी.

सगळे : कुठे जमायचंय?

कदम : इथेच बाहेरच्या हॉलमध्ये.

सगळे एकत्र आल्यावर –

साबळे : सहकारी बंधू भगिनींनो, तुम्हाला माहीतच आहे की शिवकुमारची बदली आजरा शाखेमध्ये झाली आहे. त्याच्या निरोप समारंभाबद्दल आज ठरवू या. या महिनाअखेरीस त्याला सोडायला लागेल. तर मला वाटतं की चौथ्या शनिवारी आपण एकत्र जमू. मी खास कोल्हापुरी जेवणाचा बेत योजला आहे. सगळ्यांना जमेल ना शनिवारी?

सगळे : हो सर, आम्ही सगळी व्यवस्था बघतो.

साबळे : शिवकुमार, तुम्हाला निरोपाला उत्तर द्यायचं आहे. मराठीत भाषण करायची तयारी करा. एक आठवडा आहे तुम्हाला तयारीला.

**ख. साबळेंनी केलेले हे निरोपाचे भाषण वाचू या.** **Read.**



साबळे :
गेलं वर्षभर शिवकुमार आपल्या शाखेत आहे. परप्रांतातून येऊन तो इथल्या वातावरणात मिसळला, सगळी कामं भराभर शिकून घेतली आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तो मराठी शिकला. सगळ्यांशी चांगले संबंध राखले. आपल्या सगळ्यांना शिवकुमार आपल्या शाखेत हवा आहे पण त्याला पुढे प्रगती करायची आहे, बढती घ्यायची आहे त्यासाठी ही बदली त्याला उपयोगी ठरणार आहे. मला खात्री आहे, की वर्षभरातच तो परीक्षा देऊन बढती मिळवेल. त्याच्या आजरा शाखेतील कामासाठी आणि पुढच्या प्रगतीसाठी मी त्याला शुभेच्छा देतो.

**ग. साबळेंनी केलेले हे भाषण शिवकुमारला आदरार्थी बहुवचनाने संबोधून लिहू या. त्याप्रमाणे क्रियापदांच्या रूपांमध्ये बदल होतील.** **Rewrite the above speech using the formal form.**

उदा॰ गेलं वर्षभर शिवकुमार आपल्या शाखेत आहेत.

साबळे:
______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

घ. **शिवकुमारने निरोपाला उत्तर दिले. पण त्याची वाक्ये मागे-पुढे झाली. खाली दिलेली वाक्ये योग्य क्रमात लावू या.** **Bring the sentences below in correct order to make it a meaningful speech.**

शिवकुमार :

१. मुख्य शाखेचं पत्र आलंय म्हणजे मला जायला लागेल.

२. कामही शिकवलं, भाषाही शिकवली आणि मराठी पदार्थही शिकवले.

३. नमस्कार, मी माझ्या गावातून प्रथमच बाहेर पडून इथे कोल्हापुरात आलो तेव्हा जरा ताण, भीती वाटली होती.

४. पण सगळ्यांची आठवण येईल.

५. त्यासाठी मी मोकाशीबाईंना खास धन्यवाद देतो.

६. पण तुम्ही सगळ्यांनी मला सांभाळून घेतलंत.

७. आजरा काही फार लांब नाही त्यामुळे मी सुट्टीच्या दिवशी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

८. साबळेसाहेबांचे मी आभार मानतो.

९. इथली हवा, वातावरण आणि माणसंही अगदी मोकळी आहेत.




१०. माझ्या प्रशिक्षणाचा मला नव्या शाखेतखूप उपयोग होईल.

११. ग्राहक आणि सहकारी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**च. खालील शुभेच्छांचा वापर करून शिवकुमारसाठी एक शुभेच्छापत्र तयार करू या.** **Create a greeting card for Shivkumar taking help of the wishes given below.**

- पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.
- तुमची नेहमीच आठवण येईल.
- तुमची नेहमीच कमी भासेल.
- पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा.
- तुमची उत्तरोत्तर प्रगती होवो.
- पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा.
- असंच काम करत राहा.
- संपर्कात राहा.
- तुमच्यासोबत काम करणं हा एक खूप छान अनुभव होता.
- ...

प्रिय शिवकुमार,



दृष्टिक्षेप । **Overview**

| नामे | | |
|---|---|---|
| तो (पु.) | ती (स्त्री.) | ते (नपुं.) |
| तो ताण, ते-<br>tension, stress<br>ताणा-, ताणां- | ती व्याधी, त्या-<br>ailment<br>व्याधी-, व्याधीं- | ते निरीक्षण, ती निरीक्षणे / णं<br>observation<br>निरीक्षणा-, निरीक्षणां- |
| तो निष्कर्ष, ते-<br>conclusion<br>निष्कर्षा-, निष्कर्षां- | ती डोकेदुखी,-<br>headache<br>डोकेदुखी- | ते सर्वेक्षण, ती सर्वेक्षणे / णं<br>survey<br>सर्वेक्षणा-, सर्वेक्षणां- |
| तो विकार, ते-<br>disorder<br>विकारा-, विकारां- | ती पाठदुखी,-<br>backache<br>पाठदुखी- | ते पोट, ती पोटे / टं<br>stomach<br>पोटा-, पोटां- |
| तो मधुमेह,-<br>diabetes<br>मधुमेहा- | ती कंबरदुखी-<br>lower back pain<br>कंबरदुखी- | ते अपयश, ती अपयशे / शं<br>failure<br>अपयशा-, अपयशां- |
| तो मणका, ते मणके<br>spondyl, vertebra<br>मणक्या-, मणक्यां- | ती खोटी नोट, खोट्या नोटा<br>fake note<br>खोट्या नोटे-, खोट्या नोटां- | ते धाडस, ती धाडसे / सं<br>adventure<br>धाडसा-, धाडसां- |
| तो दात, ते-<br>tooth<br>दाता-, दातां- | ती त्रुटी, त्या-<br>error<br>त्रुटी-, त्रुटीं- | ते मनगट, ती मनगटे / टं<br>wrist<br>मनगटा-, मनगटां- |
| तो रक्तदाब,-<br>blood pressure<br>रक्तदाबा- | ती सत्यता,-<br>authenticity<br>सत्यते- | ते बडे / डं प्रस्थ, ती बडी प्रस्थे / स्थं<br>bigshot<br>बड्या प्रस्था-, बड्या प्रस्थां- |
| तो शरीरधर्म, ते-<br>physiological needs<br>शरीरधर्मा-, शरीरधर्मां- | ती गैरसोय, त्या गैरसोयी<br>inconvenience<br>गैरसोयी-, गैरसोयीं- | |
| तो भुर्दंड, ते-<br>penalty, fine,<br>suffer a forfeit<br>भुर्दंडा-, भुर्दंडां- | ती निराशा,-<br>despair, disappointment<br>निराशे- | |
| तो राजीनामा, ते राजीनामे<br>resignation<br>राजीनाम्या-, राजीनाम्यां- | ती मान, त्या माना<br>neck<br>माने-, मानां- | |
| तो तंत्रज्ञ, ते-<br>technician<br>तंत्रज्ञा-, तंत्रज्ञां- | ती प्रणाली, त्या-<br>system<br>प्रणाली-, प्रणालीं- | |

| | | |
|---|---|---|
| तो संसर्ग,-<br>infection<br>संसर्गा- | ती हरकत, त्या हरकती<br>objection<br>हरकती-, हरकतीं- | |
| तो विषाणू, ते-<br>virus<br>विषाणु-, विषाणुं- | ती धास्ती,-<br>fright, apprehension<br>धास्ती- | |
| तो आदर,-<br>respect<br>आदरा- | ती एकवाक्यता,-<br>unanimity<br>एकवाक्यते- | |
| तो छापा, ते छापे<br>raid<br>छाप्या-, छाप्यां- | ती भरपाई,-<br>compensation<br>भरपाई- | |
| तो निरोप समारंभ, ते-<br>farewell<br>निरोप समारंभा-, निरोप समारंभां- | ती थप्पी, त्या थप्प्या<br>heap<br>थप्पी-, थप्प्यां- | |
| तो तुरुंग, ते-<br>prison<br>तुरुंगा-, तुरुंगां- | ती छाननी, त्या छानन्या<br>scrutiny<br>छाननी-, छानन्यां- | |
| तो लठ्ठपणा, -<br>obesity<br>लठ्ठपणा- | ती नेमणूक, त्या नेमणुका<br>appointment<br>नेमणुकी-, नेमणुकां- | |
| तो मोकळेपणा, -<br>frankness<br>मोकळेपणा- | ती म्हैस, त्या म्हशी<br>buffalo<br>म्हशी-, म्हशीं- | |
| तो दुष्परिणाम, ते-<br>ill effects<br>दुष्परिणामा-, दुष्परिणामां- | ती खाडाखोड,-<br>scratching<br>खाडाखोडी- | |
| तो वाटेकरी, ते<br>partner, someone to share<br>वाटेकऱ्या-, वाटेकऱ्यां- | ती शिष्यवृत्ती, त्या शिष्यवृत्त्या<br>scholarship<br>शिष्यवृत्ती-, शिष्यवृत्त्यां- | |
| | ती प्रगती,-<br>progress<br>प्रगती- | |
| | ती शुभेच्छा, त्या-<br>good wishes<br>शुभेच्छे-, शुभेच्छां- | |
| | ती वाटचाल, त्या वाटचाली<br>walking the path<br>वाटचाली-, वाटचालीं- | |

### क्रियापदे

रेंगाळणे – to get prolonged    वाचवणे – to save    मरणे – to die
सोडणे – to relieve    पत्करणे – to accept    गोठवणे – to block
शोधणे – to search    नोंदवणे – to register    पेलणे – to shoulder
आखडणे – to become stiff    हाताळणे – to handle

### क्रियाविशेषण / अव्यय

जवळून – closely    प्रकर्षाने – prominently
अचानक – suddenly    उत्तरोत्तर – increasingly

### विशेषण

त्रासदायक – troublesome    अंतर्गत – internal    अतिशय – very much
धोकादायक – dangerous    विपरीत – preposterous    कार्यक्षम – efficient
आधुनिक – modern    अनपेक्षित – unexpectedly    अरुंद – narrow

### नाम / इतर शब्द + क्रियापद जोड्या

| नाम / इतर शब्द | अर्थ – इंग्रजी |
|---|---|
| व्याधी जडणे | ailment becoming part of body |
| भूक भागवणे | to pacify the hunger |
| संकोच करणे | to hesitate |
| ताण झेलणे | to bear the stress |
| प्रतिक्रिया उमटणे | to pop up the reactions |
| नावावर असणे | to belong legally |
| सांभाळून घेणे | to accommodate |

### वाक्प्रचार

मन लावून काम करणे to get involved in the work
तुरुंगाची हवा खाणे to experience imprisonment

# दृक्‌श्राव्य

## १ मिनी बँक

**१. योग्य पर्याय निवडू या.** Choose the correct answer.



क. राहीच्या आईची काय तक्रार असते?
अ. राही नियमितपणे शाळेत जात नाही.
आ. राही तिला मिळालेल्या पैशांचे योग्य नियोजन करत नाही.
इ. राही सकाळी लवकर आवरत नाही.

ख. राहीची आजी आपल्या मुलीला काय सल्ला देते?
अ. राही नव्या पिढीची असल्याने तिच्याकडे दुर्लक्ष करणे.
आ. राहीला एक मातीचे गाडगे आणून देऊन त्यात पैसे जमवायला शिकवणे.
इ. राहीचे सगळे लाड पुरवणे.

ग. राहीला आईने तयार केलेले गुल्लक आवडते का?
अ. हो.
आ. नाही.
इ. सांगता येत नाही.

**२. जोड्या लावू या.** Choose the correct answer.

| | |
|---|---|
| क. पिढी दरपिढी | अ. मातीचे भांडे |
| ख. वायफळ | आ. अनेक पिढ्यांपासून / वर्षांपासून |
| ग. गाडगे | इ. विनाकारण केलेले |

**३. चित्रफितीचे शीर्षक 'मिनी बँक' योग्य वाटते का? चर्चा करू या.**

**४. ही चित्रफीत पाहून शिवकुमार राहीच्या आईला बदलत्या काळानुरूप कोणते पर्याय सुचवेल?**

## २ सोन्यात गुंतवणुकीचे फायदे-तोटे

**१. चूक की बरोबर ते लिहू या.** True or false.



क. सोने व गुढीपाडवा यांचे खूप पूर्वीपासूनचे नाते आहे.

------------------

ख. सोनेखरेदीत भारताचा प्रथम क्रमांक लागतो.

------------------

ग. भारत मोठ्या प्रमाणात सोने आयात करतो. ------------------

घ. सरकारी तिजोरीत सर्वाधिक सोने असण्याच्या क्रमवारीत अमेरिकेनंतर चीनचा क्रमांक लागतो. ------------------

च. सोने केवळ धातू स्वरूपातच विकत घेता येते. ------------------

**२. एका शब्दात उत्तरे लिहू या.**

क. चित्रफितीत उल्लेखलेला सण – ----------------------------

ख. सोन्याशी निगडित असणारी जागतिक स्तरावरील संघटना – ____________________

ग. बँक, पोस्ट ऑफीस, नोंदणीकृत एम॰एम॰टी॰सी॰ केंद्रे या ठिकाणी मिळणारी गोष्ट –

----------------------------

**३. सोने खरेदी करणाऱ्या ग्राहकांना शिवकुमार कोणता सल्ला देईल?**

## ३ लोन (कर्ज)

**१. रिकाम्या जागा भरू या.** Fill in the blanks.



क. लघुचित्रफितीतील नायकाला बँकेकडून

---------------------- हवे असते.

ख. बँकेतील कर्मचारी त्याच्याकडे पुरावा म्हणून काही

---------------------- मागतात.

ग. नायक त्याच्या घरच्यांच्या नजरेत ---------------------- असतो.

घ. ---------------------- बँक कर्मचाऱ्यांचे हात बांधलेले असल्यामुळे ते नायकाला काहीच मदत करू शकत नाही.

च. स्वत:ची किडनी विकून नायकाला ----------------------- रु. मिळतात.

**२. थोडक्यात उत्तरे देऊ या. Answer in brief.**

क. नायक आवश्यक ती कागदपत्रे का देऊ शकत नाही?

ख. नायक मिळालेल्या पैशातून काय करायचे ठरवतो?

**३. एकदा शिवकुमारच्या पाहण्यात ही चित्रफीत आली. त्याने त्याच्या ग्राहकांना ही चित्रफीत दाखवून काही सल्ले देण्याचे ठरवले. तुमच्या मते शिवकुमार या चित्रफितीचा कशाप्रकारे वापर करेल?**

## ४ एका मराठी चित्रपटाची झलक

**१. एका शब्दात उत्तरे देऊ या. Answer in one word.**

क. चित्रपटाचे नाव – -----------------------

ख. चित्रपटाची कथा प्रामुख्याने कोणत्या शहरात घडते? – -----------------------

**२. योग्य पर्याय निवडू या. Choose the correct answer.**



क. चित्रपट ----------------------- आहे.

अ. गूढ

आ. विनोदी

इ. भावनाप्रधान

ख. चित्रपटात खालीलपैकी कोणत्या रकमांचा उल्लेख येतो?

अ. दहा करोड

आ. दोन करोड

इ. दोन्ही पर्याय योग्य

ग. 'अरे, याला मोर आणून द्या रे कुणीतरी!' या वाक्यातील 'मोर' या शब्दाचा चित्रफितीच्या संदर्भात खालीलपैकी योग्य अर्थ कोणता?

अ. जास्त

आ. एक पक्षी

इ. एक वस्तू

**३. थोडक्यात उत्तरे देऊ या.** **Answer in brief.**

क. चित्रपटात कोणता विषय हाताळला गेला आहे?
ख. चित्रपटात पुढे काय होईल याविषयी अंदाज बांधू या.

## ५ बँकेतील व्हिडिओ

**१. एक छोटी मूक-चित्रफीत पाहू या व काही अंदाज बांधू या.** **Answer in one word.**

क. चित्रफितीत दाखवण्यात आलेले ठिकाण – ------------------------

ख. चित्रफितीतील कर्मचाऱ्यांनी हातात काय घातले आहे? – ------------------------

ग. चित्रफितीतील कर्मचाऱ्यांनी तोंडाला काय बांधले आहे? – ------------------------

**२. खालील चित्रांत दिसणाऱ्या वस्तूंची नावे माहीत आहेत का?** **Name the objects.**

क



------------------------------

ख



------------------------------

ग



------------------------------

### ३. तोंडी उत्तरे देऊ या. Answer orally.

क. चित्रफितीत दिसणारा पहिला कर्मचारी काय करत आहे?
ख. चित्रफितीत दिसणारा दुसरा कर्मचारी काय करत आहे?

### ४. चर्चा करू या. Discuss.

क. चित्रफितीतील कर्मचारी एवढी दक्षता का बाळगत असावेत?
ख. स्वत:चा जीव धोक्यात घालून कर्मचारी का काम करत आहेत?

## ६ मराठी माणूस इन फेस्टिवल्स

### १. चूक किंवा बरोबर ते लिहू या. True or false.

क. कदम सुट्टीच्या अपेक्षेने बॉसकडे जातात. ____________________

ख. कदमांचा अपेक्षाभंग होतो. ____________________

ग. कदमांचा मुलगा क्रिकेट खेळायला जात असतो. ____________________

घ. रिक्षावाले जास्त भाडं घेतात म्हणून कदम मुलाला लवकर घरी यायला सांगतात. ____________________

च. साफसफाई चांगली केल्याबद्दल सौ. कदम श्री. कदमांचे कौतुक करतात. ____________________

छ. बबन हा कदमांच्याच घरातील आणखी एक सदस्य. ____________________

### २. चित्रफितीत कोणकोणत्या सणांचा (प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या) उल्लेख आला आहे? Which of the following festivals are mentioned in the video?

☐ गणेशोत्सव ☐ दिवाळी ☐ रंगपंचमी ☐ दसरा

☐ होळी ☐ नवरात्रौत्सव ☐ गुढीपाडवा

३. **योग्य पर्याय निवडू या.** **Choose the correct answer.**



क. “घरी लवकर ये माझ्या बाळा” असं वडील मुलाला का म्हणतात?

अ. मुलाची काळजी वाटते म्हणून

आ. रात्री येणं सुरक्षित वाटत नाही म्हणून

इ. रात्री उशिरा रिक्षावाले दुप्पट भाडं घेतात म्हणून

ख. “आई, मी चालली.” यात बाबांना काय चूक वाटते?

अ. जाताना आईला सांगितलं, बाबांना नाही.

आ. कुठे जात आहे ते सांगितलं नाही.

इ. “मी चालली” ही रचना बाबांना चूक वाटते.

४. **‘टी॰व्ही॰वर मुंग्या दिसतायत’, ‘मायक्रोवेव्ह बाहेरच जास्त गरम होतो’, ‘फ्रीज म्हणजे ग्लोबलवॉर्मिंगचा देखावाच झालाय’ या तिन्ही वाक्यांचा अर्थ एकाच वाक्यात सांगा.** **Answer in brief.**

५. **खालील शब्द दोन अर्थांनी चित्रफितीत आले आहेत. ते दोन अर्थ कोणते ते ओळखू या.** **Write the two meanings of following homonyms.**

क. इंटरेस्ट

ख. हार

ग. दिवे लावणे

६. **मराठी सणांबद्दल तुम्हाला माहीत असलेल्या आणखी काही गोष्टींविषयी / गमतीजमतींविषयी बोलू या. खालील शब्दांची मदत होऊ शकते.** **Give information about more Marathi festivals if you know.**

- कोणता सण?
- पूर्वतयारी (साफसफाई, खरेदी, घरसजावट)
- पेहेराव
- खाद्यपदार्थ
- किती दिवस?
- भेटीगाठी

७. **आता, तुमच्याकडे किंवा तुमच्या शहरात साजरा केल्या जाणाऱ्या एखाद्या सणाविषयी बोलू या. वरील मुद्द्यांची मदत घेऊ शकता.** **Also, speak about the festivals celebrated in your region.**

## ७ अतितणावातून बाहेर पडण्यासाठी करा 'हे' उपाय

### १. थोडक्यात उत्तरे लिहू या. Answer in brief.

क. मनावर ताण, दडपण येण्याची कोणती कारणे चित्रफितीत नमूद केली आहेत?

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

ख. ताण दूर करण्यासाठी चित्रफितीत कोणते उपाय सुचवले आहेत?




-------------------------------------------

-------------------------------------------

-------------------------------------------

ग. कोणता उपाय तुम्हाला सर्वांत जास्त आवडला / पटला? का?

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

### २. खालील शब्दांसाठी चित्रफितीत आलेले शब्द किंवा शब्दजोड्या शोधू या. Write the correct word from the video for the following words / phrases.

क. एखाद्या गोष्टीकडे गांभीर्याने न बघणे – -------------------

ख. सापडणे – -------------------

ग. अतिताणाचा खोल परिणाम होणे – -------------------

घ. याउलट – -------------------

च. वेग कमी होणे – -------------------

छ. नकोशी वाटणारी – -------------------

### ३. रिकाम्या जागी चा, ची, चे, चे, च्या, ची यांपैकी योग्य तो प्रत्यय जोडून अर्थपूर्ण जोड्या तयार करू या. Fill in the blanks using the correct suffix.

| | | |
|---|---|---|
| क. नात्यां ------ गोंधळ | ख. कामा ------ व्याप | ग. मनावर ------ ताण |
| घ. मनावर ------ दडपण | च. स्वत: ------ छंद | छ. स्वत: ------ आवड |
| ज. मदती ------ गोष्टी | झ. जीवनशैली ------ वेग | ट. परिस्थिती ------ माहिती |

# बँकेतील नेहमीचे संवाद

- **कर्मचारी व शिपायामधील संवाद**

Employee

कर्जविभागातून निळी फाईल घेऊन ये आणि दोन चहा पाठव.
Please bring the blue file from the loan department and bring two cups of tea.

नंतर तू क्लिअरिंगचे चेक लगेच व्यवस्थित लाव.
Please arrange the cheques for clearing later.

जेवणाच्या सुट्टीनंतर आपण नोटांचे गठ्ठे तयार करू.
We shall prepare bundles of the currency notes after the lunch break.

नंतर कॅश जुळल्यावर तिजोरीत टाकू
After tallying the cash, we will put it in the vault.

Peon

बरं, साहेब.
Ok sir.

ठीक आहे, साहेब.
Ok sir.




**१. जोड्या जुळवू या.** **Match the columns.**

| | |
|---|---|
| उदा० दोन चहा | अ. व्यवस्थित लाव. |
| क. क्लिअरिंगचे चेक | आ. तिजोरीत टाकू. |
| ख. नोटांचे गठ्ठे | पाठव. |
| ग. कॅश जुळल्यावर | इ. तयार करू. |

- **ग्राहक व बँक कर्मचारी यांमधील संवाद**

| **Customer to employee** | | **Employee to customer** | |
|---|---|---|---|
| पैसे भरायचे आहेत. कुठे भरायचे? | I want to deposit cash. Where do I deposit? | चार नंबर काऊंटरवर कॅशिअरकडे पैसे भरा. | Please deposit the cash with the cashier on counter no. 4. |
| चेक कुठे भरायचा? | Where do I deposit the cheque? | मी करतो / करते. माझ्याकडे द्या. | I will do it. Give it to me. |
| पैसे काढायचे आहेत. | I want to withdraw cash. | ही पांढरी स्लिप भरा. | Please fill this white slip. |
| पाच हजार पाहिजेत. शंभरच्या २० नोटा पाचशेच्या दोन नोटा आणि दोन हजारची एक नोट. | I want Rs. 5000/-. Please give 20 notes of Rs. 100, 2 of 500 and 1 of Rs. 2000. | २०००ची नोट नाहीये. ५००च्या ४ चालतील का? | Notes of Rs. 2000 are not available. Will 4 of Rs. 500 do? |
| पासबुक भरायचं आहे. | I want to update the passbook. | काऊंटर नं. ३ वर होईल किंवा तुम्ही पासबुक अपडेट मशीनमध्ये करू शकता. | Please go to counter no. 3 or you can update the passbook from the machine. |
| चेकबुक कुठे मिळेल? | I need a new cheque book. | हा फॉर्म भरा आणि सही करून द्या. | Fill this slip and sign it. |
| बचत खात्याचा फॉर्म कुठे मिळेल? | Where do I get the savings account opening form? | हा घ्या फॉर्म | Yes, take this. |
| बचतखात्यासाठी कोणती कागदपत्रे लागतील? | Which documents do I need to submit to open the savings account? | आधारकार्ड आणि राहण्याच्या जागेच्या पत्त्याचा पुरावा. | Aadhar card and residential proof |

| | | | |
|---|---|---|---|
| बचतखाते सुरू करण्यासाठी किमान किती पैसे भरू? | What is the minimum amount required to open a savings account? | कमीतकमी हजार रुपये भरावे लागतील. | You will have to deposit minimium one thousand rupees. |
| पासबुक कधी मिळेल? | When shall I get the passbook for this account? | हे घ्या तुमचं पासबुक. | Here is your passbook. |
| चेकबुक कधी मिळेल? | When shall I get the cheque book? | चेकबुक एक आठवड्यात तुमच्या घरी येईल. | You will receive the cheque book at your address within a week. |
| मुदतठेवीची पावती कधी मिळेल? | When shall I get the receipt of the fixed deposit? | उद्या मिळेल. | You will get it tomorrow. |
| मुदतठेवीवर व्याजदर किती आहे? | What is the rate of interest on fixed deposit? | समोरच्या भिंतीवर लावले आहेत ते पाहून घ्या. | Please check the chart on the opposite wall. |
| ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याजदर किती आहे? | What is the rate of interest for senior citizens? | साडेसहा टक्के. | 6.5 percent. |
| शैक्षणिक कर्जावर व्याजदर किती आहे? | What is the rate of interest for the education loan? | दहा टक्के आहे. | It is 10 percent. |
| शैक्षणिक कर्जासाठी कोणती कागदपत्रे लागतील? | Which documents should I give for the education loan? | गेल्या तीन वर्षांची गुणपत्रके, जिकडे प्रवेश घेणार तिथे प्रवेश मिळाल्याचे पत्र आणि तारण ठेवण्याच्या घराची कागदपत्रे. | The marksheets of the last three years, admission letter and the documents of the house to be mortgaged. |
| सेफ डिपॉजिट लॉकर मिळेल का? | Will a safe deposit locker be available | हो, मिळेल की. | Yes, it is available. |

२. **खालील प्रश्नांसाठी योग्य उत्तरे निवडू या.** **Select the correct option.**

क. पैसे भरायचे आहेत. कुठे भरायचे?
अ. चार नंबर काऊंटरवर कॅशियरकडे पैसे भरा.
आ. चेकबुक एक आठवड्यात तुमच्या घरी येईल.
इ. कमीतकमी हजार रुपये भरावे लागतील.

ख. पैसे काढायचे आहेत.
अ. हो, उद्या मिळेल.
आ. ही पांढरी स्लिप भरा.
इ. हे घ्या पासबुक.

ग. बचत खात्याचा फॉर्म कुठे मिळेल?
अ. काऊंटर नं॰ ३ वर होईल किंवा तुम्ही पासबुक अपडेट मशीनमध्ये करू शकता..
आ. कमीतकमी हजार रुपये भरावे लागतील.
इ. काऊंटर नं॰ ५ वर.

घ. चेकबुक कधी मिळेल?
अ. हो मिळेल.
आ. चेकबुक एक आठवड्यात तुमच्या घरी येईल.
इ. हे घ्या पासबुक.

च. मुदतठेवीवर व्याजदर किती आहे?
अ. ज्येष्ठ नागरिकांसाठी साडेसहा टक्के.
आ. हा फॉर्म भरा आणि सही करून द्या.
इ. कमीतकमी ३००० रुपये भरावे लागतील.

| Employee to Customer | |
|---|---|
| काय हवं आहे आपल्याला? | How can I help you? / May I help you. |
| बसा, आपण. | Please have a seat. |
| चार नंबर काऊंटरवर कॅशियरकडे पैसे भरा. | Please deposit the cash with the cashier on counter no. 4. |

| | |
|---|---|
| या पैशाची नोंद तुमच्या पासबुकात काऊंटर नंबर पाचवर करून घ्या. | Please fill your passbook at counter no. 5. |
| सगळ्यांनी काऊंटरवर गर्दी करू नका. | Please do not rush at the counter. |
| रांगेत उभे रहा. | Please stand in the queue. |
| ज्यांना चेक भरायचे आहेत त्यांनी चेक या पेटीत टाका. | Please deposit your cheques in the drop box. |
| ही तुमची सही आहे का? | Is this your signature? |

**३. जोड्या जुळवू या. Match the columns.**

| | |
|---|---|
| उदा. दोन चहा | अ. या पेटीत टाका. |
| क. रांगेत | आ. कॅशियरकडे पैसे भरा. |
| ख. चार नंबर काऊंटरवर | पाठव. |
| ग. चेक | इ. उभे रहा. |

- **व्यवस्थापक व कर्मचारी यांमधील संवाद**

| व्यवस्थापक काय सांगेल / विचारेल? | | कर्मचारी काय म्हणेल / विचारेल | |
|---|---|---|---|
| केबिनमध्ये या. | Please, come to my cabin. | येतो, सर. | Ok sir. |
| आताच प्रादेशिक कार्यालयातून मुख्य प्रबंधकांचा फोन आला होता. | I just received a call from the regional manager. | काय म्हणाले ते? | What did he say? |
| या महिन्याच्या उद्दिष्टाच्या आपण खूप मागे आहोत. | We are lagging behind the targets of this month. | हो, सर. | Yes sir. |

| | | | |
|---|---|---|---|
| या महिनाअखेरपर्यंत सर्वांना खूप उत्साहाने काम करावे लागेल. | Everyone needs to put in extra efforts this month. | हो सर, आम्ही तयार आहोत. | Yes sir, we are ready. |
| प्रसिद्धीसाठी आकर्षक बॅनर लावू. | Let's make an attractive banner for marketing. | त्याची जबाबदारी मी घेतो. | I will take the initiative. |
| कर्मचाऱ्यांचे चार गट करून काम पूर्ण करावे लागेल. | Make four groups to complete the target. | चालेल. | Ok sir. |
| या महिन्याच्या दोन रविवारी आपल्या योजनेची माहिती प्रत्येक घरामध्ये जाऊन द्यायची आहे. | On the remaining Sundays of this month we will have to inform every household about our schemes. | चालेल. | Right sir. |
| कर्जवसुली पण करायची आहे. | We have to look after recovery of loans also. | ठीक आहे. | Ok. |
| या महिन्याच्या शेवटी ऑडिटर येणार आहेत. | The auditor will visit at the end of this month. | आपली सर्व खाती टॅली झाली आहेत सर! | All of our accounts have been tallied. |

४. **योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरू या. Choose the correct word and fill in the blanks.**

| ऑडिटर, | योजनेची, | उद्दिष्टाच्या, | प्रसिद्धिसाठी, | कर्जवसुली |
|---|---|---|---|---|

क. या महिन्याच्या ---------------------- आपण खूप मागे आहोत.

ख. ---------------------- आकर्षक बॅनर लावू.

ग. या महिन्याच्या शेवटी ---------------------- येणार आहेत.

घ. ---------------------- पण करायची आहे.

च. या महिन्याच्या दोन रविवारी आपल्या ---------------------- माहिती प्रत्येक घरामध्ये जाऊन द्यायची आहे.

# अंतिम परीक्षा

**एकूण १५० गुण**

**तोंडी परीक्षा – एकूण ५० गुण**

## १. स्वत:ची ओळख (एकूण ६ गुण)

खालील मुद्द्यांच्या साहाय्याने स्वत:ची ओळख करून द्या.
(नाव, गाव, कुठे राहता, कोणती बँक, कुठली शाखा, बँकेतील पद, कोणत्या विभागात काम करता, काय काम करता इ॰)

## २. वाचन आणि आकलन (एकूण १० गुण)

### क. खालील बातमी मोठ्याने वाचून दाखवा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे द्या.

**अंधांना चलनी नोटा ओळखता येण्यासाठी नवे ॲप**

रिझर्व बँकेचा पुढाकार
अंधांना चलनी नोटा सहज ओळखता याव्यात, यासाठी एक अनुप्रयोग (ॲप्लिकेशन) रिझर्व बँक ऑफ इंडियाने विकसित करण्याचे ठरवले असून सध्यातरी रोखीच्या व्यवहारांना महत्त्व असल्याने त्याचा वापर करता येणार आहे.

सध्या १०, २०, ५०, १००, २००, ५००, २००० या नोटा चलनात असून एक रुपयाची नोट केंद्राने जारी केली आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियाने म्हटले आहे, की नोटा ओळखणे अंधांना सोपे नसते. त्यामुळे या नोटांमधील खुणांच्या माध्यमातून त्या ओळखणे आवश्यक असते त्यासाठी १०० व त्यावरील चलनाच्या नोटांत अंधांसाठी खास ओळख पटवणाऱ्या सुविधा आहेत पण त्या त्यांना माहिती नाहीत. नोव्हेंबर २०१६ मध्ये निश्चलनीकरणानंतर पाचशे व हजाराच्या नोटा बाद करण्यात आल्या होत्या. त्यानंतर पाचशे व दोन हजाराच्या नवीन नोटा चलनात आल्या.
अंधांना या नोटा ओळखता याव्यात यासाठी रिझर्व बँक प्रयत्नशील आहे. महात्मा गांधी मालिका व महात्मा गांधी नवी मालिका यातील नोटांच्या प्रतिमा घेऊन प्रस्तावित मोबाइल अनुप्रयोगासाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत.

या अनुप्रयोगात ध्वनीच्या माध्यमातून सूचनेचा पर्याय राहील. त्यात प्रतिमा योग्य प्रकारे घेतली तर ती नोट कुठल्या किमतीची आहे हे समजू शकेल. देशात ८० लाख अंध लोक असून त्यांना या अनुप्रयोगाचा फायदा होणार आहे. जून २०१८ मध्ये बँकेने अंधांना नोटा ओळखता याव्यात, यासाठी उपकरण किंवा अनुप्रयोग तयार करण्याचे सुतोवाच केले होते. दुकानदारांनीच अंधांना अशा प्रकारचे ॲप (अनुप्रयोग) उपलब्ध करून द्यावे, अशी सूचनाही आधी बँकेने मांडली होती.

(लोकसत्ता, जुलै २०१९)

### ख. बातमीत उल्लेख केलेल्या ॲपचा अंध व्यक्तींना कशा प्रकारे उपयोग होऊ शकतो?

### ग. खालील इंग्रजी शब्दांसाठी बातमीत आलेले मराठी शब्द सांगा.

अ. demonitisation

आ. currency

इ. series

ई. tenders

उ. mobile application (app)

## ३. संवादकौशल्य (एकूण ५ गुण)

### खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर ग्राहकांशी संवाद साधा.

क. तुमच्या एका ग्राहकाला तुम्हाला बँकेचे एक नवीन उत्पादन विकायचे आहे अशी कल्पना करून संवाद साधा.

ख. 'अपघातामुळे हप्ता भरण्यास पुरेसे पैसे नाहीत' या ग्राहकाच्या अडचणीवर काय उपाय सुचवाल?

## ४. संवाद / वादविवाद (एकूण ५ गुण)

### बँक कर्मचारी व बँक व्यवस्थापन यांच्यातील चर्चा.

क. काउंटर, संगणक पुसलेले नसतात, त्यावर धूळ असते ही कर्मचाऱ्यांची तक्रार आहे. चर्चा करा.

ख. कर्जवसुलीचे उद्दिष्ट साध्य न झाल्याबद्दल मुख्य प्रबंधकांनी जाब विचारला. मुख्य प्रबंधक व शाखाप्रबंधक यांच्यातील वादविवाद.

## ५. दृक्श्राव्य – चित्रफीत पाहून खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (एकूण १० गुण)

### क. चूक की बरोबर ते सांगा.

अ. क्रिप्टोचलनाच्या व्यापाराला सुप्रीम कोर्टाने हिरवा कंदील दाखवला आहे.

आ. जगातील अनेक देशांचे स्वत:चे असे एक क्रिप्टोचलन आहे.

इ. क्रिप्टोचलन हा छापील चलनाला पर्याय आहे.

ई. ब्लॉकचेनमार्फत होणारे क्रिप्टोचलनाचे व्यवहार सुरक्षित मानले जातात.

उ. बिटकॉईन हे एक क्रिप्टोचलन दहा वर्षांपूर्वी लॉँच करण्यात आले होते.

ऊ. बिटकॉईनचे मूल्य स्थिर असते.

### ख. थोडक्यात उत्तरे द्या.

अ. क्रिप्टोचलन वापरून केले जाणारे व्यवहार सुरक्षित असतात का?

आ. बिटकॉईन्सकडे गुंतवणूक म्हणून का पाहिलं जातंय?

### ६. श्रवणकौशल्य (एकूण १० गुण)

**क. ध्वनिफितीचे शीर्षक काय आहे?**

**ख. योग्य पर्याय निवडा.**

अ. ध्वनिफितीचा विषय काय आहे?
१. गुंतवणूक कशी करावी?
२. गुंतवणूक करताना वाटणारी भीती
३. गुंतवणूक करताना काळजीपूर्वक करावी
४. गुंतवणूक काढून घेताना येणाऱ्या अडचणी

आ. प्रस्तुत माहिती कोणाला उद्देशून आहे?
१. सामान्य माणसाला
२. अर्थतज्ज्ञांना
३. बँक कर्मचाऱ्यांना

इ. पैसे गुंतवताना गुंतवणूकदार कधी अडचणींना सामोरा जातो?
१. गुंतवणूक करताना
२. गुंतवणूक केल्यावर पैसे काढताना
३. दोन्ही पर्याय बरोबर

ई. 'म्हातारी मेल्याचं दु:ख नाही पण काळ सोकावतोय' ह्या म्हणीचा योग्य अर्थ कोणता?
१. म्हातारीच होती म्हणून मेल्याचे दु:ख नसणे
२. म्हातारी होती म्हणून मृत्यूने घाला घातला
३. चुकीकडे एकदा दुर्लक्ष केले की ती करणाऱ्याची हिंमत वाढत जाते.

उ. वक्त्यांच्या मते पैसे गुंतवताना जशी सेवा मिळते तशी पैसे काढताना मिळत नाही.
१. चूक
२. बरोबर
३. सांगता येत नाही

ए. गुंतवणुकीबाबत वक्ते बँकांच्या बाबतीत त्यांचे कोणते निरीक्षण नोंदवतात?
१. रिझर्व बँकेने पतधोरण जाहीर केले की बँका त्यानुसार लगेच बदल करतात.
२. रिझर्व बँकेने पतधोरण जाहीर केले की बँका गुंतवणुकीवरील व्याजदर लगेच कमी करतात पण कर्जावरचे व्याजदर मात्र लगेच कमी करत नाहीत.
३. रिझर्व बँकेने पतधोरण जाहीर केले की बँका गुंतवणुकीवरचे व्याजदरही त्याप्रमाणे लगेच वाढवतात.

अॅ. वक्ते या ध्वनिफितीमार्फत कोणता सल्ला देतात?
१. गुंतवणूक काढून घेताना होणाऱ्या त्रासाकडे दुर्लक्ष करू नका.
२. वेळीच योग्य त्या आस्थापनेकडे तक्रार नोंदवा.
३. परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या एजंट, प्रतिनिधींची नावे निदर्शनाला आणून द्या.
४. वरील तिन्ही पर्याय बरोबर आहेत.

**ग. थोडक्यात उत्तर सांगा.**

म्युच्युअल फंड्स रिडम्पशन, शेअर्सची विक्री याबाबतीत घडणाऱ्या प्रकाराची तुलना वक्ते कशाशी करतात?

**७. खालील प्रसंगांच्या वेळी तुमची प्रतिक्रिया सांगा. (एकूण ४ गुण)**

**(योग्य त्या उद्गारवाचक शब्दासहित प्रतिक्रिया द्या.)**

क. बँकेत आल्यावर तुमच्या टेबलावर सुंदर फुलांचा पुष्पगुच्छ ठेवलेला होता.

ख. बँकेत आल्यावर ग्राहक एका कोपऱ्यात थुंकला.

# अंतिम परीक्षा

एकूण १५० गुण

लेखी परीक्षा – एकूण १०० गुण

## १. वाचन आणि आकलन (एकूण २० गुण)

भारतीय रिझर्व्ह बँक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

आरबीआय/2018-19/179

एफआयडीडी.सीओ.प्लान.बीसी.18/04.09.01/2018-19 मे 6, 2019

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक व सीईओ

सर्व प्रादेशिक ग्रामीण बँका/सर्व लघु वित्त बँका

महोदय/महोदया,

**प्राधान्य क्षेत्रातील कर्ज - उद्दिष्टे व वर्गीकरण**

कृपया, प्रथम द्वैमासिक चलन विषयक धोरण निवेदन, 2019-20 दि. एप्रिल 4, 2019 च्या, विकासात्मक व विनियामक धोरणे निवेदनाचा परिच्छेद 10, आणि महानिर्देश - प्रादेशिक ग्रामीण बँका (आरआरबी) - प्राधान्य क्षेत्र कर्ज - उद्दिष्टे व वर्गीकरण दि. जुलै 7, 2016 चा परिच्छेद 9 लघु वित्त बँकांसाठी (एसएफबीज) संक्षेप - प्राधान्य क्षेत्र कर्ज - उद्दिष्टे व वर्गीकरण, दि. जुलै 6, 2017 चा परिच्छेद 5 चा संदर्भ घ्यावा. ह्यात गृहकर्जांचे, प्राधान्य क्षेत्राखाली वर्गीकरण करण्यासाठीच्या पात्रतेचे निकष विहित केले आहेत.

(2) आरआरबींसाठी असलेल्या वरील महानिर्देशानुसार, राहत्या घराचा सर्वसमावेशक खर्च रु.25 लाखांपेक्षा अधिक नसलेल्या घरांची खरेदी/बांधणी करण्यासाठी, प्रति कुटुंब रु.20 लाखांपर्यंतची कर्जे, प्राधान्य क्षेत्रासाठी वर्गीकृत केली जाऊ शकतात. एसएफबीसाठीच्या संक्षेपानुसार, राहत्या घरांचा सर्वसमावेशक खर्च अनुक्रमे रु.35 लाख व रु.25 लाख पेक्षा अधिक नसल्यास, महानगर केंद्रातील (दहा लाख व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या) व्यक्तींसाठी रु.28 लाखांपर्यंत व इतर केंद्रातील व्यक्तींसाठी रु.20 लाखांपर्यंतची कर्जे, प्राधान्य क्षेत्राखाली वर्गीकृत केली जाण्यास पात्र आहेत.

(3) आरआरबी व एसएफबी ह्यांना इतर अनुसुचित वाणिज्य बँकांच्या स्तरांवर आणण्यासाठी, प्राधान्य क्षेत्राखालील पात्रतेसाठी कर्जांच्या मर्यादा वाढविण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार, आरआरबीज व एसएफबीजच्या बाबतीत, महानगर प्राधान्य क्षेत्रातील कर्ज - उद्दिष्टे व वर्गीकरण केंद्रामधील (दहा लाख व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या) व्यक्तींसाठीची रु.35 लाख पर्यंतची गृहकर्जे व इतर केंद्रामधील व्यक्तींसाठीची रु.25 लाख पर्यंतची गृहकर्जे, त्या-त्या

महानगर केंद्रात व इतर केंद्रात, राहत्या घराचा सर्वसमावेशक खर्च अनुक्रमे रु.45 लाख व रु.30 लाखांपेक्षा अधिक असल्यास, प्राधान्य क्षेत्रातील कर्जाखाली वर्गीकृत करण्यास पात्र असतील.

---

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, 10वा मजला, केंद्रीय कार्यालय भवन, शहिद भगत सिंह मार्ग, पो.बा.सं.10014, मुंबई 400 001 टेलिफोन: 022-22610586 फॅक्स: 91-22-22621011/22610943 ईमेल: cgmincfidd@rbi.org.in

**सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.**

(4) ह्याशिवाय, आरआरबींसाठीचे महानिर्देशचा परिच्छेद 9.4 एसएफबीसाठीचा संक्षेपचा परिच्छेद 5.4 ह्यात, विहित केलेली आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्युएस) व अल्प उत्पन्न गटांसाठी (एल आय जी) असलेल्या केवळ गृह प्रकल्पांसाठी पात्र असलेली, विद्यमान कुटुंब उत्पन्नाची प्रतिवर्ष रु.2 लाख ही मर्यादा, प्रधानमंत्री आवास योजनाखाली विहित केलेल्या उत्पन्नाशी जुळवून, आता, ईडब्ल्युएससाठी, प्रतिवर्ष रु.3 लाख व एलआयजीसाठी प्रतिवर्ष रु.6 लाख अशी सुधारित करण्यात आली आहे.

(5) त्यानुसार, ह्या परिपत्रकाच्या तारखेपासून, आरआरबी/एसएफबी ह्यांना, त्यांच्या गृहकर्जाच्या आऊटस्टँडिंग पोर्टफोलियोसाठी प्राधान्य क्षेत्र कर्जाखाली वर्गीकृत करण्यासाठीचे सुधारित निकष लागु करण्यास परवानगी आहे.

(6) वरील महानिर्देश/संक्षेपात विहित केलेल्या अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

आपला विश्वासु,

(गौतम प्रसाद बोराह)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

## क. एका वाक्यात उत्तरे द्या.

अ. प्रस्तुत अधिसूचनेचा विषय काय आहे?

_______________________________________________

आ. अधिसूचना कोणत्या बँकांना उद्देशून आहे?

_______________________________________________

इ. अधिसूचना कोणातर्फे पाठवण्यात आली आहे?

_______________________________________________

ई. कोणत्या प्रकारच्या कर्जाचा अधिसूचनेत उल्लेख केला आहे?

_______________________________________________

उ. अधिसूचनेतील माहितीप्रमाणे महानगर केंद्राची व्याख्या कशी कराल?

_______________________________________________

**ख. खालील इंग्रजी शब्दांसाठी परिपत्रकात आलेले मराठी शब्द शोधून लिहा.**

| | |
|---|---|
| अ. priority area – ---------------- | आ. all inclusive – ---------------- |
| इ. classified – ---------------- | ई. being eligible – ---------------- |
| उ. chronologically – ---------------- | ऊ. scheduled – ---------------- |
| ए. prescribed – ---------------- | ॲ. criteria, parameters – ------------ |

**ग. कंसातील सूचनेप्रमाणे योग्य ते बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.**

अ. आरआरबी व एसएफबी ह्यांना इतर अनुसुचित वाणिज्य बँकांच्या स्तरांवर आणण्यासाठी, प्राधान्य क्षेत्राखालील पात्रतेसाठी कर्जांच्या मर्यादा वाढविण्याचे ठरवण्यात आले आहे. (‘म्हणून’ वापरून वाक्य पुन्हा लिहा)

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

आ. त्यानुसार, ह्या परिपत्रकाच्या तारखेपासून, आरआरबी एसएफबी ह्यांना, त्यांच्या गृहकर्जाच्या आऊटस्टँडिंग पोर्टफोलिओसाठी प्राधान्य क्षेत्र कर्जाखाली वर्गीकृत करण्यासाठीचे सुधारित निकष लागू करण्यास परवानगी आहे. (अधोरेखित शब्दांऐवजी ‘शकणे’ या क्रियापदाचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.)

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**२. लेखन** **(एकूण १० गुण)**

क. डेबिट कार्डाचे फायदे लिहा.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

ख. क्रेडिट कार्ड वापरण्यातील धोके लिहा.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

**३. व्याकरण** **(एकूण ७० गुण)**

**क. खालील उताऱ्यात क्रियापदांची योग्य रूपे घालून गाळलेल्या जागा भरा. (१० गुण)**

[ करणे (४), जाणे, पाठवणे, होणे (२), पटणे, म्हणणे, थांबणे, येणे (२), न घालणे, पडणे, निघणे ]

पाऊस जोरातच ----------- ----------- (अ). दूध घेऊन ट्रक पुण्याला निघाला होता. वेळेवर पुण्याला पोचेल अशी आशा ----------- (आ) या. पावसाने काही गोंधळ ----------- ----------- (इ) हीच इच्छा! कालच पुण्याहून फोन ----------- ----------- (ई). रस्ते खूप खराब ----------- ----------- (उ). जेव्हा पाऊस ----------- (ऊ) तेव्हा ट्रकचालक वाटेत ----------- (ए). परवा ग्रामसभा ----------- (ॲ). तेव्हा अरुण पाटलांनी चांगली सूचना ----------- (ऐ). ते ----------- (ओ), "दूध पाठवण्यापेक्षा दुधाचे पदार्थ करून शहरात ----------- (ऑ). ते जास्त फायदेशीर ----------- (औ)." मला ते ----------- (ऋ).

रोजची धास्ती नको आणि धोकाही नको. उद्याच बाजारात ---------- (ऌ) आणि पेढे, बर्फी आणि श्रीखंड तयार करण्याच्या यंत्रांची चौकशी ---------- (अं). बँकेत जाऊन कर्जाचीही चौकशी ---------- (अः).

**ख. खालील वाक्ये कंसातील सूचनेप्रमाणे बदलून लिहा. (५ गुण)**

अ. “तुम्हाला ६% दराने व्याज मिळालं. तुम्ही ठेवीची मुदत वाढवली का?” (चालू वर्तमानकाळ)

------------------------------------------------------------------------

आ. तुम्ही चांगलं काम करता म्हणून ग्राहक खूश होतात. (साधा भूतकाळ)

------------------------------------------------------------------------

इ. शिवकुमारने स्टेटमेंट केले आणि तपासून दिले. (चालू भूतकाळ)

------------------------------------------------------------------------

ई. कदम वैतागले कारण त्यांना भूक लागली. (पूर्ण भूतकाळ)

------------------------------------------------------------------------

उ. एक तारखेला बँकेत गर्दी असते कारण तो पगाराचा दिवस असतो. (साधा भविष्यकाळ)

------------------------------------------------------------------------

**ख. योग्य ठिकाणी पुढीलपैकी योग्य शब्द भरून वाक्ये पूर्ण करा. (४ गुण)**

(पेक्षा, सर्वांत, हून, मध्ये)

अ. बँकेतील विविध कामांमध्ये ---------------- अवघड काम कोणतं आहे असं तुम्हाला वाटतं?

आ. कॅशियरच्या कामा---------------- बचत विभागाचं काम सोपं आहे असं तुम्हाला वाटतं का?

इ. मला वाटतं की बचत विभाग आणि कॅशियरच्या कामा---------------- कॅशियरचे काम जास्त जोखमीचे आहे.

ई. पण कर्जविभागाचे काम त्या---------------- जोखमीचे आहे.

**ग. बँकेतील विभागांपैकी कोणतेही तीन विभाग व त्यांची प्रत्येकी दोन कामे लिहा.** **(६ गुण)**

| विभाग | (१) --------------- | (२) --------------- | (३) --------------- |
| --- | --- | --- | --- |
| कामे | ---------------- | ---------------- | ---------------- |

**घ. खालील धनादेशांमधील रक्कम अक्षरांत लिहा.** **(४ गुण)**

४४,८०० ----------------------------

२,५७,५३४ ----------------------------

५०,६५,६२३ ----------------------------

११,९८,५९,२६९ ----------------------------

**च. नामाचे अयोग्य विशेषण खोडा.** **(३ गुण)**

अ. योजना – फायदेशीर, जुनी, पारदर्शक, लख्ख

आ. माहिती – अचूक, पुरेशी, स्वच्छ, चांगली

इ. केबिन – स्वच्छ, खमंग, रंगीत, लख्ख

ई. कर्मचारी – कामसू, आळशी, योग्य, धोधो

उ. सहकारी – हिरवागार, तत्पर, जुना, वाईट

ऊ. ग्राहक – अशिक्षित, शहाणा, भव्य, शांत

**छ. खालील शब्दांमधील संबंध ओळखून रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **(३ गुण)**

अ. प्रामाणिक : प्रामाणिकपणा :: दानशूर : ----------------------

आ. स्वच्छ : स्वच्छता :: सुरक्षित : ----------------------

इ. इमानदार : इमानदारी :: जबाबदार : ----------------------

ई. गंभीर : गांभीर्य :: शूर : ----------------------

उ. मित्र : मित्रत्व :: शत्रू : ----------------------

ऊ. गाव : गावोगावी :: देश : ----------------------

**ज. खालील उत्तरांचे प्रश्न लिहा.** **(५ गुण)**

अ. मी रत्नागिरीचा. ------------------------------

आ. बोट क्लब रोडला आमची शाखा आहे. ------------------------------

इ. बँक सकाळी ९.३०ला उघडते. ------------------------------

ई. श्री॰ दामले या शाखेचे शाखाप्रबंधक आहेत. ------------------------------

उ. तुमच्या व्याजाची मुदत या महिन्यात संपत आहे. ------------------------------

**झ. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे खालील वाक्ये आज्ञार्थात लिहा.** **(५ गुण)**

| | **तुम्ही / आपण** | **तू** |
|---|---|---|
| अ. आपला पासवर्ड नियमितपणे बदलणे | आपला पासवर्ड नियमितपणे बदला. | आपला पासवर्ड नियमितपणे बदल. |
| आ. आपला पासवर्ड शक्य तितका सोपा ठेवणे | | |
| इ. ऑनलाईन बँकिंग सत्र पूर्ण झाल्यावर त्यातून योग्य पद्धतीने लॉगआऊट करून बाहेर पडणे | | |
| ई. वारंवार आपले खाते तपासणे | | |
| उ. सार्वजनिक ठिकाणी असलेले संगणक वापरताना विशेष काळजी घेणे | | |
| ऊ. मोबाईल नोटिफिकेशनच्या सुविधेचा वापर करणे | | |

**ट. कोणती ठेव / योजना ते लिहा.** **(६ गुण)**

अ. श्री. पाठक, वय वर्षे ६५ यांच्यासाठी सुयोग्य योजना – ------------------------------

आ. काटदरे यांना पेन्शन मिळत नाही. त्यांना दर महिन्याला पेन्शनसारखे पैसे मिळतील अशी ठेव योजना – ------------------------------

इ. श्रीमती देशमुख यांना वर्षातून चार वेळा व्याज मिळेल अशी ठेव सुचवा – ------------------------------

ई. श्रीमती काळे यांच्या नोकरीत त्यांना भविष्य निधीची सुविधा नाही. ही सुविधा मिळण्यासाठी त्यांना कोणती योजना सुचवाल? – -------------------------

उ. श्री. खोपडे यांना वर्षातून दोन वेळा व्याज मिळेल अशी ठेव सुचवा – ------------------------------

ऊ. श्री. पवार यांना मुदतीनंतर ठेवीची रक्कम आणि व्याज एकत्रच हवे आहे. – ------------------------------

**ठ. कंसातील शब्दांपैकी योग्य तो शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.** **(४ गुण)**

(आत्ता, शिवाय, नंतर, आधी, सह / सकट, करता / साठी)

आत्ता या मंदीच्या काळात उद्योगधंदे सुरू होणं महत्त्वाचं आहे. ---------------------- (अ) पुरामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान कसे भरून येईल याचाही विचार ताबडतोब करणं गरजेचं आहे. ---------------------- (आ) जर शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली तर __________________ (इ) बँकांची आर्थिक स्थिती कमकुवत होईल. म्हणून __________________ (ई) शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीचा अंदाज बांधणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्या---------------------- (उ) पावले उचलली पाहिजेत. नव्या येणाऱ्या उद्योगांमुळे अर्थव्यवस्थेला किती चालना मिळेल याचा आढावा घेतल्या---------------------- (ऊ) सर __________________ (ए) परवानग्या देऊ नयेत असे मत स्थानिक नेत्यांनी व्यक्त केले. उद्योगपतींसह झालेल्या सर्व बँकांच्या सभेत अर्थव्यवस्थेला चालना देण्या---------------------- (ॲ) काय उपाययोजना करता येतील यावर चर्चा झाली.

**ड. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरा.** **(४ गुण)**

(जेव्हा-तेव्हा, जसा-तसा, जर-तर, जरी-तरी)

अ. --------------- सध्याचा काळ कर्जवसुलीसाठी प्रतिकूल असला --------------- कर्जवसुली चालू राहील.

आ. उद्यापासून --------------- कोणी उशिरा आले --------------- त्यांचा अर्धाच दिवस धरला जाईल.

इ. --------------- आर्थिक व्यवहार चालू राहतील आणि बँकिंग प्रणाली मजबूत होईल --------------- अर्थव्यवस्था रुळावर येईल.

ई. --------------- शाखाप्रमुख --------------- कर्मचारी.

**ढ. योग्य अव्यय वापरून रिकाम्या जागा भरा.** **(४ गुण)**

(आणि, पण / परंतु, की / किंवा, म्हणून, त्यामुळे)

शिवकुमार ------------------ साबळे कर्जवसुलीच्या मोहिमेवर बाहेर पडले. निघताना दोन कर्जदारांना फोन करण्याचा प्रयत्न केला ------------------ कोणीही फोन उचलला नाही म्हणून त्यांनी सरळ कारखान्यावरच जायचे ठरवले. प्रत्यक्ष गेल्यावर त्यांना दिसले ------------------ कारखाना चालू नाही ------------------ तिथे कोणी माणूसही नाही. आता काय करावे हे साबळ्यांच्या लक्षात येईना ------------------ आज कागदपत्रांवर कर्जदाराच्या सह्या घेणे आवश्यक होते ------------------ ते तिथेच दोन मिनिटे उभे राहिले. मग शिवकुमारने सुचवले ------------------ त्यांनी त्या कर्जदाराच्या पत्नीला फोन लावला ------------------ सगळ्या परिस्थितीचा उलगडा झाला.

**त. योग्य पर्याय निवडा.** **(४ गुण)**

अ. ------------------ जरा मदत करता का?

(१) मी (२) माझी (३) मला

आ. मी उद्या बांदलांकडे जाणार आहे. ------------------ काही गुंतवणूक करायची आहे.

(१) त्याला (२) त्यांना (३) ते

इ. ------------------ मुदतठेवीची मुदत संपत आली की मी रक्कम काढेन.

(१) मला (२) माझ्या (३) माझी

ई. ------------------ येत्या कार्यशाळेची बरीच तयारी करायची आहे.

(१) आपल्याल्या (२) आपल्या (३) आपली

उ. ------------------ पावसाळी सहलीचं बजेट झालं मंजूर.

(१) आपल्याल्या (२) आपल्या (३) आपली

ऊ. भोसले साहेब, नवीन आहे तो. नीट समजावून सांगा ------------------.

(१) त्याचं (२) त्यांना (३) त्याला

ए. ------------------ काही तक्रारी असतील तर त्या व्यवस्थापनाला सांगा.

(१) तुमच्या (२) तुम्हाला (३) तुमची

ॲ. ------------------ म्हणणं तरी ऐकून घ्या.

(१) त्यांना (२) त्यांची (३) त्यांचं

**ढ. कंसातील क्रियापदांपैकी योग्य ते क्रियापद निवडा आणि क्रियापदाला 'ताना' प्रत्यय लावून रिकाम्या जागा भरा. (३ गुण)**

(शिंकणे, करणे, गुंतवणे, देणे, कमावणे, खोकणे)

अ. काम ------------------ ताण येणारच. तो कसा हाताळायचा हे आपल्या हातात असतं.

आ. ------------------, ------------------ तोंडावर रुमाल धरावा.

इ. पैसे ------------------ ते कसे गुंतवायचे ह्याचाही विचार करावा.

ई. म्युच्युअल फंडात पैसे ------------------ योग्य ती काळजी घ्यावी.

उ. कर्ज ------------------ बँक कर्जदाराची परतफेडीची क्षमता लक्षात घेते.

# उत्तरे

## पाठ १

| प्रश्न क्र. | उपप्रश्न क्र. | प्रश्न क्रमांक आणि उत्तरे |
|---|---|---|
| १ | ख. | अ. ३, आ. १, इ. २ |
| २ | ग. | अ. मी, आ. ऐ, इ. घे, ई. खा, उ. ए, ए. अ, ॲ. से, ऐ. आ, ओ. व |
| | घ. | पैसे, कसे, खाते, नाते, नाव, नाक |
| ३ | घ. | अ. त्या, आ. ते, इ. तो, ई. ती, उ. ते |
| | च. | अ. तुम्ही, आ. मी, इ. त्या, ई. ते, उ. तू, ऊ. तुम्ही, आपण, ए. ते |
| ४ | घ. | अ. बचत विभाग, आ. कर्ज विभाग, इ. क्लिअरिंग विभाग, ई. बचत विभाग, उ. रोखीचे व्यवहार विभाग, ऊ. मुदत ठेव विभाग, ए. रोखीचे व्यवहार विभाग |
| | ज. | १. ई, २. आ, उ, ३. इ, ४. अ, ५. आ |
| | झ. | अ. काय, आ. कुठे, इ. कोण, ई. काय, उ. काय |
| ५ | ख. | अ. दोन, आ. तीन, इ. पाच, ई. सात, उ. दहा, ऊ. अकरा, ए. पंधरा, ॲ. वीस |
| | ग. | अ. सहा, आ. दहा, इ. बारा, ई. पाच |
| ६ | ख. | अ. ब् + ज = ब्ज, आ. च् + छ = च्छ, इ. न् + न = न्न, ई. क् + ट = क्ट, उ. श् + न = श्न |
| | घ. | अ. स् + वा = स्वा, आ. न् + सि = न्सि, इ. म् + या = म्या, उ. स् + पॅ = स्पॅ ऊ. ग् + लि = ग्लि |
| | छ. | अ. फ् + रां = फ्रां, आ. र् + ष = र्ष, इ. त् + र = त्र, ई. ट् + रॅ = ट्रॅ, उ. र् + या = ऱ्या |
| | ज. | १. का, २. ह, ३. शि, ४. रा, ५. ने, ६. शा, ७. पा, ८. मॅ, ९. पं, १०. लॉ, ११. ठे, १२. रो, १३. र, १४. पै, १५. स्टा |
| | झ. | अ. स्टा, आ. पै, इ. मॅने, ई. पं---रा, उ. पं, ऊ. का, ए. लॉ---र, ॲ. रो, ऐ. ठे, ओ. शिपा |

## पाठ २

१ **ख.** अ. ३, आ. २, इ. ३, ई. १, उ. २, ऊ. ३

**घ.** अ. १८ आ. ३१ इ. २४ ई. ३९ उ. ३८

**ज.** अ. एक हजार बारा, आ. पाच हजार पाचशे पंचवीस, इ. दोनशे एक्याण्णव, ई. दहा हजार चारशे एकोणीस, उ. अकरा लाख चव्वेचाळीस हजार तीनशे पंचावन्न.

**झ.** अ. २९८९, आ. १८,३२९, इ. ५०,०१७, ई. ७३,००,०८१, उ. १,५७,००,८४०

**ड.** अ. ४, आ. ६, इ. २, ई. ५, उ. ७, ऊ. ८, ए. १, ॲ. ३

२ **ख.**

| | | |
|---|---|---|
| मी | बघतो / बघते | देतो / देते |
| आम्ही / आपण | बघतो | देतो |
| तू | बघतोस / बघतेस | देतोस / देतेस |
| तुम्ही / आपण | बघता | देता |
| तो | बघतो | देतो |
| ती | बघते | देते |
| ते | बघते / बघतं | देते / देतं |
| ते / त्या / ती | बघतात | देतात |

**ग.** अ. करतो / करते, आ. बघतो, इ. आहेत, ई. सांगतात, उ. दाखवतात, ऊ. वाचतात

**घ.** अ. मी बँकेत मुदतठेवींचे काम बघते. आ. मी बँकेत व्यवहारांच्या नोंदी करते.
इ. मी बँकेत रोख पैसे देतो. ई. तो बँकेत रोख पैसे स्वीकारतो.
उ. त्या बँकेत ग्राहकांना मदत करतात. ऊ. ते बँकेत ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरे देतात.
ए. मी बँकेच्या सर्व कामकाजावर लक्ष ठेवतो / ठेवते.

**च.**

लपंडाव
कळीमध्ये लपते (ते) फूल;
फुलामध्ये लपते (ती) बी;
बियांमध्ये लपते (ते) झाड;
नारळामध्ये लपतो (तो) माड.
दर्यामध्ये लपतो (तो) ढग;
ढगामध्ये -लपते (ती) नदी;
नदीमध्ये लपते (ते) पाणी;
गळ्यामध्ये लपतात (ती) गाणी (अ॰ व॰).
या खेळाचे सांगा नाव:
'लपंडाव! लपंडाव!'
- विंदा करंदीकर
(कवितासंग्रह : सशाचे कान)

३ **ख.** अ. चार वाजले, आ. दहा वाजले, इ. बारा वाजले, ई. पाच वाजले,
उ. सात वाजले, ऊ. आठ वाजले

ग. अ. चार वाजून पंचेचाळीस मिनिटे झाली आहेत. आ. सव्वादोन वाजले आहेत. दोन वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. इ. साडेपाच वाजले आहेत. पाच वाजून तीस मिनिटे झाली आहेत. ई. पावणेअकरा वाजले आहेत. दहा पंचेचाळीस झाले आहेत. अकराला पंधरा मिनिटे बाकी आहेत. उ. दोन वाजायला तीस मिनिटे बाकी आहेत. ऊ. सव्वादहा झाले आहेत. दहा वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. ए. बाराला दहा मिनिटे कमी आहेत. अकरा वाजून पन्नास मिनिटे झाली आहेत. अकरा पन्नास झाले आहेत. ॲ. साडेआठ वाजले आहेत. आठ वाजून तीस मिनिटे झाली आहेत. आठ तीस झाले आहेत. ऐ. सहा वाजून चाळीस मिनिटे झाली आहेत. सहा चाळीस झाले आहेत. सातला वीस मिनिटे बाकी आहेत.

घ. अ. १. ग, २. क, ३. ख, ४. ग, ५. ख

घ. आ. १.३०, १.४५, ३० मि., २.१५, २.३०, २.२५, २.५०, ४.१५, ४.३०

४ ग. अ. राहा, आ. घ्या, इ. लिहा, ई. राहा, उ. बोलू नका, ऊ. वाचा

घ. अ. १. ख, २. ग, ३. घ, ४. क

च. आ. पैसे मोजून घ्यावेत. इ. पैसे काढण्याच्या स्लिपवर खाते क्रमांक लिहावा.
ई. खिसेकापूंपासून सावध राहावे. उ. मोबाईलवर बोलू नये.
ऊ. फलकावरच्या सूचना वाचाव्या(त).

छ. अ. सगळ्यांनी बँकेत वेळेवर यावे. आ. ग्राहकांना सगळी माहिती नीट द्यावी.
इ. बँकेत मोबाईल बंद ठेवावा. ई. ग्राहकांनी रांगेत उभे राहावे, गर्दी करू नये.
उ. शिवकुमार, तुम्ही मराठी शिकावे. ऊ. जोसेफ, खुर्चीत बसून झोपू नये.
ए. गायकवाड, कामाचा कंटाळा करू नये. ॲ. सांगितलेली सगळी कागदपत्रे आणावीत.
ऐ. फॉर्म नीट भरावा. ऑ. चोरांपासून सावध राहावे.

५ क. अ. ९, आ. ४, इ. १, ई. ७, उ. ६, ऊ. ८, ए. ५, ॲ. २, ऐ. ३

ख. १. करत, २. रागवत, ३. करत, ४. बसत, ५. भरत, ६. जात, ७. वाचत, ८. पडत

छ.

| | |
|---|---|
| मी पैसे मोजत आहे / मोजतोय. | ---आम्ही / आपण पैसे मोजत आहोत / मोजतोय. |
| -तू पैसे मोजत आहेस / मोजतोयस | -तुम्ही / आपण पैसे मोजत आहात / मोजताहात. |
| --तो पैसे मोजत आहे / मोजतोय | --ते पैसे मोजत आहेत / मोजतायत. |
| -ती पैसे मोजत आहे / मोजतेय.<br>ते पैसे मोजत आहे. / मोजतंय. | त्या पैसे मोजत आहेत / मोजतायत.<br>ती पैसे मोजत आहेत / मोजतायत. |

ज. अ. मोजतोय / मोजतेय, आ. भरतोय, इ. देतायत, ई. राहतायत, उ. करतोय, ऊ. लावतोय

झ. अ. खात आहे / खातोय, आ. करत आहे / करतोय, इ. ओरडत आहे / ओरडतेय,
ई. भुंकत आहे / भुंकतोय, उ. उडत आहेत / उडतायत.

ट. अ. स. ९ वाजता बँक उघडत आहे.
आ. सर्व कर्मचारी ९.३० पासून काम करत आहेत.
इ. बबन चहा आणत आहे.
ई. सगळे चहा पीत आहेत.
उ. शाखाप्रबंधक कर्मचाऱ्यांना सूचना देत आहेत.
ऊ. शिपाई ग्राहकांना रांगेत उभे राहायला सांगत आहेत.
ए. बँकेच्या सुट्टीमध्ये शिपाई मोबाईलवर गाणी ऐकत आहेत.
ॲ. बँकेच्या मुख्य कार्यालयातून सतत फोन येत आहेत.

## पाठ ३

१ ग. अ. कर्मचारी दरवाजापुढे आहे. आ. कर्मचारी खिडकीजवळ / खिडकीपाशी आहे.
इ. कर्मचारी कुलरजवळ / कुलरपाशी आहे. ई. कर्मचारी फाईलींच्या ढिगाऱ्याखाली आहे.
उ. कर्मचारी टेबलामागे खुर्चीवर बसला आहे.

घ. अ. २, आ. १, इ. ४, ई. ३

च. २. इमारत चौकापलीकडे आहे. ३. सायकलवाला पादचारी मार्गावर आहे.
४. ट्रक चौकात उजव्या बाजूला आहे. ५. दुकाने इमारतीखाली आहेत.
६. जाहिरात बिल्डिंगवर आहे. ७. जिलबीवाला फळांच्या दुकानाजवळ आहे.
८. फळवाला चौकासमोर आहे. ९. बस चौकात डाव्या बाजूला आहे.
१०. मोटारसायकली पोलिसासमोर आहेत.

ज. अ. डेबिट कार्ड, आ. क्रेडिट कार्ड, इ. क्रेडिट कार्ड, क्रेडिट कार्ड, उ. डेबिट कार्ड

२ क. अ. By INTT : जमा व्याज, To CLG : डेबिट क्लिअरिंग
आ. खाडाखोड चालत नाही., चेकची सुरक्षितता : चेक क्रॉस करा.
इ. खाते क्रमांक : पासबुकात बघून लिहा., नोटांचे विवरण : न चुकता लिहा. पैसे भरण्याच्या स्लिपवर मोबाईल क्रमांक लिहा.

३ ख.

| सर्वनामे | क्रियापदे | | |
|---|---|---|---|
| | साधा भूतकाळ | मूळ रूप | साधा वर्तमानकाळ |
| तू | होतास | होणे (असणे) | आहेस |
| आम्ही | होतो | होणे (असणे) | आहोत |
| मी | जन्मलो | जन्मणे | जन्मतो |
| आम्ही | आलो | येणे | येतो |
| आम्ही | झालो | होणे | होतो |
| मी | गेलो | जाणे | जातो |

घ.

| सर्वनामे | येणे (साधा वर्तमानकाळ) | येणे (साधा भूतकाळ) | जाणे (साधा वर्तमानकाळ) | जाणे (साधा भूतकाळ) |
|---|---|---|---|---|
| मी (पु॰) | येतो | आलो | जातो | गेलो |
| मी (स्त्री॰) | येते | आले | जाते | गेले |
| आम्ही / आपण | येतो | आलो | जातो | गेलो |
| तू (पु॰) | येतोस | आलास | जातोस | गेलास |
| तू (स्त्री॰) | येतेस | आलीस | जातेस | गेलीस |
| तुम्ही / आपण | येता | आलात | जाता | गेलात |
| तो | येतो | आला | जातो | गेला |
| ती | येते | आली | जाते | गेली |
| ते | येते / येतं | आले / आलं | जाते / जातं | गेले / गेलं |
| ते | | आले | | गेले |
| त्या | येतात | आल्या | जातात | गेल्या |
| ती | | आली | | गेली |

**झ. अ.** १. केले, २. पाडली, ३. झाला, ४. घेतली, ५. होते, ६. झाली

**झ. आ.** १. झाल्या, २. केले, ३. केली, ४. झाल्या, ५. केली, ६. मिळाले, ७. केले

**ट.** १. होता, २. होती, ३. ठरवले, ४. म्हणाला, ५. केला, ६. आणला, ७. भरली, ८. टाकले, ९. घेतला, १०. सुचले, ११. होता, १२. आणल्या, १३. आणले, १४. आणल्या, १५. लावल्या, १६. भरली, १७. भरले, १८. झाले, १९. वाटले

**ड.**

| सर्वनामे | पूर्ण वर्तमानकाळ | |
|---|---|---|
| | लिहिताना | बोलताना |
| मी (पु॰) | जेवलो आहे | जेवलोय |
| मी (स्त्री॰) | जेवले आहे | जेवलेय |
| आम्ही / आपण | जेवलो आहोत | जेवलोत |
| तू (पु॰) | जेवला आहेस | जेवलायस |
| तू (स्त्री॰) | जेवली आहेस | जेवलीयस |
| तुम्ही / आपण | जेवला आहात | जेवलाहात |
| तो | जेवला आहे | जेवलाय |
| ती | जेवली आहे | जेवलीय |
| ते | जेवले / जेवलं आहे | जेवलंय |
| ते | जेवले आहेत | जेवलेयत |
| त्या | जेवल्या आहेत | जेवल्यायत |
| ती | जेवली आहेत | जेवलीयत |

**ढ.** अ. बोलत आहात, आ. घेतो, इ. झाली आहे, ई. करत आहेत, उ. आले, ऊ. गेली आहेत, ए. शिकला आहे, ॲ. आहे, ऐ. ठेवतो.

**न.** अ. पाऊस पडला, आ. चिखल उडला, इ. वाहतूक हळूहळू पुढे सरकली, ई. फोनची घंटा वाजली, उ. त्याने चित्रपट पाहिला, ऊ. तो फोनवर मित्राशी बोलला, ए. शिवकुमारने पोहे परतले.

४ **घ.** अ. मोठे, आ. चांगले, इ. चांगले, ई. भव्य, उ. खूप, ऊ. गोड, ए. आकर्षक, ॲ. सुंदर, ऐ. गरमागरम, ओ. नव्या

**च.**

| | बँक | खाते | ग्राहक (अ॰व॰) | मेळावा |
|---|---|---|---|---|
| नवा | नवी | नवे / नवं | नवे | नवा |
| हुशार | हुशार | हुशार | हुशार | हुशार |
| चकाचक | चकाचक | चकाचक | चकाचक | चकाचक |
| बोलका | बोलकी | बोलके / बोलकं | बोलके | बोलका |

छ. १. लख्ख, स्वच्छ, शांत, रंगीत, जरासा, योग्य
२. तत्पर, आळशी, शांत, काटेकोर, नवा, जुना, शहाणा, अशिक्षित इ॰
३. मस्त, खमंग
४. स्वच्छ, नीटनेटकं, लाकडी, रंगीत
५. जुनी, हिरवीगार, पुरेशी
६. लाल, लख्ख, रंगीत, लख्ख
७ स्वच्छ, नीटनेटका, घाणेरडा
८. धोधो, मस्त, जरासा, फार
९. योग्य, काटेकोर, अचूक, पुरेशी
१०. स्वच्छ, मळका, फाटका, कोरा, घाणेरडा, रंगीत
११. तत्पर, कामसू, आळशी, शांत, जुने, शहाणे
१२. वाईट, घाणेरडे, सुंदर
१३. गोड, मस्त, गरम
१४. स्वच्छ, गोड, शुद्ध, वाहणारे, पारदर्शक
१५. स्वच्छ, मळक्या, फाटक्या, जुन्या, कोऱ्या, घाणेरड्या, योग्य, पुरेशा
१६. अचूक, काटेकोर, योग्य
१७. स्वच्छ, नीटनेटकी, शांत, पारदर्शक, घाणेरडी, जुनी

ज. अ. १. चूक, २. बरोबर, ३. चूक, ४. बरोबर, ५. चूक

## पाठ ४

१ ग. अ. ग्राहकहो, तुम्हाला काय पाहिजे?
आ. आम्हाला कर्जमाफी हवी आहे.
इ. कर्मचाऱ्यांना बोनस हवा आहे.
ई. सर्वांना बँकेत चांगलं वातावरण हवं आहे.
उ. शिवकुमार, तुम्हाला कम्प्युटर पाहिजे का?
ऊ. किमया, तुम्हाला किती कॅश हवी?

घ. अ. साबळेसाहेबांना फाईल लगेच हवी आहे.
आ. कांबळेंना व्याजाची रक्कम हवी आहे.
इ. ग्राहकांना बँकेत पाणी हवे आहे.
ई. सर्वांना आत्ता चहा हवा आहे.
उ. त्यांना मुदतठेवींचे व्याजाचे दर हवे आहेत.
ऊ. "सातपुतेबाई, इथे पासबुके हवीत."
ए. बाहेर ग्राहकांना बसण्यासाठी खुर्च्या हव्या आहेत.
ॲ. बँकेच्या आवारात सावलीसाठी झाडे लावायला हवी आहेत.
ऐ. पाणी कोणाला हवंय?
ओ. पासबुक कोणाला भरून हवे आहे?

ज. अ. तुम्ही खात्यातील रक्कम बघू शकता.
आ. तू ऑनलाईन खरेदी करू शकतोस / शकतेस.
इ. आपण मोबाईलवरून बिलं भरू शकता.
ई. त्या पैसे पाठवू शकतात.
उ. तो रेल्वेचे तिकिट काढू शकतो.

**झ.** काय करावे गट : आ. इ. ई. ए. ॲ.
काय करू नये गट : अ. उ. ऊ. ऐ.

**ट.** अ. आपला पासवर्ड शक्य तितका सोपा ठेवावा.
आ. आपले ऑनलाईन बँकिंग सत्र पूर्ण झाल्यावर त्यातून योग्य पद्धतीने लॉगआऊट करून बाहेर पडावे.
इ. आपला इंटरनेट बँकिंग पासवर्ड गोपनीय ठेवावा.
ई. वारंवार आपले खाते तपासावे.
उ. बँकेकडून आलेली पिन, पासवर्ड अशी माहिती असलेली कागदपत्रे जपून ठेवावीत.
ऊ. असुरक्षित साईट्स वरून विविध सॉफ्टवेअर्स, प्रोग्रॅम्स डाऊनलोड करू नयेत.
ए. सार्वजनिक ठिकाणचे संगणक वापरताना विशेष काळजी घ्यावी.
ॲ. मोबाईल नोटिफिकेशनच्या सुविधेचा वापर करावा.
ऐ. जर बँकेचे अधिकारी फोनवर पिन, पासवर्ड विचारत असतील तर तो सांगू नये.

२ **ग.** अ. तो फोल्डर – निळा, आ. ती डायरी – काळी, इ. ती दरवाजाची मूठ – सोनेरी,
ई. ते कागद – पांढरे, उ. ते टेबल – तपकिरी, ऊ. ती पर्स – पिवळी,
ए. ते घड्याळ – नारिंगी, ॲ. पाकीट – राखाडी

३ **ग.**

| सर्वनामे | बसणे (साधा भूतकाळ) |
|---|---|
| मी (पु॰) | बसलो होतो |
| मी (स्त्री॰) | बसले होते |
| आम्ही / आपण | बसलो होतो |
| तू (पु॰) | बसला होतास |
| तू (स्त्री॰) | बसली होतीस |
| तुम्ही / आपण | बसला होतात |
| तो | बसला होता |
| ती | बसली होती |
| ते | बसले होते / बसलं होतं |
| ते | बसले होते |
| त्या | बसल्या होत्या |
| ती | बसली होती |

घ.

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण, तुम्ही / आपण / | ए॰व॰ | कागद ठेवला होता | फाईल ठेवली होती | पेन ठेवले / होते / ठेवलं होतं |
| त्याने / त्यांनी, तिने / त्यांनी, त्याने / त्यांनी | अ॰व॰ | कागद ठेवले होते | फाइली ठेवल्या होत्या | पेने ठेवली होती |
| तू | ए॰व॰<br>अ॰व॰ | कागद ठेवला होतास<br>कागद ठेवले होतेस | फाईल ठेवली होतीस<br>फाइली ठेवल्या होत्यास | पेन ठेवले होतेस<br>पेने / पेनं ठेवली होतीस |

च. अ. केले होते, आ. दिली होती, इ. बसल्या होत्या, ई. साठवले होते, उ. झाले होते, ऊ. आवडले होते, ए. म्हणाले होते, ॲ. म्हणाली होती, ओ. होती, ऑ. केले होते

छ. बँकेत खूप गर्दी झाली होती. एकूण कर्मचाऱ्यांपैकी तीन कर्मचारी रजेवर होते. मॅनेजरसाहेबांना भेटायला एक मोठे उद्योजक आले होते. त्यामुळे ते फारच कामात होते. साबळेंनी एक काम शिवकुमारला ताबडतोब करायला सांगितले होते. इथे काउंटरला ग्राहकांनाही काम लवकर करून हवे होते. कुठले काम आधी करावे हे त्याला कळले नव्हते. जेवणाची सुट्टी झाली तरी गर्दी कमी झाली नव्हती. त्याने प्रशांत जेधेला मदतीला बोलावले होते. त्यात वीज गेल्यामुळे कम्प्युटर बंद पडले होते. सगळे लोक वीज येण्याची वाट पाहत थांबले होते.

४ ख. अ. तिचे, आ. त्याचा, इ. त्यांची, ई. आमची, उ. तुमचे, ऊ. माझा, ए. तिचे

ग. १. माझे, २. चे, ३. आमची, ४. तुमचा, ५. त्यांची, ६. तुमचं

५ घ.

| नाम / एकवचन | अनेकवचन | ए॰व॰सा॰रू॰ | अ॰व॰सा॰रू॰ |
|---|---|---|---|
| ती चोरी | त्या चोऱ्या | चोरी- | चोऱ्यां- |
| ती गोष्ट | त्या गोष्टी | गोष्टी- | गोष्टीं- |
| ती मदत | --- | मदती- | --- |
| ती पद्धत | त्या पद्धती | पद्धती- | पद्धतीं- |
| ते शिक्षण | --- | शिक्षणा- | --- |
| तो दिवस | ते दिवस | दिवसा- | दिवसां- |
| तो व्यवहार | ते व्यवहार | व्यवहारा- | व्यवहारां- |
| ते व्याज | ती व्याजे | व्याजा- | व्याजां- |

| | | | |
|---|---|---|---|
| ते खाते | ती खाती | खात्या- | खात्यां- |
| तो दुसरा | ते दुसरे | दुसऱ्या- | दुसऱ्यां- |
| ती बँक | त्या बँका | बँके- | बँकां- |

**च.** अ. पुस्तकाची, आ. ग्राहकांची, इ. केबिनचा, उ. पत्राचा, ऊ. भाषणाची
ॲ. गायकवाडबाईंचं, ऐ. दरवाजाचे, ओ. कोणाची

**छ.** अ. ग्राहकांची, आ. कर्मचाऱ्यांची, इ. रोखपालाची, ई. लोकांची, उ. तिजोरीचे, आमचे,
ऊ. शिवकुमारचे, ए. बँकेचे

**झ.** अ. प्रस्तुत परिपत्रक बँकेच्या शाखा व व्यवस्थापकीय कार्यालये यांना उद्देशून आहे.
आ. १६ जाने. ते ३१ जाने. २०१९ या काळात स्वच्छता पंधरवडा पाळणे हा परिपत्रकाचा विषय आहे.
इ. स्वच्छता पंधरवडा पाळण्याची सूचना प्रादेशिक कार्यालयाने केली आहे.
ई. परिपत्रक उप मुख्यप्रबंधक आणि मुख्यप्रबंधक यांनी पाठवले आहे.
उ. स्वच्छता पंधरवडा पूर्ण झाल्यावर त्याचा साद्यंत अहवाल २ फेब्रुवारी २०१९च्या आत प्रादेशिक कार्यालयाला पाठवायचा आहे.

**ट.** अ. पंधरवडा, आ. निवासी परिसर, इ. मोहीम, ई. अभियान, उ. विल्हेवाट लावणे,
ऊ. उल्लेखनीय, ए. स्पष्ट, ॲ. कालबाह्य, ऐ. साद्यंत

## पाठ ५

१ **ग.**

| सर्वनामे | येणे | होणे | करणे | बसणे |
|---|---|---|---|---|
| मी (पु.)<br>मी (स्त्री.) | येईन | होईन | करेन / करीन | बसेन / बसीन |
| आम्ही / आपण | येऊ | होऊ | करू | बसू |
| तू (पु.)<br>तू (स्त्री.) | येशील | होशील | करशील | बसशील |
| तुम्ही / आपण | याल | व्हाल | कराल | बसाल |
| तो<br>ती<br>ते | येईल | होईल | करेल | बसेल |

१ ग.

| ते | येतील | होतील | करतील | बसतील |
|---|---|---|---|---|
| त्या | | | | |
| ती | | | | |

झ. अ. आणेल, आ. मिळेल, ई. करू, उ. होईल, ऊ. भरेन / भरीन, ए. होईल, वाढेल, ॲ. वाढेल, ऐ. काढेन / काढीन, देईन, ओ. करशील

२ ख. अ. तिमाही ठेव, आ. मासिक ठेव, इ. सहामाही ठेव, ई. संचित ठेव

च. अ. होईल, आ. होईल, इ. देतील, ई. विचारतील, उ. येईल, ऊ. करतील, ए. मिळेल, ॲ. जाऊ

छ. अ. होईल, आ. जाईल, इ. होतील, ई. मिळणार नाहीत, उ. शकाल, ऊ. येईल, ए. करेन, ॲ. वाचेन, घेईन, ऐ. करू, ओ. होईल, ऑ. समजेल

ज. अ. उठणार, आ. करणार, इ. खाणार, ई. बघणार, उ. जाणार, ऊ. मारणार, ए. करणार, ॲ. झोपणार

ड. अ. नंतर, आ. आधी, इ. शिवाय, ई. नंतर, उ. सह

ढ. अ. नंतर, आत्ता, आ. शिवाय, इ. आधी, नंतर, ई. शिवाय, उ. शिवाय, ऊ. आत्ता, ए. नंतर, ॲ. नंतर, ऐ. आत्ता, ओ. सह, ऑ. सकट

ण. अ. २, आ. ४, इ. १, ई. ३

३ ग. अ. ५, आ. ४, इ. १, ई. २, उ. ३

ख. अ. चूक, आ. चूक, इ. चूक, ई. बरोबर, उ. बरोबर

४ ग. अ. स्पष्टीकरण, आ. आधिसूचना, इ. अन्वये, ई. विद्यमान मालिका, उ. विहित ऊ. वैध चलन, ए. व्याप्ती ॲ. वाणिज्य बँका

## पाठ ६

१ ख. अ. ४, आ. १, इ. ६, ई. २, उ. ३, ऊ. ५

ग. अ. आणि, आ. पण, इ. किंवा, पण, ई. म्हणून, उ. कारण, ऊ. परंतु, ए. आणि, ॲ. आणि

घ. आ + ४ कारण, इ + ७ म्हणून, ई + १४ परंतु, उ + ८ म्हणून, ऊ. + ३ तरीसुद्धा, ए + ९ कारण, ॲ + २ पण, ऐ + ५ म्हणून, ओ + १२ पण, ऑ + १३ कारण, औ + ६ तरीसुद्धा, अं + १० आणि, अः + ११ आणि

च. अ. शिवकुमार मराठीच्या वर्गाला जातो कारण त्याला मराठी शिकायचे आहे.
आ. भोसलेबाईंना दागिने सुरक्षित ठेवायचे होते म्हणून त्यांनी लॉकर घेतला.
इ. मी आज बँकेत येत नाही कारण माझी तब्येत बरी नाही.

ई. जहागिरदारांना मी वयाचा दाखला आणायला सांगितला कारण त्यांना ज्येष्ठ नागरिक बचत योजनेमध्ये गुंतवणूक करायची आहे.
उ. कदमांनी ग्राहकांना रांगेत उभे राहायला सांगितले कारण बँकेत गर्दी झाली होती.
ऊ. चिखल झाला कारण पाऊस पडला.
ए. किमया धावतपळत बँकेत आली कारण उशीर झाला होता.
ॲ. प्रत्येकाची गरज वेगळी असते म्हणून ग्राहक वेगवेगळ्या ठेव योजना निवडतात.
ऐ. प्रिंटर बंद होता त्यामुळे काळेंना खातेउतारा मिळाला नाही.
ओ. जोशींनी एटीएम कार्ड ब्लॉक केले कारण त्यांचे कार्ड हरवले.
ऑ. नोटांचा तपशील लिहिला नव्हता म्हणून कॅशिअरने कांबळेंना स्लिप नीट भरायला सांगितले.
औ. शिवकुमारने सहलीचा बेत ठरवला कारण आज सुट्टी होती.
अं. त्यांची तब्येत बरी नाही म्हणून आज साबळे येणार नाहीत.
अ: सर्व राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधीची योजना राबवली जाते कारण भविष्यनिर्वाह निधीचा लाभ सर्वांना मिळावा हा उद्देश आहे.

**ज.** अ. जर...तर, आ. तर, इ. तर...पण, ई. सुद्धा, उ. तर, ऊ. जर...तर...सुद्धा, ए. ही...सुद्धा, ॲ. जर...तर, ऐ. ही

**झ.** अ. ही, आ. जर, इ. तर, ई. सुद्धा, उ. किंवा, ऊ. सुद्धा, ए. जर, ॲ. तर, ऐ. सुद्धा, ओ. तरीसुद्धा

२ **घ.** अ. त्याला...तिला, आ. त्यांना, इ. ला, ई. ना...ला, उ. मुलाखतीला...तुम्हाला, ऊ. आपल्याला, ए. पाखराला

**ज.** अ. ग्राहकांनी...शी, इ. ने, ई. एकमेकांशी, उ. दराने, ऊ. लोकांनी, ए. ने...सहकाऱ्यांशी त्याने...माशाशी

**झ.** अ. शी, आ. नी, इ. ना, ई. ना, उ. ला, ऊ. नी, ए. शी, ॲ. ने, ऐ. शी, ओ. ला, ऑ. ना, औ. ना, ऋ. ला, ऌ. ला, अं. ना, अ:. शी

३ **घ.** अ. कलकलाट, आ. गलबलाट, इ. कटकट, ई. बडबड, उ. गडबड

५ **ख.** अ. २, आ. ६, इ. ७, ई. १०, उ. ११, ऊ. ३, ए. ४, ॲ. ८

६ **क.**
**अ.** १. सेवाकर, २. अग्रक्रम, ३. खबरदारी, ४. अधिकृत, ५. अधिनियम, ६. थकीत, ७. लेखांकन, ८. वर्गीकरण

**आ.** १. चूक, २. चूक, ३. बरोबर, ४. बरोबर

## पाठ ७

१ **क.** १. उत्साहाने, २. स्वच्छता, ३. दिवाळी, ४. रोषणाई, ५. आकाशकंदील, ६. सौंदर्य, ७. चिवडा, ८. शंकरपाळी, ९. गोडी, १०. धमाल, ११. कमतरता, १२. भाऊबीज, १३. कृतज्ञता, १४. भेटीगाठी, १५. उत्सुकता

**घ.** अ. टिप्परघाई उडाली, आ. आश्चर्ये आहेत, इ. उत्सुकता...पोचली, ई. महत्त्व...करते, उ. मजा...नसतो, ऊ. प्रोत्साहन मिळते, ए. आत्मविश्वास वाढला, ॲ. धमाल केली, ऐ. गुंतवणूक...करावी, ओ. स्वच्छता...आश्चर्य

च.

| तो | ती | ते |
|---|---|---|
| गारवा | लबाडी | समाधान |
| आवाज | अस्वच्छता | |
| विचार | शंका | |
| कलकलाट | उलाढाल | |
| राग | भूक | |
| आनंद | घाबरगुंडी | |
| सुगंध | काळजी | |
| तणाव | शांतता | |
| आरडाओरडा | चव | |
| जाणीव | | |
| दमणूक | | |

छ. अ. प्रोत्साहन, आ. सुरक्षितता, इ. जबाबदारी, ई. जबाबदारी, उ. चालढकल, ऊ. टाळाटाळ, ए. वादावादी, ॲ. भरभराट, ऐ. जाणीव, ओ. उत्साह, ऑ. तणाव, औ. प्रसन्नता, अं. स्वच्छता, अः नीटनेटकेपणा

ज. अ. विश्वासा....जबाबदारी, आ. गारव्या...उत्साहा, इ. दमणुकी...समाधाना, ई. रागा, उ. आश्चर्या, ऊ. थंडी, ए. कलकलाटा, ॲ. भांडणा, ऐ. तणावा, ओ. शंका

ट. अ. दिवाळी, आ. बैलपोळा, इ. मकरसंक्रांत, उ. ईद, ऊ. नागपंचमी

ठ. अ. दिवाळी, बैलपोळा, दसरा, होळी, आ. कुस्त्यांचे फड, लावणी महोत्सव, ई. १. शिवकुमार, २. गायकवाडबाई, ३. सगळे

२ ख. अ. मिसळ, मिरची, मटण रस्सा, बटाटावडा, आ. लाडू, आंबा, खीर, इ. मीठ, ई. मेथी, उ. आवळा, सुपारी, तुरटी, ऊ. लिंबू, कैरी, अननस

ग. अ. साबुदाण्याची खिचडी, आ. बटाटावडा, इ. पुरणपोळी, ई. थालीपीठ, उ. श्रीखंड, ऊ. तळलेला मासा, ए. मोदक, ॲ. कोंबडीवडे, ऐ. शिरा, ओ. पेढे, ऑ. भजी, औ. तांबडा रस्सा, ऋ. मिसळ पाव, अं. खीर, अः. पोहे

च. अ. ३, आ. ५, ई. ६, उ. ७, ऊ. ४, ए. ८, ॲ. २, ऐ. १

छ. अ. कुरकुरीत, खमंग, आ. लुसलुशीत, इ. स्वादिष्ट, ई. चविष्ट, चटकदार, उ. चमचमीत, चटकदार, ऊ. गुलगुलीत, रसरशीत, ए. मधुर, रसरशीत, ॲ. खुमासदार, ऐ. खमंग, गरमागरम, ओ. मसालेदार, चविष्ट, ऑ. लुसलुशीत, मधुर, औ. खुसखुशीत, खुमासदार

३ ग. अ. कधी, आ. कशा, इ. केव्हा, ई. कशात

घ. अ. बँकेत, आ. डब्यात, इ. मिसळीत, उ. गळ्यात, नाकात, हातात, बोटात, पायांत,
ऊ. पायी, ए. दिवसा...रात्री

च. १. आकाशात, २. ढगात, ३. शेतात, ४. मातीत, ५. मातीत, ६. शेतात,
७. पोत्यात, ८. बाजारात, ९. दारात, १०, खिशात, ११. बँकेत, १२. खात्यात,
१३. अर्थव्यवस्थेत, १४. प्रवासात, १५. खात्यात

छ. अ. गावोगावी, आ. घरोघरी, इ. रस्तोरस्ती, ई. क्षणोक्षणी, उ. पानोपानी

ज. आ. पावलोपावली, इ. गल्लोगल्ली, ई. रस्तोरस्ती, उ. क्षणोक्षणी

४ क. आ. अजिंठा-वेरूळ – औरंगाबाद, इ. महालक्ष्मी मंदिर – कोल्हापूर, ई. झिरो मैल – नागपूर,
उ. त्र्यंबकेश्वर – नाशिक, ऊ. महाबळेश्वर, ए. शनिवारवाडा – पुणे,
ॲ. पन्हाळा – कोल्हापूर, ऐ. खंडोबाचे मंदिर – जेजुरी

५ क. १. निष्क्रिय, २. अनिवासी, ३. संपर्क साधणे, ४. सर्वतोपरी, ५. सुदृढ,
अ. ६. संधीचा फायदा घेणे १. निष्क्रिय अनिवासी खाती पुन्हा सक्रिय करणे

आ. २. केवायसी फॉर्म भरून घेणे, खातेदारांना ई-मेल करणे, त्यांच्या नातेवाइकांद्वारे संपर्क साधणे.
३. कमी – खूप, अवघड – सोपे, अनिवासी – स्थानिक, निष्क्रिय – चालू (सक्रिय)

## पाठ ८

१ ख. कर्ज वितरण, गहाणखत, सात बाराचा उतारा, पीक कर्ज, शेतीपूरक उद्योग, बँकेची मालमत्ता (assets)

घ. अ.

| क्रियापद | मूळ धातू | 'ताना' पद लावून झालेले रूप |
|---|---|---|
| १. हाताळणे | हाताळ | हाताळताना |
| २. घेणे | घे | घेताना |
| ३. बोलणे | बोल | बोलताना |
| ४. करणे | कर | करताना |
| ५. भरणे | भर | भरताना |
| ६. उघडणे | उघड | उघडताना |
| ७. पिणे | पी | पिताना |
| ८. जेवणे | जेव | जेवताना |
| ९. बघणे | बघ | बघताना |
| १०. ऐकणे | ऐक | ऐकताना |

घ. आ.

| क्रियापद | मूळ धातू | 'ताना' जोडून |
|---|---|---|
| खाणे | खा | खाताना |
| लिहिणे | लिह | लिहिताना |
| वाचणे | वाच | वाचताना |
| पसरवणे | पसरव | पसरवताना |
| भांडणे | भांड | भांडताना |
| हसणे | हस | हसताना |
| राहणे | राह | राहताना |
| सोडणे | सोड | सोडताना |
| होणे | हो | होताना |

घ. उ. अ. खाताना, आ. लिहिताना, इ. पसरवताना, ई. शिकताना, उ. ओरडताना,
ऊ. बोलताना, ए. ऐकताना, ॲ. चालताना

२ ग. अ. पेक्षा, आ. पेक्षा, इ. सर्वात, ई. मध्ये, उ. मध्ये

घ. आ. मिसिसिपी गंगेपेक्षा मोठी नदी आहे पण ॲमेझॉन सर्वात मोठी आहे.
इ. सायकलपेक्षा स्कूटर महाग आहे पण चारचाकी गाडी सर्वात महाग आहे.
ई. महाराष्ट्रापेक्षा मध्यप्रदेश लहान आहे पण गोवा त्यापेक्षाही लहान राज्य आहे.
उ. सोन्यापेक्षा चांदी स्वस्त आहे पण तांबे चांदीपेक्षा स्वस्त आहे.

४ ख. अ. पासून, आ. पासून...पर्यंत, इ. पासून, ई. पर्यंत, उ. पासून...पर्यंत,
ऊ. पासून...पर्यंत, ए. कधीपासून, ॲ. पासून...पर्यंत, ऐ. पासून...पर्यंत, ओ. पासून,
ऑ. पासून...पर्यंत, औ. पासून...पर्यंत

५ क. अ. फलोत्पादन : कॅनिंग युनिट, टेम्पो खरेदी, शीतगृह, कच्चा माल, तयार माल, निर्यात
आ. उपभोक्ता कर्ज : पगाराची स्लिप, कर्ज फेडण्याची क्षमता, लग्नासाठी कर्ज, आयकर इ॰
इ. शेतीपूरक उद्योग : बायोगॅस प्लांट, कुक्कुटपालन, वनशेती, दुभती जनावरे खरेदी, हत्यारे, साधने, शेतजमीन
ई. जमीनखरेदीसाठी : गहाण खत, सात बारा उतारा, बिगर शेतजमीन प्रमाणपत्र, इ॰
उ. व्यवसायासाठी / उद्योगासाठी : यंत्रसामग्री, खेळते भांडवल, व्यवसाय परवाना, दुकानाचा परवाना, कच्चा माल, भागीदारी करार, स्टॉक स्टेटमेंट, सुटे भाग उत्पादन, वार्षिक उलाढाल, नफातोटा पत्रक इ॰
ऊ. वाहतूक साधनांसाठी : वाहन परवाना, वाहतूक परवाना, स्कूल व्हॅन, मागणी पत्र, वाहन खरेदी

६ क. अ. ४, आ. ३, इ. २, ई. १

ख. अ. १३, आ. १०, इ. १, ई. १२, उ. ९, ऊ. २, ए. ११, ॲ. ३, ऐ. ७,
ओ. १४, औ. ६, अं. ४, अ:. ५

ग. अ. – १, आ. – २, नैसर्गिक साधनसंपत्ती (खाणीतून धातू, जंगलातून कोळसा, समुद्रातून खनिजतेल, पाण्यापासून वीज), कच्चा माल, यंत्रसामग्री, व्यापारी, ग्राहक

# पाठ ९

१ **ख.** अ. जर तुम्ही कर्जवसुली करून दाखवली(त) तर तुमचा सत्कार करतील.
आ. ग्राहकांच्या अडचणी समजून घेतल्या तर कर्जवसुली जास्त चांगली होईल.
इ. मराठी शिकलास तर ग्राहकांशी चांगला संवाद साधू शकशील.
ई. जर कर्ज फेडण्याची क्षमता असेल तर यंत्रखरेदीसाठी कर्ज घे.
उ. त्यांनी जर बचत केली असती तर कर्जाचा हप्ता ते भरू शकले असते.

**ग.** १. जेव्हा काम संपले तेव्हा शिवकुमारने संगणक बंद केला.
२. शिवकुमारने ग्राहकाची अडचण समजून घेतली तेव्हा त्याच्या रागाचा पारा खाली आला.
३. श्रीमती बोराडेंनी फोन केला होता तेव्हा बँक बंद झाली होती.
४. रिझर्व बँक जेव्हा रेपो दरात कपात करेल तेव्हा बँका कमी दराने कर्जे देऊ शकतील.
५. जेव्हा कर्जवसुलीचे प्रमाण कमी झाले तेव्हा शाखेचा नफाही कमी झाला.
६. कॅशला जेव्हा फरक लागतो तेव्हा कॅशिअरलाच जबाबदार धरले जाते.
७. कर्जावरील व्याजाचे दर जेव्हा कमी झाले तेव्हा कर्जासाठी ग्राहकांची मागणी वाढली.

**घ.** अ. जसा...जसे, आ. जशा...तशा, इ. जसा...तशी, ई. जसे...तसे, उ. जसं...तसा,
ऊ. जसे...तसा, ए. जशी...तशी

२ **ख.** अ. बरोबर, आ. चूक, इ. चूक, ई. बरोबर

**ग.**

| भाववाचक नामे | | | |
|---|---|---|---|
| ए॰व॰ | अ॰व॰ | ए॰व॰ | अ॰व॰ |
| ती बारकाई | त्या बारकाया | ती पद्धत | त्या पद्धती |
| ती पत | - | ती उलाढाल | त्या उलाढाली |
| तो आढावा | ते आढावे | ती इच्छा | त्या इच्छा |
| तो अंदाज | ते अंदाज | ती अडचण | त्या अडचणी |
| ती मदत | त्या मदती | ती गरज | त्या गरजा |
| ती सवलत | त्या सवलती | ते धोरण | ती धोरणे |
| तो विश्वास | - | | |

**घ.** अ. गोंधळ, आ. सवलत, इ. आशा, ई. शांतता, उ. विनंती, ऊ. अडचण,
ए. धीर, ॲ. समज, ऐ. धांदल

३ **ख.** अ. ३, ४, आ. १, इ. १,२,३,४,५, ई. २,३,४, उ. ३, ऊ. ३, ए. १,२,३,४

**छ.** अ. देणं, आ. घालणं, इ. समजणं, ई. साधणं, उ. करणं, ऊ. करणं, ए. देणं,
ॲ. होणं, ऐ. घडवणं, ओ. म्हणणं

४ **ख.** अ. अनुत्पादित, आ. अनुत्पादित, इ. बुडीत, ई. अनुत्पादित, उ. बुडीत

५ **ख.** अ. घेण्यामुळे, आ. व्यायामामुळे, इ. बोलण्यामुळे, ई. पैशांमुळे, ऊ. कशामुळे,
ए. कोणामुळे, ॲ. सूचनांमुळे, ऐ. ओरडण्यामुळे

६ **ख.** अ. पुरेशी, आ. पुरेशी, इ. पुरता, ई. पुरता, उ. पुरते / पुरतं, ऊ. पुरता,
ए. भरण्यापुरते / भरण्यापुरतं, ॲ. पिण्यापुरते / पिण्यापुरतं, ऐ. रिक्षाभाड्यापुरते, खरेदीपुरते,
ओ. गरजेपुरते

७ **ख.** अ. अशक्य, आ. बहुतेक, इ. कदाचित, ई. बहुधा, उ. खात्रीने, ऊ. नक्की

८ **क.** अ. १, आ. ९, इ. ३, ई. ८, उ. ७, ऊ. २, ए. ४, ॲ. ५, ऐ. ६

## पाठ १०

१ **ख.**

| मूळ धातू + आयचा | क्रियापदाचे रूप | मूळ धातू + आयला | क्रियापदाचे रूप |
|---|---|---|---|
| आठव + आयचा | आठवायचा | भर + आयला | भरायला |
| शोध + आयचा | शोधायचा | जुळव + आयला | जुळवायला |
| जा + आयची | जायची | टाक + आयला | टाकायला |
| कर + आयचं | करायचं | जेव + आयला | जेवायला |
| वाचव + आयचा | वाचवायचा | कर + आयला | करायला |
| कर + आयचा | करायचा | पेल + आयला | पेलायला |
| | | दे + आयला | द्यायला |

**च.** अ. डोकेदुखी, आ. मानदुखी, इ. कंबरदुखी, ई. दातांचे विकार, उ. हृदयविकार,
ऊ. पाठदुखी, ए. मधुमेह, ॲ. उच्च रक्तदाब, ऐ. मनगट दुखणे / आखडणे

२ **ख.** १. ख, २. ग, ३. झ, ४. ट, ५. ठ, ६. ड, ७. घ, ८. त, ९. ढ,
१०. च, ११. ण, १२.न, १३. थ, १४. द, १५. क, १६. प, १७. फ, १८. ब,
१९. छ, २०. ज, २१. ध

३ **ख.** अ. अरे, मित्रा, आ. अगं, वसुधा, इ. श्रोतेहो, ई. ओ भाऊ, उ. चला, मुलांनो

४ **ख.** दोन : दुप्पट, तीन : तिप्पट, चार : चौपट, पाच : पाच पट, सहा : सहापट,
सात : सातपट, आठ : आठपट, नऊ : नऊपट, दहा : दहापट किंवा दसपट

**ग.** अ. सगळ्या, आ. दुप्पट, इ. एकेकाला, ई. दोघींच्या, उ. निम्मी / निमपट,
ऊ. खूप, ए. तिघीं

**घ.** अ. ३, आ. ६, इ. १०, ई. ९, उ. ८, ऊ. ४, ए. २, ॲ. ५, ऐ. १, ओ. ७

५ **क.** अ. अरेच्चा! आ. काय सांगताय! इ. अरेरे! ई. छान! उ. हो ना! ऊ. खरंच!
ए. हो ना! ॲ. अय्या! ऐ. कमालच! ओ. छे! छे! ऑ. खरंच! औ. काय!
ऋ. किमया! अं. अरेच्चा! अः. बिचारा!

**ख.** अ. खरं की काय! आ. बापरे! इ. हो ना! ई. ओ हो! उ. अरेच्चा!
ऊ. कमाल आहे! ए. छे! छे! ॲ. खरंच!

६ **ग.** परप्रांतातून येऊन ते इथल्या वातावरणात मिसळले. सगळी कामं भराभर शिकून घेतली आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ते मराठी शिकले. सगळ्यांशी चांगले संबंध राखले. आपल्या सगळ्यांना शिवकुमार आपल्या शाखेत हवे आहेत. पण त्यांना पुढे प्रगती करायची आहे, बढती घ्यायची आहे. त्यासाठी ही बदली त्यांना उपयोगी ठरणार आहे. मला खात्री आहे, की वर्षभरातच ते परीक्षा देऊन बढती मिळवतील. त्यांच्या आजरा शाखेतील कामासाठी आणि पुढच्या प्रगतीसाठी मी त्यांना शुभेच्छा देतो.

**घ.** ३, ६, २, ९, १०, ५, १, ४, ७, ८, ११

# ध्वनिमुद्रित उतारे व संवाद यांचे प्रतिलेखन ।
# TRANSCRIPTS

## पाठ २ - दैनंदिन कामकाज

**१. घ. कोणता अंक ऐकला? त्याभोवती गोल करू या. Listen and circle the number.**

अ. अठरा
आ. एकतीस
इ. चोवीस
ई. एकोणचाळीस
उ. अडतीस

## पाठ २ - दैनंदिन कामकाज

**३. किती वाजले?**

**घ. बँकेच्या कामकाजाच्या वेळा**

**अ. ऐकू या व योग्य पर्याय निवडू या. Listen and select the correct option.**

**किती वाजता?**

शिवकुमार : या, थोरातबाई.
थोरातबाई : बँक किती वाजता उघडते हो?
शिवकुमार : नाईन थर्टी.
थोरातबाई : म्हणजे ओ काय?
शिवकुमार : अहो सातपुतेबाई, या थोरातबाईंना सांगा ना!
सातपुते : सांगा की त्यांना, बँक साडेनऊला उघडते. आणि साडेतीनला काऊंटर बंद होतात.
थोरातबाई : आणि जेवणाची सुट्टी कधी असते?
सातपुते : सांगा ना, शिवकुमारसाहेब. येतं की तुम्हाला!
शिवकुमार : हो. हो. दीड वाजता. अर्धा तास सुट्टी असते.
सातपुते : पण बँकेचं कामकाज चालू असतं. एक काऊंटर चालू असतो. थोरातबाई, काय लॉकर उघडायचाय का तुम्हाला? चार वाजेपर्यंत कधीही उघडता येईल. अहो शिवकुमारसाहेब, पावणेचारला माझ्या मुलीच्या शाळेची बस तिला इथे सोडते. मी पाच मिनिटांत तिला घेऊन येऊ का?
शिवकुमार : पावणेचार म्हणजे तीन पंचेचाळीस ना?
सातपुते : हो. बरोबर. येतंय की तुम्हाला घड्याळ!

शिवकुमार : थोरातबाई, किल्ली आणली आहे ना लॉकरची? या इकडे.
थोरातबाई : शिवकुमारसाहेब, शनिवारी बँक कधी उघडते हो?
शिवकुमार : त्याच वेळेला उघडते आणि पूर्णवेळ चालू असते. पण दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी सुट्टी असते.
थोरातबाई : म्हणजे शनिवारीसुद्धा एक-दीड वाजता आलं तरी चालतंय की!

## पाठ ३ - क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड

### २. ग्राहकांच्या शंका

**क. खालील संवाद ऐकू या व त्याखालील तक्ता भरू या. Listen and fill in the table below.**

**संवाद अ.**

गोंधळेकर : या पासबुकातल्या नोंदी कळत नाहीयेत. जरा सांगता का, शिवकुमारसाहेब?
शिवकुमार : कुठली नोंद? दाखवा बरं मला.
गोंधळेकर : हे पाहा, By INTT. म्हणजे काय?
शिवकुमार : By म्हणजे जमा. आणि INTT म्हणजे व्याज. तुमच्या खात्यात व्याज जमा झालं आहे.
गोंधळेकर : बरं... आता हे सांगा. १०/०४/२०१९ ची नोंद आहे.
शिवकुमार : अहो, तुम्ही दुसऱ्या खात्यात पैसे पाठवल्याची ती नोंद आहे. आणि ही बघा, ही नोंद आहे तुम्ही कुणाला तरी चेक दिला होता तो तुमच्या खात्यात डेबिट पडलाय. To म्हणजे डेबिट, CLG म्हणजे क्लिअरिंग. दुसऱ्या बँकेकडून तो चेक क्लिअरिंगमधून आला तो तुमच्या खात्यात नामे टाकला आहे. बरोबर आहे ना? अजून काही शंका?
गोंधळेकर : हं, काही नाही. धन्यवाद सर!

**संवाद आ.**

तांबोळी : हा चेक मी बरोबर भरलाय का बघता का जरा?
शिवकुमार : रक्कम फक्त आकड्यात लिहिली तुम्ही. अक्षरातही लिहायला पाहिजे.
तांबोळी : हं, आता बघा.
शिवकुमार : चेक क्रॉस करा. म्हणजे कोपऱ्यात दोन तिरक्या रेघा मारा. चेकच्या सुरक्षिततेसाठी.
तांबोळी : तारीख चुकली लिहायला. खोडून बरोबर लिहू का?
शिवकुमार : कुठली तारीख लिहिली आहे? उद्याची ना? मग काय हरकत आहे? आजचीच तारीख लिहायला पाहिजे असं नाही. तुम्ही ज्यांना चेक देणार ते आजच्याऐवजी उद्या चेक त्यांच्या बँकेत भरतील. राहू द्या. खाडाखोड अजिबात चालत नाही चेकवर. जर खाडाखोड केलीत तर चेक पास होणार नाही.

**संवाद इ.**

शिवकुमार : काळेबाई, पैसे भरताना स्लिप नीट भरा. खाते क्रमांक नीट पासबुकात बघून लिहा. नाहीतर दुसऱ्याच खात्यात पैसे जमा होतील.
काळेबाई : किती मोठा आहे तो खाते क्रमांक! चुकतो लिहायला!
शिवकुमार : आणि खाली तुमचा मोबाईल क्रमांक लिहा म्हणजे काही अडचण आल्यास तुम्हाला फोन करता येईल. नोटांचं विवरण भरा. म्हणजे कॅशिअरला पैसे घ्यायला सोयीचं होतं.

### ३. ह्याआधी कुठे होतास तू?

**ढ. फोनवरील संभाषण ऐकून रिकाम्या जागा भरू या. Listen and fill in the blanks.**

**ग्राहक मेळावा**

(मुख्य कार्यालयातून आपटेसाहेबांचा फोन येतो.)

"साबळेसर, तुमच्यासाठी हेडऑफिसमधून फोन आला आहे. तुम्ही ग्राहकांशी बोलत आहात असं सांगू का?"

"नको. घेतो मी फोन. नमस्कार आपटेसाहेब, बोला.

हो, ग्राहक मेळावा आयोजित केलाय. सगळी तयारी झाली आहे. शिपाई आणि इतर कर्मचारी बँकेची सजावट करत आहेत. काही ग्राहकही मदतीला आले आहेत. पाहुण्यांची यादी झालीये. आणि सगळ्यांना आमंत्रणेही गेली आहेत. शिवकुमार थोडंफार मराठी शिकला आहे. तो आत्ता त्याचं भाषण तयार करत आहे. सगळे जण त्याची गंमत करतायत. हो, तोच तो. बनारसहून आला आहे. तुम्ही ओळखता का त्याला? अच्छा! त्याच्या मुलाखतीमुळे तो तुमच्या लक्षात आहे. हो, कामाला चांगलाय मुलगा. ठीक आहे, मी फोन ठेवतो."

## पाठ ६ – बँक लॉकरचे व्यवहार

### १. सेफ डिपॉझिट लॉकर घेताना ...

**छ. खालील संवाद ऐकू या. Listen.**

**लॉकरची किल्ली सांभाळा बरं का!**

साबळे : हं, या भोसलेबाई. कुठला लॉकर घ्यायचा ते ठरलं का? शिवकुमार, तुम्हीपण इकडे या.

भोसलेबाई : हो ठरलं, जरी बाकी सगळं झालं असलं तरी माझा आणि माझ्या मुलीचा असे दोन फोटो द्यायचे आहेत. मुलीच्या आणि माझ्या संयुक्त नावाने लॉकर घेणार आहे. म्हणजे माझी मुलगीसुद्धा लॉकर वापरू शकेल.

साबळे : छान! आता तुमचा प्रश्न होता की एवढी ठेव कशासाठी ठेवायची. त्याआधी एक लक्षात ठेवा की लॉकरची किल्ली, तुमची नमुना सही या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. लॉकर उघडताना जर सही जुळली नाही तर लॉकर उघडता येणार नाही. जर किल्ली हरवली तर दुसरी किल्ली मिळत नाही. लॉकर फोडावाच लागतो. आणि ती सगळी प्रक्रिया अतिशय खर्चिक आणि वेळखाऊ आहे. वकील, साक्षीदार आणि लॉकर ज्या कंपनीने बनवला आहे त्या कंपनीची माणसे अशा सगळ्यांच्या उपस्थितीत ते करावं लागतं आणि त्याला खूप खर्च येतो. तो सगळा खर्च ग्राहकालाच करावा लागतो. त्यासाठी हमी म्हणून ही ठेव बँक घेते आणि भविष्यात कधी गरज पडली तर बँक ते पैसे वापरू शकते.

भोसलेबाई : अगं बाई! बरंच आहे की हे प्रकरण! खूपच कटकट आहे. एका किल्लीसाठी वकील कशाला? फारच व्याप आहे हो!

साबळे : अहो, लगेच एवढ्या चिडू नका. घाबरू नका. तुम्हाला किल्ली किती नीट सांभाळली पाहिजे हे कळावं म्हणून इतकं सविस्तर सांगितलं. जरी तुम्हाला ही कटकट वाटली तरी त्यामागे तुमच्या वस्तूंची काळजी आहे.

भोसलेबाई : पण म्हणूनच कळलं की आमच्या वस्तू लॉकरमध्ये अगदी सुरक्षित आहेत. धन्यवाद साबळेसाहेब. धन्यवाद शिवकुमार. तुम्हीसुद्धा मराठी चांगलं बोलता की. मी उगीचच तुमच्याशी बोलायचं टाळत होते.

### ३. वादविवाद

**क. आता हा संवाद ऐकू या. Listen.**

(अनेक ग्राहक कलकलाट करतायत.)
"अहो काय हे, किती वेळ लावताय! बँक बंद व्हायची वेळ आली तरी अजून रांग आहेच. आम्ही नाही आता रांगेत उभे राहणार. आमच्या वेळेला काही किंमत आहे की नाही? किती कागदपत्रं मागतात हे बँकवाले! कटकट आहे बुवा! हे शिवकुमार मघापासून वटवट करतायत पण रांग काही कमी होत नाही. अहो, मॅनेजरसाहेब जरा बघा, लक्ष घाला. फार झालं आता. नाहीतर आम्हाला तुमच्या हेडऑफिसला तक्रार नोंदवावी लागेल."
साबळे : जरा शांत व्हा. जरा मला बोलू द्याल का? या बचत योजनेला भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल सर्वप्रथम सर्व ग्राहकांचे मी आभार मानतो. आज एकाच दिवशी एवढी गर्दी झाल्यामुळे गडबड झाली आहे. जास्तीचं काम करायला एकदम माणसं कशी मिळणार, तुम्हीच सांगा. पण आपल्या शाखेतला प्रत्येक कर्मचारी याच कामाला लागला आहे. ते कदम तुम्हाला नीट सांगतायत पण तुम्ही त्यांचं ऐकत नाही आहात. वर त्यांच्यावरच ओरडताय. टेबलाभोवती गर्दी केलीत तर कामात अजूनच अडथळे येतील. शिवकुमारनं सर्व कागदपत्रांची यादी लावलेली आहे. त्याप्रमाणे तुम्ही आणली आहेत का सगळी कागदपत्रं? नाही ना? मग आरडाओरडा करू नका. या योजनेची मुदत अजून दोन दिवसांनी वाढवण्यात आली आहे. तेव्हा ज्यांना थांबायला वेळ नाही त्यांनी उद्या सर्व कागदपत्रं घेऊन यावं अशी माझी विनंती आहे. नुसत्या तक्रारी करून आणि कर्मचाऱ्यांबद्दल चुकीची शेरेबाजी करून काहीच साध्य होणार नाही. हे पहा, तुमच्या सहकार्याशिवाय काम सुरळीतपणे पार पडू शकणार नाही.

## पाठ ७ – सण, उत्सव आणि भटकंती

### १. दिन दिन दिवाळी

**क. खालील संवाद ऐकून रिकाम्या जागा भरू या. Listen and fill in the blanks.**

शिवकुमार : आज शहरात वेगळंच वातावरण दिसतंय. लोक उत्साहाने कामाला लागलेत. स्वच्छता, सजावट सुरू झालीये.
कदम : अहो, शिवकुमारसाहेब, दिवाळी आली ना दोन दिवसांवर! त्याची तयारी. आता बघाच तुम्ही. एकदम वेगळंच दिसेल कोल्हापूर. सगळीकडे रोषणाई, पणत्या, दिवे, सडे-रांगोळ्या, आकाशकंदील काही विचारू नका. आता या शहराचं सौंदर्य आणखीच खुलेल.
शिवकुमार : मिठाईसुद्धा करतात का?
कदम : अहो, दिवाळीत इतके पदार्थ करतात की काही विचारू नका.
शिवकुमार : कोणकोणते पदार्थ असतात?
कदम : चकली, चिवडा, वड्या, शेवेचे वेगवेगळे प्रकार आणि कितीतरी! लाडू, शंकरपाळी, चिरोटे, करंजी, अनारसे यांची गोडी तर अहाहा.
शिवकुमार : आणखी काय काय करतात दिवाळीत?
कदम : अहो, बरीच धमाल असते बघा! आणि शिवाय जेवणाव्यतिरिक्त इतर पक्वान्नंही असतातच. माझ्या तोंडाला तर आत्ताच पाणी सुटलंय. दिवाळीत तुम्ही या आमच्याकडे फराळाला.
शिवकुमार : नक्कीच आवडेल मला यायला.
कदम : अहो, शिवकुमारसाहेब, हा नात्यांचा सण आहे. त्यामुळे तुम्हाला आम्ही तुमच्या कुटुंबियांची कमतरता भासू देणार नाही.

शिवकुमार : दिवाळी म्हणजे दिव्यांचा सण हे ऐकलं होतं. पण, नात्यांचा सण म्हणजे?

कदम : म्हणजे असं बघा, दिवाळी चार-पाच दिवस साजरी केली जाते. प्रत्येक दिवशी एकेका नात्याला महत्त्व असतं. नवरा-बायको, वडील-मुलगी यांच्या नात्यासाठी पाडवा, भाऊ-बहिणीच्या नात्यासाठी भाऊबीज. आपल्या महाराष्ट्रात शेतकरी बांधवांसाठी महत्त्वाचा असणारा दिवस म्हणजे वसुबारस. याच दिवशी ते वर्षभर त्यांना मोलाची साथ देणाऱ्या गाई-वासरांची पूजा करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. आणि, दिवाळीच्या निमित्ताने नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांच्या भेटीगाठी तर होतातच. म्हणूनच, सगळी नाती साजरी करण्याचा हा सण आहे.

शिवकुमार : मलाही आता दिवाळीबद्दल खूप उत्सुकता वाटतेय.

### १. दिन दिन दिवाळी

**ठ. संवाद ऐकू या व त्याखालील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहू या. Listen and answer the questions.**

**सण, उत्सव आणि बँकेचे व्यवहार**

साबळे : शिवकुमार, आता दिवाळी जवळ आली आहे. पुढचा आठवडा डिपॉझिट मोबिलायझेशन वीक म्हणजे जास्तीतजास्त ठेवी गोळा करण्याचा सप्ताह असेल. दिवाळीमध्ये बाजारात खूप उलाढाल होते, नफा कमावला जातो, लोकांना बोनस वाटला जातो, शेतकऱ्यांचे सुगीचे दिवस असतात. सगळ्यांना चांगली गुंतवणूक करायची असते. त्यामुळे आपल्याला जास्तीतजास्त ठेवी मिळवायच्या आहेत.

शिवकुमार : मी संभाव्य ग्राहकांची यादी करतो म्हणजे त्यांच्याशी संपर्क साधणे सोपे जाईल.

साबळे : छान! गायकवाडबाईंना मी ठेव सप्ताहाचे एक पत्रक लिहायला सांगितले आहे. ते पण तुम्ही शिकून घ्या. त्याची मोठी पोस्टर्स तयार करून ठिकठिकाणी लावायची आहेत. दिवाळीत आपल्याला दुप्पट काम आहे.

शिवकुमार : साबळेसाहेब, असे अजून कोणते सण आहेत? म्हणजे बँकेतील व्यवहारांसाठी महत्त्वाचे?

साबळे : आपल्या कोल्हापूर जिल्ह्यात शेती खूप आहे. त्यामुळे बैलपोळा हा एक जोरात साजरा होणारा सण आहे. त्यावेळीही आपली उलाढाल वाढते. दसरा, होळी हे तर आहेतच, पण कोल्हापूरची प्रसिद्धी आहे ती म्हणजे कुस्त्यांचे फड आणि लावणी महोत्सव यांसाठी. या दोन्हींसाठी कोल्हापूरचा मराठी माणूस भरपूर पैसे खर्च करतो.

शिवकुमार : हो का? मी ऐकलंय की लावणी हा महाराष्ट्रातील नृत्याचा खास प्रकार आहे. आजच मी एक पत्रक वाचलं की दिवाळीनंतर लगेच कुस्त्यांचे फड लागणार आहेत. मलाही खासबाग मैदान बघायचं आहे.

साबळे : आणि कुस्ती नाही बघायची? इथे मातीतली कुस्ती असते. मॅटवरची नाही. खूप मजा असते. सगळे कोल्हापुरी फेटे बांधून ऐटीत येतात. कुस्तीगिरांना प्रोत्साहन देण्यासाठी फेटे हवेत उडवतात.

## पाठ ९ – कर्जवसुली

### २. कर्जवसुलीसाठी लक्षात घ्यायच्या गोष्टी

**क. ऐकू या व त्यावरील प्रश्नांची उत्तरे देऊ या. Listen and answer the questions.**

सगळ्यात आधी ज्या खात्यामध्ये कर्जवसुली होत नाही त्या कर्जखात्याचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे. कर्जाचे हप्ते येणे नेमके केव्हापासून थांबले आहे ते पाहणे, कर्जासाठी जी कागदपत्रे बँकेने घेतली आहेत ती योग्य आणि पुरेशी आहेत याची खात्री करून घेणे. दिलेल्या कर्जाचा वापर कर्जदाराने योग्य पद्धतीने केला असल्याचे कोणते पुरावे बँकेकडे आहेत ते तपासणे. बाजारातली कर्जदाराची पत, त्याच्या उद्योगाची उलाढाल याचा आढावा घेणे. यावरून कर्जदाराची कर्ज फेडण्याची इच्छा आहे की नाही याचा अंदाज लावता येतो.

जर कर्ज फेडण्याची इच्छा नसलेला कर्जदार असेल तर अशा कर्जवसुलीसाठी वेगळे उपाय योजावे लागतात. पण जर तसे नसेल तर मात्र कर्जदाराच्या अडचणी समजून घेणे, त्या सोडवण्यासाठी त्याला मदत करणे, गरज असेल तर अशा अडचणींतून बाहेर काढण्यासाठी कर्जदाराला योग्य सवलती देऊन कर्जवसुली करणे असे बँकेचे धोरण असावे लागते. तिथे कर्जदाराला एकदम कोर्टात खेचण्याचा काही उपयोग होत नाही.

अशाने ग्राहकांचा विश्वास बँक गमावते आणि कर्जवसुली तर होत नाहीच.

### ३. मराठीत संवाद साधण्याचे फायदे

**क. संवाद ऐकून खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या. Listen and answer the questions.**

**"मराठीत बोलतो हा साहेब?"**

कृष्णाजी कोल्हापुरे : अहो संपतराव, कसं बोलायचं या साहेबाशी? आपल्याला तर काय हिंदीबिंदीत बोलता येत नाही राव.

संपतराव : अहो, हे शिवकुमारसाहेब. यांना येतं मराठीत बोलता. निदान समजतं तर नक्की.

कृष्णाजी : काय सांगताय! मला काय खरं नाही वाटत.

संपतराव : नमस्कार, शिवकुमारसाहेब, या कोल्हापुरेंचं काम आहे तुमच्याकडे.

शिवकुमार : काय अडचण आहे? बोला, सांगा बरं.

कृष्णाजी कोल्हापुरे : शिवकुमारसाहेब, एका मोठ्या गुंत्यात अडकलोय बघा मी. ऊस घेऊन कारखान्याला जाणाऱ्या माझ्या ट्रकला झालाय अपघात. मी लगेच दुसरा ट्रक पाठवून त्या ट्रकातला ऊस ह्या ट्रकात भरून पाठवला. पण मग ट्रक पोचायला उशीर झाला आणि आता कारखान्याचं गेट बंद झालं की हो! घेत नाहीत ते माझा ऊस. ऊस असाच उघड्यावर पडून राहिला तर सुकून जाईल आणि मग त्याचा उतारा कमी पडेल. माझं लई नुकसान होईल बघा. साखर कारखान्याचं खातं तुमच्याकडेच हाय ना? मग बघा की जरा ते तुमचं तरी ऐकतायत का ते!

शिवकुमार : कुठला साखर कारखाना? अच्छा, वारणा साखर कारखाना? हो, आमच्याकडेच आहे खातं. बघू, तिथले मॅनेजर पवारसाहेब आहेत का.

फोनवर : हॅलो पवारसाहेब, अहो त्या कोल्हापुरेंच्या ट्रकला अपघात झालाय. त्यांची अडचण समजून घ्या ना जरा. तुम्ही त्यांचा ऊस नाही घेतलात तर मोठं नुकसान होईल त्यांचं, ते नेहमी येतात ना वेळेवर? आणि आता हंगाम संपलाय ना, नाहीतर उद्यापर्यंत थांबले असते ते. उगीच अडवणूक नका करू. ठीक आहे, सांगू मी त्यांना?

कोल्हापुरे : काय सांगताय साहेब! झालं माझं काम? तुमचे कसे आणि किती आभार मानू मला कळत नाहीये. सांगा मी तुमच्यासाठी काय करू?

शिवकुमार : माझ्यासाठी काही नको पण बँकेसाठी करा. आमच्या शाखेत खातं उघडा. ठेवी ठेवा, गरज असेल तर योग्य कारणासाठी तुम्हाला आम्ही कर्जही देऊ.

कोल्हापुरे : अगदी उद्याच येतो साहेब. तुम्ही माझं लई मोठं काम केलंय. संपतराव, तुमचा खूप आभारी आहे मी. तुम्ही या साहेबांशी गाठ घालून दिलीत. आणि मी मात्र शंका घेत होतो त्यांच्याबद्दल.

दुसऱ्या दिवशी कोल्हापुरेंनी बँकेत खातं तर उघडलंच; शिवाय, तीस लाखांची ठेव ठेवली. अजून आपल्या गावच्या दोन मित्रांनाही खाती उघडायला घेऊन आले. अशी आहे भाषेची करामत!

# शब्दसंग्रह

| | |
|---|---|
| ७/१२ extract (a record / document to describe land ownership) | तो सात बाराचा उतारा, सातबाराचे उतारे / सातबाराच्या उताऱ्या-, सातबाराच्या उताऱ्यां- |
| absence | ती कमतरता, - / कमतरते- |
| abuse | ती शिवी, त्या शिव्या / शिवी-, शिव्यां- |
| accept | पत्करणे |
| accident | तो अपघात, ते- / अपघाता-, अपघातां- |
| accommodate | सांभाळून घेणे |
| account | ते खाते / खातं, ती खाती / खात्या-, खात्यां- |
| acquire forcefully | जप्त करणे |
| admiration, appreciation | ते कौतुक, ती कौतुके / कौतुकं / कौतुका-, कौतुकां- |
| adventure | ते धाडस, ती धाडसे / धाडसं / धाडसा-, धाडसां- |
| adverse | विपरीत |
| advice | तो सल्ला, ते सल्ले / सल्ल्या-, सल्ल्यां- |
| adviser | तो / ती सल्लागार, ते / त्या - / सल्लागारा-, सल्लागारां- |
| affection | ती आपुलकी, - / आपुलकी- |
| agreement | तो करार, ते- / करारा-, करारां- |
| alright | ठीकठाक |
| alternative | तो पर्याय, ते- / पर्याया-, पर्यायां- |
| amount | ती रक्कम, त्या रकमा / रकमे-, रकमां- |
| anger | तो राग, - / रागा- |
| announcement | ती उद्घोषणा, त्या - / उद्घोषणे-, उद्घोषणां-<br>ती घोषणा, त्या घोषणा / घोषणे-, घोषणां- |
| apple | ते सफरचंद, ती सफरचंदे / सफरचंदं / सफरचंदा-, सफरचंदां- |
| appointment | ती नेमणूक, त्या नेमणुका / नेमणुकी-, नेमणुकां- |
| area | तो भाग, ते- / भागा-, भागां- |
| argue | वाद घालणे |
| article | ती वस्तू, त्या - / वस्तू-, वस्तूं- |

| | |
|---|---|
| as per norm / regular | नियमित |
| ask | विचारणे |
| asset, property | ती मालमत्ता, त्या- / मालमत्ते-, मालमत्तां- |
| assurance | ती खात्री, - / खात्री- ते आश्वासन, ती आश्वासने / आश्वासनं / आश्वासना-, आश्वासनां- |
| atmosphere | ते वातावरण, - / वातावरणा- |
| attract attention | लक्ष वेधणे |
| audacious, artistic manner | तो ठसका, - / ठसक्या- |
| authenticity | ती सत्यता, - / सत्यते- |
| available | उपलब्ध |
| avoid | टाळणे |
| avoidance | ती टाळाटाळ, - / टाळाटाळी- |
| awareness | ती जाणीव, त्या जाणीवा / जाणीवे-, जाणीवां- |
| away | लांब, दूर |
| backache | ती पाठदुखी, - / पाठदुखी- |
| balance | ती शिल्लक, - / शिलकी- |
| balance sheet | तो ताळेबंद, ते- / ताळेबंदा-, ताळेबंदां- |
| bank | ती बँक, त्या बँका / बँके-, बँकां- |
| bankruptcy | ती दिवाळखोरी, - / दिवाळखोरी- |
| be | असणे |
| be alert, beware | सावध राहणे |
| be in need | गरज पडणे |
| bear the stress | ताण झेलणे |
| become easy | सोपे / सोपं जाणे |
| become stiff | आखडणे |
| behave | वागणे |
| behind | पाठीमागे |
| belong legally | नावावर असणे |
| beside | शेजारी |

| | |
|---|---|
| bigshot | ते बडे / बडं प्रस्थ, ती बडी प्रस्थे / प्रस्थं / बड्या प्रस्था-, बड्या प्रस्थां- |
| block | गोठवून टाकणे |
| block | गोठवणे |
| blocked | खीळ बसणे |
| blood pressure | तो रक्तदाब, - / रक्तदाबा- |
| bloom / enhance | खुलणे |
| blow / play flying | उडवणे |
| book | ते पुस्तक, ती पुस्तके / पुस्तकं / पुस्तका-, पुस्तकां- |
| boon | ते वरदान, ती वरदाने / वरदानं / वरदाना-, वरदानां- |
| box | ती पेटी, त्या पेट्या / पेटी-, पेट्यां- |
| branch | ती शाखा, त्या- / शाखे-, शाखां- |
| brand new | कोऱ्या करकरीत |
| bravery | ते शौर्य, - / शौर्या- |
| break | मोडणे |
| breathe very fast | धाप लागणे |
| bring | आणणे |
| buffalo | ती म्हैस, त्या म्हशी / म्हशी-, म्हशीं- |
| build | बांधणे |
| build / make with efforts | घडवणे |
| bull | तो बैल, ते- / बैला-, बैलां- |
| bundle | ते गाठोडे / गाठोडं, ती गाठोडी / गाठोड्या-, गाठोड्यां- |
| business | तो धंदा, ते धंदे / धंद्या-, धंद्यां- |
| by all means | सर्वतोपरी |
| bye | टाटा |
| calamity | ते संकट, ती संकटे / संकटं / संकटा-, संकटां- |
| calculation | तो हिशेब, ते- / हिशेबा-, हिशेबां- |
| call | बोलावणे |
| campus | ते आवार, ती आवारे / आवारं / आवारा-, आवारां- |
| cashier | तो / ती रोखपाल, ते / त्या- रोखपाल / रोखपाला-, रोखपालां- |

| | |
|---|---|
| catch | पकडणे |
| cave | ते लेणे / लेणं, ती लेणी / लेण्या-, लेण्यां- |
| cease | ठप्प होणे |
| certain point of time | ती वेळ, त्या वेळा / वेळे-, वेळां- |
| certificate | तो दाखला, ते दाखले / दाखल्या-, दाखल्यां- ते प्रमाणपत्र, ती प्रमाणपत्रे / प्रमाणपत्रं / प्रमाणपत्रा-, प्रमाणपत्रां- |
| chain | ती साखळी, त्या साखळ्या / साखळी-, साखळ्यां- |
| chair | ती खुर्ची, त्या खुर्च्या / खुर्ची-, खुर्च्यां- |
| change | बदलणे |
| chart, table | तो तक्ता, ते तक्ते / तक्त्या-, तक्त्यां- |
| chat with | गप्पा मारणे |
| check, examine | तपासणे |
| cheque | धनादेश |
| chitchat | गप्पा मारणे |
| claim | तो हक्क, ते- / हक्का-, हक्कां- |
| clap | ती टाळी, त्या टाळ्या / टाळी-, टाळ्यां- |
| clear | स्पष्ट |
| clear the doubts | शंकांचे निरसन करणे / होणे |
| close | लावणे (उदा. दरवाजा) |
| closely | जवळून |
| cloud | तो ढग, ते- / ढगा-, ढगां- |
| cold storage | ते शीतगृह, ती शीतगृहे / शीतगृहा-, शीतगृहां- |
| collect, accumulate | साठवणे |
| collection | ते संकलन, ती संकलने / संकलनं / संकलना-, संकलनां- |
| colour shade | ती रंगच्छटा, त्या- / रंगच्छटे-, रंगच्छटां- |
| come | येणे |
| come to fruition | चीज होणे |
| communicative | संवादात्मक |
| comparison | ती तुलना, ते- / तुलने-, तुलनां- |

| | |
|---|---|
| compensation | ती भरपाई, - / भरपाई- |
| complain | तक्रार करणे |
| compliance | ती पूर्तता, - / पूर्तते- |
| complication | तो गुंता, ते गुंते / गुंत्या-, गुंत्यां- |
| compulsion | ती सक्ती, - / सक्ती- |
| computer | तो संगणक, ते- / संगणका-, संगणकां- |
| concept | ती संकल्पना, त्या- / संकल्पने-, संकल्पनां- |
| conclusion | तो निष्कर्ष, ते- / निष्कर्षा-, निष्कर्षां- |
| condition | ती अट, त्या अटी / अटी-, अटीं- |
| consequence | तो परिणाम, ते परिणाम / परिणामा-, परिणामां- |
| consonant | ते अक्षर, ती अक्षरे / अक्षरं / अक्षरा-, अक्षरां- |
| container | तो डबा, ते डबे / डब्या-, डब्यां- |
| contribution | ती वर्गणी, त्या वर्गण्या / वर्गणी-, वर्गण्यां- |
| convenience, facility | ती सोय, त्या सोयी / सोयी-, सोयीं- |
| converse | संवाद साधणे |
| convince | पटवणे |
| cook | स्वयंपाक करणे |
| cool down the anger | रागाचा पारा खाली येणे |
| coolness | तो गारवा, - / गारव्या- |
| cooperation | ते सहकार्य, - / सहकार्या- |
| copy | ती प्रत, त्या प्रती / प्रती-, प्रतीं- |
| corrective measures | ती उपाययोजना, त्या- / उपाययोजने-, उपाययोजनां- |
| costly | खर्चिक |
| costume | तो पोशाख, ते - / पोशाखा-, पोशाखां- |
| cotton | तो कापूस, - / कापसा- |
| count | मोजणे |
| courage | ते धैर्य, - / धैर्या- |
| courtesy | ते सौजन्य, - / सौजन्या- |
| co-worker, colleague | तो / ती सहकारी, ते / त्या- / सहकाऱ्या- , सहकाऱ्यां- |

| | |
|---|---|
| crack, burst | फुटणे |
| crop loan | ते पीककर्ज, ती पीककर्जे / पीककर्जं / पीककर्जा-, पीककर्जां- |
| cross | ओलांडणे |
| cuisine | तो पदार्थ, ते- / पदार्था-, पदार्थां- |
| cuisine | ती खाद्यसंस्कृती, - / खाद्यसंस्कृती- |
| cumulative | संचित |
| curiosity | ती उत्सुकता, - / उत्सुकते- |
| curiosity reaching at its peak | उत्सुकता शिगेला पोचणे |
| current account | ते चालू खाते / खातं, ती चालू खाती / चालू खात्या-, चालू खात्यां- |
| custom | ती प्रथा, त्या- / प्रथे-, प्रथां- |
| customer | तो / ती ग्राहक, ते / त्या- / ग्राहका-, ग्राहकां- |
| cut | ती कपात, त्या कपाती / कपाती-, कपात्यां- |
| dancer | ती नृत्यांगना, त्या- / नृत्यांगने-, नृत्यांगनां- |
| danger | तो धोका, ते धोके / धोक्या-, धोक्यां- |
| dangerous | धोकादायक |
| day before yesterday OR day after tomorrow | परवा |
| death | तो मृत्यू, ते- / मृत्यू-, मृत्यूं- |
| deceive | फसवणे |
| decide | ठरवणे |
| decoration | ती सजावट, त्या सजावटी / सजावटी-, सजावटीं- |
| definitely | नक्की |
| deliberately, intentionally | मुद्दाम |
| demand (n.) | ती मागणी, त्या मागण्या / मागणी-, मागण्यां- |
| demand (v.) | मागणी करणे |
| demand letter | ते मागणीपत्र, ती मागणीपत्रे / मागणीपत्रं / मागणीपत्रा-, मागणीपत्रां- |
| department, section | तो विभाग, ते- / विभागा-, विभागां- |
| depending | अवलंबून |

| | |
|---|---|
| deposit (n.) | ती ठेव, त्या ठेवी / ठेवी-, ठेवीं- |
| deposit (v.) | भरणे |
| deposit money with bank | पैसे ठेवणे |
| deposit receipt | ती पावती, त्या पावत्या / पावती-, पावत्यां- |
| depositor | तो / ती ठेवीदार, ते / त्या - / ठेवीदारा-, ठेवीदारां- |
| despair, disappointment | ती निराशा, - / निराशे- |
| destruction | ती नासाडी, - / नासाडी- |
| detailed | साद्यंत |
| determined, firm | कणखर |
| devastation | ती वाताहत, त्या वाताहती / वाताहती-, वाताहतीं- |
| diabetes | तो मधुमेह, - / मधुमेहा- |
| die | मरणे |
| difference | तो फरक, ते- / फरका-, फरकां- |
| difficult | अवघड |
| difficulty | ती अडचण, त्या अडचणी / अडचणी-, अडचणीं- |
| discussion | ती चर्चा, त्या- / चर्चे-, चर्चां- |
| disorder | तो विकार, ते- / विकारा-, विकारां- |
| distribution | ते वाटप, - / वाटपा-, ते वितरण, - / वितरणा- |
| district | तो जिल्हा, ते जिल्हे / जिल्ह्या-, जिल्ह्यां- |
| do | करणे |
| do the work | काम करणे |
| door | तो दरवाजा, ते दरवाजे / दरवाजा-, दरवाजां- |
| draw a decorative design | रांगोळी काढणे |
| drink | पिणे |
| drool | तोंडाला पाणी सुटणे |
| drop / throw | टाकणे |
| duty | ते कर्तव्य, ती कर्तव्ये / कर्तव्य / कर्तव्या-, कर्तव्यां- |
| earn | कमवणे |

| | |
|---|---|
| earthen pot | ते मडके / मडकं, ती मडकी / मडक्या-, मडक्यां- |
| ease | ती सहजता, - |
| easy | सोपे / सोपं |
| economy | ती अर्थव्यवस्था, त्या- / अर्थव्यवस्थे-, अर्थव्यवस्थां- |
| education | ते शिक्षण, - / शिक्षणा- |
| efficient | कार्यक्षम |
| efforts | ती मेहनत, / मेहनती- |
| elaborately, in details | सविस्तर |
| elephant | तो हत्ती, ते हत्ती / हत्ती-, हत्तीं- |
| enjoy | मजा करणे / येणे |
| enjoyable things | ती गम्मतजम्मत, त्या गमतीजमती / गमतीजमती-, गमतीजमतीं- |
| enjoyment | ती मजा, - / मजे-, ती धमाल, - / धमाली- |
| enmity | ते शत्रुत्व, - / शत्रुत्वा- |
| enthusiasm | तो उत्साह, - / उत्साहा- |
| error | ती त्रुटी, त्या- / त्रुटी-, त्रुटीं- |
| examination | ती परीक्षा, त्या- / परीक्षे-, परीक्षां- |
| examine | तपासणे |
| excessive walking | ती पायपीट, - / पायपिटी- |
| excitement | ती उत्कंठा, - / उत्कंठे- |
| exhaustion | ती दमछाक, - / दमछाकी- |
| expand, grow, enhance | वाढणे |
| expectation | ती अपेक्षा, त्या- / अपेक्षे-, अपेक्षां- |
| expenditure | तो खर्च, ते - / खर्चा-, खर्चां- |
| expensive | किमती |
| experience | तो अनुभव, ते अनुभव / अनुभवा-, अनुभवां- |
| experience imprisonment | तुरुंगाची हवा खाणे |
| expert | तो तज्ज्ञ, ते- / तज्ज्ञा-, तज्ज्ञां- |
| expire | संपणे |
| exploitation | ते शोषण, - / शोषणा- |

| | |
|---|---|
| export | ती निर्यात, त्या निर्याती / निर्याती-, निर्यातीं- |
| extreme curiosity | उत्सुकता दाटणे |
| face abusive comments | शिव्या खाणे |
| facility | ती सुविधा, त्या - / सुविधे-, सुविधां- |
| factory | तो कारखाना, ते कारखाने / कारखान्या-, कारखान्यां- |
| failure | ते अपयश, ती अपयशे / अपयशं / अपयशा-, अपयशां- |
| fake note | ती खोटी नोट, खोट्या नोटा / खोट्या नोटे-, खोट्या नोटां- |
| fall | पडणे |
| fame | ती कीर्ती, - / कीर्ती- |
| family members | ते कुटुंबीय (अ॰व॰) / कुटुंबियां- |
| farewell | तो निरोप समारंभ, ते- / निरोप समारंभा-, निरोप समारंभां- |
| farm | ते शेत, ती शेते / शेतं / शेता- शेतां- |
| farmer | तो शेतकरी, ते शेतकरी / शेतकऱ्या-, शेतकऱ्यां- |
| fast | लवकर |
| fear | ती भीती, - / भीती- |
| feel | भासणे |
| feel hungry | भूक लागणे |
| felicitation | तो सत्कार, ते- / सत्कारा-, सत्कारां- |
| festival | तो उत्सव, ते- / उत्सवा-, उत्सवां- |
| festival with rituals | तो सण, ते- / सणा-, सणां- |
| fight | लढणे |
| fill, deposit, pay | भरणे |
| finger | ते बोट, ती बोटे / बोटं / बोटा-, बोटां- |
| finish, wind up | संपणे / आवरणे |
| first time | प्रथमच |
| fish | तो मासा, ते मासे / माशा-, माशां- |
| fixed deposit, time deposit | ती मुदतठेव, त्या मुदतठेवी / मुदतठेवी-, मुदतठेवीं- |
| flexible | लवचीक |
| flood | तो पूर, ते- / पुरा-, पुरां- |

| | |
|---|---|
| folder | तो फोल्डर, ते- / फोल्डरा-, फोल्डरां- |
| follow the diet | पथ्य पाळणे |
| follow-up | तो पाठपुरावा, - / पाठपुराव्या- |
| for no reason | उगीच |
| foreign | विदेशी |
| forest cultivation | ती वनशेती, - / वनशेती- |
| forget | विसरणे |
| forget to breathe due to excitement | श्वास रोखून पाहणे |
| form | तो आकार, ते - / आकारा-, आकारां- |
| formal | औपचारिक |
| fort | तो किल्ला, ते किल्ले / किल्ल्या-, किल्ल्यां- |
| fortnight | तो पंधरवडा, ते पंधरवडे / पंधरवड्या-, पंधरवड्यां- |
| frankness | तो मोकळेपणा, - / मोकळेपणा- |
| fresh | ताजा |
| friendliness | ते मित्रत्व, - / मित्रत्वा- |
| fright, apprehension | ती धास्ती, - / धास्ती- |
| from where | कुठले / कुठल्या |
| fruit | ते फळ, ती फळे / फळं / फळा-, फळां- |
| fruit production | ते फलोत्पादन, ती फलोत्पादने / फलोत्पादनं / फलोत्पादना-, फलोत्पादनां- |
| fulfil a demand | मागणी पुरवणे |
| fulfil a responsibility / task | पार पाडणे |
| fulfil calculated self-contribution | वाटा उचलणे |
| fulfil or complete a work | पार पाडणे / पडणे |
| futile trip / make several trips to get a work done | तो हेलपाटा, ते हेलपाटे / हेलपाट्या-, हेलपाट्यां- |
| future | ते भविष्य, ती भविष्ये / भविष्यं / भविष्या-, भविष्यां- |
| games | तो खेळ, ते- / खेळा-, खेळां- |
| gather | जमणे, गोळा होणे |

| | |
|---|---|
| generally | सामान्यत: |
| generosity | तो दानशूरपणा, - / दानशूरपणा-, ते औदार्य, - / औदार्या- |
| get angry | चिडणे |
| get annoyed | वैतागणे |
| get bored | कंटाळा येणे |
| get confused | भांबावून जाणे |
| get familiar with | मैत्री करणे |
| get finished | संपणे |
| get frightened | घाबरणे |
| get hurt | मनाला, व्यक्तीला लागणे |
| get in the mood | मूड लागणे |
| get involved in the work | मन लावून काम करणे |
| get prolonged | रेंगाळणे |
| get relieved | सुटका होणे |
| get spoilt | बिघडणे |
| get together | तो मेळावा, ते मेळावे / मेळाव्या-, मेळाव्यां- |
| get, receive | मिळणे |
| give | देणे |
| give information | माहिती देणे |
| give instruction | सूचना देणे |
| give the possession / responsibility | हवाली करणे |
| give, supply | पुरवणे |
| glory | तो थाट, ते- / थाटा-, थाटां- |
| goal | ते उद्दिष्ट, ती उद्दिष्टे / उद्दिष्टं / उद्दिष्टा- , उद्दिष्टां- |
| good wishes | ती शुभेच्छा, त्या- / शुभेच्छे-, शुभेच्छां- |
| goods | तो माल, - / माला- |
| grains | ते धान्य, ती धान्ये / धान्यं / धान्या-, धान्यां- |
| grant deliverance | मुभा देणे |

| | |
|---|---|
| gratitude | ती कृतज्ञता, - / कृतज्ञते- |
| greet | अभिवादन करणे |
| greeting | ते अभिवादन, ती अभिवादने / अभिवादनं / अभिवादना-, अभिवादनां- |
| group | तो समूह, ते- / समूहा-, समूहां- |
| grow / cultivate | पिकवणे |
| guess, making predictions | अंदाज लावणे, अंदाज बांधणे |
| gun | ती बंदूक, त्या बंदुका / बंदुकी-, बंदुकां- |
| half yearly | सहामाही |
| hand | तो हात, ते- / हाता-, हातां- |
| hand cart | ती हातगाडी, त्या हातगाड्या / हातगाडी-, हातगाड्यां- |
| handle | हाताळणे |
| happen | घडणे |
| happiness | ती प्रसन्नता, - / प्रसन्नते- |
| happy | हसताखेळता |
| hard work | ते कष्ट (अ॰व॰) / कष्टां-, ती मेहनत, त्या मेहनती / मेहनती-, मेहनतीं- |
| hardworking nature | तो कष्टाळूपणा, - / कष्टाळूपणा- |
| harsh | खरमरीत |
| harvest | ती सुगी, - / सुगी- |
| harvest season | तो हंगाम, ते- / हंगामा-, हंगामां- |
| haste | ती टिप्परघाई, - / टिप्परघाई-, टिप्परघाई उडणे |
| haste, hastiness | धांदल उडणे |
| have breakfast | नाश्ता करणे |
| have extreme feelings | पारावार न राहणे |
| have lunch | जेवणे |
| have packed lunch | डबा खाणे |
| head | ते डोके / डोकं, ती डोकी / डोक्या-, डोक्यां- |
| head of the department | तो / ती विभागप्रमुख, ते / त्या- / विभागप्रमुखा-, विभागप्रमुखां- |
| headache | ती डोकेदुखी, - / डोकेदुखी- |

| | |
|---|---|
| headgear | तो फेटा, ते फेटे / फेट्या-, फेट्यां- |
| health | ती तब्येत, त्या तब्येती / तब्येती-, तब्येतीं- |
| heap | ती थप्पी, त्या थप्प्या / थप्पी-, थप्प्यां- |
| heir | तो वारसदार, ते- / वारसदारा-, वारसदारां- |
| hello | नमस्कार / नमस्ते |
| help (n.) | ती मदत, - / मदती- |
| help (v.) | मदत करणे |
| here used as ankles | तो पाय, ते- / पाया-, पायां- |
| hesitate | संकोच करणे |
| hesitation, shyness | तो संकोच, - / संकोचा- |
| hide oneself | तोंड लपवणे |
| hinder progress | प्रगती खुंटणे |
| hit against something | शरीराच्या एखाद्या भागाला काहीतरी लागणे (इजा होणे) |
| hit, kill | मारणे |
| home loan | ते गृहकर्ज, ती गृहकर्जे / गृहकर्जं / गृहकर्जा-, गृहकर्जां- |
| honesty | तो प्रामाणिकपणा, - / प्रामाणिकपणा- |
| house | ते घर, ती घरे / घरं / घरा-, घरां- |
| hunger | ती भूक, त्या भुका / भुके-, भुकां- |
| ill effects | तो दुष्परिणाम, ते- / दुष्परिणामा-, दुष्परिनामां- |
| illegal | बेकायदेशीर |
| illness | ते आजारपण, ती आजारपणे / आजारपणं / आजारपणा-, आजारपणां- |
| illusion | तो भ्रम, ते- / भ्रमा-, भ्रमां- |
| immediately | लगेच / ताबडतोब |
| implement | राबवणे |
| implement the scheme | योजना राबवणे |
| importance | ते महत्त्व, - / महत्त्वा- |
| impossible | अशक्य |
| improve | सुधारणे |

| | |
|---|---|
| in | मध्ये |
| in all respects | सर्वस्वी |
| in front of | समोर |
| incident | ती घटना, त्या- / घटने-, घटनां- |
| income | ते उत्पन्न, ती उत्पन्ने / उत्पना-, उत्पन्नां- |
| inconvenience | ती गैरसोय, त्या गैरसोयी / गैरसोयी-, गैरसोयीं- |
| increasingly | उत्तरोत्तर |
| Indian gooseberry | तो आवळा, ते आवळे / आवळ्या-, आवळ्यां- |
| indigenous ghee | ते तूप, - / तुपा- |
| industry | तो उद्योग, ते- / उद्योगा-, उद्योगां- |
| infection | तो संसर्ग, - / संसर्गा- |
| inflation | तो चलनफुगवटा, - / चलनफुगवट्या- |
| inform of the happenings | कानावर घालणे |
| information | ती माहिती, - / माहिती- |
| inquiry | ती चौकशी, त्या चौकश्या / चौकशी-, चौकश्यां- |
| instalment | तो हप्ता, ते हप्ते / हप्त्या-, हप्त्यां- |
| instruction, suggestion | ती सूचना, त्या- / सूचने-, सूचनां- |
| interact, have dialog | संवाद साधणे |
| interest | ते व्याज- / व्याजा- |
| internal | अंतर्गत |
| introduction | ती ओळख, त्या ओळखी / ओळखी-, ओळखीं- |
| invest | गुंतवणे |
| investment | ती गुंतवणूक, त्या गुंतवणुकी / गुंतवणुकी-, गुंतवणुकीं- |
| investor | तो गुंतवणूकदार, ते- / गुंतवणुकदारा-, गुंतवणुकदारां- |
| invite | आमंत्रण देणे |
| jewellery / ornaments | तो दागिना, ते दागिने / दागिन्या-, दागिन्यां- |
| join / attach | जोडणे |
| join the service or job | रुजू होणे |
| joint | संयुक्त |
| keep | ठेवणे |

| | |
|---|---|
| key | ती किल्ली, त्या किल्ल्या / किल्ली-, किल्ल्यां- |
| kindness | तो दयाळूपणा, - / दयाळूपणा- |
| kite | तो पतंग, ते- / पतंगा-, पतंगां- |
| late | तो उशीर, - / उशिरा- |
| laugh | हसणे |
| leaf | ते पान, ती पाने / पानं / पाना-, पानां- |
| learn | शिकणे |
| leave | सोडणे |
| leave (to remain absent on duty) | ती रजा, त्या रजा / रजे-, रजां- |
| legal | कायदेशीर |
| leisurely | आरामात |
| letter | ते पत्र, ती पत्रे / पत्रं / पत्रा-, पत्रां- |
| level | ती पातळी, त्या पातळ्या / पातळी-, पातळ्यां- |
| license | तो परवाना, ते परवाने / परवान्या-, परवान्यां- |
| lighting | ती रोषणाई, - / रोषणाई- |
| like | आवडणे |
| link | तो दुवा, ते दुवे / दुव्या-, दुव्यां- |
| list | ती यादी, त्या याद्या / यादी-, याद्यां- |
| listen, hear | ऐकणे |
| load | तो भार, - / भारा- |
| loan | ते कर्ज, ती कर्जे / कर्जा-, कर्जां- |
| loan recovery | ती कर्जवसुली- / कर्जवसुली- |
| lock | ते कुलूप, ती कुलुपे / कुलुपं, कुलपे / कुलपं / कुलुपा- / कुलपा-, कुलुपां- / कुलपां- |
| look | दिसणे |
| look after | सांभाळणे |
| lose | हरवणे |
| lose the trust | विश्वास गमावणे |
| loss, damage | ते नुकसान / नुकसाना- |
| loss, disadvantage | तो तोटा, ते तोटे / तोट्या-, तोट्यां- |

| | |
|---|---|
| lot of, plenty | खूप |
| lower back pain | ती कंबरदुखी- / कंबरदुखी- |
| loyalty | ती इमानदारी- / इमानदारी- |
| magic | ती करामत, त्या करामती / करामती-, करामतीं- |
| maintain | राखणे |
| make a difference | फरक पडणे |
| make applicable / become applicable | लागू करणे / होणे |
| make someone feel obliged | लाजवणे |
| make someone work | कामाला लावणे |
| management | ते व्यवस्थापन, - / व्यवस्थापना- |
| marriage | ते लग्न, ती लग्ने / लग्नं / लग्ना-, लग्नां- |
| mattress | ती गादी, त्या गाद्या / गादी-, गाद्यां- |
| meal | ते जेवण, ती जेवणे / जेवणं / जेवणा- जेवणां- |
| meal preparation | तो स्वयंपाक, - / स्वयंपाका- |
| means | ते साहित्य, - / साहित्या- |
| meeting on happy notes | त्या भेटीगाठी (अ॰व॰) / भेटीगाठीं- |
| mentality | ती मानसिकता, - / मानसिकते- |
| menu | तो बेत, ते - / बेता-, बेतां- |
| message | तो संदेश, ते- / संदेशा-, संदेशां- |
| method, system | ती पद्धत, त्या पद्धती / पद्धती-, पद्धतीं- |
| meticulously | बारकाईने |
| minute thing | तो बारकावा, ते बारकावे / बारकाव्या-, बारकाव्यां-,<br>ती बारकाई, त्या बारकाया / बारकाई-, बारकायां- |
| mislead | ती दिशाभूल, त्या- / दिशाभुली-, दिशाभुलीं- |
| mission | ते अभियान, ती अभियाने / अभियानं / अभियाना-, अभियानां- |
| mistake | ती चूक, त्या चुका / चुकी-, चुकां- |
| modern | आधुनिक |
| moisture | तो ओलावा, - / ओलाव्या- |
| moment, particular time | ती वेळ, त्या वेळा / वेळे-, वेळां- |

| | |
|---|---|
| money | तो पैसा, ते पैसे / पैशा-, पैशां- |
| money collection | जमा रक्कम / रकमे-, रकमा- |
| money lender | तो सावकार, ते- / सावकारा-, सावकारां- |
| month | तो महिना, ते महिने / महिन्या-, महिन्यां- |
| mortgage deed | ते गहाणखत, ती गहाणखते / गहाणखतं / गहाणखता-, गहाणखतां- |
| motivation | ते प्रोत्साहन, ती प्रोत्साहने / प्रोत्साहनं / प्रोत्साहना-, प्रोत्साहनां- |
| mountain fort | तो गड, ते- / गडा-, गडां- |
| move | सरकणे |
| movie | तो चित्रपट, ते - / चित्रपटा-, चित्रपटां- |
| mud | तो चिखल, - / चिखला- |
| name | ते नाव, ती नावे / नावं / नावा-, नावां- |
| narration | ते निवेदन, ती निवेदने / निवेदनं / निवेदना-, निवेदनां- |
| narrow | अरुंद |
| national park | ते राष्ट्रीय उद्यान, ती राष्ट्रीय उद्याने / उद्यानं / राष्ट्रीय उद्याना-, राष्ट्रीय उद्यानां- |
| natural | नैसर्गिक |
| nature, attitude | तो स्वभाव, - / स्वभावा- |
| neat and tidy | सुव्यवस्थित |
| neat, proper | नीट |
| necessary | आवश्यक |
| neck | तो गळा, ते गळे / गळ्या-, गळ्यां-, ती मान, त्या माना / माने-, मानां- |
| need | ती गरज, त्या गरजा / गरजे-, गरजां- |
| need desperately | एखादी गोष्ट नेहमी खाण्यासाठी लागणे (हवी असणे) |
| needy | तो गरजू, ते- / गरजू-, गरजूं- |
| no objection certificate | ते ना हरकत प्रमाणपत्र, प्रमाणपत्रे / प्रमाणपत्रं / प्रमाणपत्रा-, प्रमाणपत्रां- |
| noble thought | तो सुविचार, ते- / सुविचारा-, सुविचारां- |
| nomination | ते नामनिर्देशन |
| nominee | नामित, - / नामिता-, नामितां- |

| | |
|---|---|
| non-operative | अनुत्पादित |
| non-recoverable | बुडीत |
| nose | ते नाक, ती नाके / नाकं / नाका-, नाकां- |
| not at all | अजिबात |
| not tallying | फरक लागणे |
| not to return, avoid | न फिरकणे |
| notice board, black board | तो फलक, ते- / फलका-, फलकां- |
| nowadays | आजकाल, अलीकडे |
| nuisance | ती कटकट, त्या कटकटी / कटकटी-, कटकटीं- |
| number | ती संख्या, त्या- / संख्ये-, संख्यां- |
| obesity | तो लठ्ठपणा, - / लठ्ठपणा- |
| objection | ती हरकत, त्या हरकती / हरकती-, हरकतीं- |
| observation | ते निरीक्षण, ती निरीक्षणे / निरिक्षणं / निरीक्षणा-, निरीक्षणां- |
| observe silence | शांतता राखणे |
| obstruction | ती अडवणूक, - / अडवणुकी- |
| officer, officer in charge | तो / ती अधिकारी, ते / त्या- अधिकारी / अधिकाऱ्या-, अधिकाऱ्यां- |
| ok / bye | अच्छा |
| old | जुना |
| on time | वेळेवर |
| open | उघडणे |
| opinion | ते मत, ती मते / मतं / मता-, मतां- |
| outdated | कालबाह्य |
| pacify the hunger | भूक भागवणे |
| pain | दुखणे |
| partner, someone to share | तो वाटेकरी, ते / वाटेकऱ्या-, वाटेकऱ्यां- |
| pass comments | शेरेबाजी करणे |
| passbook | खाते पुस्तक |
| patience | तो धीर, - / धीरा- |
| pay attention | लक्ष पुरवणे |

| | |
|---|---|
| pay off (n.) | ती परतफेड, त्या- / परतफेडी-, परतफेडीं- |
| pay off (v.) | फेडणे |
| pen | ते पेन, ती पेने / पेनं / पेना-, पेनां- |
| penalty, fine, suffer a forfeit | तो भुर्दंड, ते- / भुर्दंडा-, भुर्दंडां- |
| pencil | ती पेन्सिल, त्या पेन्सिली / पेन्सिली-, पेन्सिलीं- |
| pensioner | तो निवृत्तीवेतनधारक, ते- / निवृत्तिवेतनधारका-, निवृत्तिवेतनधारकां- |
| peon | तो / ती शिपाई, ते / त्या- / शिपाया-, शिपायां- |
| per month, monthly | मासिक |
| percentage | ती टक्केवारी, त्या टक्केवाऱ्या / टक्केवारी-, टक्केवाऱ्यां- |
| perform a great feat | कमाल करणे |
| period, time | तो वेळ / वेळा- |
| permission | ती परवानगी, त्या परवानग्या / परवानगी-, परवानग्यां- |
| persistently | नेटाने |
| person | ती व्यक्ती, त्या- / व्यक्ती-, व्यक्तीं- |
| physiological needs | तो शरीरधर्म, ते- / शरीरधर्मा-, शरीरधर्मां- |
| place | ते गाव, ती गावे / गावं / गावा-, गावां- |
| place | ते ठिकाण, ती ठिकाणे / ठिकाणं / ठिकाणा-, ठिकाणां-,<br>ती जागा, त्या - / जागे-, जागां- |
| plan | तो आराखडा, ते आराखडे / आराखड्या-, आराखड्यां- |
| plan a special event | बेत करणे |
| planning | ते नियोजन, - / नियोजना- |
| plenty | खूप |
| plough | नांगरणे |
| pocket | तो खिसा, ते खिसे / खिशा-, खिशां- |
| point | तो मुद्दा, ते मुद्दे / मुद्द्या-, मुद्द्यां- |
| poise, show | ती ऐट, - / ऐटी- |
| policy | ते धोरण, ती धोरणे / धोरणं / धोरणा-, धोरणां- |
| politeness | ती नम्रता, - / नम्रते- |
| poor | गरीब |

| | |
|---|---|
| pop up the reactions | प्रतिक्रिया उमटणे |
| popular | लोकप्रिय |
| possibility | ती शक्यता, त्या- / शक्यते-, शक्यतां- |
| possibly | कदाचित |
| post | ते पद, ती पदे / पदं / पदा-, पदां- |
| poultry | ते कुक्कुटपालन, - / कुक्कुटपालना- |
| poverty | ती गरिबी, - / गरिबी- |
| practice | तो सराव, ते- / सरावा-, सरावां- |
| preparation | ती तयारी, - / तयारी- |
| presence | उपस्थिती, - / उपस्थिती- |
| prestigious | प्रतिष्ठित |
| priority | ते प्राधान्य, ती प्राधान्ये / प्राधान्यं / प्राधान्या- |
| prison | तो तुरुंग, ते- / तुरुंगा-, तुरुंगां- |
| probably | बहुधा, बहुतेक |
| problem | ती समस्या, त्या- / समस्ये-, समस्यां- |
| proceedings | ती कारवाई, त्या कारवाया / कारवाई-, कारवायां- |
| process | ती प्रक्रिया, त्या- / प्रक्रिये-, प्रक्रियां- |
| procession | ती मिरवणूक, त्या मिरवणुका / मिरवणुकी-, मिरवणुकां- |
| procrastinate | ती चालढकल, - / चालढकली- |
| production chain | ती उत्पादन साखळी, उत्पादन साखळ्या / उत्पादन साखळी-, उत्पादन साखळ्यां- |
| profession | तो व्यवसाय ते- / व्यवसाया-, व्यवसायां- |
| professional | व्यावसायिक |
| profit | तो नफा, ते नफे / नफ्या-, नफ्यां- |
| programme | तो कार्यक्रम, ते- / कार्यक्रमा-, कार्यक्रमां- |
| progress | ती प्रगती, - / प्रगती- |
| prolonged ailment | ती व्याधी, त्या- / व्याधी-, व्याधीं- |
| prominently | प्रकर्षाने |
| promotion | ती बढती, त्या बढत्या / बढती-, बढत्यां- |
| proof | तो पुरावा, ते पुरावे / पुराव्या-, पुराव्यां- |

| | |
|---|---|
| prosperity | ती भरभराट, - / भरभराटी-, ती समृद्धी, - / समृद्धी- |
| proved to be a boon | वरदान ठरणे |
| provision | ती तरतूद, त्या तरतुदी / तरतुदी-, तरतुदीं- |
| public sector | ते सार्वजनिक क्षेत्र, ती सार्वजनिक क्षेत्रे / क्षेत्रं / क्षेत्रा-, क्षेत्रां- |
| pull | ओढणे |
| purchase | खरेदी करणे |
| put | ठेवणे |
| quality | ती गुणवत्ता, - / गुणवत्ते- |
| quarrel | ते भांडण, ती भांडणे / भांडणं / भांडणा-, भांडणां- |
| quarterly | तिमाही, त्रैमासिक |
| question | तो प्रश्न, ते- / प्रश्ना-, प्रश्नां- |
| queue | ती रांग, त्या रांगा / रांगे-, रांगां- |
| quickly | पटकन, झटपट |
| quickness, swiftness | तो झपाटा, - / झपाट्या- |
| raid | तो छापा, ते छापे / छाप्या-, छाप्यां- |
| rate | तो दर, ते- / दरा-, दरां- |
| raw material | तो कच्चा माल, - / कच्च्या माला- |
| reach | पोचणे |
| read | वाचणे |
| reason, cause | ते निमित्त, ती निमित्ते / निमित्तं / निमित्ता-, निमित्तां- |
| receipt | ती पावती, त्या पावत्या / पावती-, पावत्यां- |
| recess, holiday, break | ती सुट्टी, त्या सुट्ट्या / सुट्टी-, सुट्ट्यां- |
| recession | ती मंदी, - / मंदी- |
| recline | रेलणे |
| record | ती नोंद, त्या नोंदी / नोंदी-, नोंदीं- |
| refreshment | ती तरतरी, - / तरतरी- |
| regional | क्षेत्रीय |
| register | नोंदवणे |
| relax | लोळणे |
| relief | तो दिलासा, - / दिलाश्या- |

| | |
|---|---|
| relieve | सोडणे |
| remarkable | उल्लेखनीय |
| remedy | तो इलाज, ते- / इलाजा-, इलाजां- |
| remove, withdraw | काढणे |
| repair | ती दुरुस्ती, त्या दुरुस्त्या / दुरुस्ती-, दुरुस्त्यां- |
| repeatedly coming in mind | डोक्यात / मनात फेर धरणे |
| request | ती विनंती, त्या विनंत्या / विनंती-, विनंत्यां- |
| reserve forest | ते अभयारण्य, ती अभयारण्ये / अभयारण्यं / अभयारण्या-, अभयारण्यां- |
| residential | निवासी |
| residential area | तो निवासी परिसर, ते - / निवासी परिसरा-, निवासी परिसरां- |
| resignation | तो राजीनामा, ते राजीनामे / राजीनाम्या-, राजीनाम्यां- |
| resource | ते संसाधन, ती संसाधने / संसाधनं / संसाधना-, संसाधनां- |
| respect | तो आदर, - / आदरा- |
| response | तो प्रतिसाद, ते- / प्रतिसादा-, प्रतिसादां- |
| responsibility | ती जबाबदारी, त्या जबाबदाऱ्या / जबाबदारी-, जबाबदाऱ्यां- |
| rest, relaxation | ती विश्रांती, - / विश्रांती- |
| restructuring | ती पुनर्रचना, त्या- / पुनर्रचने-, पुनर्रचनां- |
| retirement | ती सेवानिवृत्ती, - / सेवानिवृत्ती- |
| return | माघारी |
| revenue | तो महसूल, - / महसुला- |
| review | तो आढावा, ते आढावे / आढाव्या-, आढाव्यां- |
| ring | वाजणे |
| risk | ती जोखीम, त्या जोखमी / जोखमी-, जोखमीं- |
| rivalry | ते शत्रुत्व / शत्रुत्वा- |
| role | ती भूमिका, त्या- / भूमिके-, भूमिकां- |
| rumour | ती अफवा, त्या- / अफवे-, अफवां- |
| run / pay off | भागवणे |
| run away from the unwanted situation | पळ काढणे |

| | |
|---|---|
| running capital | ते खेळते / खेळतं भांडवल, - / खेळत्या भांडवला- |
| running here and there for work | ती धावपळ, - / धावपळी- |
| rushing liveliness | चैतन्य सळसळणे |
| sack | ते पोते / पोतं, ती पोती / पोत्या-, पोत्यां- |
| salaried | पगारदार |
| salary | तो पगार, ते पगार / पगारा-, पगारां- |
| salt | ते मीठ, - / मिठा- |
| sample | तो नमुना, ते नमुने / नमुन्या-, नमुन्यां- |
| sanctioned limit | ती मर्यादा, त्या - / मर्यादे-, मर्यादां- |
| satisfaction / contentment | ते समाधान, - / समाधाना- |
| sauté | परतणे |
| save | वाचवणे |
| saving account | ते बचत खाते / खातं, ती बचत खाती / बचत खात्या-, बचत खात्यां- |
| say | म्हणणे |
| scholarship | ती शिष्यवृत्ती, त्या शिष्यवृत्या / शिष्यवृत्ती-, शिष्यवृत्यां- |
| scold | रागवणे |
| scratching | ती खाडाखोड, - / खाडाखोडी- |
| scrutiny | ती छाननी, त्या छानन्या / छाननी-, छानन्यां- |
| search | शोधणे |
| security guard | तो / ती सुरक्षारक्षक, ते / त्या- / सुरक्षारक्षका-, सुरक्षारक्षकां- |
| self confidence | तो आत्मविश्वास, - / आत्मविश्वासा- |
| send | पाठवणे |
| separate | वेगवेगळे |
| seriousness | ते गांभीर्य, - / गांभीर्या- |
| shareholder | तो भागधारक, ते- / भागधारका-, भागधारकां- |
| sheep rearing | ते मेंढीपालन, - / मेंढीपालना- |
| shop | ते दुकान, ती दुकाने / दुकानं / दुकाना-, दुकानां- |
| shopkeeper | तो दुकानदार, ते- / दुकानदारा-, दुकानदारां- |
| shoulder | तो खांदा, ते खांदे / खांद्या-, खांद्यां- |

| | |
|---|---|
| shoulder | पेलणे |
| shout | ओरडणे |
| show running in the theatre | चित्रपट लागणे |
| show, indicate | दाखवणे |
| signature | ती स्वाक्षरी, त्या स्वाक्षऱ्या / स्वाक्षरी-, स्वाक्षऱ्यां- |
| silence | ती शांतता, - / शांतते- |
| similarity | ते साम्य, ती साम्ये / साम्यं / साम्या-, साम्यां- |
| sing | गाणे |
| sky | ते आकाश, - / आकाशा- |
| sleep | झोपणे |
| slip book | पैसे भरण्याचे पावती पुस्तक / भरणापुस्तक |
| slowly | हळूहळू |
| small makeshift shop | ती टपरी, त्या टपऱ्या / टपरी-, टपऱ्यां- |
| snake | तो साप, ते- / सापा-, सापां- |
| snake hole | ते वारूळ, ती वारुळे / वारुळं / वारुळा-, वारुळां- |
| social awareness | ती जनजागृती, - / जनजागृती- |
| sound | वाजणे |
| spare parts | तो सुटा भाग, ते सुटे भाग / सुट्या भागा-, सुट्या भागां- |
| spare some time | वेळ देणे |
| speak in high pitch with anger | आवाज चढणे |
| special | खास, विशेष |
| special delicacies made for Diwali | तो फराळ, ते- / फराळा-, फराळां- |
| specimen | तो नमुना, ते नमुने / नमुन्या-, नमुन्यां- |
| spit | थुंकणे |
| spondyl, vertebra | तो मणका, ते मणके / मणक्या-, मणक्यां- |
| spontaneous | उत्स्फूर्त |
| sportsman | तो खेळाडू, ते- / खेळाडू-, खेळाडूं- |
| spread | पसरवणे |
| square | तो चौक, ते - / चौका-, चौकां- |
| start | सुरुवात करणे |

| | |
|---|---|
| start work | कामाला लागणे |
| start, light | लावणे (उदा॰ पंखा, ट्यूबलाईट) |
| start, move | निघणे |
| statement of account | तो खातेउतारा, ते खातेउतारे / खातेउताऱ्या-, खातेउताऱ्यां- |
| statue | तो पुतळा, ते पुतळे / पुतळ्या-, पुतळ्यां- |
| step | तो टप्पा, ते टप्पे / टप्प्या-, टप्प्यां- |
| stomach | ते पोट, ती पोटे / पोटं / पोटा-, पोटां- |
| stone | तो दगड, ते- / दगडा-, दगडां- |
| stop, wait | थांबणे |
| story | ती गोष्ट, त्या गोष्टी / गोष्टी-, गोष्टीं- |
| stress | तो तणाव, ते- / तणावा-, तणावां- |
| strong | भरभक्कम |
| study | तो अभ्यास,- / अभ्यासा- |
| study | अभ्यासणे |
| sub region | तो प्रभाग, ते- / प्रभागा-, प्रभागां- |
| subject | तो विषय, ते- / विषया-, विषयां- |
| successful | यशस्वी |
| suddenly | अचानक |
| suffering from a prolonged ailment | व्याधी जडणे |
| sugar | ती साखर, त्या साखऱ्या / साखरे-, साखऱ्यां- |
| suitable, proper | योग्य |
| sunrays | ते उन्ह, ती उन्हे / उन्हं / उन्हा-, उन्हां- |
| supplementary | पूरक |
| supplier | तो पुरवठादार, ते- / पुरवठादारा-, पुरवठादारां- |
| support | तो आधार, ते आधार / आधारा-, आधारां- |
| surely | निश्चितपणे |
| surprise | ते आश्चर्य, ती आश्चर्ये / आश्चर्यं / आश्चर्या-, आश्चर्यां- |
| survey | ते सर्वेक्षण, ती सर्वेक्षणे / सर्वेक्षणं / सर्वेक्षणा-, सर्वेक्षणां- |
| sweet dish | ते पक्वान्न, ती पक्वान्ने / पक्वान्नं / पक्वान्ना-, पक्वान्नां- |

| | |
|---|---|
| sweetness | ती गोडी, - / गोडी- |
| synonymous | समानार्थी |
| syrup | ते सरबत, ती सरबते / सरबतं / सरबता-, सरबतां- |
| system | ती प्रणाली, त्या- / प्रणाली-, प्रणालीं- |
| take advantage | फायदा घेणे |
| take cognizance | दखल घेणे |
| take legal action | कोर्टात खेचणे |
| take time | वेळ लागणे |
| taking into account | एकंदरीत |
| talk, lecture, speech | ते भाषण, ती भाषणे / भाषणं / भाषणा-, भाषणां- |
| tally | जुळणे, पडताळून पाहणे |
| tamarind | ती चिंच, त्या चिंचा / चिंचे-, चिंचां- |
| targeted | संकल्पित |
| taste (n.) | ती चव, त्या चवी / चवी-, चवीं- |
| taste bitter, sweet, spicy ... (v.) | कडू, गोड, तिखट ... लागणे |
| tea stall | ती चहाची टपरी ती टपरी, त्या टपऱ्या / टपरी-, टपऱ्यां- |
| technician | तो तंत्रज्ञ, ते- / तंत्रज्ञा-, तंत्रज्ञां- |
| tedious task | तो व्याप, ते- / व्यापा-, व्यापां- |
| tell | सांगणे |
| tell the timings | वेळा सांगणे |
| tension, stress | तो ताण, ते- / ताणा-, ताणां- |
| thanks, gratitude | ते आभार अ॰व॰ / आभारा- |
| theft | ती चोरी, त्या चोऱ्या / चोरी-, चोऱ्यां- |
| thing, story | ती गोष्ट, त्या गोष्टी / गोष्टी-, गोष्टीं- |
| thirst | ती तहान, - / तहाने- |
| thought | तो विचार, ते - / विचारा-, विचारां- |
| throat | तो घसा, ते घसे / घशा-, घशां- |
| tiffin | तो डबा, ते डबे / डब्या-, डब्यां- |
| time | तो वेळ, - / वेळा- |
| time consuming | वेळखाऊ |

| | |
|---|---|
| time deposit | ती मुदतठेव, त्या मुदतठेवी / मुदतठेवी-, मुदतठेवीं- |
| time to time | वेळोवेळी |
| tomorrow | उद्या |
| tool | ते हत्यार, ती हत्यारे / हत्यारं / हत्यारा-, हत्यारां- |
| tools, means | ते साधन, ती साधने / साधनं / साधना-, साधनां- |
| tooth | तो दात, ते- / दाता-, दातां- |
| totally | पूर्णत: |
| tourism | ते पर्यटन, ती पर्यटने / पर्यटनं / पर्यटना-, पर्यटनां- |
| trader | तो व्यापारी, ते - / व्यापाऱ्या-, व्यापाऱ्यां- |
| training | ते प्रशिक्षण, ती प्रशिक्षणे / प्रशिक्षणं / प्रशिक्षणा-, प्रशिक्षणां- |
| transaction | तो व्यवहार, ते - / व्यवहारा-, व्यवहारां- |
| transfer | ती बदली, त्या बदल्या / बदली-, बदल्यां- |
| transformation / change | ते परिवर्तन, ती परिवर्तने / परिवर्तनं / परिवर्तना-, परिवर्तनां- |
| travel | तो प्रवास, ते- / प्रवासा-, प्रवासां- |
| trick | ती युक्ती, त्या युक्त्या / युक्ती-, युक्त्यां- |
| trick, clever idea | ती क्लृप्ती, त्या क्लृप्त्या / क्लृप्ती-, क्लृप्त्यां- |
| trouble | तो त्रास, ते- / त्रासा-, त्रासां- |
| troublesome | त्रासदायक |
| trust | तो विश्वास, - / विश्वासा- |
| trustee | तो विश्वस्त, ते- / विश्वस्ता-, विश्वस्तां- |
| trustworthiness | ती विश्वासार्हता, - / विश्वासार्हते- |
| turnover | ती उलाढाल, त्या उलाढाली / उलाढाली-, उलाढालीं- |
| type | तो प्रकार, ते- / प्रकारा-, प्रकारां- |
| unanimity | ती एकवाक्यता, - / एकवाक्यते- |
| underlined | अधोरेखित |
| understand, know | कळणे, समजणे, समजून घेणे |
| unexpectedly | अनपेक्षित |
| usage | तो वापर, - / वापरा- |
| use | वापरणे |
| valuable | मौल्यवान |

| | |
|---|---|
| valuable things | तो ऐवज, ते- / ऐवजा-, ऐवजां- |
| vault | ती तिजोरी, त्या तिजोऱ्या / तिजोरी-, तिजोऱ्यां- |
| very much | अतिशय |
| virus | तो विषाणू, ते- / विषाणू-, विषाणूं- |
| wait | वाट पाहणे |
| walking the path | ती वाटचाल, त्या वाटचाली / वाटचाली-, वाटचालीं- |
| wear | परिधान करणे |
| week | तो आठवडा, ते आठवडे / आठवड्या-, आठवड्यां- |
| weirdness | तो चमत्कारिकपणा, - / चमत्कारिकपणा- |
| welcome | स्वागत करणे |
| well | ती विहीर, त्या विहिरी / विहिरी-, विहिरीं- |
| well being | ती खुशाली, - / खुशाली- |
| what | काय |
| where | कुठे |
| who | कोण |
| wholesome amount | एकरकमी |
| wife | ती बायको, त्या बायका / बायको-, बायकां- |
| will | ती इच्छा, त्या- / इच्छे-, इच्छां- |
| wise | शहाणा |
| without fail | आवर्जून |
| witness | तो साक्षीदार, ते- / साक्षीदारा-, साक्षीदारां- |
| word | तो शब्द, ते- / शब्दा-, शब्दां- |
| work | ते काम, ती कामे / कामं / कामा-, कामां-, ते कामकाज, - / कामकाजा- |
| work, job | ते काम, ती कामे / कामं / कामा-, कामां- |
| workshop | ती कार्यशाळा, त्या- / कार्यशाळे-, कार्यशाळां- |
| worry, care | ती काळजी, त्या काळज्या / काळजी-, काळज्यां- |
| wrestler | तो कुस्तीगीर, ते- / कुस्तीगिरा-, कुस्तीगिरां- |
| wrist | ते मनगट, ती मनगटे / मनगटं / मनगटा-, मनगटां- |
| write | लिहिणे |
| yearly | वार्षिक |

**COMMUNICATIVE MARATHI FOR BANK EMPLOYEES**

- Marathi text cum workbook for non-native bank employees
- Special focus on vocabulary related to their profession
- A comprehensive glossary with translation in English
- An integrated communicative approach
- For classroom study as well as for self learners
- For adult learners
- Language skills: Listening, understanding, speaking, reading, writing Marathi

## The set contains:

1. Textbook with vocabulary, text types, exercises and glossary
2. Link for audio and audio-visual learning material
   https://mu.ac.in/bankmarathi

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in

मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

9 789354 075193

**Price:** Rs. 500